पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक –६४

सभावृत्तांत

दिनांक – १५/११/२०२१ वेळ –दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **नोव्हेंबर-२०२१** ची मासिक मा.महापालिका सभा **सोमवार** दिनांक **१५/११/२०२१** रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आलेली आहे. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन उपमहापौर

२) मा.कुंदन अंबादास गायकवाड

३) मा.अश्विनी संतोष जाधव

४) मा.राहुल गुलाब जाधव

५) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

६) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

७) मा.गायकवाड निर्मला मनोज

८) मा.सागर बाळासाहेब गवळी

९) मा.अजित दामोदर गव्हाणे

१०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

११) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१२) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१३) मा.फुगे भिमाबाई पोपट

१४) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१५) मा.सावळे सिमा रविंद्र

१६) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

१७) मा.लांडे विक्रांत विलास

१८) मा.गीता सुशिल मंचरकर

१९) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२०) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२१) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२२) मा.अनुराधा गणपत गोरखे

२३) मा.केशव हनुमंत घोळवे

२४) मा.मंगला अशोक कदम

२५) मा.अश्विनी भिमा बोबडे

२६) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२७) मा.संजय बबन नेवाळे

२८) मा.भालेकर प्रविण महादेव

२९) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३०) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३१) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३२) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३३) मा.चिखले सचिन तुकाराम

३४) मा.यादव मीनल विशाल

३५) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३६) मा.प्रमोद कुटे

३७) मा.राजू मिसाळ

३८) मा.शैलजा अविनाश मोरे

३९) मा.बाबर शर्मिला राजू

४०) मा.अमित राजेंद्र गावडे

४१) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४२) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४४) मा.ढाके नामदेव जनार्दन

४५) मा.करुणा शेखर चिंचवडे

४६) मा.भोईर सुरेश शिवाजी

४७) मा.अपर्णा निलेश डोके

४८) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४९) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५०) मा.जयश्री वसंत गावडे

५१) मा.कोमल दिपक मेवानी

५२) मा.शाम गणपतराव लांडे

५३) मा.सुजाता सुनिल पालांडे

५४) मा.योगेश मंगलसेन बहल

५५) मा.कदम निकीता अर्जुन

५६) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

५७) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

५८) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

५९) मा.काळे उषा दिलीप

६०) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६१) मा.निलेश हिरामण बारणे

६२) मा.कलाटे राहुल तानाजी

६३) मा.कलाटे मयूर पांडुरंग

६४) मा.ममता विनायक गायकवाड

६५) मा.कामठे तुषार गजानन

६६) मा.चोंधे आरती सुरेश

६७) मा.कस्पटे संदिप अरुण

६८) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

६९) मा.सविता बाळकृष्ण खुळे

७०) मा.सुनिता हेमंत तापकीर

७१) मा.कुटे निर्मला संजय

७२) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

७३) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

७४) मा.आंगोळकर सागर सुनिल

७५) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

७६) मा.आशा धायगुडे-शेंडगे

७७) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

७८) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

७९) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

८०) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

८१) मा.नवनाथ दत्तू जगताप

८२) मा.संतोष बबन कांबळे

८३) मा.सोनवणे शारदा हिरेन

८४) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

८५) मा. संजय मल्हारराव वाबळे

८६) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

८७) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

८८) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.चारठाणकर, मा.दुरगुडे-उपआयुक्त, मा.कुलकर्णी - सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.देशमुख, शिंदे -सहाय्यक आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

(सभा कामकाज भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा.महापौर सभागृहात उपस्थित नसल्यामुळे मा.उपमहापौर यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

**मा.उपमहापौर** – उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य,मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर, नक्षलवाद्यांनी मणीपुरमध्ये केलेल्या गोळीबारात लष्करातील कमांडींग ऑफीसरसह पाच जवान शहीद तसेच शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे– पद्मविभूषण, महाराष्ट्रभूषण, प्रभाकर जोग – जेष्ठ संगीतकार, लेफ्टनंट ऋषी रंजन सिंग – सीमेवर गस्त घालीत असताना झालेल्या हल्ल्यात शहीद, पांडुरंग चव्हाण – सुरक्षा निरीक्षक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पार्वतीबाई पोपट चिंचवडे – नगरसेविका अश्विनीताई चिंचवडे यांच्या सासुबाई, ह.भ.प. हिरामण श्रीपती गावडे व श्रीमती सुनंदाबाई दत्तात्रय भोईर व काळूराम मुळशीराम गोफणे – नगरसेविका अनुराधाताई गोफणे यांचे सासरे यांचे निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

मा. केशव घोळवे – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.उपमहापौर - श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा. ॲड. मोरेश्वर शेंडगे – सन्मा. आयुक्त, मा. महापौर, सन्मा. सभागृह प्रख्यात शिवशाहीर, इतिहास संशोधक, महाराष्ट्र भुषण, पद्मविभुषण बाबासाहेब पुरंदरे यांचे आज सकाळी निधन झाले आहे. बाबासाहेब पुरंदरे यांचे इतिहास असेल किंवा छत्रपती शिवाजी महाराज यांचा जो अविष्कार आहे जो करिष्मा आहे जो सर्वांसमोर त्यांनी आणला असे बाबासाहेब पुरंदरे यांचे इतिहासात मोठे संशोधन आहे. खुप मोठे योगदान आहे. मी माझ्या शेंडगे कुटुंबाच्यावतीने,

भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

मा. केशव घोळवे – मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व नगरसेवक, सर्व अधिकारी, सर्व पत्रकार बंधु. थोर शिवशाहीर त्याच बरोबर महाराष्ट्र भुषण, पद्मविभुषण आदरणीय बाबासाहेब पुरंदरे यांची आज पहाटे प्राणज्योत मालवली. खरोखरच त्यांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्रावर दु:खाचं मोठं सावट कोसळलेले आहे. त्यांच्या संपूर्ण १०० वर्षाच्या कारकीर्दीमध्ये त्यांचा जीवनपट जर पाहिला तर खरतर राजा शिवछत्रपतींच्या या ग्रंथाच्या माध्यमातुन त्यांनी संपूर्ण देशभर छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, गडकोट किल्ल्यांची माहिती, रचना ही सर्व तरुणांपुढे आणि जनतेपुढे आणण्याचे एक महान कार्य त्यांच्या हातुन घडलेलं आहे. जवळपास पाच लाख ग्रंथ त्याच्या १६ आवृत्त्या घरोघरी पोहोचवण्याचं काम त्यांच्या हातुन घडलेल आहे. एवढंच नाही तर “जाणता राजा” हया महानाटयाच्या माध्यमातुन १५० पेक्षा अधिक कलाकारांना बरोबर घेऊन हत्ती, घोडे, उंट यासह अतिशय यशस्वी असा आणि खरोखरच सर्वांमध्ये स्फुर्ती, प्रेरणा आणि शक्ती निर्माण करणारा, अतिशय रोमांचकारी असा इतिहास त्यांनी देशासमोर आणलेला आहे आणि म्हणुन या इतिहासामुळे त्यांचं माजी पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयी साहेबांनी, यशवंतराव चव्हाण साहेबांनी, वसंतदादा पाटील यांनी सर्व मान्यवरांनी त्यांचं विविध पुरस्कारांच्या माध्यमातुन अभिनंदन केलेलं आहे. एक उत्तुंग असे हे व्यक्तिमत्व आज आपल्यामध्ये नाही. त्यांच्या जाण्याने खुप मोठं महाराषट्राचे, देशाचे नुकसान झालेले आहे. परंतु ते आज जरी आपल्यात नसले तरी त्यांच्यामधील विचार, त्यांच्यामधले लेखन, त्यांच्यामधील ललित लेखन साहित्य त्यांनी वर्षानुवर्षे जपण्यासारखे, रुजवण्यासारखं महान कार्य आपल्या महाराष्ट्रामध्ये केलेल आहे आणि म्हणून मी भारतीय जनता पार्टी कामगार आघाडी व महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने, आपल्या सभागृहाच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली या ठिकाणी अर्पण करतो.

मा. राजू मिसाळ – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. छत्रपती श्रीमंत शिवाजी महाराज यांचे किर्तीवंत अजरामर इतिहास गेले अनेक वर्ष हिंदु जनतेला आपल्या मुखोद्गत वाणीने मंत्रमुग्ध करुन आपले सारे जीवन शिवमय समर्पित करणाऱ्या पद्मविभूषण, तसेच महाराष्ट्र भूषण बाबासाहेब पुरंदरे आज शिवमय लीन होणे आणि ते सुद्धा शताब्दी वर्षात हा देह चंदना समान आपले आयुष्य राष्ट्रकार्य करीता अर्पण केले, त्यांच्या निधनाबद्दल मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे त्यांना भावपुर्ण श्रद्धांजली वाहतो.

मा.नामदेव ढाके – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरं म्हणजे आज आपल्या सगळयांना अतिशय दु:खद असं ज्यांनी खर म्हणजे शिवाजी महाराज यांच्या चरित्रावरती आपलं आयुष्य घालवलं असे शिवशाहीर महाराष्ट्र भुषण, पद्मविभुषण आदरणीय बाबासाहेब पुरंदरे यांचे आज सकाळी १५ नोव्हेंबरला दिनानाथ मंगेशकर रुग्णालय या ठिकाणी उपचार घेत असताना निधन झाले आणि बाबासाहेबांच्या बद्दल बोलायचे झाले तर

जवळपास १२००० हून अधिक व्याख्यानं बाबासाहेबांनी संपूर्ण महाराष्ट्रात केली आणि "जाणता राजा" च्या माध्यमामधुन साडेबाराशेंहून अधिक प्रयोग महानाटयाच्या माध्यमातुन येणा-या पिढीला शिवछत्रपतींचा इतिहास पूर्णपणे ज्ञात व्हावा या साठी त्यांनी मोठं काम महाराष्ट्रभर केलेलं आहे. खरं म्हणजे त्यांच्या अनेक ज्या गोष्टी आहेत पुरंदराची दौलत, पुरंदरची नौबत, गड किल्ल्यांची ऐतिहासीक माहिती, शेलारखिंड असे गडकिल्ल्यांचे संच त्यांच्या या व्याख्यानाच्या आणि पुस्तकाच्या माध्यमातुन आपल्या हया छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासावरती खुप मोठं काम बाबासाहेबांच्या माध्यमातुन संपूर्ण महाराष्ट्रामध्ये केलेलं आहे आणि एका अर्थाने छत्रपती शिवाजी महाराजांचा जो काही इतिहास आहे तो हया नवीन पिढीला अवगत सहजपणे कसा करता येईल या साठी सातत्याने बाबासाहेब पुरंदरेंनी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पुणे जिल्हयामध्ये काम केले आहे आणि म्हणुन आपल्या जिल्हयामध्ये असणारे बाबासाहेब पुरंदरे आदरणीय व्यक्तिमत्व आज ख-या अर्थाने शिवाजी महाराजांचे इतिहासावरती अनेक युवक या छत्रपती शिवाजी महाराजांच्या त्यांच्या वेगवेगळया व्याख्यानाच्या माध्यमतुन, जाणता राजा या प्रयोगाच्या माध्यमातुन या ठिकाणी जोडले गेलेले होते आणि संपूर्ण महाराष्ट्राला आणि पुणे जिल्हयाला एका अर्थाने खुप मोठी हानी बाबासाहेबांच्या जाण्याने झालेली आहे. त्यांच्या जाण्याने संपूर्ण पुणे जिल्हयावरती शोककळा पसरली आहे त्यामध्ये मी स्वत:, आमचा भारतीय जनता पार्टीचा पक्ष, संपूर्ण महानगरपालिका संपूर्ण पदाधिकारी, अधिकारी वर्ग खरं म्हणजे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि त्यांनी या ठिकाणी जे काय शिवाजी महाराजांच्या वरती लिखाण केलेले आहे ते पुढच्या पिढीला शिवाजी महाराजांचा इतिहास कळावा म्हणून याठिकाणी केलेल आहे आणि त्यांच्या ज्या काय आठवणी आहेत, त्यांनी केलेली व्याख्याने असतील काय त्यांनी लिहीलेली पुस्तके असतील त्यामधुन प्रेरणा घेण्याचं काम आपण येणा-या काळात केलं तर मला असं वाटतं की ख-या अर्थानं त्यांना श्रध्दांजली घडेल आणि सर्वांनी मिळुन आता बाबासाहेब पुरंद-यांच्या माध्यमामधुन त्यांचं कार्य करणारी जी मंडळी आहेत त्यांना ख-या अर्थानं मदत करणं त्यांचा वारसा पुढं घेऊन जाण्याचं कार्य आपल्या सर्वांवर आलेलं आहे आणि ते आपण सर्व मिळून हया ठिकाणी महापालिकेचे सभागृह म्हणुन आपण करुया. ख-या अर्थाने हीच खरी भावपूर्ण श्रध्दांजली होईल असं मला या ठिकाणी वाटतं. बाबासाहेब पुरंदरेंच्या जाण्याने खरं म्हणजे इतिहासाला कलाटणी देणारे व्यक्तिमत्व ख-या अर्थाने बाबासाहेब पुरंदरे होते ते गेलं आहे आणि त्यामुळे साहजिकच पिंपरी चिंचवड शहर पुणे जिल्हयामध्ये सगळयांना जे दु:ख झालय ते त्यातुन सावरण्याची ईश्वर त्यांना शक्ती देवो. मी माझ्या संपूर्ण परिवाराच्या वतीने या सभागृहाच्या वतीने आमचे पिंपरी चिंचवड शहराचे अध्यक्ष आमदार महेशदादा लांडगे आणि आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या वतीने या सभागृहामध्ये भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि मा. महापौर मी आपणांस विनंती करतो की ही सभा गुरुवार दि. १८/११/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकुब करावी अशी मी सूचना मांडतो.

मा. केशव घोळवे – आताच पक्षनेते यांनी दिलेल्या सूचनेस मी अनुमोदन देतो.

मा.उपमहापौर – सर्व सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेता ही सभा गुरुवार दि. १८/११/२०२१ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकुब करण्यात येत आहे.

------

**(घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन )**
**उपमहापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक –६४

सभावृत्तांत

(दि.१५/११/२०२१ ची तहकूब सभा)

दिनांक – १८/११/२०२१ वेळ –दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.**१५/११/२०२१** ची तहकूब मा.महापालिका सभा **गुरुवार** दिनांक **१८/११/२०२१** रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आलेली आहे. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन उपमहापौर

३) मा.साधना अंकुश मळेकर

४) मा.अश्विनी संतोष जाधव

५) मा.सारीका शिवाजी सस्ते

६) मा.राहुल गुलाब जाधव

७) मा.बुर्डे सुवर्णा विकास

८) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

९) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१०) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

११) मा.गायकवाड निर्मला मनोज

१२) मा.सागर बाळासाहेब गवळी

१३) मा.बारसे प्रियांका प्रविण

१४) मा.अजित दामोदर गव्हाणे

१५) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१६) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१७) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१८) मा.सावळे सिमा रविंद्र

१९) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२०) मा.लांडे विक्रांत विलास

२१) मा.गीता सुशिल मंचरकर

२२) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२३) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२४) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२५) मा.अनुराधा गणपत गोरखे

२६) मा.केशव हनुमंत घोळवे

२७) मा.मंगला अशोक कदम

२८) मा.तुषार रघुनाथ हिंगे

२९) मा.अश्विनी भिमा बोबडे

३०) मा.भालेकर प्रविण महादेव

३१) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३२) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३३) मा.घोलप कमल अनिल

३४) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३५) मा.चिखले सचिन तुकाराम

३६) मा.यादव मीनल विशाल

३७) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३८) मा.प्रमोद कुटे

३९) मा.राजू मिसाळ

४०) मा.शैलजा अविनाश मोरे

४१) मा.बाबर शर्मिला राजू

४२) मा.अमित राजेंद्र गावडे

४३) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४४) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४५) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४६) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४७) मा.ढाके नामदेव जनार्दन

४८) मा.करुणा शेखर चिंचवडे

४९) मा.भोईर सुरेश शिवाजी

५०) मा.अपर्णा निलेश डोके

५१) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५२) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५३) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

५४) मा.जयश्री वसंत गावडे

५५) मा.कोमल दिपक मेवानी

५६) मा.सुजाता सुनिल पालांडे

५७) मा.योगेश मंगलसेन बहल

५८) मा.कदम निकीता अर्जुन

५९) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६०) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६१) मा.पाडाळे निता विलास

६२) मा.काळे उषा दिलीप

६३) मा.कोकणे संतोष अंकुश

६४) मा.पवार मनिषा प्रमोद

६५) मा.अभिषेक गोविंद बारणे

६६) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६७) मा.निलेश हिरामण बारणे

६८) मा.दर्शिले रेखा राजेश

६९) मा.कलाटे राहुल तानाजी

७०) मा.कलाटे मयूर पांडुरंग

७१) मा.ममता विनायक गायकवाड

७२) मा.चोंधे आरती सुरेश

७३) मा.कस्पटे संदिप अरुण

७४) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

७५) मा.सविता बाळकृष्ण खुळे

७६) मा.सुनिता हेमंत तापकीर

७७) मा.कुटे निर्मला संजय

७८) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

७९) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

८०) मा.आंगोळकर सागर सुनिल

८१) मा.मुंढे उषा अंकुश

८२) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

८३) मा.आशा धायगुडे-शेंडगे

८४) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

८५) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

८६) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

८७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

८८) मा.नवनाथ दत्तू जगताप

८९) मा.संतोष बबन कांबळे

९०) मा.सोनवणे शारदा हिरेन

९१) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

९२) मा. संजय मल्हारराव वाबळे

९३) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

९४) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

९५) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.जितेंद्र वाघ- अति.आयुक्त (२),मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.प्रमोद भोसले-मुख्य लेखापरिक्षक, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.लोणकर, मा.खोत, मा.मा.चारठाणकर, मा.इंदलकर, मा.दुरगुडे-उपआयुक्त, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.कुलकर्णी - सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.देशमुख, शिंदे -सहाय्यक आयुक्त, मा.ओंभासे, मा.भोसले-कार्यकारी अभियंता, मा.गावडे- मुख्य अग्निशामक अधिकारी व मा.पाटील-प्राचार्य (आयटीआय) व मा.पानसरे सुचिता-प्र.क्षेत्रीय अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर –** उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य,मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे – सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, पत्रकार बंधु आज आपले पीएमपीएमपीएल चे जुन्या काळातले पीएमपीएमएलचे माजी अध्यक्ष आणि राष्ट्रीय सुरक्षा स्वयंसेवक संघ आणि आणिबाणीमध्ये ज्यांना अटक झाली होती असे आपल्या रस्टन कॉलनीतील निवृत्तीभाऊ राऊत यांचे आज सकाळी वृध्दापकाळाने दु:खद निधन झालेल आहे त्याचबरोबर चिंचवड गावातील लक्ष्मणराव पेंढारकर उर्फ अप्पा जुन्या काळातील अतिशय नामवंत नाव आहे. अप्पा पेंढारकरांचंसुध्दा निधन झालेलं आहे. आणि आमच्या चिंचवड गावातील ज्येष्ठ ग्रामस्थ हिरामण गावडे यांच निधन झालेलं आहे. त्यांच्या जाण्यामुळे चिंचवड गावातील ग्रामस्थ आणि त्यांचे नातेवाईक असतील त्यांना दु:ख झालेलं आहे . मी सभागृहाच्यावतीने विनंती करतो की आपण हया सर्वांना श्रध्दांजली वाहण्यासाठी उभे रहावे.

मा. ज्ञानदेव थोरात – मा. महापौर, सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर -** सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा. महापौर – सत्काराचा कार्यक्रम घ्यावा.

(मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.स्थायी समिती सभापती, मा.पक्षनेते, मा.विरोधीपक्षनेते व सर्वपक्षाचे गटनेते व पदाधिकारी यांचे हास्ते विशेष कार्याबद्दल कुमारी दुर्गा गणेश मिरजकर, वेदमुर्ती विनायक शेखर रबडे यांचे वतीने त्यांचे वडील श्री. चंद्रशेखर आणि आई हेमांगी यांचा व डॉ. प्रियंका साखरे यांचे वतीने श्री. राम साखरे यांचा सत्कार करणेत आला)

मा.किरण गायकवाड - सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त, सन्मा. सभागृह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अतिरिक्त आयुक्त (२) या पदावरती नुकतेच रुजू झालेले सन्मा. जितेंद्रजी वाघ सभागृहाला आपला परिचय करुन देत आहेत.

मा.जितेंद्र वाघ (अति.आयुक्त (२)) – व्यासपीठावर उपस्थित असलेले मा. महापौर, मा. आयुक्त महोदय आणि सर्व सन्माननीय सदस्य मी जितेंद्र वाघ. मी १९९९ पासुन शासनाच्या सेवेत उपजिल्हाधिकारी संवर्गात कार्यरत होतो. मागच्या दोन वर्षापासुन माझं पद पदोन्नतीवर अप्पर जिल्हाधिकारी हया संवर्गात पदोन्नती झाली असुन तेव्हापासुन या संवर्गात मी कार्यरत आहे. आणि दिनांक १२ नोव्हेंबर २०२१ पासुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अतिरिक्त आयुक्त या पदावर रुजु झालेलो आहे व यापूर्वी नजिकच्या काळात मी महामेट्रोमध्ये वरिष्ठ उप महाव्यवस्थापक या पदावरती कार्यरत होतो. यापूर्वी मी अमरावती, अकोला, जळगाव, अहमदनगर, पुण्यामध्ये यशदा आणि महामेट्रो या ठिकाणी वेगवेगळया ठिकाणी मी काम केले आहे, धन्यवाद.

(महापालिकेच्या निवडणुकीच्या संदर्भात भारत निवडणूक आयोगाने आणि महाराष्ट्र यांच्या वतीने या ठिकाणी निवडणूकीचा मतदार नोंदणीचा उपक्रम कार्यक्रम सुरु केलेला आहे. त्याबाबतची माहिती देणेसाठी जिल्हाधिकारी यांच्या वतीने या ठिकाणी जिल्हयाच्या निवडणूक उपजिल्हाधिकारी मृणालिनी सावंत यांनी सभागृहाला मतदार नोंदणी प्रक्रियेची माहिती दिली. )

मा. मृणालिनी सावंत, (उपजिल्हाधिकारी, निवडणुक) – नमस्कार. पिंपरी चिंचवड शहराच्या प्रथम नागरीक आदरणीय व सन्मा. महापौर ताई, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रशासकीय प्रमुख मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, सभागृहातील सर्व सन्मा. सदस्य मी आज मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य आणि मा. जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी यांच्या वतीने आपल्याला एक आवाहन आणि विनंती करण्यासाठी उपस्थित झाले आहे. सद्यस्थितीत भारत निवडणूक आपल्याला ज्ञात असेल की आपल्या देशामध्ये दोन निवडणूक आयोग आहेत एक भारत निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोग. राज्य निवडणूक आयोग हा प्रत्येक राज्यासाठी वेगळा आहे आणि तो जो आयोग आहे तो स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे महानगरपालिका निवडणुका आणि जिल्हा परिषद निवडणुका याची कामं करत असतो. आणि भारत निवडणूक आयोग हा विधानसभा आणि विधान परिषद निवडणूका, लोकसभेच्या निवडणुका या पहिल्या इलेक्शनच काम पाहतो. या दोन्ही निवडणुकांमध्ये भारत निवडणूक आयोगाची जी मतदार यादी आहे ती वर्षातुन दोनदा प्रसिध्द होत असते. प्रत्येक वर्षी साधारणत: सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये प्रारुप यादी प्रसिध्द होत असते आणि जानेवारीमध्ये आपली अंतिम यादी प्रसिध्द होत असते. ही भारत निवडूक आयोगाची यादी वेगवेगळया राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांसाठी वापरण्यात येते. त्यामुळे ही यादी खूप महत्वाची आहे. आणि सद्यस्थितीत हया यादीचे संक्षिप्त पुर्ननिरीक्षण कार्यक्रम मा. भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेला आहे आणि हया यादीचे तीन टप्पे असतात आणि आपण एक टप्पा पार पाडलेला आहे की १ नोव्हेंबरला प्रारुप मतदार यादी ऑलरेडी प्रसिध्द झालेली आहे. प्रारुप मतदार यादी म्हणजे काय तर हया यादीमध्ये आपल्याला दुरुस्ती करायला स्कोप आहे किंवा चान्स आहे. आणि त्याबाबतचे जे दावे हरकती दावे म्हणजे नवीन अर्ज आणि हरकती म्हणजे एखाद्या व्होटर लिस्टमधल्या नावाला ऑब्जेक्शन या साठी आपल्याला १ ते ३० नोव्हेंबर अशी मुदत देण्यात आलेली आहे. आणि आपल्या पुणे जिल्हयात २१ मतदार नोंदणी अधिकारी आहेत ज्यामध्ये तीन मतदार नोंदणी अधिकारी पिंपरी, चिंचवड, भोसरी यात महानगरपालिकेचे दोन मतदार नोंदणी अधिकारी घेतलेले आहेत व उपजिल्हाधिकारी आहेत. या १ ते ३० नोव्हेंबर मध्ये दावे हरकती प्राप्त होतील त्याच्यावर निकाली काढण्यात येणार आहेत आणि भारत निवडणूक आयोग ही ५ जानेवारीला अंतिम यादी प्रसिध्द होईल त्यावेळेला संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका जर जाहीर

झाल्या तर ही मतदार यादी वापरण्यात येईल त्यामुळे ही यादी खूप महत्वाची आहे. आणि अशा यादीत जर आपल्याला या कालावधीत स्थानांतरीत झालेले मतदार असतील, छायाचित्र नसलेले मतदार असतील, ज्यांचे १ जानेवारी २०२२ ला १८ वर्षे वय पूर्ण झाले आहे अशी सर्व मुले आणि मुली हे नव मतदार म्हणुन आपण enroll करु शकतो. तसेच दुबार मतदार असतील, मयत झालेले मतदार असतील यांची आपल्याला प्रोसेस करुन वगळणी करण्याची आहे. नवीन नाव ऍड करायचं आहे किंवा माझं यादीत नाव सावंतच्या ऐवजी काही तरी दुसरं झालं आहे, नाव चुकलं आहे उकार चुकला आहे ही सुध्दा दुरुस्ती आपल्याला करावयाची आहे. हयाला ३० नोव्हेंबर पर्यंत चान्स आहे. जर हाच अर्ज आपण ३० नोव्हेंबर नंतर केला, १ डिसेंबरच्या पुढे तर तो अंतिम यादीत त्याचे नावाची दुरुस्ती होणार नाही. म्हणुन मी आपल्या आणि आपल्या सर्व सन्मा. सदस्यांच्या सहकार्याशिवाय हे काम होणार नाही म्हणुन मी आपल्याला आव्हान करण्यात येत आहे. आपलं नाव तपासावं, आपल्या कुटुंबियांचं नाव तपासावं, आपल्या फॅमिली मेंबर्स, नातेवाईकांच तपासावं, आपल्या वॉर्डमधल्या लोकांची नावे आहेत का हे तपासावे आणि याबाबत जनजागृती पिंपरी चिंचवड महापालिकेनी मा. जिल्हाधिका-यांच्या वतीने खरंच आभार मानते की खुप मोठया प्रमाणात जनजागृती सध्या चालू आहे. हयात जर आपण आता नाव निदर्शनास आणलं संबंधित मतदार नोंदणी अधिका-यांच्या तशी दुरुस्ती ८ जानेवारीच्या अंतिम यादीत एखाद्याचे नाव वगळलं असेल जेणेकरुन भविष्यात होणा-या ज्या तक्रारी आहेत त्या होणार नाहीत. यासाठी भारत निवडणूक आयोगाची एनव्हीएसपी.इन ही वेबसाईट आहे ज्यावर आपण आज नाव नोंदवू शकता. वगळणीचा अर्ज भरु शकता, किंवा दुरुस्त करु शकता. किंवा आपला ऍंड्रॉईड मोबाईल जो आहे नॉर्मली ज्याच्यावर आपण व्हॉटसऍप डाऊनलोड करुन घेतो अशा मोबाईलमध्ये व्होटर हेल्पलाईन ऍप आहे त्याच्या द्वारे सुध्दा आपण सर्व अर्ज भरु शकता. ऑनलाईन व्होटर ऍपला जास्त प्रमोशन देतो कारण अशा ऍपद्वारे भरलेले अर्ज किंवा वेबसाईटद्वारे भरलेल्या अर्जामध्ये मॅन्युअल एरर होण्याची चुका सर्वात कमी असते. कारण ज्या योगे आपण स्वत:चे नाव करेक्ट लिहितो आपण आपला ऍड्रेस आपण करेक्ट लिहितो आणि आपलं वय देखील आपण करेक्ट लिहितो. जे की आपण ऑफलाईन पध्दतीने अर्ज दिलातर त्यात मॅन्युअल एरर होण्याची शक्यता जास्त प्रमाणात असते. त्यामुळे मी आपल्या सर्वांना असं आवाहन करते की आपण जास्तीत जास्त भारतीय निवडणूक आयोगाचे संकेतस्थळावरुन किंवा व्होटर हेल्पलाईन ऍपवरुन नाव नोंदणी करावी असे मी आवाहन करते. त्याचप्रमाणे पिंपरीमध्ये जर ड्राफ्टरोल आजचा बघीतलातर पिंपरीमध्ये ३,५२,००० भोसरी मतदारसंघात ४,६९,००० व चिंचवड मध्ये ५,३९,००० व्होटर्स आहेत. याबाबत जर आपला सध्या जो स्वीपचा कार्यक्रम चालू आहे Systemic Voters Education and Training Program हयात सुध्दा पिंपरी चिंचवड

महापालिकेने खुप उपक्रम चालू केलेले आहेत. आपल्याला एवढीचं विनंती आहे की आपलं नाव तपासावं, सगळे आपल्या महानगरपालिकेचे जे सगळे वॉर्ड ऑफीस आहेत ते मतदान नोंदणी कलेक्शन सेंटर्स म्हणुन जाहीर करण्यास मान्यता दिलेली आहे. तिथे सुध्दा कलेक्शन चालू आहे. आमचे जे मतदान नोंदणी अधिकारी आहेत त्यांनी १६ तारखेपासुन सगळया वॉर्डमध्ये आपल्या वॉर्ड ऑफीसर बरोबर सभा घेण्यास सुध्दा सुरुवात केली आहे की ज्यामुळे की लोकांना माहिती व्हावं की प्रारुप यादी प्रसिध्द झाली आहे आणि ३० नोव्हेंबर पर्यंत आपण त्यात काही दुरुस्त्या आहेत त्या समाविष्ट करु शकतो किंवा आपल्या काही सूचना सजेशन्स जर काही आपलं म्हणंण असेल तर आपण संबंधित मतदान नोंदणी अधिकारी आहेत या ठिकाणी जसं की पिंपरीला अढारी साहेब, चिंचवडला स्मिता झगडे मॅडम आहेत आणि भोसरीला राणी काटे मॅडम उपजिल्हाधिकारी हे आपले संबंधित मतदार नोंदणी अधिकारी आहेत त्यांचेकडे देऊ शकता. मतदार यादी आपल्याला संकेतस्थळावर देखील पाहता येईल सीईओ ऑफीसच्या वेबसाईटवर आणि मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयात देखील आज उपलब्ध आहे. आपल्या सूचना असल्यास जरुर संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांना कळवाव्यात आणि आज मा. जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणुन मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आदरणीय महापौर ताई, मा. आयुक्त आणि सर्व सन्माननीय सदस्य यांचे मी आभार मानते, धन्यवाद.

मा.ज्ञानदेव थोरात – मा. महापौर साहेब, मा. आयुक्त, सर्व सदस्य, पत्रकार बंधुंनो माई मी गेल्या महिन्याच्या मिटींगला २० तारखेला आयुक्त साहेबांना पाच प्रश्न विचारले होते. त्याचा आपण आदेश पण दिले होते की आयुक्त साहेब जे श्री. थोरातांनी विषय मांडले आहेत त्या विषयाला उत्तर द्यावे. त्यातला महत्वाचा विषय होता आयटीआय मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती, कासारवाडी रँप असे तीन चार विषय मी आयुक्त साहेबांच्या समोर मी मांडले होते. त्याचं मला उत्तर मिळावं मग मला बोलता येईल मी.

मा. महापौर – माऊली माहितीच्या अधिकारामध्ये आपल्याला माहिती मिळाली आहे. आपल्याला अधिक माहिती हवी असेल तर समक्ष आपण ती माहिती संबंधित अधिका-याशी चर्चा करुन ती माहिती आपल्याला मिळेल.

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पवै/४/कावि/१२/२०२१, दि.२७/१०/२०२१

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०५६० दि.२७/१०/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात मोठ्या संख्याने भटके श्वान व जनावरे यांचेबाबत वेगवेगळया कारणानी अनेक तक्रारी विभागास प्राप्त होत आहेत.जसे की इजा होणे, अपघात होऊन गंभीर जखमी होणे, अतिसार व उलटी व इतर गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या प्राण्यांबाबत तक्रारी प्राप्त झाल्यावर औषधोपचार तातडीने करण्याची गरज असते. सद्यस्थितीत अश्या भटक्या जनावरांवर दिर्घ काळ उपचार करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडे मनुष्यबळ तथा संसाधने अपुरी असल्याने सुविधा वेळेवर उपलब्ध करुन देणे अवघड जात आहे.परिणामी,तक्रारी वेळेवर पुर्ण न केल्याने तक्रारदार व नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. सदर सुविधांचे सक्षमीकरण व बळकटीकरण केल्यास आजारी प्राण्यांना वेळेवर उपचार करून तक्रारीपुर्ण करणे शक्य होणार आहे.

उपरोक्त संदर्भीय प्राणी श्रुशूषा केंद्र/उपचार केंद्र हे उपचारदृष्टया स्वयंपूर्ण बनविण्यासाठी भटक्या श्वान व मांजर यांसाठी मोफत उपचार व मालकी हक्क असणा-या श्वान व मांजर संबंधित सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया व बाह्यरुग्ण विभाग याबाबतचा सर्व उपचार वाजवी दरात उपलब्ध करून देण्यासाठी पि.चिं. मनपाचा मानस आहे. त्यान्वये खालील प्रमाणे अंदाजपत्रक दर (सेवा शुल्क) सादर करण्यात येत आहे.

<u>प्राणी श्रुशूषा केंद्रयाचे/पशुवैद्यकीय दवाखाने प्रस्तावित संभाव्य दरपत्रक</u>

| अनु. क्र. | तपशील | शुल्क र.रु |
|---|---|---|
| १ | केस पेपर फी | २०/- |
| २ | बाह्यरुग्ण विभाग(OPD)(सामान्य प्रथमोपचार) | १५०/- |
| ३ | Specialized Treatment (Systemic Diseases Treatment Fluid Therapy) | २००/- |
| ४ | रेबीज प्रतिबंधक लस (Anti Rabies Vaccination) | १००/- |
| ५ | क्ष-किरण(लहान जनावरे) X-Ray Of Small Animal | २५०/- |
| ६ | सोनोग्राफी (USG) | ३५०/- |
| ७ | आय.पी.डी शुल्क प्रति दिन | ३००/- |
| ८ | शस्त्रक्रिया सेवा शुल्क (शस्त्रक्रियासाठी लागणारे साहित्य वगळुन) | ४००/- |
| ९ | नसबंदी शस्त्रक्रिया (मनपा मार्फत) श्वान | १२००/- |
| १० | नसबंदी शस्त्रक्रिया (मनपा मार्फत) मांजर | १३००/- |

मे.पीपल फॉर ऍनिमल यासंस्थेने संयुक्त समन्वयाने काम लवकरात चालू करण्याचा प्रस्ताव प्रस्तावित केलेला आहे.मे.पिपल फॉर ऍनिमल्स (पि.एफ.ए) या संस्थेने देऊ केलेली सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी लागाणारे या क्षेत्रात अनुभवी मुनष्य बळ (दोन व्यक्ती) पुरविण्याच्या मोबदल्यात एकुण रक्कम रुपये. ५०,०००/- प्रती माह महानगरपालिकेडुन मागणी केली आहे. त्यान्वये सदर केंद्र सुस्थितीत व सुरळीत चालविण्यासाठी सदर संस्थेची मदत होउन सेवा नियमित करणे शक्य होणार आहे. त्यामुळे नमुद रक्कम त्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेने एक वर्ष कालावधीसाठी देणे उचित वाटते. तसेच पशुशल्यचिकित्सक (Veterinary Surgeon)नेमणुक करणे आवश्यक आहे. सदर पद हे मानधन तत्वावर सहा महिने कालावधी करीता र.र.५०,०००/- प्रति माह मानधनावर नेमणुक करणे आवश्यक आहे.मा.स्थायी समितीच्या मंजुरीने सदरचा खर्च पशुवैद्यकीय विभागाच्या अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षकामधून खर्च करण्यात येईल.

सबब, पशुवैदयकीय विभागाकडील भटक्या प्राण्यासाठी ऍनिमल शेल्टर(प्राणी सुश्रुषा केंद्र) व औषधोपचार केंद्र सुरु करणेकामी मे.पीपल फॉर ऍनिमल या संस्थे बरोबर संयुक्त समन्वयाने एक वर्ष कालावधीकरीता कामकाज करणे व सदर संस्थेने देऊ केलेली सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या क्षेत्रात लागणारे अनुभवी मुनष्य बळ त्या माध्यामातून सल्लागार व व्यवस्थापन यांचे शुल्क यामध्ये प्रती किमान माह दोनशे श्वान व मांजर यांचेवर उपचार होणे आवश्यक आहे. त्यापेक्षा कमी झाल्यास संस्थेच्या प्रमाणात व्यवस्थापन शुल्क कपात करण्यात येईल. दोनशे पेक्षा कितीही अधिक झाले तर कुठलेही वाढीव शुल्क देण्यात येणार नाही एकुण रक्कम रुपये. ५०,०००/- प्रती माह महानगरपालिकेकडून मागणी केले प्रमाणे खर्चास मान्यता घेणे तसेच पशुशल्यचिकित्सक (Veterinary Surgeon) पद मानधन तत्वावर सहा महिने कालावधी करीता र.र.५०,०००/- प्रति माह मानधनावर नेमणुक करणे व येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेस तसेच पाळीव श्वान, मांजर, इत्यादी प्राण्यांना सार्वजनिक ठिकाणी नागरिक शौचालयास घेवून जातात, ज्याप्रमाणे उघड्यावर शौच करणा-या नागरिकांना दंड केला जातो, त्याप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी पाळीव प्राणी शौचालयासाठी घेऊन जाणा-या नागरिकांना ५००/- दंड करणेस मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- “माझी मिळकत, माझी आकारणी” योजना मिळकत कराची आकारणी करणेकरिता स्वतः अर्ज करणाऱ्या मिळकतधारकास पहिल्या वर्षी सामान्य करात सवलत देण्यास मान्यता देणेत यावी. सद्यस्थितीमध्ये पिंपरी चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना या साथरोगाचा प्रादुर्भाव असल्यामुळे महापालिका कार्यक्षेत्रामध्ये फिरण्यास प्रतिबंध करणेत आला होता. दरम्यानचे कालावधीमध्ये नव्याने बांधकामे झालेली असून, सदर मिळकतींची प्राधान्याने करआकारणी होणे आवश्यक आहे अशा मिळकतींची करआकारणी करणेकामी जर मिळकतधारक स्वत:

www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावरील शिघ्रगणकाद्वारे मिळकतकराच्या नोंदणीसाठी अर्ज करत असेल, तर अशा मिळकतधारकांना प्रोत्साहित करणेकामी सवलत योजना राबविणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रातील करआकारणी न झालेल्या मिळकतींचे मिळकतधारक महापालिकेचे संकेतस्थळावर अथवा स्वत: करआकारणी नोंदणीसाठी अर्ज करत असेल, तर अशा मिळकतधारक / नागरिक यांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४० मधील तरतूदीनुसार यापुढे नविन करआकारणी होणाऱ्या मिळकतीचे प्रकरणी ज्या वर्षात करआकारणी कायम होईल त्या आर्थिक वर्षाच्या चालू मागणीतील मिळकतकर बिलामधील सामान्य करामध्ये ५ % फक्त पहिल्या वर्षाकरिता अटी व शर्तीच्या अधीन सवलत देणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची एकुण ४ नाटयगृह उपलब्ध आहेत. सदर नाट्यगृहामध्ये विविध प्रकारची व्यवसायिक नाटके, सामाजिक उपक्रमे तसेच शालेय कार्यक्रम इ. कार्यक्रम होत असतात. या कार्यक्रमाच्या माध्यमातुन महापालिकेस शुल्काद्वारे उत्पन्न मिळत असते. परंतु शहरातील विविध जेष्ठ नागरिकांच्या संस्था यांनी त्यांच्या कार्यक्रमांसाठी महापालिकेची नाट्यगृहे मोफत उपलब्ध करुन मिळावीत म्हणून मागणी केलेली आहे.

सबब पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील जे जेष्ठ नागरिक संघ नोंदणीकृत असतील अशांना महापालिकेची नाट्यगृहे फक्त स्वच्छता व वीज बीलाचे शुल्क आकारुन इतर भाडेशुल्क माफ करुन उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच कोरोना प्रादुभावाच्या काळात विधवा झालेल्या महिलांना र.रु. २५,०००/- अर्थसहाय्य देणेकामी अर्जदार महिलेच्या वयाची मर्यादा ५० वर्षे ठेवणेत आलेली आहे. परंतू मा. स्थायी समिती ठराव क्र. १०५६९ दि २७/१०/२०२१ अन्वये अर्जदार महिलेच्या वयाची मर्यादा रद्द करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

तरी कोरोना काळात पतीच्या निधनाने विधवा झालेल्या सर्व महिलांना सदर योजनेचा लाभ मिळणेच्या हेतूने या योजनेअंतर्गत अर्जदार महिलेच्या वयाची मर्यादा रद्द करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच दिव्यांग व्यक्तीने दिव्यांग व्यक्तीशी विवाह केल्यास अशा नवविवाहीत दांपत्यास संसारात मदत होण्याच्या दृष्टीने र.रु. २,००,०००/- (अक्षरी र.रु. दोन लाख फक्त) अर्थसहाय्य देणे अशी योजना नव्याने सुरु करण्यास मा. स्थायी समिती ठराव क्र. ९९४६ दि २२/७/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तरी सदर मा. स्थायी समितीने मान्यता दिलेल्या ठरावानुसार सदरची योजना नव्याने सुरु करण्यास मान्यता देण्यात यावी.

तसेच त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांचा जयंतीदिन दि.०७ फेब्रुवारी आणि स्मृतिदिन दि.२७ मे शासनाच्या परिपत्रकात समाविष्ट करणेस मान्यता देणेत यावी. महाराष्ट्र राज्य स्तरावर विविध महापुरुष आणि महामाता यांच्या जयंती आणि स्मृतिदिनाचा कार्यक्रम केला जातो. या अनुषंगाने राज्य शासनाकडून जयंती/पुण्यतिथी/राष्ट्रीय कार्यक्रम आदींकरीता स्वतंत्र परिपत्रक निर्गमित करुन शासनाच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांना/कार्यलयांना अंमलबजावणी करीता पाठविले जाते. भारतीय संविधानाचे शिल्पकार

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी माता रमाई भीमराव आंबेडकर यांनी बाबासाहेबांना प्रत्येक संघर्षात खंबीरपणे साथ दिली, शोषितांना अन्यायाविरुध्द संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. अशा त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांचे आदर्शवादी संघर्षमय जीवन समाजापुढे उभे राहण्यासाठी तसेच राज्यासह देशाला त्यांच्या कार्याची माहिती शासकीय स्तरावरुन होण्यासाठी त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांचा जयंतीदिन (दि.०७ फेब्रुवारी) आणि स्मृतीदिन (दि.२७ मे) हे दिवस महाराष्ट्र राज्यस्तरावर शासकीय स्वरुपात साजरे करण्यासाठी शासनाच्या जयंती/पुण्यतिथी/राष्ट्रीय कार्यक्रम या संदर्भातील शासनाकडून निर्गमित होणा-या परिपत्रक/ आदेशामध्ये त्यांचे नाव समाविष्ट करावे अशी नागरिकांची मागणी असून पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्वसाधारण सभा देखील शासनाकडे ही मागणी करीत आहे. शासनाने या मागणी प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत या ठरावास मान्यता देणेत यावी व हा ठराव पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र शासनाकडे तात्काळ पाठविण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास मंत्रालय मुंबई, ४०००३२ यांचेकडील शासन निर्णय क्र.टीपी १८१९/प्र.क्र.१६७/१९ न.वि १३ दि. १३/९/२०१९ अन्वये पिंपरी चिंचवड नगरविकास प्राधिकरणाकडील बांधकाम परवानगी व पूर्णत्वाचे कामकाज पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेकडे देण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील अधिसूचना दि. ७/०६/२०२१ क्र.टीपीएस- १८२१ प्र क्र ४३/२०२१ नवि- १३ नुसार पिंपरी - चिंचवड नगरनगर विकास प्राधिकरणाच्या सर्व विकास विभागाच्या अखत्यारीत येत आहेत व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे तसेच पिंपरी चिवड महापालिकेकडे विहीत आहेत.

पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने भाडेपट्टयाने दिलेले व विकसीत झालेले भूखंड सार्वजनिक सुविधाच्या आरक्षणाखालील मालकी व ताबा या अधिसूचनेद्वारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे सुपूर्द करण्यात आले आहे नगरविकास प्राधिकरण क्षेत्रातील पेठ क्र.५ व ८ पुणे आंतरराष्ट्रीय प्रदेश केंद्र पेठ ९, ११, १२ आणि भोसरी मध्यवर्ती सुविधा केंद्र या क्षेत्रकरिता पिंपरी चिंचवड महापालिकेची विशेष प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे

नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयाचे कामकाज करताना भूवाटप हस्तांतरण फि, सदनिका हस्तांतरित करणे, नाव समाविष्ट करणे, अतिरिक्त अधिमूल्य, विविध कर्ज ना हरकत दाखला, वारसा हक्क, सोड शुल्क इ.कामकाजाकारिता फी, शुल्क निर्धारित केलेले होते. महापालिकेकडे जे कामकाज वर्ग झालेले आहे सदर कामकाज करताना प्राधिकरणामार्फत ज्याप्रमाणे महानगरपालिकेमार्फत फी, शुल्क आकारणी करण्यात येत आहे याबाबत महानगरपाकिचे संपूर्ण क्षेत्राकरिता जी कामकाज, फी शुल्क आकारणी करण्याची प्रचलीत पध्दत आहे. तसेच पिंपरी - चिंचवड नगरविकास प्राधिकरणाच्या क्षेत्राकरिता फी आकारणीचे धोरण आवश्यक आहे.

त्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत सदनिका हस्तांतरित करणे, हस्तांतरण फी प्रस्तावित वाढ नावे समाविष्ट करणे कमी करणे, नावे वर्ग करणे इ.बाबत कोणतेही अतिरिक्त शुल्क न आकारणेबाबत धोरणास मा. महापालिका सभेची मंजुरी घेवून शासनाकडे पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, उपसूचन स मी अनुमोदन देतो.

मा. अॅड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.राजु मिसाळ - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ही उपसूचना सुसंगत आहे का हे नगरसचिवांनी सांगावे.

मा.नगरसचिव – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सभा कामकाजाच्या नियमावलीप्रमाणे उपसूचना ही विषयास सुसंगत असली पाहीजे असा नियम आहे. उपसूचनेबाबत संबंधित विभाग निर्णय घेईल आणि उपसूचना मंजूर करायची किंवा त्याच्यावर अंमलबजावणी करायची किंवा नाही याचेबाबतचे अधिकार मा.आयुक्त साहेबांचे आहेत.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सभाशाखेचा नियम काय म्हणतो आहे ते वाचून सांगा. आयुक्त काय करणार आहेत, महापौर काय करणार आहेत, सभाशाखेचा नियम काय म्हणतो ते सांगाना, तुम्हांला काय विचारल सुसंगत आहे का नाही. आम्ही कशासाठी बसलोत सभागृहात, आम्हांला कळू दयाना, आम्हांला त्याच ज्ञान नाही तुमच्याकडन ते ज्ञान आम्हांला घेवू दया. या विषयाला दिलेली उपसूचना ही सूसंगत आहे किंवा नाही याच उत्तर आम्हांला पाहीजे आणि सभाशाखेचा नियम काय म्हणतो. महापौर काय करणार आहेत, आयुक्त काय करणार आहेत कोर्टात जाणार आहेत का हे नंतर सांगा तुम्ही. आम्हांला आमच्या प्रश्नाच उत्तर दया.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषयाला ही उपसूचना सुसंगत आहे का अशाप्रकारचा अक्षेप याठिकाणी घेतला गेला. मा.महापौर साहेब, आपल्या अधिकारामध्ये महासभेमध्ये धोरण निश्चित करायच आहे. धोरण निश्चित करण्याचा हा विषय आहे आणि त्याला विसंगत असलेला कुठलाही काही संबंध नाही सगळी उपसूचना ही त्याला सुसंगत आहे आणि मा.महापौर साहेब, आपला अधिकार आहे त्याप्रमाणे हा विषय जो आहे तो धोरणाचा विषय आहे आणि धोरणाचा विषय असल्यामुळे उपसूचना त्याला विसंगत नाही त्यामुळे हा विषय आपण मंजूर करावा अशी मी आपणास विनंती करतो.

मा.भाऊसाहेब भोईर - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. धोरणात्मक विषय आहे, शहराच्या विकासात्मक दृष्टिकोनातून महत्वाचा विषय आहे. या सभागृहात मुळ विषयाला, धोरणाला मुळात विरोधच नाही तो घेता येतो किंवा नाही याविषयावर आपली चर्चा आहे. मुळात पक्षनेते तुम्ही जे आता वक्तव्य केल की धोरण आहे, चांगल धोरण आहेना. या धोरणाची व्यवस्थीत अंमलबजावणी होण्यासाठी पुढ आपल्यालाच अडचणी येवू नयेत म्हणून ते आता योग्य आहे का अयोग्य आहे एवढच दोन शब्दात सांगाना. मुळात आपण जातोय कुठे, जायचय काजजला आणि जाताय खंडाळा घाटामध्ये.

मा.मंगला कदम - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. यामध्ये पहील्यांदा खुलासा व्हायला पाहीजे आणि जगताप साहेब तुम्हांला सांगता आला पाहीजे होत की ही सुसंगत आहे किंवा नाही. तुम्ही महापालिकेमध्ये इतकी वर्षे सर्व्हिस करता, प्रमोशन घेत घेत तुम्ही नगरसचिव पदावरती आलेला आहात, मला वाटत तुमचा अभ्यास नक्की आहे. मा.महापौर साहेब, पहील्यांदा त्यांनी हे सांगायला पाहीजे. तुमच्यासारखे प्रमोशन घेवून इथपर्यंत आलातर त्यांचे रिलेशन सगळयाबरोबर असतात. तुम्हांला बोलायला सुध्दा कुणाला काही आवडेल असं मला वाटत नाही परंतु तुम्ही ज्या खुर्चीवर बसलेला आहात......

मा.महापौर - मंगलाताई एकच मिनीट मी बोलते की आपल्याला हे धोरण करायच आहे, तरी नगरसचिव तुम्हांला माहीती देतात.

मा.नगरसचिव - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महानगरपालिकेच्या सभाकामकाज नियमावलीनुसार उपसूचनेबाबत नियम क्रमांक ३९ आहे. याच्यामध्ये एखादा प्रस्ताव प्रस्तावित केल्यानंतर व त्या प्रस्तावाला अनुमोदन दिल्यानंतर कोणताही महानगरपालिका सदस्य त्यास उपसूचना सुचवू शकतो. प्रत्येक उपसूचना ही प्रस्तावाशी सुसंगत असली पाहिजे आणि ती, त्यास फेरफार, भर किंवा त्यातून वगळावयाचा भाग सुचवू शकते, पण सभेपुढे असलेल्या कोणत्याही प्रस्तावास ती सरळ सरळ नकार देणारी नसावी किंवा सारत: ती हुबेहुब त्याच सभेत अगोदरच नाकारण्यात आलेल्या कोणत्याही प्रस्तावाप्रमाणे किंवा उपसूचनेप्रमाणे नसावी. मात्र जेव्हा एखादा नकारात्मक प्रस्ताव मांडला गेला असेल तेव्हा त्यास होकारात्मक उपसूचना मांडता येईल. सभेपुढे कितीही उपसूचना मांडता येतील, परंतू कोणताही महानगरपालिका सदस्य एकाच प्रस्तावाला एकापेक्षा जास्त उपसूचना सुचवणार नाही किंवा त्यास अनुमोदन देणार नाही, आणि ज्या महानगरपालिका सदस्याने कोणत्याही प्रस्ताव मांडला असेल किंवा प्रस्तावाला अनुमोदन दिले असेल तो त्यास उपसुचना सुचवणार नाही. रीतसर प्रस्तावित केलेली व अनुमोदन दिलेली एक वा अनेक उपसुचना प्रस्तावाच्या प्रस्तावकास स्विकारता येतील. असे झाल्यास अशाप्रकारे सुधारलेला प्रस्तावच सभागृहापुढे ठेवलेला मुळ प्रस्ताव समजला जाईल. अशाप्रकारे उपसूचनाच्या बाबतीमध्ये नियमामध्ये तरतूद आहे. सभागृह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची प्रकरण २ नियम १ ओ प्रमाणे बहुमताने निर्णय घेत असते. ही जी उपसूचना आलेली आहे ती प्रस्तावशी सुसंगत आहे किंवा नाही हे त्या विभागप्रमुखानां ठरवता येईल आणि त्याबाबत सभागृह जो निर्णय घेईल त्याच्या प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ६७ प्रमाणे याच्या बाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त साहेबांना आहे.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता नगरसचिव यांनी विषय सुसंगत आहे किंवा नाही त्याबाबत सांगीतल आणि मी मगाशीच म्हणलो की हा धोरणाचा विषय आहे आणि आपण जो टॅक्समध्ये, म्हणजे सातत्याने जे रेग्युलर टॅक्स भरतात त्या लोकांना सामान्य करामध्ये पाच टक्के सवलत देण्याचा विषय आपण उपसूचनेमध्ये घेतलेला आहे तो सुध्दा धोरणाचाच आहे आणि तो सुध्दा जनतेच्या संबंधित आहे. त्यामुळे त्यांच्या म्हणण्यानुसार मला नाही वाटत की कुठे विसंगती दिसते. मा.महापौर साहेब, हा विषय सुसंगत आहे आणि शेवटी अंतीम अधिकार तुमच्याकडे आहेत. तो विषय जो आहे तो सुसंगतच आहे आणि तो सुध्दा धोरणाचा विषय आहे आणि विषयपत्रीकेवरील विषय क्रमांक १ जो आहे तो भटक्या श्वान आणि जनावरांचा त्यासंदर्भात त्याला जे वेगवेगळे शुल्क आकारलेले आहेत हा तो

सुध्दा धोरणाचा विषय आहे त्यामुळे मा.महापौर साहेब, आपण याच्यावरती चर्चा न करता हा विषय सुसंगत असल्यामुळे आपण मंजुर करावा अशी मी विनंती करतो.

मा.महापौर – विषय क्रमांक १ उपसूचनेसहीत मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ७२८ विषय क्रमांक – १

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पवै/४/कावि/१२/२०२१, दि.२७/१०/२०२१
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०५६० दि.२७/१०/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात मोठ्या संख्याने भटके श्वान व जनावरे यांचेबाबत वेगवेगळया कारणानी अनेक तक्रारी विभागास प्राप्त होत आहेत.जसे की इजा होणे, अपघात होऊन गंभीर जखमी होणे, अतिसार व उलटी व इतर गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या प्राण्यांबाबत तक्रारी प्राप्त झाल्यावर औषधोपचार तातडीने करण्याची गरज असते. सद्यस्थितीत अश्या भटक्या जनावरांवर दिर्घ काळ उपचार करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडे मनुष्यबळ तथा संसाधने अपुरी असल्याने सुविधा वेळेवर उपलब्ध करुन देणे अवघड जात आहे.परिणामी,तक्रारी वेळेवर पुर्ण न केल्याने तक्रारदार व नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. सदर सुविधांचे सक्षमीकरण व बळकटीकरण केल्यास आजारी प्राण्यांना वेळेवर उपचार करून तक्रारीपुर्ण करणे शक्य होणार आहे.

उपरोक्त संदर्भीय प्राणी श्रुशूषा केंद्र/उपचार केंद्र हे उपचारदृष्टया स्वयंपूर्ण बनविण्यासाठी भटक्या श्वान व मांजर यांसाठी मोफत उपचार व मालकी हक्क असणा या-श्वान व मांजर संबंधित सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया व बाह्यरुग्ण विभाग याबाबतचा सर्व उपचार वाजवी दरात उपलब्ध करून देण्यासाठी पि.चिं .मनपाचा मानस आहे .त्यान्वये खालील प्रमाणे अंदाजपत्रक दर (सेवा शुल्क) सादर करण्यात येत आहे.

<u>प्राणी श्रुशूषा केंद्र याचे/पशुवैद्यकीय दवाखाने प्रस्तावित संभाव्य दरपत्रक</u>

| अनु. क्र. | तपशील | शुल्क र.रु |
|---|---|---|
| १ | केस पेपर फी | २०/- |
| २ | बाह्यरुग्ण विभाग)OPD)(सामान्य प्रथमोपचार( | १५०/- |
| ३ | Specialized Treatment (Systemic Diseases Treatment Fluid Therapy) | २००/- |
| ४ | रेबीज प्रतिबंधक लस) Anti Rabies Vaccination) | १००/- |

| | | |
|---|---|---|
| ५ | क्ष-किरण)लहान जनावरे (X-Ray Of Small Animal | २५०/- |
| ६ | सोनोग्राफी) USG) | ३५०/- |
| ७ | आय.पी.डी शुल्क प्रति दिन | ३००/- |
| ८ | शस्त्रक्रिया सेवा शुल्क) शस्त्रक्रियासाठी लागणारे साहित्य वगळुन( | ४००/- |
| ९ | नसबंदी शस्त्रक्रिया) मनपा मार्फत (श्वान | १२००/- |
| १० | नसबंदी शस्त्रक्रिया) मनपा मार्फत (मांजर | १३००/- |

मे.पीपल फॉर ऍनिमल यासंस्थेने संयुक्त समन्वयाने काम लवकरात चालू करण्याचा प्रस्ताव प्रस्तावित केलेला आहे.मे.पिपल फॉर ऍनिमल्स (पि.एफ.ए) या संस्थेने देऊ केलेली सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी लागाणारे या क्षेत्रात अनुभवी मुनष्य बळ (दोन व्यक्ती) पुरविण्याच्या मोबदल्यात एकुण रक्कम रुपये ५०,०००/- प्रती माह महानगरपालिकेडुन मागणी केली आहे. त्यान्वये सदर केंद्र सुस्थितीत व सुरळीत चालविण्यासाठी सदर संस्थेची मदत होउन सेवा नियमित करणे शक्य होणार आहे .त्यामुळे नमुद रक्कम त्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेने एक वर्ष कालावधीसाठी देणे उचित वाटते .तसेच पशुशल्यचिकित्सक (Veterinary Surgeon)नेमणुक करणे आवश्यक आहे .सदर पद हे मानधन तत्वावर सहा महिने कालावधी करीता र.र. ५०,०००/- प्रति माह मानधनावर नेमणुक करणे आवश्यक आहे.मा.स्थायी समितीच्या मंजुरीने सदरचा खर्च पशुवैद्यकीय विभागाच्या अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षकामधून खर्च करण्यात येईल.

सबब, पशुवैदयकीय विभागाकडील भटक्या प्राण्यासाठी ऍनिमल शेल्टर (प्राणी सुश्रुषा केंद्र ) व औषधोपचार केंद्र सुरु करणेकामी मे.पीपल फॉर ऍनिमल या संस्थे बरोबर संयुक्त समन्वयाने एक वर्ष कालावधीकरीता कामकाज करणे व सदर संस्थेने देऊ केलेली सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या क्षेत्रात लागणारे अनुभवी मुनष्य बळ त्या माध्यामातून सल्लागार व व्यवस्थापन यांचे शुल्क यामध्ये प्रती किमान माह दोनशे श्वान व मांजर यांचेवर उपचार होणे आवश्यक आहे .त्यापेक्षा कमी झाल्यास संस्थेच्या प्रमाणात व्यवस्थापन शुल्क कपात करण्यात येईल .दोनशे पेक्षा कितीही अधिक झाले तर कुठलेही वाढीव शुल्क देण्यात येणार नाही एकुण रक्कम रुपये .५०,०००/- प्रती माह महानगरपालिकेकडून मागणी केले प्रमाणे खर्चास मान्यता घेणे तसेच पशुशल्यचिकित्सक (Veterinary Surgeon) पद मानधन तत्वावर सहा महिने कालावधी करीता र.र. ५०,०००/- प्रति माह मानधनावर नेमणुक करणे व येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेस तसेच पाळीव श्वान ,मांजर ,इत्यादी प्राण्यांना सार्वजनिक ठिकाणी नागरिक शौचालयास घेवून जातात , ज्याप्रमाणे उघड्यावर शौच करणा-या नागरिकांना दंड केला जातो ,त्याप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी पाळीव प्राणी शौचालयासाठी घेऊन जाणा-या नागरिकांना ५०० -/दंड करणेस मान्यता देणेत येत आहे . तसेच “माझी मिळकत, माझी आकारणी” योजना मिळकत कराची आकारणी करणेकरिता स्वतः अर्ज करणाऱ्या मिळकतधारकास पहिल्या वर्षी सामान्य करात सवलत देण्यास मान्यता देणेत येत आहे. सद्यस्थितीमध्ये पिंपरी चिंचवड महापालिका

कार्यक्षेत्रामध्ये कोरोना या साथरोगाचा प्रादुर्भाव असल्यामुळे महापालिका कार्यक्षेत्रामध्ये फिरण्यास प्रतिबंध करणेत आला होता. दरम्यानचे कालावधीमध्ये नव्याने बांधकामे झालेली असून, सदर मिळकतींची प्राधान्याने करआकारणी होणे आवश्यक आहे अशा मिळकतींची करआकारणी करणेकामी जर मिळकतधारक स्वत: www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावरील शिघ्रगणकाद्वारे मिळकतकराच्या नोंदणीसाठी अर्ज करत असेल, तर अशा मिळकतधारकांना प्रोत्साहित करणेकामी सवलत योजना राबविणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रातील करआकारणी न झालेल्या मिळकतींचे मिळकतधारक महापालिकेचे संकेतस्थळावर अथवा स्वत: करआकारणी नोंदणीसाठी अर्ज करत असेल, तर अशा मिळकतधारक / नागरिक यांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४० मधील तरतूदीनुसार यापुढे नविन करआकारणी होणाऱ्या मिळकतीचे प्रकरणी ज्या वर्षात करआकारणी कायम होईल त्या आर्थिक वर्षाच्या चालू मागणीतील मिळकतकर बिलामधील सामान्य करामध्ये ५ % फक्त पहिल्या वर्षाकरिता अटी व शर्तीच्या अधीन सवलत देणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची एकुण ४ नाटयगृह उपलब्ध आहेत. सदर नाट्यगृहामध्ये विविध प्रकारची व्यवसायिक नाटके, सामाजिक उपक्रमे तसेच शालेय कार्यक्रम इ. कार्यक्रम होत असतात. या कार्यक्रमाच्या माध्यमातुन महापालिकेस शुल्काद्वारे उत्पन्न मिळत असते. परंतु शहरातील विविध जेष्ठ नागरिकांच्या संस्था यांनी त्यांच्या कार्यक्रमांसाठी महापालिकेची नाट्यगृहे मोफत उपलब्ध करुन मिळावीत म्हणून मागणी केलेली आहे.

सबब पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील जे जेष्ठ नागरिक संघ नोंदणीकृत असतील अशांना महापालिकेची नाट्यगृहे फक्त स्वच्छता व वीज बीलाचे शुल्क आकारुन इतर भाडेशुल्क माफ करुन उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच कोरोना प्रादुभावाच्या काळात विधवा झालेल्या महिलांना र.रु. २५,०००/- अर्थसहाय्य देणेकामी अर्जदार महिलेच्या वयाची मर्यादा ५० वर्षे ठेवणेत आलेली आहे. परंतू मा. स्थायी समिती ठराव क्र. १०५६९ दि २७/१०/२०२१ अन्वये अर्जदार महिलेच्या वयाची मर्यादा रद्द करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

तरी कोरोना काळात पतीच्या निधनाने विधवा झालेल्या सर्व महिलांना सदर योजनेचा लाभ मिळणेच्या हेतूने या योजनेअंतर्गत अर्जदार महिलेच्या वयाची मर्यादा रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच दिव्यांग व्यक्तीने दिव्यांग व्यक्तीशी विवाह केल्यास अशा नवविवाहीत दांपत्यास संसारात मदत होण्याच्या दृष्टीने र.रु. २,००,०००/- (अक्षरी र.रु. दोन लाख फक्त) अर्थसहाय्य देणे अशी योजना नव्याने सुरु करण्यास मा. स्थायी समिती ठराव क्र. ९९४६ दि २२/७/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तरी सदर मा. स्थायी समितीने मान्यता दिलेल्या ठरावानुसार सदरची योजना नव्याने सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांचा जयंतीदिन दि.०७ फेब्रुवारी आणि स्मृतिदिन दि.२७ मे शासनाच्या परिपत्रकात समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

महाराष्ट्र राज्य स्तरावर विविध महापुरुष आणि महामाता यांच्या जयंती आणि स्मृतिदिनाचा कार्यक्रम केला जातो. या अनुषंगाने राज्य शासनाकडून जयंती/पुण्यतिथी/राष्ट्रीय कार्यक्रम आदींकरीता स्वतंत्र परिपत्रक निर्गमित करुन शासनाच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांना/कार्यलयांना अंमलबजावणी करीता पाठविले जाते. भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी माता रमाई भीमराव आंबेडकर यांनी बाबासाहेबांना प्रत्येक संघर्षात खंबीरपणे साथ दिली, शोषितांना अन्यायाविरुध्द संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. अशा त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांचे आदर्शवादी संघर्षमय जीवन समाजापुढे उभे राहण्यासाठी तसेच राज्यासह देशाला त्यांच्या कार्याची माहिती शासकीय स्तरावरुन होण्यासाठी त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांचा जयंतीदिन (दि.०७ फेब्रुवारी) आणि स्मृतीदिन (दि.२७ मे) हे दिवस महाराष्ट्र राज्यस्तरावर शासकीय स्वरुपात साजरे करण्यासाठी शासनाच्या जयंती/पुण्यतिथी/राष्ट्रीय कार्यक्रम या संदर्भातील शासनाकडून निर्गमित होणा-या परिपत्रक/ आदेशामध्ये त्यांचे नाव समाविष्ट करावे अशी नागरिकांची मागणी असून पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्वसाधारण सभा देखील शासनाकडे ही मागणी करीत आहे. शासनाने या मागणी प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत ही महापालिका सभा ठरावास मान्यता देत असून हा ठराव पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र शासनाकडे तात्काळ पाठविण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास मंत्रालय मुंबई, ४००३२ यांचेकडील शासन निर्णय क्र.टीपी १८१९/प्र.क्र.१६७/१९ न.वि १३ दि. १३/९/२०१९ अन्वये पिंपरी चिंचवड नव नगरविकास प्राधिकरणाकडील बांधकाम परवानगी व पूर्णत्वाचे कामकाज पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेकडे देण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील अधिसूचना दि. ७/०६/२०२१ क्र.टीपीएस- १८२१/२२१ प्र क्र ४३/२०२१ नवि- १३ नुसार पिंपरी – चिंचवड नव नगरनगर विकास प्राधिकरणाच्या सर्व विकास विभागाच्या अखत्यारीत येत आहेत व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे तसेच पिंपरी चिंचवड महापालिकेकडे विहीत आहेत.

पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने भाडेपट्ट्याने दिलेले व विकसीत झालेले भूखंड सार्वजनिक सुविधाच्या आरक्षणाखालील मालकी व ताबा या अधिसूचनेद्वारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे सुपूर्द करण्यात आले आहे नगरविकास प्राधिकरण क्षेत्रातील पेठ क्र.५ व ८ पुणे आंतरराष्ट्रीय प्रदेश केंद्र पेठ ९, ११, १२ आणि भोसरी मध्यवर्ती सुविधा केंद्र या क्षेत्रकरिता पिंपरी चिंचवड महापालिकेची विशेष प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे

नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयाचे कामकाज करताना भूवाटप हस्तांतरण फि, सदनिका हस्तांतरित करणे, नाव समाविष्ट करणे, अतिरिक्त अधिमूल्य, विविध कर्ज ना हरकत दाखला, वारसा हक्क, सोड शुल्क इ.कामकाजाकारिता फी, शुल्क निर्धारित केलेले होते. महापालिकेकडे जे कामकाज वर्ग झालेले आहे सदर कामकाज करताना प्राधिकरणामार्फत ज्याप्रमाणे महानगरपालिकेमार्फत फी, शुल्क आकारणी करण्यात येत आहे याबाबत महानगरपाकिचे संपूर्ण क्षेत्राकरिता जी कामकाज, फी शुल्क आकारणी करण्याची प्रचलीत

पध्दत आहे. तसेच पिंपरी - चिंचवड नव नगरविकास प्राधिकरणाच्या क्षेत्राकरिता फी आकारणीचे धोरण आवश्यक आहे.

त्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत सदनिका हस्तांतरित करणे, हस्तांतरण फी प्रस्तावित वाढ नावे समाविष्ट करणे कमी करणे, नावे वर्ग करणे इ.बाबत कोणतेही अतिरिक्त शुल्क न आकारणेबाबत धोरणास मा. महापालिका सभेची मंजुरी घेवून शासनाकडे पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – २

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/२/कावि/८६४/२०२१, दि.२२/०७/२०२१.
२) मा.विधी समिती कडील ठराव क्र.६३ दि.१८/१०/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **'कार्यकारी अभियंता (स्था)'** अभिनामाची २४ पदे **एस - २३ वेतनश्रेणी ६७७०० - २०८७००** मध्ये शासन मंजूर असून पदोन्नती करीता ५ पदे रिक्त आहेत. **'कार्यकारी अभियंता (स्था)'** अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्त सो. यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक १२/०७/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **'कार्यकारी अभियंता (स्था)'** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, खालील **उपअभियंता (स्था)** यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'कार्यकारी अभियंता (स्था)'** पदावर **एस - २३ वेतनश्रेणी ६७७०० – २०८७००** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

| **अ.क्र** | **उपअभियंता नावं** | **पदोन्नतीचा प्रवर्ग** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीम.पाठक अनघा अविनाश | ज्येष्ठतेनुसार |
| २ | श्री.जावरानी मनोहर टेकचंद | ज्येष्ठतेनुसार |

सबब, उपरोक्त **उप अधिकारी** यांना **एस - २३ वेतनश्रेणी ६७७०० -२०८७००** मध्ये **'कार्यकारी अभियंता (स्था)'** पदावर, पदोन्नती मधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन व शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहून सेवाज्येष्ठतेनुसार रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० मध्ये, प्रशासकीय सेवा गट ब, "ग्रंथालय प्रमुख" या पदास खालील प्रमाणे अर्हतेमध्ये दुरुस्ती करणेस मान्यता देणेत यावी. ("ग्रंथालय प्रमुख" पदाकरिता सुधारणा / दुरुस्ती बदल करणे बाबत)

| **अ.क्र.** | **संवर्ग** | **पदनाम** | **नेमणुक पद्धत** | **नेमणूकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती** |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय सेवा गट –ब (एस-१६ ) | ग्रंथालय प्रमुख | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १)मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील ग्रंथालय व माहिती शास्त्र शिक्षणक्रम पदव्युत्तर पदवी.(एम.लिब.अँड आय. एस्सी.) आवश्यक.<br>२)शासकीय व निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रंथपाल पदावरील ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. |
| | | | पदोन्नती (१००%) | १)ग्रंथालय व माहिती शास्त्र शिक्षणक्रम पदव्युत्तर पदवी (एम.लिब.अँड आय.एस्सी.)/ग्रंथालय शास्त्राचा पदवीधर (B.Lib.&I.Sc.)<br>२)पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग्रंथपाल **अथवा ज्युनियर टेक्निकल असिस्टंट** पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

सबब उपरोक्त, ग्रंथालय प्रमुख, या पदासाठी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग्रंथपाल अथवा ज्युनियर टेक्निकल असिस्टंट पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक व एस-१६ - वेतनश्रेणी ४४९००-१४२४०० मंजूर करणे अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० मध्ये, प्रशासकीय सेवा गट ब, क मध्ये, मुख्य क्रीडा अधिकारी, क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक पदाकरिता या पदास सुधारणा / दुरुस्ती, पदनामात बदल करणेस मान्यता देणेत यावी. (क्रीडा अधिकारी, क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक " पदाकरिता सुधारणा / दुरुस्ती, पदनामात बदल करणे बाबत )

क्रीडा अधिकारी (पदसंख्या-१), क्रीडा पर्यवेक्षक (पदसंख्या-१०), क्रीडा शिक्षक (पदसंख्या-४०) या पदाकरिता वरील अर्हता ऐवजी मुख्य क्रीडा अधिकारी (पदसंख्या-१), क्षेत्रीय क्रीडा अधिकारी (पदसंख्या-१०), क्रीडा मार्गदर्शक (पदसंख्या-४०) खालील प्रमाणे पदनामामध्ये व अर्हतामध्ये दुरुस्ती करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | नेमणुक पद्धत | नेमणूकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| १ | क्रीडा सेवा गट-अ (एस-२०) | मुख्य क्रीडा अधिकारी | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १)बी.पी.एड पदवीधारक असणे आवश्यक<br>२)स्पोर्ट्स ॲथॉरिटी ऑफ इंडीया कडील पदविका असणे आवश्यक<br>३)राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूस प्राधान्य देणेत येईल.<br>४)शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा राष्ट्रीय क्रीडा संस्थेतील तत्सम पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती (१००%) | १)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी.<br>२)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील बी.पी.एड. पदवी असणे आवश्यक.<br>३)पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील क्रीडा पर्यवेक्षक अथवा क्षेत्रीय क्रीडा अधिकारी या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या अधिका-यांची सेवा ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारावर पदोन्नती.<br>४)पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील ,शासनाकडील शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू यांचेकरिता वरील अट वरील अट क्र.२,३ या अटी शिथिलक्षम. |
| २ | क्रीडा सेवा गट-ब (एस-१६ ) | क्षेत्रीय क्रीडा अधिकारी | पदोन्नती (१००%) | १)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी.<br>२)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील बी.पी.एड. पदवी असणे आवश्यक.<br>३)पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील क्रीडा विभागातील क्रीडा शिक्षक अथवा क्रीडा मार्गदर्शक या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या अधिका-यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| ३ | क्रीडा सेवा गट क (एस-१४ ) | क्रीडा मार्गदर्शक | नामनिर्देशन १००% | शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या प्रचलित सेवाप्रवेश नियमानुसार, |

तरी वरील प्रमाणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० मध्ये, १) क्रीडा अधिकारी ऐवजी मुख्य क्रीडा अधिकारी, एस - २०- वेतन श्रेणी ५६१००-१७७५०० २) क्रीडा पर्यवेक्षक ऐवजी, क्षेत्रीय क्रीडा अधिकारी, एस -१६ -वेतनश्रेणी ४४९००-१४२४०० व ३) क्रीडा शिक्षक ऐवजी क्रीडा मार्गदर्शक, एस-१४ – वेतनश्रेणी- ३८६००-१२२८०० अशी मंजूर करणेस मान्यता देणेत यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतर्गत विद्युत विभागाच्या आस्थापनेवर शासन मान्य असलेले सह शहर अभियंता (विद्युत) पदावर कार्यरत असलेले अधिकारी सेवानिवृत्त झालेनंतर तसेच या संवर्गात नव्याने पद निर्माण झालेनंतर अशा पदांवर सेवाज्येष्ठता, शैक्षणिक पात्रता, अनुभव इ. पदोन्नतीचे सर्व निकष पुर्ण करणाऱ्या पदोन्नतीपूर्व कार्यकारी अभियंता (विद्युत) या पदावरील सेवाज्येष्ठ अधिकारी १) श्री. संजय खाबडे व २) श्री. बाबासाहेब गलबले यांना सह शहर अभियंता (वि.) या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच विद्युत विभागाच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (विद्युत) अभिनामाची पदे नव्याने शासनमान्य झालेस अथवा रिक्त झालेस अशा पदांवर पदोन्नतीपूर्व उपअभियंता (विद्युत) या पदावरील सेवाज्येष्ठ अधिकाऱ्यांची सेवाज्येष्ठता, शैक्षणिक पात्रता, अनुभव इ. पदोन्नतीचे सर्व निकष पूर्ण करणाऱ्या सेवाज्येष्ठ अधिकारी १) श्रीमती लता बाबर २) श्री. वासुदेव मांडरे ३) श्रीमती अनुश्री कुंभार व ४) श्री.अकबर शेख यांना कार्यकारी अभियंता (वि.) या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देण्यात यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेमध्ये २००८ मध्ये स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर नेमणूका देण्यात आलेल्या होत्या. सदर स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती पूर्व अनुभवाची पाच वर्षाची अट व व्यवसायीक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक होते. तसेच कनिष्ठ अभियंता स्थापत्य या पदाची ११ पदे रिक्त असताना व पात्र उमेदवार मनपामध्ये उपलब्ध असताना देखिल उपरोक्त कर्मचारी यांना पदोन्नती पासुन वंचित ठेवणेत आले होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने शासनाच्या नगरविकास विभागास पत्र.क्र. प्रशा/२/कावी/३९१/०९ दिनांक २५/०३/२००९ अन्वये कनिष्ठ अभियंता(स्था) या पदांची आवश्यकता विचारात घेता मा. महापालिका सभा मंजूर ठराव क्रमांक ५४८ दिनांक २२/१२/२००८ नुसार कनिष्ठ अभियंता (स्था) पदावर पदोन्नती साठी सेवा प्रवेश नियमात पदोन्नती पूर्वपदावरील पाच वर्ष सेवा याऐवजी पदोन्नती पुर्व पदावर नियमित ३ वर्षांची किमान सेवा असा बदल करून कनिष्ठ अभियंता स्थापत्य या पदावर पदोन्नती देणेच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेची विनंती केली होती.

सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० कनिष्ठ अभियंता (स्था) या पदासाठी पदोन्नती पूर्व अनुभवाची अट पाच वर्ष ऐवजी तीन वर्षेच मान्य करणेत आलेली आहे. तसेच व्यवसायीक परीक्षेची अट देखिल शिथिल करणेत आलेली आहे. सद्यस्थितीत कार्यरत असलेले कनिष्ठ अभियंता (स्था) २०११ मध्येच पदोन्नतीसाठी पात्र होते तसेच कनिष्ठ अभियंता (स्था) या संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील पदे रिक्त होती. तरी देखिल स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर कार्यरत असलेल्या

अभियंत्यांना त्यावेळी पदोन्नती न देता सरळसेवेने कनिष्ठ अभियंता (स्था) पदाची भरती करणेत आलेली असल्याने सन २०११ मध्ये कार्यरत असलेल्या व पदोन्नती पात्र असलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचेवर अन्याय झालेला स्पष्ट दिसुन येत आहे.

मनपा प्रशासनाच्या दिरंगाईमुळे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना कनिष्ठ अभियंता (स्था) या अभिनामाच्या पदावर पदोन्नतीकरीता झालेला प्रशासकीय विलंब विचारात घेता त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने सेवा जेष्ठता लागू करुन त्यांच्यावर सेवा ज्येष्ठता यादी मध्ये झालेला अन्याय दूर करणे आवश्यक आहे. तरी २०११ पासुन पदोन्नतीकरीता पात्र असुन देखिल वेळेवर पदोन्नती न मिळालेल्या अभियंत्यांना ते ज्यावेळी पदोन्नतीस पात्र होते त्या दिनांकापासुन पुर्वलक्षी प्रभावाने सेवाजेष्ठता यादीतील मानिव जेष्ठता क्रमांक मिळणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत यावी.

तसेच सन १९९१ पासूनचे महिन्याचे दुस-या व चौथ्या शनिवारचा अतिकालीन भत्ता (दिडपट) मिळणेस मान्यता देणेत यावी. अग्निशामक विभागातील ८३ कर्मचा-यांनी मे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्थर, पिंपरी यांचे कोर्टात रे.दि.मु.न.११९/९२ अन्वये महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारचा अतिकालीन भत्ता मिळावा याकरीता दावा दाखल केला होता. सदरच्या दाव्याचा निकाल मे.कोर्टाने दि.०९ /०७/२०१४ रोजी दिला. सदर निकालामध्ये मे.कोर्टाने सर्व बाबींचा अभ्यास करुन कामगारांना महिन्याच्या दुस-या व चौथ्या शनिवारी काम केल्याबाबत दीडपटीने अतिरिक्त भत्ता देण्याबाबत आदेश केला आहे. त्यानंतर अग्निशामक विभागातील कर्मचा-यांना त्यांचे पगाराच्या दिडपट अतिकालीन भत्ता अदा केलेला आहे. तद्अनुषंगाने अग्निशामक विभागातील उर्वरीत १०६ कर्मचा यांनी मे. औदयोगिक न्यायालय, पुणे यांचे कोर्टात अतिकालीन भत्ता मिळावा याकरीता तक्रारी अर्ज दाखल केले होते. मे.कोर्टाने त्यांना अतिकालीन भत्ता अदा करणेबाबत आदेश दिलेले आहे. तसेच प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्रं. प्रशा /४/कावि/१३५/२००९ दि. १८/२/२००९ अन्वये अत्यावश्यक सेवेतील सर्व कर्मचा-यांना अतिकालीन भत्ता देय असल्याचे अटीमध्ये नमूद केले आहे. सुरक्षा विभाग हा अत्यावश्यक सेवेमध्ये येत असल्याने अग्निशामक विभागातील उर्वरीत सर्व कर्मचाऱ्यांना तसेच सुरक्षा विभागातील सन १९९१ पासूनच्या सर्व कर्मचा-यांना त्याचप्रमाणे सर्व लिफ्टमन (उद् वाहक चालक) कर्मचा-यांना महिन्याच्या दुस-या व चौथ्या शनिवारचा अतिकालीन भत्ता ( दीडपटीने अतिरिक्त भत्ता ) पुर्वलक्षी प्रभावाने अदा करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवेपैकी पाणी पुरवठा विभागांतर्गत सेक्टर नं.२३ व आंद्रा /भामा आसखेड येथील जलशुद्धीकरण केंद्राद्वारे शहरातील नागरिकांना शुद्ध व स्वच्छ पाणी पुरवठा करण्याचे काम करण्यात येते. सेक्टर नं.२३ येथील एकूण चार टप्प्यातील छत्तीस बेड मार्फत जलशुद्धीकरणाचे कामकाज अहोरात्र चालू असते. त्या करिता तांत्रिक संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांची आवश्यकता असते. कामकाजाच्या सोयीसाठी व जलशुद्धीकरण प्रक्रियेतील गाळणी निरीक्षक (फिल्टर इन्स्पेक्टर) व गाळणी चालक (ऑपरेटर ) या कर्मचा-यांवर पर्यवेक्षीय पदाची नितांत गरज आहे. जेणेकरून शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने शुद्ध पाणी पुरवठा करण्यात येईल. त्या करिता चीफ केमिस्ट पदाप्रमाणेच, मुख्य गाळणी निरीक्षक (चीफ फिल्टर इन्स्पेक्टर) या पदाची देखील आवश्यकता आहे. सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० या मध्ये मुख्य गाळणी निरीक्षक (चीफ फिल्टर इन्स्पेक्टर) या अभिनामाच्या पदाचा समावेश करण्यास मान्यता देणेत यावी.

"मुख्य गाळणी निरीक्षक (चीफ फिल्टर इन्स्पेक्टर)" हे नव्याने पदनाम मंजूर केल्याने,

सदर पदास मान्यता तसेच मुख्य गाळणी निरीक्षक (चीफ फिल्टर इन्स्पेक्टर), गाळणी निरीक्षक (फिल्टर इन्स्पेक्टर) व  गाळणी चालक (ऑपरेटर) " या पदाकरिता खालील प्रमाणे अर्हता अनुभव या मध्ये दुरुस्ती करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | नेमणुक पद्धत | नेमणूकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| १ | तांत्रिक सेवा गट-ब S-16 | मुख्य गाळणी निरीक्षक (चीफ फिल्टर इन्स्पेक्टर) | पदोन्नती (१००%) | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची शास्त्र शाखेची पदवी (बी.एस्सी.)(केमिस्ट्री विषयासह )आवश्यक.<br>२) पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आस्थापनेवरील गाळणी निरीक्षक(फिल्टर इन्स्पेक्टर)या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिका-यांची सेवा ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती . |
| २ | तांत्रिक सेवा गट-क S-13 | गाळणी निरीक्षक (फिल्टर इन्स्पेक्टर) | पदोन्नती (१००%) | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची शास्त्र शाखेची पदवी (बी.एस्सी.)(केमिस्ट्री विषयासह )आवश्यक.<br>२) गाळणी चालक (ऑपरेटर ) कामाचा ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक असणे आवश्यक. |
| ३ | तांत्रिक सेवा गट-क S-8 | गाळणी चालक (ऑपरेटर) | नामनिर्देशन (१००%) | मान्यता प्राप्त विद्यापीठाची शास्त्र शाखेची पदवी (बी.एस्सी.)(केमिस्ट्री विषयासह)आवश्यक. |

तरी वरील प्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० व आकृतिबंध या मध्ये, "मुख्य गाळणी निरीक्षक (चीफ फिल्टर इन्स्पेक्टर) S16 वेतनश्रेणी ४४९००-१४२४०० हे नव्याने पदनाम मंजूर केल्याने, सदर पदास मान्यता व गाळणी निरीक्षक (फिल्टर इन्स्पेक्टर) S13 व  गाळणी चालक (ऑपरेटर) S8 " या पदाकरिता सुधारणा /दुरुस्ती करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाहन दुरुस्ती कार्यशाळा विभागाकडे ( यांत्रिकी विभाग ) कार्यकारी अभियंता, यांत्रिकी या पदाचे १ पद शासन मंजूर असून सद्य स्थितीत ते रिक्त आहे. वाहन दुरुस्ती कार्यशाळा विभागाचे कामकाज सद्य स्थितीत कार्यकारी अभियंता, विद्युत यांचेकडे आहे. कार्यालयीन कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने सदरचे कामकाज हे या क्षेत्रातील अनुभव व कार्यरत असलेल्या अभियंता यांचेकडे सोपविणे आवश्यक आहे. कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदाकरीता खालील प्रमाणे अर्हता आहे.

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील उप अभियंता (ऑटोमोबाईल/यांत्रिकी) / कार्यव्यवस्थापक व मान्यता प्राप्त विद्यापिठाची मेकॅनिकल अभियांत्रिकी शाखेची पदवी धारण केलेल्या अधिका-यास ३ वर्षे व पदवीका धारण करणारा ५ वर्षे अशा अधिका-यांमधून सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती.

कार्यशाळा विभागातील अनुभव असलेले श्री. दिवेकर कैलास विठ्ठल हे कार्यव्यवस्थापक या पदावर कामकाज करीत आहेत. तसेच त्यांना या विभागाचा २२ वर्षांचा अनुभव आहे. कार्यकारी अभियंता, यांत्रिकी या पदास असलेली शैक्षणिक अर्हता व श्री. कैलास विठ्ठल दिवेकर यांचा कार्यव्यवस्थापक पदाचा १ वर्षांचा अनुभवासह २२ वर्षांचा अनुभव असलेले एकमेव आहेत. त्यांचेकडे असलेली मान्यता प्राप्त विद्यापिठाची मेकॅनिकल अभियांत्रिकी शाखेची पदवीका धारण करणारा ५ वर्षाची अट शिथील करुन रिक्त असलेल्या कार्यकारी अभियंता, यांत्रिकी या पदावर त्यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सद्यस्थितीत सह कनिष्ठ अभियंत्यांना ०१/११/२०२१ रोजी उपअभियंता (स्थापत्य) पदाचा पदभार दिलेला आहे. त्यांना डी. पी. सी. घेऊन तातडीने उपअभियंता पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी. सद्यस्थितीत Ad-hoc तरी देणेस मान्यता देणेत येत आहे. सदर ठरावाची अंमलबजावणी प्रशासन विभागाने तातडीने करणेस मान्यता देणेत यावी.

डॉ.वर्षा सुभाष डांगे या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वैद्यकिय अधिकारी या पदावर सन २०१० पासून वैद्यकिय विभागामध्ये कार्यरत आहेत. त्यांची प्रथम नियुक्ती यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये करण्यात आलेली होती सदर कालावधीमध्ये त्यांनी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथील कुटुंब कल्याण विभागामध्ये कामकाज केलेले आहे. तद्नंतर त्यांची नियुक्ती वैद्यकिय विभाग मुख्य कार्यालयात महिला वैद्यकिय अधिकारी तथा आर.सी.एच.ऑफिसर या पदावर करण्यात आलेली आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरामधील कोविड-१९ विषयक सर्व लसीकरण केंद्रे तसेच कोरोना तपासणी विषयक (कोविड टेस्टींग) या विषयाचे प्रमुख म्हणून संपूर्ण कामकाज करत आहेत. त्यांचे वैद्यकिय अधिकारी पदावर दि.०१/०२/२०२० रोजी काम करणा-या अधिका-यांच्या अंतिम सेवाजेष्ठसूची क्र.प्रशा/१२/कावि/३९१/२०२० दि.०४/११/२०२० अन्वये त्याज्येष्ठ वैद्यकिय अधिकारी या पदोन्नतीच्या पदासाठी पात्र आहेत. तरी त्यांना “ज्येष्ठ वैद्यकिय अधिकारी” या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दुरसंचार विभागातील कर्मचारी श्री नागनाथ आण्णा कांबळे रेडिओ मॅकेनिक इलेक्ट्रीशन यांचे सेवानोंद पुस्तकामध्ये चुकिचा जन्म तारीख नोंदविलेली आहे. जन्म तारीख ०१/०६/१९६१ ऐवजी १२/०६/१९६५ अशी दुरुस्त व खरी सुधारित जन्म तारीखची नोंद सेवानोंद पुस्तकात घेणेकामी श्री. कांबळे यांनी दि १२/०८/२०१५ दि २३/०५/२०१८ व दि १४/०५/२०१९ अन्वये मा. आयुक्त यांचेकडे जन्म तारीख दुरुस्ती बाबत अर्ज सादर केलेले आहेत. श्री नागनाथ आण्णा कांबळे यांनी शासन निर्णय १) क्र. पीसीसी- ३०१९ / मुसंस क्र ४५५/नवि -२२ नगरविकास विभाग दि. १०/०६/२०१९ व २) जन्म दि.१३१९/१०६/ (प्र.क्र.४२/१९)/१३अ दि.०४/०७ /२०१९ न्यायालयीन निर्णयानुसार सादर केलेल्या कागदपत्राचे अनुशंगाने कागदपत्राचे अवलोकन करून श्री.कांबळे यांचे सेवा नोंद पुस्तकामध्ये जन्म तारीख ०१/०६/१९६१ च्या ऐवजी १२/०६/१९६५ अशी दुरुस्त नोंद घेणेस मान्यता देणेत यावी.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.अजित गव्हाणे – सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त, सर्व सभागृह आणि पत्रकार बंधू, हा जो विषय आहे आयुक्त साहेब हा विषय ज्या दोन इंजिनिअर्सचा श्रीमती पाठक आणि श्री. जावरानी या दोघांचा विषय सभागृहापुढे प्रशासनाने ठेवला आहे. आयुक्त साहेब मुळात डीपीसी झाली आहे तुमची आधी आणि डीपीसी पूर्वी काही लोकांनी अशाच पध्दतीने उपसूचना देऊन या ठिकाणी सभागृहाने विषय मंजुर केला. परंतु हया दोन इंजिनिअर्सचा सभागृहात विषय मंजूर नव्हता. महापौर साहेब आमचे म्हणणे आताच्या विषयालाही तेच आहे की आपण चुका करतोय विषय खुप चांगला होता. नामदेवरावांनी खुलासा केला आमचा काही त्या विषयाला विरोध नव्हता. परंतु विषय करताना आपण चुकीच्या पध्दतीने केला तर पुढे अडचणी निर्माण होतात. हया विषयाच्या जर आपण खोलात गेलो महापौर साहेब तर हया दोन्ही अधिका-यांवर अन्याय झालेला आहे. आयुक्त साहेब मी आपल्याला भेटून हया विषयासंदर्भात आपल्याशी मी बोललो होतो की एखाद्या अधिका-याने जर नगरसेवकाची पदाधिका-याची भेट घेतली नाही तर त्याचा विषय जी.बी. मध्ये मंजूर होत नाही आणि म्हणुन त्याच्यावरती अन्याय होतो. महापौर साहेब या केसमध्ये असंच झालेले आहे. उर्वरीत लोकांनी सभागृहात कोणालातरी भेटून पक्षनेते असतील किंवा इतर नगरसेवक असतील त्या ठिकाणी विषय मंजूर केला. आणि म्हणुन त्यांना डीपीसी नंतर ताबडतोब आयुक्त साहेबांनी चार्ज देऊन टाकला. परंतु हया दोघांना सभागृहात मंजुरी नव्हती म्हणुन त्यांना पदोन्नतीपासुन वंचित ठेवण्यात आलं. आणि नंतर त्याच्यामध्ये काही लोक कोर्टात गेले म्हणुन आता हा विषय पाठीमागे पडला आहे. म्हणजे अशा पध्दतीने चुकीचा कारभार जर आपण करणार असु. मुळातच विधी समितीच्या माध्यमातुन हा विषय महापौर साहेब जनरल बॉडीला यायला पाहिजे होता सगळेच विषय. त्या त्या समित्या आपण केलेल्या आहेत त्या समितीचा आपण ख-या अर्थांने आवाहन करतो त्या समितीला कुठलाही अधिकार नाही. त्या समित्यांना ओव्हरटेक करुन आपण जनरल बॉडीत आपण असे विषय मंजुर करतो त्या गोष्टीला आमचा विरोध आहे. आणि अशा पध्दतीने जेव्हा कोर्टात जातात तुम्ही त्यांच्याशी बोललात कदाचित ते तुम्हांलाही भेटले असतील की त्यांच्यावर कशा प्रकारचा अन्याय झालाय. त्याच्यामुळे अशा पध्दतीने महापौर साहेब आपण चुकीचा कारभार करु नये. जगताप साहेब खरं म्हणजे सांगताना तुम्ही आम्हांला गोल गोल करुन उत्तर सांगितले. तुम्हांला पण माहिती आहे. तो विषय ती उपसूचना त्याला सुसंगत नाहीए. नामदेवरावांच नॉलेज आमच्या सगळयांपेक्षा जास्त आहे. त्यांनी लगेच निर्णय देऊन टाकला. नामदेवराव खरंच वस्तुस्थिती ती नाहीए. वस्तुस्थिती काय आहे त्या विषयाला ती उपसूचना सुसंगत नाही. आणि ती सुसंगत नाही म्हटल्यावर महापौर साहेब एवढी चर्चा झाली १०० टक्के सांगतो ती विसंगत असल्यामुळे ती बाजूला फेकली जाणार आहे. मग त्याचा उपयोग काय. फक्त आपण समाधान करायचं सभागृहामध्ये आणि पेपरला बातमी येणार लोकांना वाटणार छान छान आपल्यासाठी

ठराव झाला म्हणुन. हयाची अंमलबजावणी महापौर साहेब होणार नाही. इथुन मागच्या काळात अनेक विषयांमध्ये अशा पध्दतीने अडचणींना सामोरे जावे लागले आहे . सभागृहात आपण घाई घाईने विषय मंजूर करतो आणि ते मंजुर केल्यानंतर तो विषय पुढे महापौर साहेब १०० टक्के विसंगत आहे तो. तुम्ही पण सभागृहात अनेक वर्ष काम केलेलं आहे. आमचा धोरणाला विरोध नाही पण तुम्ही सुसंगत सूचना द्या ना. आता सुध्दा तुम्ही महापौर साहेब त्यांनी काय सांगितलं वाचताना एक सदस्य एकच उपसूचना देऊ शकतो. आपण काय करतो. आता त्यांनी किती उपसूचना दिल्या महापौर साहेब. आपण नियमाला बगल देतोय. तुम्ही वाचलं ना, तुम्ही काय वाचलं जगताप साहेब आता एक सदस्य एकच उपसूचना देऊ शकतो. किती दिल्या आता. अशा पध्दतीने कामकाज होणार असेल तर उपयोग नाही ना महापौर साहेब. तुम्ही काम चांगलं करताय. तुम्ही ते योग्य पध्दतीने करा. अशा पध्दतीने चुकीचा विषय करु नका. आयुक्त साहेब हया ज्या दोन अधिका-यांवरती अन्याय झालाय इथुन पुढच्या काळात माझी तुम्हांला आणि प्रशासनाला विनंती आहे तुम्ही डीपीसीच्या आधी हा विषय खरं म्हणजे विधी समितीत मांडला पाहिजे आणि विधी समितीतुन विषय महापालिका सभेत आला पाहिजे म्हणजे कुठल्याही अधिका-यावरती अन्याय होणार नाही आणि चुकीच्या पध्दतीने काम होणार नाही. त्याच्यामुळे महापौर साहेब आपल्याला विनंती आहे. आयुक्त साहेब विनंती आहे की तुम्ही अशा प्रकारे चुकीच्या कारभाराला मदत करु नये आणि चुकीचं काम करु नये.

मा. वैशाली घोडेकर – सन्मा. महापौर, सन्मा. सभागृह मी हया विषयाच्या संदर्भात बोलणार नाही. परंतु अशाच पध्दतीच्या प्रमोशनच्या संदर्भात बोलणार आहे. या ठिकाणी प्रमोशन ज्येठतेनुसार दिली जातात. आयुक्त साहेब मी वैद्यकीय अधिका-यांचा एक ज्येष्ठतेचा विषय घेऊन आपल्याकडे आले होते. आयुक्त साहेब मी आपल्याकडे एक विषय घेऊन आले होते त्या वेळेस तुम्ही मला सांगितले होते की मी हयाच्यावर विचार करतो. आपल्याकडे दोन ज्येष्ठ वैद्यकीय अधिका-यांची पदे आहेत. एक आयुर्वेदिक बी.ए.एम.एस. आणि एक वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस. हया दोन उपसूची आपण तयार केल्या आहेत. परंतु ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी म्हणुन आपण फक्त एम.बी.बी.एस. च्या अधिका-यांचा विचार करतो. जे आयुर्वेदिक अधिकारी बी.ए.एम.एस. आहेत जवळ जवळ १६ ते २० सेवाज्येष्ठ आहेत. त्यांना कुठेही प्रमोशन दिले जात नाही. आणि आज आपल्या ज्या सगळया बाहय ओपीडी आहेत त्या सगळयाही बी.ए.एम.एस. लोकं संभाळतात की जी एम.ओ म्हणुन काम करतात. परंतु ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी त्यांना कधीच प्रमोशन म्हणुन मिळत नाही, तुम्ही मला तो नियम सांगितला होता. तुम्ही मला म्हटले होते आयुक्त साहेब तुम्ही मला त्या नियमाच्या आधारे म्हटला होतात तुम्ही मला हेही आश्वासन दिले होते की मॅडम मी त्या ठिकाणी या नियमाच्या पलीकडे जावून कोणत्या तरी पध्दतीने कोणत्या तरी मार्गाने त्यांना प्रमोशन देता येते का

त्याबाबत चौकशी करुन त्या बाबतीत कळवतो परंतु त्याबाबतीत आपण कोणती चौकशीही केली नाही निर्णयही घेतला नाही, चर्चाही केली नाही. मोजून थोडेसे बी.ए.एम.एस आहेत कोणत्या ना कोणत्या पध्दतीने आपण आयुक्त साहेब हे प्रमोशन दिले पाहिजे भले तुम्ही ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी म्हणुन नका घेऊ परंतु त्यांना त्या ठिकाणी कोणत्या ना कोणत्या पध्दतीने प्रमोशन दिले पाहिजे. खूप सुरुवातीच्या वाय.सी.एम. च्या काळापासुन ही लोकं कामं करत आहेत. पूर्ण बाहय ओपीडी ही लोकं संभाळतात त्या पध्दतीने आपण विचार महापौर ताई आपण त्यांना सांगितलं पाहिजे की त्या पध्दतीने त्या लोकांचा देखील आपण विचार केला पाहिजे. दुसरा एक प्रश्न हा आहे की भटक्या कुत्र्यांचा. या ठिकाणी महापौर ताई आणि आयुक्त साहेब मी हे सांगेन की अतिशय चांगलं धोरण तुम्ही केले आहे धोरणाला विरोध नाही. परंतु भटकी कुत्री तुम्ही घेऊन जाता आणि त्याच एरियात सोडता. मग ती व्यवस्थित आहेत का पिसाळली आहेत का हयाच्या बाबतीत पाहणी केली जात नाही. भटक्या कुत्र्यांबरोबर एक माझ्या वॉर्डात खुप मोठा प्रश्न आहे महापौर ताई की या ठिकाणी जी पाळीव कुत्री आहेत त्यांचे कुठेही रेकॉर्ड नाही. पाळीव कुत्री आम्ही सकाळी ७ – ८ वाजता रस्ता साफ करतो आणि ती पाळीव कुत्री ती सगळी लोकं रस्त्यावर घेऊन येतात मग ती बिल्डींगवाली असतील, बंगल्यावाली असतील जी कुत्री पाळतात ती असतील आयुक्त साहेब या धोरणामध्ये मला एक सुचवायचे आहे की जी काही पाळीव कुत्री आहेत त्यांचे रजिस्ट्रेशन आपल्याकडे झाले पाहिजे. जो कोणी कुत्रा पाळतो त्यांचे रजिस्ट्रेशन झाले पाहिजे. त्यांना एक ट्रेनिंग दिले पाहिजे की त्यांना कुठे घेऊन गेलं पाहिजे म्हणजे आरोग्याचा प्रश्न हा निर्माण होणार नाही. कारण सकाळी रस्ते साफ करायचे आणि परत त्या कुत्र्यांनी त्या ठिकाणी जायचं. आता माझ्या मते सोसायटी आणि बंगल्यांमध्ये काय चाललय की प्रत्येक बंगल्यामध्ये प्रत्येक फ्लॅटमध्ये एक पाळीव कुत्र असतं. मग ते छोटं असेल किंवा मोठं असेल. परंतु त्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण होतोय ना. कुठेही रस्त्याच्या कडेला घेऊन जातात हातात आपली चेन धरुन मॉर्निंग वॉकला जातात आणि सगळी घाण करुन येतात. आयुक्त साहेब एक असं जे सार्वजनिक शौचालय त्या ठिकाणी आजुबाजुला केली पाहिजे की जेणेकरुन स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होणार नाही आणि जीथे ते रजिस्ट्रेशन करतील तिथे त्या मालकाला ट्रेनिंग देता येत नसेल तर स्वच्छतेचं त्या कुत्र्याला तर अशी ट्रेनिंग देणारी खुप लोक आहेत ती पण त्या ठिकाणी कामं करतील आणि ज्या पाळीव कुत्र्यांचे रजिस्ट्रेशन होईल त्यांना स्वच्छतेचे ट्रे निंग देता येईल की त्यांनी कोणत्या ठिकाणी जाऊन विसर्जन केलं पाहिजे. या पध्दतीने या धोरणात आयुक्त साहेब आपण हेही घ्यावे म्हणजे आपल्या स्वच्छता कामगारांचा प्रश्न देखील त्या ठिकाणी सॉर्ट आऊट होईल. त्या ठिकाणी एक चांगलं स्वच्छता अभियान पण त्या ठिकाणी करता येईल. या ठिकाणी मी हे म्हणेन की त्यांची जबाबदारी ही त्यांच्या मालकांनीही उचलली पाहिजे. त्यांनी कुठेही सार्वजनिक रस्त्यावर गेलं नाही पाहिजे. आणि जी भटकी कुत्री रात्री अपरात्री दुचाकीच्या मागे फिरतात आणि चार चाकी गाडयांच्या मागे फिरतात फोर व्हीलरला काही फरक पडत नाही पण टुव्हीलर स्लीप

होतात. आयुक्त साहेब याचा विचार केला पाहिजे की भटकी कुत्री जरी असली तरी ती रस्त्यावर किती धावतात. या पध्दतीने त्यांना सोडलं पाहिजे की नाही तर ट्रांझिट कँप सारखा एक कँप केला पाहिजे आणि सगळया भटक्या कुत्र्यांना तिथं पाळा.आमचं काही म्हणणं नाही. परंतु त्या ठिकाणी सोडुन परत त्या ठिकाणी तिथे त्रास होतोय का हयाचे सुध्दा सगळया डॉक्टरांनी आणि त्या ठिकाणी जे काही कर्मचारी आहेत त्यांनी त्या ठिकाणी बघितलं पाहिजे. आयुक्त साहेब माझी तुम्हांला विनंती आहे की तो एम.बी.बी.एस आणि बी.ए.एम.एस. मधील जो काही प्रश्न आहे तो तुम्ही सॉर्ट आऊट करा आणि दुसरं की या धोरणामध्ये माझं सजेशन जे आहे तेही अंमलात आणावं, धन्यवाद.

मा. सीमा सावळे – सन्मा. महापौर, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. मा. महापौर साहेब आता जो पदोन्नतीचा विषय सभागृहापुढे आहे त्याला धरुन आपण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सेवाज्येष्ठता यादी तयार केलेली आहे आणि आतापर्यंत पण म्हणजे खास आपण आल्यानंतर एक तर काही काही वॉर्डामध्ये अशा दबावांना बळी पडून कोणी तरी सांगतं म्हणुन आपण काही काही वॉर्डात तीन तीन डेप्युटी दिलेले आहेत. त्यांच्याकडे पोर्टफोलिओ नाही काम करण्यासाठी, पदभार दिलेला आहे. दिला म्हणुन आम्हांला वाईट वाटत नाही. ते डिझर्व्ह करत असतील सेवाज्येष्टता यादीला असतील. तुमच्या डीपीसी नुसार प्रमोशन देणार असेल तर आम्हांला वाईट वाटण्याचे काहीच कारण नाही. तसही आमचा या महानगरपालिकेचे कर्मचारी असल्यामुळे त्यांना पदोन्नती मिळणार असेल तर आम्ही त्यात आनंदीच आहोत. परंतु त्या किती द्याव्या, कशा द्याव्या आणि त्याच बरोबर हयांना देत असताना आपण ठराविक लोकांवरती अन्याय करतो का हे सुध्दा तपासणे अत्यंत गरजेचे आहे. जे की तुमच्याकडून तपासले जात नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनी सेवा ज्येष्ठता यादी तयार केलेली आहे आणि त्या यादीनुसारच त्याचा जॉईन होण्याचा दिनांक तपासुन आपण प्रमोशन देतो. माझ्याकडे आपल्यासाठी उदाहरण आहे की आपण तसे केलेले नाही. जाहीरपणे नाव घेऊन ज्यांना प्रमोशन आपण दिलं त्यांना मी दुखवू इच्छित नाही. परंतु १९९७ ला जी लोकं रुजु झाले आहेत त्यांना सोडून जी लोकं १९९८ -९९ मध्ये रुजु झालेत त्यांना आपण प्रमोशन दिले आहे. त्यामध्ये एक ओपन कॅटेगरीचा आहे ज्याच्यावर अन्याय झालेला आहे आणि एक एस.सी. कॅटेगरीचा आहे. एकीकडे आपण सांगता एस.सी.चे हाय कोर्टात असल्यामुळे त्यांना आपण पदोन्नती ओपन कॅटेगरीमधुन देतो मग ती कुठली देतो, कशी देतो. त्यांना बेस काय आहे. एकीकडे बाप भिक मागू देत नाही आणि माय घरात खाऊ घालत नाही अशी तुम्ही आमची परिस्थिती केली आहे. एस.सी. च्या कँडीडेटला जे अधिकारी आहेत आमचे त्यांना सांगता की नाही हायकोर्टानी त्या ठिकाणी तुमच्या आरक्षणावरती आता बंदी असल्यामुळे आम्हांला देता येत नाही. मग त्या ठिकाणी ओपन कॅटेगरीला देणार असाल तर त्या ठिकाणी सेवाज्येष्टता त्याची लक्षात घेत नाही. मग काय केलं पाहिजे त्यांनी. बरं हे काय एस.सी. च्या

कर्मचा-यांवर अन्याय करत नाही मग तुम्ही ओपन कॅटेगरीच्या कर्मचा-यांवर त्यांच्यावर सुध्दा अन्याय करतोय आणि मग माझ्यासारखी कोणीतरी येते, आशाताईंसारखी कोणीतरी येते, माई ढोरेंसारख्या कोणीतरी मा. महापौरांकडून एखादं नाव आलं म्हणजे त्या ठिकाणी त्या कर्मचा-याचा अधिकार डावलायचा आणि आम्ही सांगतो म्हणुन त्यांना आपण प्रमोशन देताएत आणि पर्यायाने काय होतं त्या अन्यायग्रस्त जे अधिकारी असतात यांना कोर्टाचे दरवाजे वाजवावे लागतात. त्यासाठी पालिका खर्च करते. पण हेच नियम आपण घालुन दिले आहेत त्या नियमाप्रमाणे अनेक वर्ष महापालिकेचे कामकाज चालू आहे. तर आता त्यांना डावलायचं कारण काय आहे आणि का डावलतोय आपण. परत तुमच्याकडे आलो, ढाकणे साहेबांना भेटलो. तुम्ही काय बघतच नाही साहेब. आम्हांला नाव घेऊन बोलायचं नसतं. पण काय करणार, अधिकार तुमच्याकडे आहेत. तुमचे नाव घेतल्याशिवाय सभागृहात बोलू शकत नाही. पण कमिशनर साहेब जर सेवा ज्येष्ठता डावलुन जर आपण प्रमोशन देत असू तर त्यांनी जे गरीब बिचारे लागले आहेत त्या तारखेला १९९७ ला रुजु झालेले आहेत, सेवा ज्येष्ठता त्यांची आहे त्यांना डावलुन १९९८, १९९९ साली आले आहेत त्यांनाही तुम्ही देताय तर हा अन्याय नाही का त्यांच्यावरती. आणि त्यांच्या पाठीमागे त्यांना कोणी गुरु नाही पॉलीटिकल गुरु नाही म्हणुन त्यांचेवर आपण अन्याय करत राहतो हे योग्य नाही. मा.महापौर साहेब आपण सगळया लोकांना पदोन्नती देतो त्याच बरोबर आपण सभागृहात आदेश करावा कमिशनरांना त्यांना सांगावं की आपण सेवाज्येष्ठता यादीनुसारच या ठिकाणी कामकाज केले पाहिजे मग तो एससीचा असुदे किंवा ओपन कॅटेगरीचा असुदे. कारण एस.सी.च्या कॅंडीडेटला आता हाय कोर्टाने मनाई केलेली असल्यामुळे त्यांना प्रमोशन थांबवलेले आहेत. मग आता काय होतय यांचं, एखाद्याला तुम्ही प्रमोशन देता दुस-यानी दबाव आणलारे आणला की लगेच त्याला खाली बसवता दुस-याला प्रमोशन द्यायचं. हे किती अपमानजनक आहे. किती ह्युमिलिएट करताय तुम्ही. एक तर देऊन टाका. देतानाच थांबवा. विचार करा खरंच आपण काय करतोय. योग्य आहे की नाही हे आणि हे सगळं करुन आपण काय मिळवतो, अपमान होतोना आणि आपण सुध्दा सत्ताधारी असुन काय करतोय. एकीकडे आपण पदोन्नतीचा विषय आहे तो खरं तर लक्षात घेतला पाहिजे. आपल्याकडे रजिस्टर आहे यादी आहे. प्रशासनाकडे यादी आहे आणि माहिती आहे त्यांना चांगल्या प्रकारे. आता जे पदोन्नतीला आहेत मा. महापौर साहेब आता सेवाज्येष्टतेनुसार डी.पी.सी. लागायला पाहिजे. डाकणे साहेब खास करुन तुमच्यासाठी सांगते तुम्हीच या लोकना डावलेल आहे. तुमच्या नावात विकास असून फायदा नाही ना साहेब आमच्या शहरालाही फायदा झाला पाहिजे तुमचा. तुम्ही बघतच नाही आमच्याकडे. महानगरपालिका कर्मचा-यांकडे. मा. महापौर साहेब आपण इथं सभागृहामध्ये स्पष्टपणे आपण कमिशनरांना या ठिकाणी आदेश करावेत की त्यांनी सेवाज्येष्टता यादी डावलुन किंवा त्या विषयावर डी.पी.सी. लावत असाल तर त्या सेवाज्येष्ठता यादीतल्या कर्मचा-यांवरती अन्याय

आहे आणि अशा अन्यायकारक भुमिका आपण कुठेही सपोर्ट करु नये. कारण त्यानंतर कोर्टाकडे जायचं मग कोर्टाच्या आदेशाच्या अधिन राहून आपण पदोन्नत्या द्यायच्या. उद्या कोर्टात निर्णय फिरला तर काय करणार, हे जर आपण डोळसपणे काम केलं तर मला वाटतं योग्य प्रकारे आपल्याला काम करता येणार आहे. मा. महापौर साहेब, आयुक्त साहेब हे तुमचा आदेश मानत नाहीत. मागच्या सभेला आपण ह्या सभागृहात आदेश दिला होता या सभागृहाच्या पटलावरती कमिशनरांनी अहवाल ठेवायचा आहे तो ठेवलेला नाही. त्यामुळे तुमच्या आदेशाला केराची टोपली वारंवार दाखवली जाते त्यामुळे या शहराच्या मा.महापौरांचा प्रथम नागरीकाचा वारंवार सभागृहामध्ये अपमान होतोय आणि तो अपमान सहन करणा-यातली एक प्रामाणिक करदाती नागरीक म्हणुन माझा या ठिकाणी तीव्र विरोध आहे ह्या विषयाला. आपण कमिशनरांना विचारावं कमिशनरांनी तो अहवाल जो मागच्या जी बी मध्ये आपण ह्या ठिकाणी सभागृहामध्ये कमिशनरांना आदेश दिलेला असताना सुध्दा सभागृहाच्या पटलावरती का ठेवण्यात आला नाही. मा.पक्षनेत्यांना सुध्दा विनंती आहे आपण पत्र देऊन आयुक्तांना जाब का विचारला नाही. हा अपमान महापौरांचा नाही शहराचे प्रथम नागरीक आहेत त्यांचा सुध्दा अपमान होतोय. अपमान किती दिवस सहन करायचा याला सुध्दा मर्यादा असली पाहिजे मा. महापौर साहेब आपण सगळे जण मीठ खातो, रक्त उसळतं ना आपलं. कमिशनर एककल्ली कारभार करत असतात साहेब. कुठेतरी जाब विचारायची वेळ आलेली आहे आणि जोपर्यंत अहवाल या सभागृहापुढे ठेवला जात नाही तो पर्यंत आपण सभाच चालू नाही दिली पाहिजे. का आमच्यावर बोलायची वेळ आणता प्रत्येक जी.बी.ला. प्रशासनाकडे आणखी सुध्दा काही काम आहे का नाही. आपण सुध्दा कमिशनर साहेब, वारंवार ह्या सभागृहात मा. महापौरांचा आदेश डावलला जातो, केराची टोपली दाखवली जाते आणि परत आपण सभा रेटतो. आज एवढी कामे केलीत का. नाही केली तर काही फरक पडणार नाही. मान, सन्मानासाठी ह्या सभागृहात इथं ह्या खुर्चीवर मा. महापौर साहेब जर आपण बसत असू या शहराचा जर कारभार आपण हाताळत असू आणि एकीकडे आपण जर का उपसूचना आणुन या शहराच भल करु पाहतोय आणि त्या आदेशांना कमिशनर मानत नाहीत, फायदा काय आहे. आम्ही दर जी.बी.ला उठायचं आणि बोलायचं माझी डयुटी तेवढीच राहिलेली आहे. खरतर हे काम सत्तारुढ पक्षनेत्यांचं, या सभागृहात बसलेल्या प्रत्येक नगरसेवकांचं कर्तव्य आहे की त्यांनी मा. महापौरांचं अपमान झाल्यानंतर ह्या ठिकाणी बोललं पाहिजे. का कमिशनरांनी अहवाल मांडला नाही. का सभागृहाच्या पटलावर ठेवला नाही. कोरोना काळातला विषय आहे. एक वर्ष झालं आम्ही अहवालाची मागणी करतोय अजुन पर्यंत अहवाल सभागृहाच्या पटलावरती येत नाही. मा. महापौर आपण आदेश दिल्यानंतर अशा प्रकारे आदेश डावलले जात असतील तर आम्ही कोणाकडे न्यायाची अपेक्षा धरायची. तुम्हांलाच नाही तर आम्ही कुठे, आम्ही तर कुठेच

नाही ना. मग आम्हांला भांडण्याशिवाय पर्यायच नाही. भांडण करुन आम्हांला जर आमचे विषय मंजुर करुन घ्यायचे असतील तर आम्हांला कमिशनरांच्या दालनात जायला लागत असेल तर आम्ही सभागृहात बसायचं कशाला. आमच्या मुलभुत हक्कांवर जर गदा येत असेल तर आम्ही कोणाकडे भीक मागायची न्यायाची. जर महापौरांना असा अनुभव येत असेल तर आम्ही काय करायचं. मा. महापौर साहेब सभागृहाच्या पटलावरती आजपर्यंत आतापर्यंत जर मागच्या जी.बी.ला आदेश देऊन मा. कमिशनरांनी अहवाल का ठेवला नाही याचा पहिल्यांदा खुलासा होणे फार गरजेचे आहे. आता खुलासा नको मा. महापौर साहेब, आता आदेश झाले पाहिजेत. नवीन आहेत, नवीन आहेत खुप दिवस आपण त्यांच ऐकुन घेतलेलं आहे. अहवाल ठेवलां पाहिजे ना मा. महापौर साहेब. का ठेवत नाहीत आणि हा तुमचा अपमान नाही? हा या शहरातील २५ लाख जनतेचा अपमान आहे. हे सभागृह लोकशाहीला माननारे सभागृह आहे. वर लिहीलेले आहे. “आता विश्वात्मके देवे येणे वागज्ञे तोषावे”. त्याचबरोबर त्याच्या बाजूने लिहीलेय “लोकशाहीचे मंदिर हे सुंदर संभाषण घडो मधुर निरंतर”. अरे संभाषण तर सोडा ज्या ज्या वेळेस उभं राहावं लागतं ना त्या त्या वेळेस मला तर भांडावच लागतं. अहो भांडायचा कुठं आमचा संबंध आलाय काही. परंतु अन्याय जर होणार असेल आणि त्या विरोधात जर मी आवाज उठवत नसेल तर पसायदान लिहून सुध्दा मा. महापौर साहेब काही अर्थ उरत नाही. कुठे तरी आपण विचार करण्याची वेळ आलेली आहे मा. महापौर साहेब गेलं एक वर्ष तो अहवाल या सभागृहाच्या पटलावरती आलेला नाही. तिस-यांदा आपण आदेश केलेला आहे आणि तो तिस-यांदा आदेशाला केराची टोपली दाखवली जाते त्यामुळे किती उपसूचना तुम्ही करा. कमिशनर त्यांना केराची टोपलीच दाखवणार आहेत हे आता इथ सांगायला कुठल्याही ज्योतिषाची गरज नाही आणि किती अपमान झेलायचा यालाही मर्यादा पाहीजे. मा. महापौर साहेब आपण सेवाज्येष्टता यादीचं पालन करावं किंवा करण्यासाठी कमिशनरांना सांगावं म्हणुन मी आताच आपल्याला सांगितलं. परंतु मला वाटत नाही कमिशनर साहेब तुम्ही त्याचंही पालन कराल. कारण की साहेब तीन वेळा आता सभागृहात सांगितल्यानंतर सुध्दा तुम्ही अहवाल ठेवत नाहीत कोणाला पाठीशी घालण्याचं काम करताय तुमचं तुम्हांलाच ठाऊक. कारण त्याच्यातले जे कोणी कल्प्रिट असतील ते पुढे आले पाहिजे ना. आमच्या पक्षाचे असतील, विरोधी पक्षाचे असतील आपण काय राजकीय पक्षाचे एखाद्या पक्षाचं सदस्यत्व घेतल असेलतर तेही आम्हांला सांगा. कोणाला पाठीशी घालताय तेही आम्हांला कळू दे आणि जर तसं नसेल आणि खरंच आपण आय.ए.एस म्हणुन जी शपथ घेतलेली आहे त्या शपथेचं पालन करा कमिशनर साहेब हे सभागृह नि:पक्षपातीपणे चाललं पाहिजे म्हणुन इथे सभागृहात प्रत्येक सदस्य बोलतो आणि त्याची अपेक्षा खरं तर साहेब आम्ही तुमच्याकडून करतो की तुम्हांला कुठला पक्ष नाहीए. परंतु हा अहवाल दडवुन मात्र तुम्ही कोणालातरी पाठीशी घालताय. त्या

अहवालात दडलय काय आम्हालांही बघायची उत्सुकता लागली आहे. एकदा ती नावं समोर आली पाहिजेत. आम्हांला कळुन घ्यायचंय की ती कोण लोकं आहेत सर. तुम्हांला कसं आहे तुम्ही एकदा परीक्षा देता आणि ३५–३६ वर्षे तुम्हांला कुठल्याही परीक्षेला सामोरे जायचं नसतं. आम्हांला मात्र साडेचार वर्ष झाली आहेत पाचव्या वर्षी पुढचे सहा महिने आमचा एक्सरे चालू होतो कसा बोलतो, काय बोलतो, कसं वागतो, काय बोलला होता काय प्रॉमिस केलं होतं ते प्रॉमिस पूर्ण केलं का नाही केलं, फुलफील केलं का नाही केलं. तुमचे अधिकारी साहेब फोन केल्यानंतर जागेवर येत नाहीत. लोकं हात हातभराचा मेल लिहून तुम्हांला टाकताएत आमच्या नावासहीत. काय केलं पाहिजे साहेब आम्ही. तुमचे अधिकारी आमचे ऐकत नाहीत. तुम्ही आमचं ऐकत नाहीत. महापौरांचे ऐकत नाहीत. लोकशाहीची मुल्य पायदळी तुडवली जात आहेत हया सभागृहामध्ये आणि आम्ही इथे हात वर करुन फक्त म्हणतो महापौर मला बोलू द्या. भाऊसाहेब, अजितदादा, योगेशभाई, मंगलाताई अत्यंत सर्व ज्येष्ठ मंडळी या सभागृहामध्ये आहेत. आणि हया ज्येष्ठ मंडळींना सुध्दा एक आव्हान आहे माझं की अशा प्रकारचा अहवाल मा. योगेशभाई गेले अनेक दिवस आपण सगळयांनी इथे हया सभागृहामध्ये अत्यंत आरडा ओरडा केला, आकाश तांडव केलं, प्रेमाने सांगितले, हात जोडून सांगितले, महापौरांनी आदेश केले आहेत सर्वपक्षीय एकमत झालं तरीही तुम्ही ऐकत नाही. कोण आहे ज्याला कमिशनर साहेब पाठीशी घालताएत आणि तुम्ही कोणाला पाठीशी घालणार नसाल तर एकदा अहवाल आमच्यासमोर मांडा. मग आम्ही तुम्हांला सांगू तुम्ही कोणाला पाठीशी घालत होतात. आणि आम्हांला तुमची हिम्मत बघायचीय साहेब. आम्हांला तुमची हिम्मत बघायचीय तुम्ही मानताय का सर. काय मा. महापौर साहेब किती अपमान सहन करायचा याला मर्यादा पाहीजे आणि असा जर आपमान वारंवार आपण सहन करुन गेला ना तर ६-८ महिने म्हणुन हिम्मत वाढली प्रशासनाची. कारण हयाच सगळया मुद्दयांना पुढे महिना दोन महिन्यांनी इलेक्शनला सामोरं जायचय. आणि जे न केलेलं पाप मी तर त्या पापात सहभागी होणारच नाही आणि मग मात्र पक्षनेते सत्तारुढ पक्षनेते तुम्ही पण मला दोष द्यायचा नाही. नावासहीत बोलायला सुरुवात करणार आहे आणि बाहेर बोलणार. सभागृहात सोडून द्या बाहेर पण बोलणार. कोण मास्कच्या घोटाळयात होतं, कोण जेवणाचा घोटाळा करतो, कोण औषधाचा घोटाळा करतो, सगळे घोटाळे बाहेर काढीन मी जर तुम्ही अहवाल नसाल मांडणार तर आणि मा. महापौर साहेब तुम्ही आग्रह धरणार नसाल तर. कारण हयाला जबाबदार जे कोण असतील त्यांनी सजा भोगायची. मेलेल्या माणसाच्या टाळूवरचं लोणी खाणा-याची जात माझी नक्कीच नाही. आणि ज्यांची ज्यांची नसेल त्यांनी सगळयांनी हया ठिकाणी मागणी केली पाहिजे मा.कमिशनरांना की त्यांनी हा अहवाल का ठेवला नाही, धन्यवाद मा. महापौर साहेब.

मा.मंगला कदम – मा. महापौर, मा. आयुक्त, माझे सर्व सहकारी सेवाज्येष्टतेनुसार दोन महिलांचा विषय आहे. नेहमी महिलांवरच अन्याय होतो. मागच्या पंचवार्षिकला जे पेरलं तेच उगवलं. पाच वर्षांनी झाड भरलं. आता इथुन मागची पाच वर्ष धरा आणि त्याच्या आधीचं एक वर्ष घ्या त्या वर्षी काय घडलं तेच रोपटं लावलेलं आता हे प्रशासनाच्या रुपाने आलेलं आहे. सीमाताई किती ओरडलं, काही जरी केलं तुम्हांलाही माहित आहे आम्हांलाही माहिती आहे काय झालंय आणि काय होणार आहे. त्यामुळे आपण तयारी ठेवू बाहेर ओरडायची. मा.महापौरांचा अपमान नाही व्हावा अशी माझी पण मनापासुनची इच्छा आहे. कारण महापौर हया शहराच्या आहेत आणि त्यांचा अपमान होऊ नये अशी माझी पण इच्छा आहे. परंतु माणसाने आयुष्यात जे पेरल तेच उगवते. चिंच पेरली तर चिंचच उगवणार त्याला आंबा येणार नाही आणि म्हणुन महापौर साहेब आम्ही तुम्हांला असं सांगत असतो की सभागृह ज्या वेळी चालू होतं त्या सभागृहातील विषयावर आम्हांला बोलू द्या. द्यायचं बोलू महापौर साहेब. नाही त्या विषयावर चार चार तास नाही त्या वेळी जी.बी. पळवायची. काय आहे तसं नसावे. आणि ते होतं ना म्हणुन कंट्रोल आपला प्रशासनावरचा सुटतो आणि म्हणुन मग ते सगळे राजकीय वरदहस्त, राजकीय वगैरे सगळीकड सगळं चालतं. त्यामुळे तुम्ही आदेश दिला काय आम्ही तुमच्या बाजूने असलो काय मग प्रशासनाने ऐकायचं तर नाही काय. असो जे पेरलं ते उगवलं. कमिशनर साहेब तसं तुम्ही आता हा विषय जो आहे सीमाताईंनी सांगितलं की ते आपल्या तारखेनुसार असतं. तारखेनुसार तुमच्याकडून यादी आली पाहिजे, तशी यादी द्या. काही महिला असतील. महिलांवर अन्याय होता कामा नये. मागे एक विषय झाला होता कमिशनर साहेब परत असा हे करायचा नाही. परंतु आमच्या कॉर्पोरेशनचे सुध्दा जे सेवाज्येष्ठतेनुसार लोकं त्या पदांवर बसले पाहिजेत त्यांच्यावर अन्याय करु नका. प्रभाग अधिकारी म्हणुन काही ठिकाणी आमची लोकं सुध्दा बसु शकतात कॉर्पोरेशनची. ताळमेळ हा तुम्ही सगळयांमध्ये घातला पाहिजे. बाहेरुन आलेले अधिकारी आणि आमचे अधिकारी मला त्याच्यात दुफळी करायची नाही. परंतु जी कॉर्पोरेशनमध्ये वर्षानुवर्षे काम करणारी मंडळी आहेत मला काय बोलायचय ते तुम्हांला समजलय परंतु त्याच्यात सुध्दा चार लोकं आहेत त्यांना सुध्दा द्या सर. त्यांनाही आनंद वाटेल की साहेबांनी आपल्याला सुध्दा काम करण्याची संधी दिली. हा दोन नंबर विषयावर माझं मत होतं. मा. महापौर १ नंबर विषयावर मला बोलायचय. मी हात वर केला होता तुम्ही म्हणताल की विषयांतर. आपण कुठे तत्वरेषेनी चाललोय. मगाशी सुध्दा बघा बोलायचं होतं. बोलुन दिलं नाही. तुम्ही म्हणाल्या ताई खुलासा करु द्या. मी तुम्हांला बोलू देते. तुम्ही बोलू दिलं नाही. नुसतं त्यांनी म्हटलं ना विषय मंजूर करा की काय तुम्ही इकडं तिकडं असं नाहीच. की तुम्ही मंजूर केलात की झालं. जर दोन लोकांना त्या विषयावर बोलायचं असेल शहराच्या वरच्या विषयाबर बोलायचंय. मा. महापौर

तुमच्या इथे कुत्र्याचा प्रश्न फार मोठया प्रमाणावर आहे. आज आपल्याला अशी परिस्थिती आहे शहरामधील संख्या घ्या, प्रभागवाईज संख्या काढा, हॉस्पिटल वाईज संख्या काढा. जी रस्त्यावर फिरणारी कुत्री आहेत किती चावली आहेत नागरीकांना मुलांना. काही मुलांचा जीव धोक्यात गेलाय त्याच्यासाठी आणि काही माणसांचा सुध्दा जीव गेलाय धोक्यात याचं मा. महापौर बोलुन दिलं असतं तर तुम्हांला माहिती चांगल्या पध्दतीने मिळाली असती. पण त्याच्यात आपल्याला काही इंटरेस्ट नाही. आपली एक उपसूचना होती तर उपसूचनेसाठी आकांडतांडव केलं आणि विषय मंजूर केला. तोही लोकांच्या हितासाठीचा आणि हा पण लोकांच्या हितासाठीचा. आणि म्हणुन तुम्ही गडबड केली नसती तर मा. महापौर तुम्हांला दोन्ही विषयांच नुसतं विषयांतर समोरची माणसं म्हटल्यानंतर लगेच पक्षनेत्यांना असं वाटलं झालं विषयांतर की आता माझी उपसूचना परत जाती की काय. अहो तीच ना पण घाबरायचं काही कारण नव्हतं. एवढं घाबरायचं काय कारण होतं. सगळयांना मान्य की तुम्ही लोकहितासाठीची उपसुचना होती. सगळयांना मान्य झाली असती ती उपसूचना घेतलीच असती. मा. महापौर इथे तुम्ही दिलेल्या शेवटच्या पहिल्या विषयाला दिलेलं आहे की शौचालयासाठी घेऊन प्राणी बाहेर जाणार आहेत त्यांना जर बघितलं तर रु. ५००/- दंड करण्याची मान्यता देणेकामी. मा. महापौर शहरामध्ये कसं असतं की आपण त्यांची पहिली व्यवस्था केलेली आहे का. नागरीकांचं काय होईल माहिती का. फॉरेनमध्ये कुत्री घेऊन जेव्हा माणसं फिरायला जातात तेव्हा त्यांच्या हातात हँडग्लोव्हज असतात, कॅरी बॅग असते खिशामध्ये. कारण त्यांना ते पहिल्यापासुन माहिती असतं की आपल्या कुत्र्यानी जर रस्त्याचा जर शौचालयासाठी वापर केला तर आपल्याला पिशवीचा वापर करुन डस्टबीन मध्ये टाकायला पाहिजे. म्हणुन फॉरेनमध्ये तशा पध्दतीने व्यवस्था केलेली आहे. आणि तिथे वेगवेगळया प्रकारच्या डस्टबीन आहेत. मग आपण तशी व्यवस्था केलेली आहे का. आपण या माणसांसाठी ५००/- रुपये त्याला दंड लावणार आहोत त्यावेळेला तुम्ही त्यांच्यासाठी छोटेछोटे प्लॉट केलेले आहेत का, की नागरीकांनी तेथे घेऊन जावे त्या प्लॉटवर. असं काही केलं आहे का. कुठल्या हक्काने आपण त्यांच्याकडून ५००/- रुपये दंड वसूल करणार. जर तुम्ही त्यांची व्यवस्थाच नाही केली तुमचं असं म्हणणं असं असेल की त्या कुत्र्याला आता टॉयलेट बांधायचं पण त्या कुत्र्याला माती उकरायची जर सवय असेल तर तो टॉयलेटमध्ये कसा जाईल. बरोबर आहे की नाही. त्यांना ती सवय लावायला पाहिजे ती जन्मापासुन लावली तरच लागणार आहे. मग हयाच्यासाठी उपाय योजना करायला पाहिजे आणि मग तुम्ही दंड लावला पाहिजे हे लक्षात घ्या. पहिली उपाय योजना शोधली पाहिजे मग दंड लावला पाहिजे. मा. महापौर ही जी कुत्री पकडून नेतात लोकं. मागच्या वेळेस सुध्दा विषय झाला होता सभागृहामध्ये. त्या वेळी आम्हांला असंच वाटायचं की का तर सत्ता आमची नाहीए तर विषय काय होईल की नाही

काही उपयोग नाही. पण कमिशनर साहेब बघा जमलं तर आपल्याला काही करता येईल तर. कमिशनर साहेब जी भटकी कुत्री आहेत त्यांना रेड बेल्ट लावायचा. अतिरिक्त आयुक्त (२) त्यावेळेला पवार म्हणुन होते त्यांनी सभागृहामध्ये सांगितलं होतं की मी लक्ष घालून लगेचच इंमपलिमेंट करणार. आज पर्यंत ढाकणे साहेब होते आता अतिरिक्त आयुक्त (२) या पदावर आले आहेत त्यांनीच हे काम करावे असे नाही ज्याच्याकडे जाईल त्यांनी हे काम करावे. परंतु आम्ही असं सांगितलं तर मॉडेल वॉर्ड प्रमाणे तुम्ही एखादा वॉर्ड घ्या की आपण ज्याच्यामध्ये वेगवेगळया प्रकारची घरगूती कुत्री किती आहेत आणि बाहेरची कुत्री किती आहेत आणि ऑपरेशन किती कुत्र्यांची झालेली आहेत ते कमिशनर साहेब मोठा भ्रष्टाचार हयाच्यात आहे. एका कुत्र्यामागे १२००, १३००, १८००, २००० हा मोठा भ्रष्टाचार हयाच्यात आहे. आपण कुठेही बघत नाही ज्या कुत्र्यांचे कान कट केलेले आहेत त्या कुत्र्यांना पण पिल्ले होतातच. हयाच्यावर सुध्दा एकदा सभागृहात चर्चा झाली होती. पण ऑपरेशन फेल व्हायच म्हणजे किती फेल झाली पाहिजेत. पण त्याच्यावर पण अभ्यास केला गेला पाहिजे ना. आपण त्यांना पगार देतो पर ऑपरेशन प्रमाणे पैसे देतो तरी सुध्दा कुत्र्याची संख्या कमी झालेली नाही. शहरातल्या नागरीकांच जीवन धोक्यात आहे. जर कुत्री पिसाळलेली असतील तर ज्या कुत्रीने पिल्लं घातलेली असतील तर ती एवढी त्रास देते आणि काही जर कुत्री पिसाळलेली असतील तर त्यांचे स्कीनला आजार झालेले असतील आणि फोन करुन दगडे साहेबांना जर सांगीतलतर, एक घेवून जर गेलेना तर त्याच्यावर चार फ्री मिळतात. एकावर चार फ्री ही सत्यता आहे आयुक्त साहेब, एक जरी कुत्र पिसाळलेल किंवा खराब झालेल नेलतर त्याच्यावर चार फ्री आणून सोडतात. आम्ही जर फोन केला की दगडे साहेब काय हो, एका वर तुम्ही चार फ्री दिली तुम्ही येवून बघा ही कुत्री आमच्याकडची नव्हती तरी सुध्दा तुम्ही येथे आणून सोडली, काय करायचं. आतातर आम्ही तो नाद पण सोडून दिला की दगडे साहेबांना फोन करायचा कुत्री घेवून जा म्हणून. नुसते विषय झाले पाहीजे पण त्याच्यातून आऊटपुट काही येतए का ते बघा. आणि म्हणून पहील्यांदा उपाययोजना झाल्या पाहीजेत. कुठलातरी एखादा वॉर्ड घ्या या लोकांना बोलवा, जे एनजीओज आहेत त्यांना बोलवा आणि तीथे तुम्ही पहील्यांदा या सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करा. आम्ही करुन बघीतल, आम्ही बोलवलं परंतु प्रशासन हालंल नाही. आम्ही म्हणल कॉर्पोरेशन काही देत नाही, आम्ही देतो. कॉर्पोरेशनकडे बेल्ट नाहीत, मॅनपॉवर नाहीत, आम्ही देतो. जी कुत्री रात्री आकरा नंतरच भेटतात मग त्यांच्यासाठी नाईटशिफ्टची लोक पकडणारी ठेवानां. पण आपल्याकडन तसल काही काम होणार नाही. फक्त रेबीज झालेल्या लोकांचीच संख्या वाढवायची की काय काही कळत नाही. मागे सुध्दा शेल्टरचा विषय निघाला होता की कुञ्यांसाठी शेल्टर केल गेल पाहीजे, कुठ काय झाल. दरवेळेला विषय येतो आणि तो विषय परत जातो आजही तसंच होणार आहे. मा.महापौर साहेब, म्हणून प्रशासनावर जर वचक ठेवायची असेलनां तर विषयाच गांभीर्य आपण आणि सभागृहाने ठेवलतरच प्रशासन ऐकणार आहे. शेवटच्या दोन जीबी आहेत, आम्ही तुमच्या बरोबर आहेत मा.महापौर साहेब. कारण महापौर या शहराच्या महापौर आहेत. तुमचा अपमान हा आमचा आपमान आहे, आम्ही असं म्हणणार नाहीत कमीशनरसाहेबांना प्रशासनाने तुमचा अपमान करावा आणि म्हणून कोणताही विषय शुल्लकातील शुल्लक जरी असेलनांतरी त्याला गांभीर्यांने बघीतल पाहीजे.

मा.आयुक्त साहेब, आता जे बोलले त्यावर लक्ष घाला आणि काहीतरी पिंपरी चिंचवडमध्ये चांगल्या पध्दतीने होईल असं बघाव अशीच विनंती करते आणि थांबते.

मा. संदीप वाघेरे – मा.महापौर साहेब. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय तसा पहिला भटक्या जनावरांचा, कुत्र्यांचा तो मंजूर झाला. टॅक्समध्ये सवलत द्यायची खरं चांगला विषय, चांगली परिस्थिती आणि चांगला निर्णय आहे की दोन वर्ष कोरोनामध्ये सध्या सर्वच लोकांची आर्थिक परिस्थिती खालवलेली आहे. तो विषय विषय पत्रीकेवरती आणून किंवा बाकीच्या गोष्टी करुन केला असता तरी शहराच्या दृष्टीने चांगला निर्णय चांगला आहे की महापालिका नुसतं लोकांकडून पैसे घ्यायचे साधन नाही तर लोकांना सुविधा द्यायच्या, सुख साधन पुरविल्या पाहीजेत का, साधन सामग्री दिली पाहिजे महापालिकेने ती टॅक्स रुपात आपण त्यांच्याकडून कलेक्शन करतो त्याची परतफेड म्हणजे महापालिका ही सर्वांचा दुवा आहे त्याच पध्दतीने महापालिकेचे काम करण्याची अपेक्षा आहे. आता आयुक्त साहेब हा जो विषय आहे पदोन्नतीचा मागच्या वेळेस कोणीतरी सभागृहात बोललं होतं की ज्या ओपन कॅटेगरीज मधल्या जागा आहेत त्याच्यामध्ये एस. सी कॅटेगरीची लोक हाय कोर्टात स्टे असल्यामुळे तिथे त्या भरल्या जातात. मग नंतर ओपन कॅटेगरीचा माणूस तो पात्र असुन सुध्दा जागा शिल्लक नसल्याने व्हेकंट नसल्यामुळे त्याला प्रमोशन भेटत नाही. म्हणजे त्याचा तिथं खोळंबा होतो. पात्रता असुनही नंतर असं धोरण आलं की सेवाज्येष्ठता वगैरे बाकीच्या गोष्टी. पण आता मागच्यावेळेला आपण सह शहर अभियंता भरती करताना पण आपल्याकडे मुळात पाच जागा आपण केल्या सहा. आता लडकत साहेब पाणी पुरवठयाचे त्यांच्याकडे आपण सह शहर अभियंता पाणीपुरवठा पदाचा चार्ज दिलाय. चुकीच्या पध्दतीने पायंडा पाडून चुकीच्या पध्दतीने प्रमोशन होत गेलं त्याच्यामुळे मागच्या लोकांना म्हणजे जे ओरीजिनल पात्र असतात किंवा ओपन कॅटेगरीचे असतात त्यांच्यावर अन्याय होतो आणि काहीवेळा एससीच्या कॅन्डेडवरती पण अन्याय होतो कारण ती जागा व्हेकंट नसते त्यावेळेस आणि ओपनचा माणुस एस.सी.च्या जागेवर भरता येत नाही. त्याचा जो पोर्टफोलिओ त्या प्रमाणे पण एस.सी.चा माणूस ओपन मध्ये घेता येतो. आता आपल्या महापालिकेमध्ये एक वाय.सी.एम. हॉस्पिटल आणि बाकीची हॉस्पिटल आहेत तिथे आपण एम.बी.बी.एस. चे डॉ घेतो किंवा आपण बी.एच.एम.एस. ही घेतो पण एम.डी.एच. चे डॉक्टर जे आहेत त्यांना आपण अजुन प्रमोशन दिलेले नाही म्हणजे माझाच वैयक्तिक मित्र नाही  संपूर्ण सभागृहाचा डॉ. विनायक पाटील कोराना काळात सर्वांत चांगलं काम केलय. हर्डीकर साहेबांना पण म्हटलो होतो साहेब हया माणसांच प्रमोशन करा. त्यांचे पाच वर्ष त्यांनी कॉंट्रॅक्टवरती काम केलय आणि १४ वर्षे त्यांनी महापालिकेच्या अस्थापनेवरती काम केलय. हयांची सर्व्हिस तेवढी झालेली आहे पण ती पाच वर्ष काऊंट होत नाहीत. तसं टोटली बाकीच्या गोष्टी म्हणजे जे तिथे केपेबल आहेत किंवा काय त्याच पध्दतीने इथे प्रमोशन दिले जात नाही. जो माणूस किंवा जो अधिकारी नेतेमंडळींची उंबरे झिजवेल मग त्याचा प्रस्ताव संबंधित विभागात  ठेवला जाणार तिथनं तो महापालिकेकडे

येणार आणि तो मंजूर होणार आणि महापौर साहेब सर्वात महत्वाचा पहिला विषय आहे. त्याच्यावर मी बोलणार आहे भटकी जनावरे व कुत्री. डिसेंबर २०२० ला चिखलीमध्ये सर्व्हे नं. १६५५/२ ही साधारणपणे ५ एकर जागा कॅटल शेडसाठी महापालिकेने दिली आणि ही महानगरपालिकेला टीडीआर च्या स्वरुपात २०१६ ला जागा भेटली. मग त्याच्यानंतर चार वर्षांनी मागं लागून कॅटल शेडचं प्रपोजल दिलं होतं. आजतागायत एक वर्ष होईल त्याला. महापालिकेने जलि:सारण, स्थापत्य विभाग, विद्युत विभाग, ड्रेनेज किंवा तार फेंसिंग वगैरे काही केलेलं नाही. आणि त्याचं टेंडर काढल आणि संबंधित विभागाला सांगितलं की तु इथं व्यवस्था करा. आयुक्त साहेब माझ्या माहितीप्रमाणे गेल्या महिन्यात एक व्हिडीओ आणि काही फोटो सेंड केले होते, गायीला लागलं होतं गाईला उडवलं होते. दगडे साहेबांना आम्ही कन्टीन्यु फोन करतोय ते आम्हांला रेस्पॉंस देत नाहीत, ते आमच्या फोनलाही रेस्पॉन्स देत नाहीत. हया गाया ज्या जखमी होतात गाडया उडवतात वगैरे काही आता परिस्थिती अशी झाली आहे की भोसरीमध्ये त्याच्यानंतर पिंपळे निलख मध्ये तीन गाया पाच गाया कापल्या म्हणजे खाटीक समाजाची जी लोकं खातात आपण हिंदू शास्त्राप्रमाणे गाईला आपण देव मानतो आणि तिची आपण अशी अवहेलना करतो आणि हयाच्यात तुमच्या म्हटलय ३००० मोकाट जनावरं आणि ९०००० कुत्री १९ लाख २१ हजार कुत्र्यावर शस्त्रक्रिया केली. प्राणी मित्र संघटनेने म्हटलय की हे कान कापायचं नाही काही नाही त्याच्यावर बंदी आणली नंतर आपण बेल्टसाठी पण एक टेंडर काढलं. कुत्र्याच्या गळयात बेल्ट घालायचा, आहो तुम्हांला आहे ते सापडत नाही तुम्ही बेल्ट घातल्यावर कधी सापडणार तुम्हांला. त्याच्यावर शस्त्रक्रिया केली असं आपण म्हणतो. आयुक्त साहेब मग हे कुत्र्यांचे प्रॉडक्शन वाढतं कुठनं. बरं ज्यांच्या घरात पाळीव कुत्री पण आहेत आता मंगलाताईंनी पण सांगितलं खरंच अमेरिका वगैरे देशांमध्ये परिस्थिती आहे हँडग्लोव्हज बॅग वगैरे घेऊन. मोदी साहेबांनी हगणदारी मुक्त शहर वगैरे गोष्टी देशामध्ये सगळीकडे राबवल्या पण कुत्र्यांसाठी काय आणि सीमाताईंनी मगाशी पसायदान आणि लोकशाहींचं वाचलं आणि इथे एक चांगल लिहीलं होतं. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावरती "सत्य न्याय शांती राहो जगी जनहित विकासाचं गाठूया उतूंग शिखर" पण हे कधीचच आहे हे पण होईल. सत्य न्याय हया पध्दतीने महापालिकेत काय झालं की पाच वर्ष सगळयांनीच बघितलय. परिस्थिती काय आहे मा. महापौर साहेब आयुक्तांना तुम्ही माझ्या माहितीप्रमाणे एप्रिलच्या महिन्याच्या दरम्यान आदेश दिला होता की स्पर्शचा अहवाल २० दिवसांत तुम्ही द्या. तो आजतागायत आपण ठीक आहे. हेच अधिकारी अमुक तमुक ठिकाणी आहेत त्यांचे मित्र परिवार अनेक गोष्टी तो अहवाल जर आला स्पर्शमध्ये किंवा त्या अहवालामध्ये काय आहे ते सभागृहाला कळलं पाहिजे ना. आज चौथ्या महिन्यात जर तुम्ही आदेश दिलाय आज अकरावा महिना आहे म्हणजे सहा सात महिने हयाच्यात काय झालं कोणालाच माहित नाही. बरं कुणाला ज्याने केस केली आहे बाकीच्या गोष्टी केल्या आहेत त्याने कोर्टात जाऊन त्या अहवालावरती आदेश मागतील, बाकीच्या गोष्टी करतील. पण इथं काही जे

चाललय ते ढकलायचं काम चाललय. म्हणजे आपण कोणावर पांघरुण घालतोय का. कोणाला वाचवतोय का. आणि सभागृहात ब-याच वेळा म्हटलेलं आहे “दुध का दुध, पानी का पानी” करा. जे भ्रष्टाचारी आहेत जे कोण आहेत ते उघड होईल सगळं आणि आयुक्त साहेब तुम्ही मला एक खुलासा करुन सांगा की सर्व्हे नं. १६५५/२ कॅटल शेडच्या साठी गेल्या वर्षी महापालिकेत ठराव झाला. सगळया गोष्टी झाल्या. अमुक अमुक संस्थेला गोरक्षणासाठी द्यायचं त्याचं काय झालं. भटकी जनावरे आणि कुत्री आज महापालिकेमध्ये चार कोंडवाडे होते. म्हणजे ज्या वेळेला महापालिका स्थापन झाली मोकाट जनावरे वगैरे पकडण्यासाठी चार आणि माई तुमच्या पिंपळे निलखमध्ये पण एक कोंडवाडा आहे. म्हणजे तुम्ही नांदगुडेंच्या आत मला माहित आहे की तिथे कोंडवाडा आहे पिंपळे निलख मध्ये माहेर आहे तुमचं. पिंपरी गावात एक आहे भासरीत एक आहे आणि आकुर्डीत एक आहे. हया महापालिकेने ते कोंडवाडे नाममात्र दरावर काही संस्थांना भाडयाने दिले आहेत. आयुक्त साहेब भाडं किती माहिती आहे का २२४/- रुपये, २३४/- रुपये २१०/- रुपये महापालिकेला भीक लागलीय का एवढं मोठं भाड घ्यायची. इथे कोंडवाडे तिथे दवाखाने जर केले असते. माझा पिंपरी तील कोंडवाडा मी प्लॉट खाली करुन घेतला तिथे एखादा दवाखान चालू करा कुत्र्यांचा जनावरांचा. आपल्यांकडे मॅनपावर आहे. किंवा संस्था आहेत त्या तिथे इम्प्लिमेंट करतील फक्त आपली मानसिकता पाहिजे काम करण्याची. आपल्याकडे साधन सामग्री यंत्रणा सर्व काही आहे पण आपली मानसिकताच नाहीए आणि आपण म्हणतो की आपलं शहर जगातलं एक नंबर झाले पाहिजे. भारतात एक नंबर झाले पाहिजे त्याची सुरुवात छोटया छोटया गोष्टींनीच झाली पाहिजे. आणि आता आपल्या हातात करण्यासारख्या गोष्टी आहेत. महापौर साहेब त्या कॅटलशेडचं काय झालं आयुक्त साहेबांनी खुलासा करावा कारण की आज एक वर्ष होऊन गेलं. २०१६ ला आपल्याला जागा ताब्यात आली आहे. आजपासुन पाच वर्षापूर्वी ६ वर्षापूर्वी अजुनपर्यंत महापालिकेने एक रुपया तिथे खर्च केला नाहीए. स्थापत्य विभाग करोडो रुपयाच्या टेंडर काढतं पाणी पुरवठा बाकीची कुठलीच गोष्ट केलेली नाही. तशीच्या तशी ती जागा पडून आहे. मला खुलासा करावा साहेब. एवढं बोलून थांबतो, जयहिंद जय महाराष्ट्र.

मा. मिनल यादव – मा.महापौर साहेब, मा. सभागृह, मा. कमिशनर. माई मी फक्त विनंती करण्यासाठी उभी आहे की आता कोरोनाचं संकट सगळंच कमी झालेलं आहे. सोयीनुसार आपण संकट जवळ घेतो आणि संकट दूर करतो. ज्याप्रमाणे आता मागील दोन महिन्यापासून आपली जनरल बॉडी चालू झालेली आहे त्याचप्रमाणे अधिकारी वर्गालाही कोरोनांचं संकट माझ्या माहितीप्रमाणे कमी झालेलं असेल. त्याच्यामुळे त्यांनी इथे येऊन बसलं तर काही हरकत नाही. आम्ही सगळयांचे दोन दोन डोस झालेले आहेत म्हणजे आमच्यामुळे त्यांना काही भिती नाही. बोलण्याचा माझा हेतू एवढाच आहे की आम्ही ज्या पोटतिडीकीने बोलतो कुठल्याही विषयावर

बोलतो ते विषय ते अधिकारी वर्ग आतमध्ये बसुन तेवढया गांभीर्याने घेत नाहीत माई. आम्ही वेडे म्हणुन दर महीन्याला प्रत्येक नगरसेवक बोलतो. कुठलेही विषय असुदे सगळया प्रभागाचे झोनल अधिकारी असतील, स्थापत्य असेल, एसटीपी असेल, स्मार्ट सिटी असेल प्रत्येक विषयावर बोलताना त्या अधिका-यांना कुठल्याच विषयाचं काही देणं घेणं राहिलेलं नाही. ज्या पध्दतीने आम्ही विषय मांडतो त्यांना विचारलं तर त्यांना माहितीही नसतं की हा विषय सभागृहामध्ये चर्चेसाठी आलेला आहे. त्याच्यामुळे माई मी विनंती करते की राहिलेल्या दोन सभांना तरी सगळा अधिकारी वर्ग इथे उपस्थित असला पाहिजे आणि प्रत्येक डिपार्टमेंटचा प्रत्येक अधिकारी वर्ग इथे उपस्थित असावा एवढी मी विनंती करते.

मा.योगेश बहल – सन्मा. महापौर, मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, मा. महापौर साहेब ज्या वेळेला आपण जनरल बॉडी सभागृहात घेत नव्हतो आणि ऑनलाईन घेत होतो, तुमच्या सभागृहामध्ये येऊन आम्ही दारे, खिडक्या, काचा वाजवल्या होत्या. त्या वेळेला सुध्दा अशाच एका सन्मा. सदस्यांनी उपसूचनांचा पाऊस पाडला एकाच विषयाला २४ उपसूचना देऊन. मगाशी खुलासा करीत असताना नगरसचिवांनी सांगितले. त्यांनी महापालिका सभा कामकाज हयाची नियमावली सांगितली. नियमावलीमध्ये नियम क्र. ३९ चा तीन त्यामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की एक सन्मा. सदस्य एका पेक्षा अधिक उपसूचना देऊ शकत नाही. आपण दोन दोन, चार चार, पाच पाच आणि त्यात एका उपसूचनेमध्ये आमचे सन्मा. सदस्य केशवजी घोळवेंना माझी विनंती आहे एक अभ्यासू नगरसेवक आहेत आपण पूर्ण अभ्यास करुन विषय मांडला तर बरे होईल. सभागृहामध्ये माझा, अजितभाऊंचा, भाऊसाहेबांचा किंवा कोणाचा विषयाला विरोध नव्हता. आम्ही कामकाजाचा विरोध करत होतो की ज्या चुकीच्या पध्दतीने सत्ताधारी काम करतात. ज्या चुकीच्या पध्दतीने सत्ताधारी काम करतात काही तरी दाखवायचं चांगलं म्हणुन आणि करायचा घोळ अनं घोळवेंच्या हातातच दयायच. उपसूचना मांडण्यामध्ये घोळवेंचा उच्चांक आहे. आपण काढलं पाहिजे एक वर्षात किती उपसूचना त्यांनी दिल्या आहेत आणि मग त्या सुसंगत नसतील तर त्यांनी अस म्हटलय वाढ किंवा घट त्या विषयाला अनुसरुन असली पाहिजे. हे स्पष्ट आहे महापौर हे एवढं स्पष्ट असताना तुम्ही एवढया सिनिअर मेंबर आहात तुम्ही स्थायी समिती अध्यक्ष होता. नगरसेवक म्हणुन काम करताय. महापौर म्हणुन काम करताय. विषय रेटून का नेता. सभागृह नेत्यांनी सांगितलं म्हणजे काय झालं. सभागृह नेते म्हणजे असं झालं की आयुक्त उत्तर देत नाहीत ते नगरसचिव उत्तरं देत नाहीत. आम्हांला सभागृह नेतेच उत्तर देतात. माझी विनंती आहे सभागृह नेत्यांना की आता आम्ही ३६ होतो त्यातले पण दोन सहकारी गेले. आम्ही ३४ लोक राहिलोय. राहिले फक्त दोन महिने. दोन महिन्यामध्ये माझी विनंती आहे तुम्हांला आमच्या राष्ट्रवादीच्या वतीने. तुम्ही महापालिका सभागृहाचं कामकाज कसं असतं हयाचं एक आम्हांला प्रशिक्षण द्या. म्हणजे हा घोळ होणार

नाही. आम्हांला जर प्रशिक्षण दिलं तर बरं होईल. मा. महापौर साहेब अशा चुकीच्या पध्दतीने काम करु नका. आम्ही म्हटलं नाही की आम्ही विषयाबद्दल बोललो नाही. नगरसचिव वाचताएत, सांगताएत की एका पेक्षा अधिक उपसूचना एक नगरसदस्य देऊ शकत नाही. अनुमोदन पण एका पेक्षा जास्त देऊ शकत नाही. मग असं स्पष्ट असताना आता एका सन्मा. सदस्यांने एवढया उपसूचना वाचायच्या दोन दोन उपसूचना वाचायच्या हे चुकीचे आहे, कळतय माहिती आहे आपल्याला तरी आपण रेटून नेतोय. सगळं रेटून काम चालवलय. आता आम्हांला कुत्र किंवा मांजरे हयाच्याबद्दल बोलायचे होते. वास्तविक पाहता आपले काय नियम आहेत का हयाला. महापालिकेने काही व्यवस्था केली आहे का. विषय चांगला आहे. त्या विषयाला आमचा तसा विरोध नाही. परंतु मा. महापौर साहेब तुम्ही काय केलं. घाईगडबडीमध्ये मांजरीच्या नसबंदीला १३००, कुत्र्याच्याला १२०० रुपये आता मला सांगा एका बाजूला तुम्ही एका उपसूचनेद्वारे असे म्हणताय अमुक तमुक करामध्ये ५ टक्के सुट द्या. अमुक अमुक हयात  असं करा. मला तर पुढं तर फलकांचा विषय आहे, शहर विद्रुप होतय त्यासाठी पण काहीतरी विषय आहे. मग शहर आपण वाय फाय करतोय. शहर आपण स्मार्ट करतोय मग हे सगळ असतांना आपल्याला या गोष्टीची काळजी घ्यायचीय. कोटयावधी रुपये आपण बाकीच्या कामांना त्या खड्डयात घालतोय आपण, केबल कुठे आहे अजुन आयुक्तांना दाखवली नाही.  आपण त्यांना सांगितलं की तुम्ही चला किती फुटावर केबल आहे आयुक्तांना दाखवा, दाखवली का नाही दाखवली. आता महापौर साहेब एवढा विषय चांगला असताना कुत्र्याबद्दल लोक त्रस्त आहेत प्रॉब्लेम आहेत मान्य आहे. काय आपले नेहरुनगरचे हॉस्पिटल आहे डॉक्टर आहेत त्याची काय अवस्था आहे. आपण टेंडर काढलय महापौर साहेब आपल्या माहितीसाठी सांगतो मा. ढाकणे साहेब आपण जरा लिहून घेतलं तर बर होईल. जर आमचे नवीन ऍडीशनल आलेत आपण ऐकू शकता भटक्या कुत्र्यांच्या नसबंदी कोरोना काळामध्ये झालेला भ्रष्टाचार. फक्त तीन महिन्यांचे आकडे आपल्या समोर मांडू इच्छितो कोरोना काळामध्ये सत्ताधा-यांनी हे पण सोडलं नाही. कुत्र्याच्या नसबंदीमधला भ्रष्टाचार तो सत्ताधारींनी सोडला नाही. कोविड मध्ये तर केलाच केला. रेमडेसिवीर विकले, भारतीय जनता पार्टीच्या लोकांनी शेवटी हॉस्पिटल बंद करायला लावलं. कारण का तर त्यांना ज्या वेळेस वाटलं की चुकीचे आहे त्या वेळी करायचला लावलं. मा. महापौर मी आपल्याला माहिती सांगू इच्छितो की आपल्याकडे चार लोकांनी टेंडर भरले होते त्यामध्ये जीवरक्षक ऍनिमल वेलफेअर ट्रस्ट, सोसायटी फॉर  फ्रीक्शन ऑफ ट्रु ऍनिमल आणि जॉनीस ट्रस्ट २०१७ पासुन हया सर्वांना काम दिले आहे. मा. महापौर साहेब प्रति नसबंदीला ९९९/- प्रति नसबंदीला ९९९/- कुत्र्यांसाठी आणि हे काम सहा महिन्यांसाठी एका संस्थेला देणेत आले. करारनाम्याचे जे नियम आहेत  करारनाम्याची कॉपी इथे माझ्याकडे आहे. मा. आयुक्त साहेब

हयात स्पष्ट लिहिले आहे की तिथे तुम्ही डिजिटल रेकॉर्डींग करायचं आहे. एक तरी डीजीटल रेकॉर्डींग तुम्ही दाखवाल का आम्हांला. अट आहे टेंडरमध्ये अट आहे तिथं डीजीटल रेकॉर्डींग करुन त्यांनी आम्हांला द्यायचय. इथे सर्जरी होते महापौर साहेब चार कुत्र्यांची त्यांच्यापुढे आकडा मांडला जातो २ होतात २४. कर्मचारी तिथे पाहिजेत आठ, डॉक्टर पाहिजेत तिथे दोन, आत्ता चला माझ्याबरोबर आत्ता. सभागृह सोडून मी ढाकणे साहेबांबरोबर जायला तयार आहे. एक डॉक्टर असेल चुकुन आणि एक कर्मचारी किंवा २ कर्मचारी असतात तो डॉक्टरांचा व्हिडीओ माझ्याकडे आहे. तो तिथे बसून गांजा ओढतोय. मी व्हिडीओ दाखवतो तुम्हांला. तिथं बसून गांजा ओढतोय तो. कोरोनाच्या काळामध्ये माहितीच्या अधिकारात जी मी माहिती घेतली तिथली. आपल्याकडे जे काही बायोमेडीकल वेस्ट आहे जे काही बाकीचे वेस्ट आहे ती एजन्सी आपण पास्कोला दिलेली आहे. आणि पास्कोची माहिती आम्ही माहिती अधिकारात घेतलेली आहे. पास्कोचं जे माहिती अधिकारामध्ये माहिती घेतली आहे त्याच्या फिगर्स माझ्याकडे आहेत. पास्कोनी ज्या ज्या वेळेला कोरोना काळामध्ये त्यांच्याकड खूप काम होतं कोरोना काळामध्ये त्याच्याकडे खूप काम होतं. त्यामुळे आपण बघू शकता पास्कोचं दैनंदिन कामाचं रेकॉर्ड मी माहिती अधिकारात घेतलं आणि हया दैनंदिन रेकॉर्डमध्ये असं स्पष्ट दिसून येतय की २३ मार्च लॉकडाऊनचा काळ सांगतोय मी. २३ मार्च २०२० ते ८ ऑगस्ट पर्यंत तिथं कामकाजच झालं नाही म्हणजे पास्को हा तिथं १३७ दिवस मा. आयुक्त साहेब १३७ दिवस हा पास्को २३ मार्च २०२० पासुन ८ ऑगस्ट २०२० पर्यंत तो तिथं बायोमेडीकल वेस्ट घ्यायला गेलाच नाही. हयाचाच अर्थ तिथे नसबंदी झाली नाही आणि जर नसबंदी झालेली असेल तर तिथलं गारबेज तिथलं वेस्ट कोणी नेल कसं नेलं हे प्रुफ आहे हे प्रुफ. जर हा गेला नाही तुम्ही प्रशासनाने दिलं ते माझ्याकडे माहिती अधिकारात पुस्तक आहे. दुसरी माहिती अशी सांगू इच्छितो की हया काळामध्ये तीन महिन्यामध्ये हे ऍग्रीमेंट आहे. हया ऍग्रीमेंटच्या टर्म्स आणि कंडीशन्स आहेत तुम्ही वाचू शकता त्याचं पण पूर्णपणे उल्लंघन करण्यात आलेलं आहे. अजिबात त्या पध्दतीने काम झालेलं नाही. दुसरी गोष्ट आता सन्माननीयांनी सांगितले की कुत्र्याच्या कानाला कट करायचं वगैरे ते तर होत नाही परंतु हया चारही संस्थांनी जे काम त्या काळात केलेलं आहे ते तुम्हाला फिगर्स देतो. तीन महिन्यांमध्ये मा. महापौर साहेब जीवरक्षा ऍनिमल वेलफेअर ट्रस्ट आहे या संस्थेने १४७५ कुत्र्यांची नसबंदी केली. या तीन महिन्यात कोरोनाकाळामध्ये सगळं जग ठप्प आहे फक्त आपले हॉस्पिटल चालू होते. त्या काळात हया संस्थेने किती केलेत १४७५ X ९९९ = १४,७३,५२५/- रु. बील हयांना देण्यात आले आहे. सोसायटी फॉर प्रिक्शन ऑफ बुलेट टुल ऍनिमल यांनी १९०२ कुत्र्यांची नसबंदी केली त्याच तीन महिन्यात ज्या तीन महिन्यामध्ये पास्कोने तिथनं काही वाहून नेलं नाही हे सगळं मॅनिप्युलेशन आहे. आता १९०२ X ९९९ = १९,००,०९८/- चे बील देणेत आले आहे. ऍनिमल वेलफेअर असोसिएशनचे सुध्दा १९०२ त्यांनी ९९९/- प्रमाणे कुत्र्यांची नसबंदी केली

आहे त्याला १९,००,०९८/- रु. बील देणेत आले आहे आणि जी जॉनीस ट्रस्टने एकूण १८४५ कुत्र्यांची नसबंदी केलेली आहे म्हणजे हया तीन महिन्यामध्ये एकूण कुत्र्यांची नसबंदी झाली आहे ती ७१२५. मा. महापौर साहेब हया तीन महिन्यामध्ये हया माहिती अधिकारातील फिगर आहेत. चुकीच्या फिगर नाहीत. रकमा घेतलेल्या आहेत. किती कुत्र्यांच्या नसबंदी झाल्याच्या घेतल्या आहेत. मा. महापौर साहेब ७१२५ कुत्र्यांची नसबंदी केली असे दाखवले गेलेले आहे. आणि त्या पोटी हे सर्व पैसे दिले गेलेले आहेत. किती चुकीचे काम होतय महापौर साहेब आणि अजेंडयावर विषय एवढा महत्वाचा असताना आम्हांला बोलायचं असताना तुमच्याकडे माहिती ठेवायची असताना आम्हांला बोलू दिलं नाही सभागृह नेत्यांनी. मंजूर करा मंजुर करा आणि हे काय आहे हयाला जबाबदार तुम्ही आहे. ते पैसे तुम्ही द्यायला लावले आणि तुमच्या माहितीसाठी सांगू इच्छितो तुमच्याच पक्षातील एक सरचिटणीस हया गोष्टीशी संबंधित मी प्रुव्ह करु शकतो हेपण मी पुव्ह करु शकतो. मग मा. महापौर साहेब पैसे कुठ कुठ लाटावे आणि कसे लाटावे आणि का बोलू द्यायच नाही आम्हांला आम्ही तुम्हांला नियमाप्रमाणे बोलतो. विषयांतर केले का. मा.महापौर आम्ही तुमचा सगळेजण आदर करतो. फक्त चुकीच्या पध्दतीने जाऊ नका. मग एवढा भ्रष्टाचार, नसबंदीमध्ये पण भ्रष्टाचार. अहो मी तुम्हांला व्हिडीओ दाखवू शकतो. दाखवण्यासारखा नाहीए. मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब तिथं जाऊन तो टेबल बघा. आपले सिमेंटचे ब्लॉक ठेवून त्या कुत्र्याचे पाय बांधून अमानुष पध्दतीने नसबंदी केली जाते. एक माणुस तो डॉक्टर तिथे बसुन गांजा ओढतो तुम्हांला व्हिडीओ दाखवतो मी. मग अशा पध्दतीने एका संस्थेला पैसे द्यायचे आणि त्याच्यावर कोणाचे लक्ष नाहीए. डॉक्टर काय करतात. मग नसबंदी नेमकी केली कोणाची. हा मोठा प्रश्न आहे. मग तीन महिन्यात ७००० कुत्र्यांची नसबंदी केलेली आहे. मग असं कसं, मगाशी मंगलाताईंनी सांगितलं, सीमाताईंनी सांगितलं आमच्या संदीपरावांनी सांगितलं मग ही कुत्री येतात कुठुन आणि काय उपाय योजना आपण केलेली आहे. आज आपण नागरीकांच्या माथ्यावर ५००/- रु. मारुन टाकले आहेत त्यांनी काय करायचं. घरातनं काय घेऊन निघायचं आपण संस्थांना काम दिलेलं आहे. ओला कचरा सुका कचरा पण परत त्यामध्ये टेंडर आहे आयुक्तांनाही महिना झाला पत्र देऊन. मा. महापौर साहेब एक महिना झाला पत्र देऊन ती साई सर्व्हिसेस प्रा. लि. बद्दल. सगळी बोगस कागदपत्र, सर्व बोगस कागदपत्र आणि दुर्देव असं की मी १५ दिवसापूर्वी आयुक्तांना भेटलो. मा. आयुक्तांनी त्याच्यावर लिहीलं आणि मला म्हटले की हे जर बोगस असेल तर हा नक्की जेलमध्ये जाईल आणि आम्ही त्याच्यावर तशी कारवाई करु. त्यांनी प्रस्ताव पाठवला व्हिजिलन्सला. व्हिजिलन्सनी आठ दिवस ठेवले आणि व्हिजिलन्सनी पत्र पाठवलं खांडकेकर साहेबांकडे. आता खांडकेकर निवडणुकीची कामे बघणार का हे कागदपत्र तपासणार. त्या संबंधित विभागाचे डॉक्टर माई गेले तीन वर्षाचा आपण अनुभव घेतोय. आपण म्हणतो की मी ३ वर्षात किती काम केलं, किती लाखांच काम केलं, किती कोटीचं काम केलं, किती कर्मचारी पुरवले, त्यांचा पगार

झाला का, त्यांची नावे आहेत का, त्यांचा टीडीएस कापलाय का, त्यांचा जीएसटी भरलाय का, त्यांचा ताळेबंद पाहिला का. आपल्या अधिका-यांनी काही पाहयलं नाही. कारण आपले अधिकारी त्याच्यात सामील आहेत आणि त्यांच्यावर प्रेशर आहे. त्याच्यामुळे ते काहीच करत नाहीत आणि आता आपण प्रेस कॉन्फरंस घेतली. सगळया पेपरला छापून आलंय. आज महिना झाला माई अजुन त्याच्यावर पुढे काही झालेलं नाही. आणि मी पुन्हा ओरडलो तेव्हा मला आता व्हिजिलन्सवाल्यांनी पत्र दिलंय. सीमाताई तुम्ही पण लक्षात घ्या. भाऊसाहेब ऐका. व्हिजिलन्सवाल्यांनी मला पत्र दिलंय की तुमच्याकडे काय पुरावे आहेत ते द्या. आता मला सांगा आयुक्त साहेब व्हिजिलन्सनी मला पत्र द्यावं की माझ्याकडे काय पुरावे आहेत. व्हिजिलन्स डिपार्टमेंट काढता कशाला तुम्ही. मी पत्र दाखवीन तुम्हांला. मला परवा पत्र दिलय की तुमच्याकडे काय पुरावे आहेत ते द्या, म्हणजे पुरावे मी द्यायचे, भ्रष्टाचार हयांनी करायचा, टक्केवारी हयांनी खायची पत्र हयानी द्यायचं की बीलं मिळाली. अहो मी त्या आळेफाटयाला जाऊन आलो. मी मुंबईला जाऊन आलो. मुंबईच्या डॉक्टरला भेटलो. आळेफाटयाला गेलो तो दवाखाना बंद होता. सर्टिफिकेट जोडले आहे. तो डॉक्टर आमच्या संत तुकाराम नगरला राहतो त्याला बोलावून घेतला तो घाबरला. थरथर कापायला लागला. तो म्हणाला माझ्याकडून फक्त लेटरहेड नेलेलं आहे. मग फक्त लेटरहेडवर लिहून दिलं असेल की मी इतकं मनुष्यबळ पुरवलं तर तुम्ही टेंडर देऊन टाकता, काय करतात आयुक्त, ऑडीट डिपार्टमेंट काय करतं. तो डॉक्टर काय करतो तिथं बसवलेला. जो काम करणारा डॉक्टर आहे त्याला बसवला बाजुला आणि जो निकामा आहे त्याला बसवला खुर्चीवर. त्याला म्हटलं उठ तर उठतो त्याला म्हटलं बस तर बसतो त्याला बोलल तर तो आजारी पडतो, त्याचा बीपी वाढतो मा. महापौर साहेब हा भ्रष्टाचार कुठं तरी थांबवा आणि जर खरंच आपली लोक त्यांत नाहीएत ना सत्ताधारी त्यात नाहीएत ना मग तुम्ही उघडा ते प्रकरण, काळया यादीत टाका. आम्ही पुरावे दिलेत पुरावे. आम्ही पुरावे दिलेत पत्रकारांना. आता प्रशासन मला पुरावे मागतय. मग करायचं काय. त्यांचे काम आहेना माझंच पत्र गेल्या गेल्या प्रेस काँन्फरन्स झाली त्या बरोबर संबंधित विभागाच्या डॉक्टरांनी हेडक्लार्कनी संबंधित विभागाचा जो कोणी असेल त्यांनी त्या संस्थांना पत्र दिले पाहिजे की तुम्ही जे जे कागदपत्र पुरावे जोडलेले आहेत ते सर्व सर्टिफिकेट आम्हांला आणून द्या. त्यांचे सगळे ताळेबंद आम्हांला आणून द्या. कारण तीन वर्षाचा अनुभव दिलेला आहे. जीएसटी भरलाय का, टीडीएस भरलाय का, रिर्टन फाइल केलेले आहेत का, ऍग्रीमेंट झालेलं आहे का. तुम्ही मनुष्यबळ पुरवले त्यांची नावे द्या. त्यांना किती पगार होता, किती मेल किती फिमेल पुरवले, किती डॉक्टर दिले काय केल आपण मला पत्र दिलयं आणि मी त्या पत्राचं उत्तर पण तयार केलय. आज देऊन टाकणार आहे. माझ्याकडे दोन्ही माहिती आहेत ते देणार आहे कारण वेळ नको वाया जायला. प्रशासनाला कळतय पुढचं टेंडर काढायचं असत घाई पुढच्या टेंडरची

असते आता तर मला असं पण कळलय आज की ज्या साठी मागे स्थायी समिती मध्ये विषय होता त्या विषयामध्ये टॅब खरेदीवर आम्ही बोललो. त्यावेळेस पण विषय तहकुब झाला. आता परत प्रशासनाच्या डोक्यात कोणी सुपीक निर्णय टाकलेला दिसतोय आता टॅब परत खरेदी करा. करा बाबा. तुम्ही काय पण करु शकता, आता २ महिने आहेत काय करायचं ते करुन घ्या. मा. महापौर साहेब हे जे तुम्हाला फिगर्स दिलेल्या आहेत ते सर्व सत्य आहेत. तुम्ही नसबंदी विषयक जी माहिती दिली आम्हाला त्या विषयावर बोलायचं होतं. नागरीकांना जी जनावरे ते पाळतात त्यांच्यासाठी आपण काय करु शकतो. आपण हजारो लोकांना वाय.सी.एम. मध्ये मोफत उपचार देतो. मग ही कुत्री प्रामाणिक आहेत. जर प्रामाणिक जातीसाठी आपण प्रामाणिक वागाव. हया प्रामाणिक जातीसाठी प्रामाणिक वागले पाहिजे ना. मग त्याच्यावर चर्चा नको का. आम्हांला सभा शाखेचे नियम बरोबर आहे सुसंगत आहे हे शिकवायला लागले, अरे सुसंगत कशाला म्हणतात हे तरी कळतय का. विषय कोणता उपसूचना कोणती आणि नियम म्हणतो एक उपसूचना द्यायची तर ऑनलाइनच्या टायमाला महापौर साहेब एका विषयाला २४ उपसूचना दिल्यात. मी मा. महापौरांना पत्र दिलयं, आयुक्तांकडे पत्र दिलेल आहे की ते सर्व रद्द करा. हा कोणता सभा शाखेचा नियम आहे आणि मग मला काय म्हणायचय जगताप साहेब काय पुस्तकातले नियम वाचायला तिथं बसलेत का. त्यांनी सांगायला नको का हे नियमाधीन नाहीए. ढकलुन देतात महापौरांचा अधिकार आहे, आयुक्तांचा अधिकार आहे, मग आम्हांला काहीच अधिकार नाहीएत. पक्षनेत्यांनी इथं बसायचं तुम्ही तिघांनी इथं बसायचं. जीबी घ्यायची. आम्ही घरी जातो. तुमचाच अधिकार आहे. कारण मेजॉरिटी तुमची आहे. नेता तुमचा आहे, महापौर तुमचेच, आयुक्त तुमचे आणि सेक्रेटरी पण तुमचा. तुम्ही सभा चालवा ना. हे कशाला पाहिजे, हे नकोत मा. महापौर बोलण्यासारखे भरपूर आहे. परंतु माझी आपल्याला विनंती आहे जे विषय मी आपल्यासमोर मांडले आहेत त्याची तुम्ही माहिती घ्या. कोविडच्या काळात झालेला भ्रष्टाचार तुम्हांला माहिती आहे त्याच्यावर आयुक्तांनी हात झटकले. आयुक्तांनी विभागीय आयुक्तांकडे पाठवलं. विभागीय आयुक्तांनी तिस-या अधिका-यांकडे दिलं. शेवटी आम्हांला पी.आय. दाखल करावी लागली. दर्दैव असं की कोविडच्या काळात कोर्टाना पण सुट्टी होती म्हणुन शेवटी तेही लांबत गेलं. परंतु तो भ्रष्टाचार सुध्दा उघडकीस येणार आहे. कुंदन आणि त्याच्या सहका-यांवर त्यावेळेला अन्याय झाला त्यांच्या टीचरवर त्यावेळेला ते भडकले तेव्हा सत्ताधारी जागे झाले. त्याच्या आधी आम्ही ओरडत होतो. ओरडत होतो. परंतु तेव्हा तुम्ही ऐकलं नाही परंतु आम्ही त्यावेळेला कुंदनला त्याच्या सहका-यांना साथ दिली आणि आम्ही पण तुमच्याबरोबर थांबलो की जे चुकीचं आहे ते चुकीचं आहे जे चांगलं काम आहे ते चांगलं काम आहे. आम्ही काय विरोध केला. आम्ही साथच दिली. त्याच्याआधी आम्ही ओरडत होतो तिथे किती रेमिडीसिव्हर विकले गेले किती लोकांकडून लाखो रुपये घेतले गेले. किती

चुकीचं काम झालय पण आपण आपली पाठ थोपटून घेतोय. मा. महापौर साहेब त्याच्यावर अजुन मला सांगायच झालं तर प्रेस कॉन्फरन्स पण झाली. हया स्थायीच्या कामाबद्दल सगळी माहिती दिली गेली. त्याच्यानंतर मागच्या स्थायी समिती मध्ये साफसफाईचं काम साधारणत: वीस कोटीचे काम होते त्याला बहाल करण्यात आलं. मग जर सत्ताधा-यांना बर काय वाईट काय कळतय त्याच्यावर प्रेस कॉन्फरन्स झाली तर एखाद्या तरी सदस्यांनी ओरडायला पाहिजे होतं की हयाची चौकशी करावी. इथं चुकीचं आहे, हा विषय तहकुब ठेवावा. किमान तहकुब तरी ठेवा ना. तो तहकुब पण ठेवला नाही. तो विषय पण मंजूर केला. म्हणजे ज्याला काळया यादीत टाकायला पाहिजे त्याची अनामत रक्कम जप्त व्हायला पाहिजे त्याची चौकशी व्हायला पाहिजे ते कोणी बोललेच नाही. मा. महापौर साहेब हे दुर्दैव आहे. कृपा करुन अशा पध्दतीने सभागृह चालवू नका, धन्यवाद.

मा. आशा धायगुडे-शेंडगे – सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त आणि संपूर्ण सभागृह खरं तर आता अनेक सदस्य सेवाज्येष्ठता यादीबाबत मा. महापौर साहेब या ठिकाणी बोलले आहेत आणि त्यांनी सांगितलं सूध्दा माई या ठिकाणी की सेवाज्येष्ठता यादी जी प्रशासनाकडे आहे ती काय तुम्ही तयार करत नाही, मी तयार करत नाही किंवा आयुक्त करत नाहीत. ती सेवा ज्येष्ठता यादी आहे ती प्रशासनामार्फत सगळयांच्या ज्या जॉईनिंगच्या तारखा आहेत त्यानुसार ती यादी तयार होते. त्याला बगल देण्याचा अधिकार कोणालाही नाही. आणि जर या सभागृहामध्ये निवडून आलेले सदस्य या शहरातील नागरीकांनी ज्यांना प्रतिनीधीत्व करण्याची संधी दिली आणि म्हणुन आपण या सभागृहात आलो अशा सगळयांना या ठिकाणी डावललं जातं. आपण सांगतो जर समजा महापौर साहेब तुम्ही सांगितलं की हयाला आपण प्रभारी चार्ज द्या तुमचं ऐकल जात नाही. मी सांगितलं माझं ऐकलं जात नाही. हयांनी सांगितलं ऐकायचं नाही. फक्त संबंधित आयुक्तांना, अतिरिक्त आयुक्त यांना कोणी भेटायला गेलं आणि त्यांना सांगितलं की मग मात्र आयुक्त साहेब नक्की आपल्याला त्या ठिकाणी वाटते की सेवाज्येष्ठता दिली पाहिजे ते सेवाज्येष्ठता यादीत नसले तरी. म्हणजे महापौर साहेब यादी आयुक्त साहेब या शहरातल्या सर्व अधिकारी तुमच्या किती अधिका-यांकडे तुमच्या प्रभारी चार्ज माई मागील चार चार, पाच पाच वर्ष ते एक्झिक्युटीव्ह पदावर बसलेले आहेत. का बरं माई. मी जर सेवाज्येष्ठतेनुसार एक्झिक्युटीव्ह पदावर बसत असेल तर माझा अधिकार असेल माझा न्याय्य हक्क असेल तर तो पायदळी तुडवण्याचा सन्मा. आयुक्तांना अधिकार आहे का. आयुक्त साहेब तुम्हांला हात जोडून विनंती आहे आमच्या बरोबर तुम्ही खेळ करताय ते करतायच आमच्या महापौरांना तुम्ही केराची टोपली दाखवतायच परंतु किमान तुमचे कर्मचारी जे तुमचे अधिकारी आहेत एॅटलिस्ट त्यांच्याशी तरी न्यायाची भूमिका तुम्ही या ठिकाणी बजावली पाहिजे. खरं तर महापौर साहेब या सगळया विषयाच्या अनुषंगाने सगळयांना विषय क्र. १ वर बोलायचे होतं. मला वाटतं प्रभागाच्या मिटींगमध्ये तुम्ही असताना मी एकदा मस्त पाढा वाचला होता होता हया कुत्र्यासंबंधातला. मागच्या वेळेस वैशालीताईंच्या वॉर्डातील एक तरुण मुलगी एक्स्पायर

झाली. माझ्या वॉर्डातील स्वामी नावाचा साधारण ३०- ३२ वर्षाचा तरुण मुलगा वारला. त्याला एक छोटं लेकरु आहे. ते अनाथ झालं त्याची बायको विधवा झाली. हे सगळे विषय असताना सुध्दा चर्चा करावयाची नाही म्हणजे काय महापौर साहेब. म्हणजे कसंय तुमचा सन्मान आयुक्तांनी ठेवायचा नाही आणि आमचा सन्मान तुम्ही ठेवायचा नाही. असं करु नका महापौर साहेब. खरं विनंती आहे तुम्हांला या ठिकाणी की सन्मान ठेवल्यानीच वाढतो नाही तर सन्मान हिसकावा लागतो. आणि ती वेळ निश्चितपणे या सभागृहात तुम्ही आमच्यावर आणणार नाहीत असा विश्वास मी याठिकाणी देते. मा. महापौर साहेब खरं तर कमिशनर इतके सिरीयस विषय चालू आहेत आता मा. सीमाताईंनी सांगितलं की तुम्ही आम्हांला उत्तर देणे लागता तर महासभा सोडून जाण्या इतपत राहिल्यात किती महासभा मा. महापौर साहेब हार्डली एक किंवा दोन. पुढची एखादी सभा आपल्याला मिळणार आहे. अशा काळात खरं महापौर साहेब, आयुक्त साहेब कुठे गेलेत आम्हांला सांगितलं तर इतका सिरीयस विषय बोलायचा. मागच्या जी.बी.ला सुध्दा मी इतका मोठा पाढा वाचला. एकूण शहर काहीच नाही. मी बोलले. अनेक सदस्य सगळयांना कळतय की आता तीन चार महिने शेवटचे आपले जीबीचे आहेत. पुढच्या वेळेला यायचे असेल तीनच सभा राहिल्यात. पुन्हा यायचय तर आपल्याला सगळयांना परीक्षा द्यायचीय. अग्निपरीक्षेतुन जायच तशी आपली सर्वांची अवस्था असते. आणि त्यामुळे सगळयांना असे वाटते की माझे विषय, माझ्या संबंधित, माझ्या शहराचे, माझ्या प्रभागाचे विषय मी मांडले पाहिजेत. परंतु त्याला बगल दिली जाते. सांगा ना महापौर साहेब या ठिकाणी कमिशनर साहेब कुठे इतक्या अर्जंट कामासाठी गेले आहेत काय विषय आहे ते सांगते म्हणजे ते १० मिनिटांना येणार असतील तर मी १० मिनिटांनी बोलते. सांगितलं तर बरं होईल महापौर साहेब.

मा.विकास ढाकणे (अतिरिक्त आयुक्त-१) – मा. महापौर साहेब, सन्मा. सर्व सदस्य आणि सर्व पत्रकार बंधु भगिनीनो, आता मा. आयुक्त साहेब आजारी असल्यामुळे मा. महापौर मॅडम यांची परमिशन घेऊन ट्रीटमेंटसाठी गेलेले आहेत. त्यांना ताप होता आणि काल त्यांची छोटीशी सर्जरीपण झालेली आहे.

मा. आशा धायगुडे-शेंडगे – मा.महापौर साहेब, ठीक आहे. धन्यवाद मा. महापौर साहेब. ख-या अर्थाने कुत्र्यांचा विषय मा. महापौर साहेब सांगत होते आपण हया शहरात मला माहीत असणारे विषय आहेत आयुक्त साहेब. हे दोन विषय महिना दोन महिन्यातल्या अंतरातले आहेत महापौर साहेब. आणि मला अजुनही आठवतय की मी २०१३ ला ज्यावेळेस मी स्टँडींगला होते त्यावेळेस आपल्या एका नगरसेवकाच्या मुलाला कुत्रा चावलां होता आणि त्याचं एक ऑपरेशन करायच होत, छोटं बाळ होत साहेब म्हणजे इतके अनेक विषय या शहरामध्ये आहेत आणि मा.

महापौर साहेब आणि कुणी काय म्हटलं, कोणी पैसे घेतं कोणाचं काय चालू आहे एक प्रशासन म्हणुन तुम्ही खुप ॲक्टीव्ह अत्यंत कार्यक्षम पध्दतीने काम करणारे सर्व अधिकारी वर्ग तुम्ही. मग मा. महापौर साहेब ९९९ रु. जर आपण एका ऑपरेशनला देतो दिवसाकाठी किमान साहेब दिवसा काठी कुत्र्यांच्या ऑपरेशनसाठी आपण ६०, ०००/- रुपये मा. महापौर साहेब आपण दिवसाला बघु साहेब, आयुक्त साहेब दिवसाला बघू आणि मी आता त्याचेकडून आकडा पुन्हा घेतला, कारण मी म्हणल आपल्याला विस्मरण झालय का. आपण मागचे चार महिने नव्हतो आकडे मोजताना चुकलो तर पुन्हा आणखीन कायद्यातील तरतुद आणतील आणि म्हणतील की तुम्ही सभागृहात बोललात आणि सभागृहाची दिशाभूल केली का असा विषय व्हायला नको म्हणुन मी पुन्हा एकदा दगडे साहेबांना फोन लावला त्यांचा फोन नॉट रिचेबल असतो मग त्यांना तीन चार वेळा फोन लावल्यानंतर कळाल तर ते म्हणतात किमान आपण ६० ऑपरेशन रोज करतो. चार संस्था कामाला आहेत. एक कुत्र्याचं ऑपरेशन केल्यानंतर मा. आयुक्त साहेब आपण किमान त्याला तीन ते चार दिवस त्याच्या प्रकृतीप्रमाणे ठेवतो.किमान तीन नाही तर चार ते पाच दिवस त्या कुत्र्याला आपल्याकडे ठेवतो. मी आपल्याला इथे सभागृहाला सांगू इच्छिते की एकदा मला असं वाटलं की त्या कुत्र्याला आपण बघायला जावंच. प्रभागात कुत्र्यांचं दर्शन कमी होतं म्हणुन तिकडे जाऊन बघावं कुत्री कशी ठेवतात, काय करतात. महापौर साहेब मला दीड तास लागला मला आत एन्ट्री मिळवायला. चोरी करते का मी. चोरीसाठी गेले होते. मग अधिका-यांना वाटतं की आशा ताई आमच्याशी चांगलं वागत नाहीत. दीड तास मा. महापौर साहेब. मग हयाला फोन कर त्याला फोन कर. मग परमिशन नसती कसे काय तुम्ही आत जाऊ शकता. अरे नगरसेवक आहेत या महानगरपालिकेचे ट्रस्टी म्हणुन काम करतो. आणि साहेब ट्रस्टींना एखाद्या गोष्टीची पाहणी करायची असेल तर त्याला नियम दीड तास साहेब त्या ठिकाणी वेटींग करावं लागलं. मग नंतर एकदा पाहून तर येऊद्यात असं म्हणुन कसंबसं आतमध्ये गेले. आत मध्ये गेल्यावर योगेशभाईंनी सांगितलं वस्तुस्थिती तशीच. त्यांनी सांगितलं स्कॅनिंग केलं डोळयांचं. असं आम्हांला टेंडरमधली अट माहित होती डोळयांचं स्कॅनिंग केलं जातं. त्यामुळे कोणत्या कुत्र्याचं ऑपरेशन झालं कोणत्याचं ऑपरेशन झालं नाही डिजीटल रेकॉर्डींग करायचं असा नियम होता. त्या नियमानुसार तुम्ही कुठे करता ते आजचे आकडे सक्सेस होत नाही. कोणी ठरवलं सक्सेस होत नाही. जर टेंडरमधला क्लॉज आहे तर हया सभागृहासमोर टेंडर आणता त्याची मान्यता घेता मग तो क्लॉज जर तुम्हाला काढायचा असेल तर सभागृहासमोर आणलं नाही पाहिजे का मा. महापौर साहेब. प्रशासनाची जबाबदारी नाही आणि मा. महापौर साहेब तुम्ही सांगायचं की तुम्ही या प्रशासनावरती काय कारवाई करणार. त्याच बरोबर साहेब त्या ठिकाणी गेल्यानंतर जर आपण एक कुत्र ६० कुत्री आज पकडली ३ दिवस ठेवली तर १८० कुत्री आपल्याकडे असली पाहिजेत. मोजून त्या दिवशी ४२ कुत्री आपल्याकडे जे ऑपरेशन झाल्यानंतर ठेवायचं ठिकाण आहे त्या ठिकाणी मोजून ४२

कुत्री होती कस काय. म्हणजे कुत्री पळून गेली, कुत्री तुमचा निरोप न घेता गेली. तुमच्या परवानगी शिवाय गेली, म्हणजे नेमकं काय घडतं. आयुक्त साहेब खरंच आम्ही काय करतो तुमच्या दृष्टी, आम्ही चो-याच करतो. प्रशासन मा. महापौर साहेब अत्यंत चांगलं काम करतं. माग आत आपण हया कामाचं खापर कोणावर फोडणार. प्रशासनाला आपण कोणता कायदा करणार. कोणत्या भुमिकेत आपण त्यांच्याकडून हे काम करुन घेणार ते सांगा मला. मा. महापौर साहेब अत्यंत वाईट वाटतं ज्या वेळेला तुमच्या आदेशास हया ठिकाणी केराची टोपली दाखवली जाते. मा. महापौर खरंच सांगते महापौर हे सर्वोच्च उच्च पद तुमच्याकडे आहे. कोण आयुक्त कोण प्रशासन कोण उपायुक्त, कोण अतिरिक्त आयुक्त काही देणं घेणं नाही आम्हांला. माझ्या महापौर आहेत, शहराच्या महापौर आहेत, प्रथम नागरीक म्हणुन तुमचा सन्मान असतो आणि तो आदर आमच्याही मनात असतो. आणि ज्या वेळेला म्हणजे मला आजही आठवतय आयुक्त साहेब तुम्हांलाही आठवत असेल हया सभागृहात जरी तुम्ही मागे बसला असाल तरी कान डोळे नक्की उघडे असणार आहेत. त्या वेळेला माई म्हणायच्या आत्ताच्या आत्ता पुढच्या सभेपर्यंत मला या ठिकाणी कार्यपटलावरती त्या सगळयाचा अहवाल पाहिजे. मा. आयुक्तांनी सांगितलं मा. महापौर मी विनंती करतो की इतक्या लगेच हे होणार नाही. मला चार दिवस वाढवून द्या. आमच्या मा. महापौर साहेब इतक्या मोठया मनाच्या. त्यांनी सुध्दा तुम्हांला सांगितलं हरकत नाही घ्या तुम्हांला अजुन चार दिवस. परंतु हया तारखेनंतर खपवुन घेणार नाही. आणि काय झालं मा. महापौर साहेब हे तुम्हांला पण हे मला खात्री आहे तुम्ही अजिबात ॲडजस्ट होणा-यातल्या नाहीत. तुम्ही कोणाचं ऐकुन घेणा-यातल्या नाहीत. तुम्ही तुमचा सन्मान तुमचे सभागृह आमच्या सभागृहातील १२८ लोकांचा सन्मान तुम्ही जपणा-यातल्या आहेत. मग काय झालं आणि जर माई तुमची ही अवस्था असेल तर नगरसेवक म्हणुन मी काय केलं पाहिजे. मग मी वागते ते काय चुकीचे आहे का. सन्मा. महापौर सन्मा. आयुक्त साहेब या ठिकाणी आयुक्त साहेब सभागृहाला सांगते की एखाद्या अधिका-याला आम्ही मेसेज टाकतो, एखादा फोटो टाकतो, तो काही आमचा पर्सनल फोटो टाकायला जात नक्की नाही. आमच्या घरची किराणाची यादी तुम्हांला टाकत नाही, आमच्या घरातले एक्सपेन्सेस तुम्हांला टाकत नाही. साहेब आम्ही तुम्हांला व्हॉटसअप करतो एखादं मेसेज करतो निश्चितपणे तो शहराच्या हिताचा शहराच्या विकासाचा, किंवा माझ्या प्रभागातील नागरीकांचा विषय असतो. मा. महापौर साहेब हयाच्यावर उत्तर द्यायचं, नाही तर मा. महापौर साहेब मागच्या वेळेस जसं म्हटलो खाली बसतो आम्ही निश्चितपणे खाली बसतो. का न्याय द्यायचा नाही. का उत्तर द्यायचं नाही मा. महापौर साहेब ३० सप्टेंबर म्हणजे आज कोणता महिना आहे नोव्हेंबरची १८ तारीख आहे. मी ३० सप्टेंबरला म्हणजे ऑक्टोबर गेला नोव्हेंबर महिना चालू आहे. एक व्हॉटसअप कमिशनरांना पाठवलं होतं मा.आयुक्तांना टाकलं होतं. त्याच्यामध्ये

गाईचा फोटो टाकला होता आणि नदीपात्रामध्ये टाकत असलेला भरावाबद्दलचं सांगीतल. त्यांचा मला पटकन सुंइर मॅसेज आला की ताई लोकेशन सांगा, मी त्यांना लोकेशन सेंड केलं. त्यांनी सांगितलं रिगार्डस. आय विल लुक इनटू इट. मला फार बरं वाटलं. आणि म्हणुनच समाधान वाटलं. याच्यावर काहीतरी होईल दोन दिवसात चार दिवसात, आठ दिवसात, १५ दिवसात मला पत्र येईल. संबंधित अधिकारी मला येऊन सांगेल ताई हा विषय तुमचा आणि त्या विषयावरती आम्ही संबंधित प्रशासनाने केलेली ही कार्यवाही. काहीच नाही आजपर्यंत एक ओळीचं पत्र माझ्याकडे आलेलं नाही. दुसरा विषय ४ ऑक्टोबरला स्मार्ट सिटीच्या अंतर्गत माझ्या प्रभागामध्ये खोदलेला विषय मागच्या वर्षीच्या ऑगस्ट मध्ये खोदलेले फोटो टाकले. तुम्हांला सांगितले आय विल लुक इनटू इट अँड विल सॉल्व्ह इट टू. शेवटी आता माझ्याकडे ड्रेनेजची लाईन साठी अख्खा रस्ता खोदला. त्यामुळे विषय मेला. परंतु मा. महापौर साहेब एकाही ओळीचं पत्र नाही. फोटो मुद्दयांसहीत लिहिलेलं असतं. म्हणजे मला माहित नव्हतं. लक्षात आले नाही. त्यामुळ फोटो टाकायचा काम करते. आता फोटोग्राफरही चांगली झालेली आहे. तिसरा विषय मला वाटतं ५ ऑक्टोबर विषय दिलेला आहे सर नाला आहे सँडव्हिकच्या येथील त्या नाल्यामध्ये माई वाहता नाला आहे त्यामध्ये ड्रेनेजची लाईन धो धो वाहती आहे म्हणजे फुटली आहे ती. माझा विषय काय आहे की मी तुम्हांला कळवलं तुम्ही संबंधित विभागाला कळवा. तुम्ही निश्चितपणे कमिशनर आहात. तुमच्याकडे इतक्या फालतु गोष्टींना निश्चित वेळ नसावा. संबंधित डिपार्टमेंटच्या लोकांनी आम्हांला काही सांगितलं पाहिजे काय कार्यवाही केली पाहिजे काय कार्यवाही केली हे सांगितलं पाहिजे. आज अनेकदा आपण शहरातील जलपर्णीसाठी हजारो लाखो कोटयावधी रुपये खर्च करतो नंतर भूषण घेतो की आम्ही नदी स्वच्छ केली. आम्ही नदीमधील जलपर्णी पूर्णपणे काढली. ही शहरातील नदी आम्ही जलपर्णीमुक्त केली असं आपण म्हणतो. आज जाऊन बघा आज शहरातील जलपर्णी किती वाढायला लागली आहे. का मा. महापौर साहेब हे तुमच्या घरातले पैसे, माझ्या घरातले पैसे साहेब हे तुमच्याही कुटुंबातील पैसे कोणाचेही पैसे नाहीत तर आपल्या शहरातील करदात्या नागरीकांचे पैसे आहेत आणि हया पैशांवरती आपण या शहराचा विकास करतो किंबहुना तुमच्या सगळयांचा पगार देखील काढतो. आम्ही बोलायचं आणि पुन्हा आमच्या बोलण्याचं तुमच्या आदेशाला केराची टोपली असेल तर आमची काय मा. महापौर साहेब आणि साहेब या ठिकाणची जलपर्णी जी वाढते नदीचं पाणी ड्रेनेजचे पाणी सगळं टाकून झालयं म्हणजे तुम्ही जलपर्णी काढण्यामध्ये सांगितलं तर मी पण माझ्या प्रभागातील दापोडी ते कासारवाडी प्रभागातील लोकं माझ्या शहरातली पवना नदी, माझ्या प्रभागातील पवना नदीचा भाग जो आहे माई किमान मी तीन वेळा बोटीतुन प्रवास केला. कुठं कुठं ड्रेनेज लाईन फुटलेली आहे तिचे फोटो काढले ते संबंधित अधिका-यांना टाकले त्याच्यावर काय केलं. साहेब आम्हांला विचारायचा अधिकार नाही किंवा तुम्ही सांगावं हे तुमचं कर्तव्य सुध्दा नाही. आमचा अधिकार

सोडा तुमचं कर्तव्य काय आहे ते साहेब सांगा ना आम्हांला. नाही का कर्तव्य माई. आपण एखादं काम सांगितलं तर ते होणार आहे, नाही होणार, त्यासाठी आम्ही ही तयारी केली, होतचं नाही, नियमात बसत नाही. तरी साहेब आम्ही ऐकू ना तुमचं. ते नियमात बसायचा कसा प्रयत्न करायचा त्याची चर्चा करु . माई हा झाला दुसरा विषय. तिसरा विषय ११ ऑक्टोबरला एका विषयाला पुन्हा साहेबांना टाकलं २० ऑक्टोबर ला शंकरवाडीबद्दल मागच्या महिन्याच्या प्रभागाच्या मिटींगमध्ये बोलले तो विषय सांगितला त्यावर तर आपण फ्लेक्स काढता आमच्या सर्व नगरसेवकांच्या इलेक्शनचे दिवस आहेत सगळेजण फ्लेक्स लावतात. कार्यकर्ते फ्लेक्स लावतात, पटापट तुम्ही काढता. अभिनंदन साहेब मनापासुन अभिनंदन. या शहराचं सुशोभिकरण करण्याचं उद्दिष्ट तुमच्या डोळयात आहे. व्हिजन तुमच्या डोळयात आहे ते तुम्ही साकारता. आम्हांला जे वाटतं आम्ही पण हया शहराचे ट्रस्टी आहोत हयाची किती वेळा तुम्हांला आठवण आणि जाणीव करुन द्यायला लागेल मा. महापौर साहेब आपल्या सगळयांना पण त्या ठिकाणी मा. महापौर साहेब त्या ठिकाणी एक खड्डा केला एकाने साहेब होर्डींगसाठी साहेब तिथं रचना केली होती. ते होडींग काढलं गेलं कुणीतरी एका पत्रकाराने पेपरला बातमी लावली. तेव्हा ते होर्डींग काढलं गेलं माई आणि होर्डींग काढल्यानंतर समजा ते होर्डींग आशाताईंच होतं संबंधिताला कळलं ना मग तुम्हां अधिका-यांना कसं कळत नाही की ते होर्डींग आशाताईंचं होतं आणि आशाताईंकडून तो खड्डा भरुन घेतला होता इथे ती त्यांची नैतिक जबाबदारी आहे. का त्या संबंधितांवर कारवाई केली गेली नाही. माई तो खड्डा २० ऑक्टोबरला सांगितला, कधी २० ऑक्टोबरला काही त्याच्यावर झालं नाही. जीबीत बोलले काही झालं नाही. मला सांगितलं जीबीत बोलल्यावर काही तरी कारवाई होणार माई . जीबी आहे जनरल बॉडीची मिटींग आहे ही. हया प्रत्येक वाक्याला हया प्रत्येक शब्दाला काही तरी वजन असलं पाहिजे. कारवाई झाली नाही माई. त्यानंतर मी म्हटलं चला आशाताई आता विसरुन जा की आपण नगरसेवक आहोत. आपण सारथीवर कंम्प्लेंट करु. माई शेवटी मी सारथीवर कंम्प्लेंट केली २३ ऑक्टोबरला. कंम्प्लेंट नंबर वगैरे सगळं माझ्याकडे आहे. काही पर्याय, काही उत्तर नाही. काही रेस्पांस नाही. येता जाता तो पोच समोर दिसतोय आहे वेदना होतच आहेत. पुन्हा काय करु आशाताई असा प्रश्न स्वत:ला विचारायचा पर्याय उरला नाही. शांत बसा होईल काही तरी. २३ तारीख होती ना माई पुन्हा २८ तारखेला मी सारथीला कम्प्लेंट दिली साहेब. मला कळून चुकल की प्रशासनाला बोलून काही उपयोग नाही. की सारथी आमच्या श्रीकर परदेशी साहेबांनी खूप अपेक्षेनी आणि खूप उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून केली होती. २८ तारखेला पुन्हा बोलले. त्या म्हणाल्या आम्ही संबंधितांना सांगितलय. परंतु असय तसयं तसयं. त्यांना विचारलं कायदा काय सांगतो. आम्ही जर कंम्प्लेंट केली असेल तर किती दिवसात सॉल्व्ह झाली पाहिजे. माई माझ्याकडे संबंधित डिपार्टमेंटचा कोणताही अधिकारी

आला नाही हे खेदाने सांगावे लागत आहे. आता तुम्ही बघताय काय कारवाई करताएत हे मलाही बघायचय. काय कारवाई करता ना साहेब तुम्ही अधिकारी म्हणुन प्रशासन म्हणुन आयुक्त म्हणुन आणि मा. महापौर साहेब तुम्ही काय आदेश देताय मलाही बघू देत. तरीही काही झालं नाही शेवटी पुन्हा मला वाटतं १० ऑक्टोबरला माझ डोकं जाम फिरलं साहेब. कारण त्याच वेगळं होते माझं ऐकलं नाही याचं दु:ख नव्हत साहेब. पुन्हा सांगतीए साहेब या ३०-३०, ४०००० लोकांचं प्रतिनीधीत्व करुन आम्ही हया सभागृहात येतो आणि माझ्या वॉर्डातला एक मुलगा थापा म्हणुन त्याच ठिकाणी त्याचा ऍक्सिडेंट झाला. त्याच स्पॉटवर चुक कोणाची होती, कशी होती, का झाला हयाच्यावर मला चर्चाच करायची नाही. किंबहुना मला वाटतं साहेब त्या खड्डयात जर माती नसती तर ते पोर तिकडनं गेलं असतं आणि तो टेंपोही तिकडनं गेला असता. माझ्या पोराचा कदाचित जीव वाचला असता. दुर्दैवाने मा. महापौर साहेब त्या दिवशी मा. माधुरीताई मिसाळांची मुलाखत होती भेट होती मिटींग होती आणि मी तिकडे निघाले असताना तो ऍक्सिडेंट पाहीला. म्हटंल खिडकी खाली घेऊन आणि जाऊन विचारावं कुणी जरी असला शहरातला नागरीक तरी विचारावं काही मदत लागती का. खिडकी खाली केली तर दुर्देवाने माझ्याच प्रभागातला मुलगा त्याच खड्डयाच्या शेजारी मरुन पडला होता. साहेब काय केलं पाहिजे. आणि म्हणुन १० ऑक्टोबरला अत्यंत वैतागुन फोन केला आणि त्या दिवशी सांगितलं आज जर झालं नाही ना तर मी माझ्या स्टाईलने येईल आणि माझ्या गुणांवर येणं मला भाग आहे. आणि ११ तारखेला ते उचललं आहे. मला आठवतय मा. महापौर साहेब आपली प्रभागाची मिटींग होती ना त्या दिवशी ते आम्ही उचलल असं सांगीतल, मी म्हणाले तुम्हांला हार-तुरे, शॉल देवूनच सत्कार केला पाहीजे कारण त्या दिवशी एका आईची कुस उजाडली होती. एक बाप एका मुलाला पोरका झाला होता. जी आम्ही मागणी करतो ना ती हया शहरातील हिताची म्हणजे पैसे कोण खातं, किती खातं, साहेब आमच्या कोणाच्याच सहया नसतात. तुमचीच इच्छा असती प्रशासनाची त्याच्याच बरोबर तुम्हांला पैसे मिळाले पाहिजेत तुमचा विकास झाला पाहिजे आणि बळीचा बकरा कोण तर नेहमीप्रमाणे आम्ही. इतक्या वेळा व्हॉटसअप टाकलेत त्याचे सगळे स्क्रीन शॉट माझ्याकडे आहेत. तुम्हांला हवे तर तुम्हांलाही पुरावे देते. हे सगळे सारथीला केलेले मेसेज आहेत. त्यांचे मेसेज मला आलेले आहेत आणि आता पुन्हा एखादया मुलाचा मृत्यु झालातर कुणी जबाबदारी घ्यायची साहेब. आणि दुर्देव काय माझं जी सारखी वटवट करते शहराचा नागरीकांच्या जीवाशी तिच्याच वॉर्डचा मुलगा थापा नावाचा साडे सतरा अठरा वर्षाचा मुलगा माई वारला तरुण मुलगा. नाही वेदना झाल्या पाहिजेत. साहेब एक विषय सांगा की ज्याच्यात तुम्ही म्हणजे राजाची प्रजा म्हणुन मी सगळया अधिका-यांनाही सांगते आम्ही तुम्हांला काम सांगतो आमच्या घरात ड्रेनेज लाइन टाकायची नाही. आमचा रस्ता करायचा नाही आमच्या घरावर कौलं टाकायची नाहीत काहीच करायचं नाही तुम्हांला. तुम्हांला शहराचा विकास करायचाय. या शहरातील मतदार आहेत ते

बंधु भगिनी त्यांच्या करावरती आपण सर्व चालवतो त्यांना काही तरी अपेक्षा त्यांच्या पूर्ण करण्यासाठी आम्ही आहोत मग का साहेब आपल्याला जीव तोडावा लागतो. सोडून द्याव मी तर आता अपेक्षा करणं पण माई चुकीचं आहे जर तुम्ही दिलेला आदेश सात महिने जर यांना उत्तर देण्याचं भान राहत नसेल, उत्तर द्यावसं वाटत नसेल तर माई तुम्हांला एक विनंती करते खरंच आज आपण या ठिकाणी सन्मा. आयुक्तांचा निषेध व्यक्त करुन ही सभा तहकुब करु. ज्या दिवशी त्यांना हया सभागृहाच्या पटलावरती ठेवावासा वाटेल अहवाल त्या दिवशी सभा ठेवावी. कारण हा तुमचा अनादर नाही तर हा आमच्या १२८ जणांचा आदरही यात आपल्या शहराची ३० लाख ४५ लाख लोकसंख्या आहे हा त्यांचा अनादर आहे आणि का म्हणुन आपण सहन करायचा, कशासाठी करायचाय तुम्ही सांगू शकता माईला तुम्ही आई म्हणुन सगळयांचा विचार करता कुणावरती तुम्हांला आसुडाच्या दोन दोन फटक्याची इच्छा होत नाही. ही तुमच्यातील चांगली भावना आहे. त्याचा समोरच्याने गैरफायदा आठ दिवस पंधरा दिवस महिना सात आठ महिने घेतलेला पाहिजे का मा. महापौर साहेब. तरी मा. महापौर साहेब तुम्हांला हात जोडून विनंती आहे की तुम्ही हयाच्यावरती आज निकाल लावा. एकदा प्रशासनाला सांगा की मी पण मोठी आहे. मी महापौर आहे मी या शहराची प्रथम नागरीक आहे आणि जर तुम्हांला असं ताण असेल तर हया सगळयाचा तर मी नाही विचार करणार हया सगळया विषयांचा. मी हया जीबीत बोलले मागच्या जीबीत बोलले कदाचित मा. आयुक्त देतील उत्तरे पुढच्या महिन्यात देतील. नाही दिलं सोडून देऊ आपण. पण तुम्हांला अनादर तुमच्याशी असे वागत असतील मा. महापौर साहेब तर निश्चितपणे आम्ही इथे गय करणार नाही, धन्यवाद.

मा.सारीका सस्ते - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माई सगळेजण कुञ्याविषयी आता बोलले. मला तर असं वाटत की नसबंदी केलेले कुञे सगळे मोशी गावात आणून सोडतात की काय, कचराडेपोच्या तीथे, कारण ती कुञे अशी टुमटुमीत होतात आणि आमच्या गावामध्ये फिरतात आमचे नागरीक आम्हांला सांगतात की कुञे पकडायची गाडी बोलवा, पण ते कुञे सोडवायचे कुठे, आमच्या तीथे कुचरा डेपोवर ऑलरेडी एवढे कुञे झालेले आहेत हा सगळयात महत्वाचा प्रश्न आहे आमच्या येथील. इकडे तीकडे कुञे जी मेलेली असतात तर ते कुञे कचरा गाडी येते त्यामध्ये टाकले जातात यासाठी आपल्या अधिका-यांच नियोजन काय आहे. आमचा भाग हा ग्रामीण पडतो तरी तीथे जनावरे खुप आहेत तरी एक एक लाख रुपयाचे बैल, गाया असतात. रस्त्यावर त्यांना कुठेतरी दुखपत झालेली असते, उडवलेलं असतं. तरी सरांना कॉल केल्यानंतर ते सांगतात की तुम्ही घेवून या एक प्रतिनिधी म्हणून आम्हांला सांगीतल जात की ताई असं असं झालेल आहे तर तुम्ही थोडीशी मदत करा. आम्ही त्यांना कॉल केल्यावर ते आम्हांला असं सांगतात की तुम्ही इकड घेवून या. आता तेवढ ऍरेंज करायला आम्हांला तेवढच काम आहे का, म्हणजे आम्हीच या सगळया गोष्टीला पर्याय शोधायचे का माई. त्यांच्याकडे या सगळयासाठी काय प्लॅनिंग आहे. तरी माझ एक असं सजेशन असेल या विभागासाठी की आपल्यासाठी जशी ऍम्ब्युलन्स असते तसं प्राण्यासाठी असं काही इमर्जन्सी सेवेसाठी काही आपल्याला करता येईल का. की एक कॉल केला की तुम्ही येवून घेवून जावु

शकता. मेन म्हणजे विभागामध्ये डॉक्टर्सच ऍव्हेलेबल नाहीत. ग्रामीण भागा सारख्या ठिकाणी एकही पशुवैदयकीय दवाखानाच नाही तरी तीथे असा एखादातरी दवाखाना व्हावा अशी ईच्छा आहे एवढ बोलून दोन शब्द संपविते.

मा.अंबरनाथ कांबळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माई विषय धरुन आपण काही गोष्टी बोलायला पाहीजेत, आम्ही नगरसेवक साडेचार वर्षे या सभागृहात असतानी अनेक ज्येष्ठ नगरसेवक इथ बोलताना आम्ही बारीकस लक्ष देतो पण आताच्या विषयाला वेगळच वळण लागलेल दिसतं. कारण आपण आयुक्तांना प्रश्न विचारायला पाहीजेत, आयुक्त ऐकत नाहीत आपण सर्व नगरसेवकांनी या शहराच्या विकासाची काम इथ मांडायला पाहीजेत. एक आयुक्त आणि तीन अतिरीक्त आयुक्त आहेत. आपण सर्वजण एकूण १३२ नगरसेवक आहोत. पण आयुक्त ऐकुण घेतात आपण आपल्यातच चर्चा करत बसतो आणि आयुक्त आपली मजा घेत बसतात. आयुक्तांना जेवढा अधिकार आहे तेवढा नगरसेवकांना पण आहे आणि आपल्या शहराचा जो विकास व्हायला पाहीजे. मागच्या सभेला मा. खासदार डॉ. कोल्हे साहेब आले होते. मी ऑनलाईन मिटींग बघीतलीतर खुप सुंदर चालली होती. या सभागृहात ज्येष्ठ नगरसेवकांच खरच मार्गदर्शन घ्याव. भाऊसाहेब भोईर हे पहील्यापासून सांगायचे की आपण भांडू नका, शहराच्या पाण्याच्या विषयाबद्दल बोला, शहराच्या आरोग्या विषयाबद्दल बोला, नदीच्या विषयाबद्दल बोला आणि एकदम सुंदर बोलायचे. भाऊसाहेबांची लेव्हल आमदार, खासदारांच्या लेव्हलची पध्दत आहे पण त्यांनी या सभागृहात कुणाच नाव घेतल नाही. कोणत्या आमदारांच नाव नाही घेतल. माग मी खरच चुकून बोललो की आयुक्त साहेब तुम्ही त्यांच्या पक्षाचे आहेत. आम्हांला त्यांनी सुनावल अरे, बाळा ही महानगरपालिका मोरे साहेबांची आहे, पाटील साहेबांची आहे खरोखर त्यांच्याकडून घेण्यासारख आहे. आहो, आपल्याला आयुक्तं साहेब १३२ जणांना वेडयात काढतात. आपण भांडतो काय, ते फक्त खुलासा देतात आणि नंतर महीन्यांनी भेटतात. आम्ही स्थायी समितीला असल्यामुळे आम्हांला थोडफार आता कळतय. बजेट नाही, तरतूद नाही राहीले तीन महीने आपण लोकांना काय काम देणार. आपल्या शहराचा पाण्याचा प्रश्न आहे तो मांडायला पाहीजे. आपल्या शहरात एका धरणातून पाणी येतय आणि पुणे शहरासारख्या ठिकाणी पाच धरणातून पाणी येतं. आहो, आपल्याला पाणी नाहीनां आल तर चार चार दिवस आपल्या लोकांना पाणी भराव लागतं. आता मला या विषयाच्या बद्दल बोलायच नाही. ऐनवेळचा विषय आला तो चुकीचा असेल किंवा खरा असेल हे आम्ही तुमच्या सारख्या नगरसेवकांकडून ऐकू पण शास्तीकर, टॅक्स हया काळात एक हजार ते दोन हजार माफ झालेला आहे तो झाला का नाही नागरीकांना फायदा मिळाला का नाही, याच्या पुढ शास्तीकर माफ होईल का नाही तो बघा. आज सर्वसाधारण दोन ते तीन पट टॅक्स आपल्याला भरावा लागतो तो माफ होईल का नाही तो विषय काढा. महापौरांचे आम्ही सर्व नगरसेवक सैनीक आहेत मा.महापौरांच आयुक्त ऐकत नसतीलनांतर आम्ही आमच्या पध्दतीने त्यांना ज्या भाषेत उत्तर दयायच त्या भाषेत उत्तर देण्याचा प्रयत्न करु. तुम्ही विकासाच बोला, तुमच्या विकासाच्या माग आम्ही उभ राहू, नवीन नगरसेवक असलोतरी. पण तुम्ही या सभागृहात पिंपरी चिंचवड शहराच्या विकासाचा विषय काढावा एवढीच या सभागृहात विनंती आहे आणि मा.महापौर मला बोलायला दिलं त्याबद्दल मी तुमच मनापासून आभार व्यक्त करतो.

मा.हर्षल ढोरे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज भटक्या कुत्र्यांचा विषय चालू आहे, हा बराचवेळ चालू असण्याच कारण असं आहे की सर्वच नगरसदस्यांना त्यांच्या त्यांच्या प्रभागामध्ये भटक्या कुत्र्यांचा होणारा जो त्रास आहे आणि तो त्रास त्या प्रभागातील नागरीकांना होतो व नागरीक आमच्यासारख्या कार्यकर्त्यांपर्यंत जेव्हा हा त्रास कळवतात तर खरोखरच खुप दयनीय अवस्था आपल्या पिंपरी चिंचवड शहरातील भटक्या कुत्र्यांची होत चाललेली आहे. कुत्र्यांबद्दल या सभागृहात आपण सर्वांनी वेळोवेळी अनेकदा आवाज उठविलेला आहे. आपण जनावरांच्या विरोधात नाही आपण फक्त जी भटकी कुत्री लहान लहान मुलांच्या मागे लागतात व त्यांचा चावा घेतात. परवा दिवशीच माईंच्या आणि आमच्या प्रभागामध्ये माझ्या कानावर एक गोष्ट आली की ममतानगरमध्ये बारा वर्षाच्या मुलांचा पिसाळलेल्या कुत्र्यांनी त्याचा चावा घेतला आणि आम्ही लगेचच त्या नातेवाईकांना सांगीतल की तुम्ही एसआय हॉस्पिटलला जा आम्ही तीथ त्याची ट्रिटमेंटची व्यवस्था केली. पण ती बीचारी लोक एवढी घाबरुन गेली होती कारण त्याचा डाव्या पायाचा लचका दिवाळीच्या आधीच त्या कुत्र्यांनी तोडला होता. तरी अशा कुत्र्यांमुळ आमच्या भागामध्ये खुप भयभीत वातावरण आहे. शितोळेनगर भाग असेल, शिवांजली नगरचा जो रस्ता असेल या भागामध्ये खुप बीकट परिस्थिती आहे. हे कुत्र एकट नसुन या कुत्र्यांची गँग तयार झालेली आहे. ते सगळे जण एकत्रीत फिरतात आणि ते सगळेजण चांगला मोका बघुन चोका मारायच्या परिस्थितीत असतात. त्याच्यामध्ये एखादया माणसाला चावा घेवून आपल्यासारख्याना किंवा वृध्द महीलेला ते अडचणीत आणतात. आयुक्त साहेब याच्यावर काय उपाययोजना करता येतील, आता उपाय काय आहेत ते निघालेले नाही पण नक्कीच याच्यावरती आपण उपाय काढावा. महत्वाचा विषय म्हणजे आमच्या प्रभागामध्ये जेव्हा आयुक्त साहेब आले होते साधारण दिड महीन्यापुर्वी आणि त्या दिड महीन्यानंतर आम्ही चौघांनीही ठरवल्याप्रमाणे मुळानगर रस्ता तो जसा आता अस्तित्वात आहे तसाच आपण करुन देण्याचे निर्देश आयुक्तांनी आम्हांला सांगीतले आणि त्या पध्दतीने तो रस्ता आयुक्तांनी प्रशासनाला सांगून चालू केला आणि तो रस्ता आता अर्धे प्रमाणात पुर्ण झालेला आहे. माई, आपण सांगीतले आणि आयुक्तांनी ते गाईडन्स दिलेत ते पुन्हा एकदा आयुक्त साहेब तुम्ही प्रशासनाला सांगाव की हा रस्ता लवकरात लवकर एक ते दोन आठवडयात पुर्ण व्हावा ही माझी तुम्हांला विनंती आहे. त्याचप्रमाणे त्या रस्त्यामुळे तीथे होणारे जे ऍक्सिडेंट आहेत आणि ब-याचशा गोष्टी होत्या त्या सगळया थांबलेल्या आहेत. त्याबद्दल मी आयुक्त साहेबांचे आमच्या चौघांच्या वतीने मनापासून अभिनंदन करतो की हा रस्ता चांगल्या प्रकारे होतो. २ ऑगष्ट २०१९ च पहील पत्र आहे माईच आणि आमच की आम्ही ३२६ आणि ३२७ मध्ये जे प्लेग्राऊंड आहे आणि कल्चरल सेंटर आहे हे पहील पत्र आम्ही आयुक्त साहेबांना दिलं होतं हे प्लेग्राऊंड आणि कल्चरल सेंटर आम्हांला हस्तांतरीत करुन तुम्ही याच काम लवकरात लवकर करुन दयाव त्याच्यानंतर १४ नोव्हेंबरला आमच परत पत्र आहे, १८ डिसेंबरला परत पत्र आहे, १६ मार्चला परत पत्र आहे, १८ मार्चला परत पत्र आहे आम्ही चारही नगरसेवकांनी वारंवार या प्लेग्राऊंड आणि कल्चरल सेंटर साठी हार्डीकर साहेब असतील आणि आयुक्त राजेश पाटील साहेब असतील यांच्याकड वेळोवेळी विनंती केली त्याच्यानंतर काहीशी तरतूद कमी पडलीतर माईनी आम्हांला तरतूद मिळवून दिलेली आहे. आता तरतूदींचाही कुठला प्रश्न राहीला नाही. प्लेग्राऊंडच टेंडर निघालेल आहे. कल्चरल सेंटरला पण आता माईच्या मार्फत आम्ही टेंडर घेतलेल आहे. तरी कृपया त्या फाईल सही करुन आम्हांला लवकरात लवकर पुर्ण करुन दयाव्यात. आम्ही सर्वजण याठिकाणी पाठपुरावा करतो.

त्यानंतर आपल्याला याठिकाणी संबंधित जागा मालकही सहकार्य करतात त्यांचही मी अभिनंदन करतो आणि बारा मीटरचा जो रस्ता आहे.....

मा.महापौर - हर्षल विषयांतर होत आहे.

मा.हर्षल ढोरे – मा.महापौर साहेब, आता नोव्हेंबर महीना येतो मगाशी सांगीतल्याप्रमाणे हायसिंथ वाढतय तरी डासांबद्दल तुम्ही काय प्रोव्हीजन केल आहे तेही तुम्ही सर्वांना कळवा कारण जानेवारी, फेब्रूवारीमध्ये पुन्हा डास वाढण्याची खुप दाट शक्यता आहे ही तुम्हांला विनंती आहे. २०१७ ला निवडून आल्यानंतर पहील्याच वर्षी त्रास झाला पण २०१८-१९-२० ला आम्ही सक्सेस झालो. २०२१ ला पुन्हा त्रास झाला तो हा त्रास २०२२ ला होता कामा नये एवढीच मी विनंती करतो, आयुक्त साहेब याच्यावर लक्ष घालाव, धन्यवाद.

मा.अजीत गव्हाणे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.महापौर साहेब, आताच हर्षल ढोरेनी आणि अंबरनाथ कांबळे यांनी जी काही भूमीका मांडली ती याच्यासाठी होती की ज्येष्ठ नगरसेवकांकडून आपण काय शिकतो. मा.महापौर साहेब, आपणही अनेक वर्ष सभागृहात आहेत आपणही आपल्या सिनीअर्सकडन अनेक विषय शिकण्याचा प्रयत्न केला आणि त्याचा निश्चितपणे फायदा आपल्याला झालेला आहे. मा.महापौर साहेब, या अनुषंगाने मी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की आपल्या सर्वांना या पंचवार्षीक मध्ये जे काही सभागृह अनुभवायला मिळाल तो मागच्या तुलनेमध्ये फार वेगळा होता. येथून मागच्या काळामध्ये मी आपल्या समोर अनेकवेळा हा विषय मांडण्याचा प्रयत्न केला की सभागृह चालवत असताना आपण जर सगळयांना बोलू तुम्ही बोलू देता परंतु आपल्याकडे मागच्या काही दिवसापासून ऑनलाईन सभा होत्या नंतर आता ऑफलाईन सभा चालू केल्यात. परंतु आता मोजक्या दोन तीन सभा आपल्या होणार आहेत. हर्षल त्याच्या वॉर्डातील काम सांगण्याचा तो प्रयत्न करत होता. त्याच्यातून हे लक्षात येते की मागच्या काळामध्ये आपल्याला जे करता आलं नाही म्हणजे दिड वर्षे कोवीडचा काळा गेला आणि आपली पंचवार्षीक जवळपास आता संपत आलेली आहे. माई, पुढच्या पंचवार्षीकला आपल्याकडे किती यातील नगरसेवक पुन्हा निवडून येतील किती येणार नाही हे सांगता येत नाही परंतु हा जो अनुभव आहे आपण नगरसेवक म्हणून जे पाच वर्षामध्ये काम करतो तो आयुष्यभर त्या माणसाच्या आठवणीत असतो आणि तो पुढच्या पुढीला किंवा समाजाला सांगत असतो की मी नगरसेवक म्हणून पाच वर्षे इतक काम केल, असं केल, तसं केल, या विषयावर बोललो, हा विषय माझ्यामुळे चांगला झाला, हा विषय आम्ही अशा पध्दतीने हाताळला हे आपण नेहमीच सांगत असतो आणि ही माणसाची सायकॉलॉजी आहे. पीएमआरडीएच्या निवडणूकीच्या निमीत्ताने आम्हांला पुणे महानगरपालिकेत आम्ही गेलो होतो आणि तीथल्या नगरसेवकांनी आम्हांला अवर्जुन त्यांच सभागृह दाखवायला नेल होतं, खुप सुंदर सभागृहत त्यांनी केलेल आहे. कदाचित तुम्ही पाहील असेल, खुप मोठ आणि छान सभागृह केल आहे. आम्ही त्यांना विचारल की तुमची सभा कधी असते, कितीवेळ चालते आणि एक सदस्य कितीवेळ बोलतो. त्यांनी जे सांगीतल ते आम्हांला खुप आश्चर्यकारक होत कारण की त्यांची सभा दोन-दोन, तीन-तीन दिवस चालते आणि सभासदांना बोलण्याची संधी मिळते आणि एक एक सदस्य जवळपास एक ते दिडतास बोलतो असं ते सांगत होते. बजेटच्या मिटींगच पण विचारलतर ते म्हणाले आमची बजेटची मिटींग आठ आठ दिवस चालते. मा.महापौर साहेब, आपण जर पुणे महापालिकेच

कामकाज कसं चालत हे आपण आपल्या सभासदांना दाखवल असतंतर त्याचा फायदा आपल्याला झाला असता. मगाशी उपसूचनांच्या संदर्भात आम्ही जे काही बोलत होतो त्यामध्ये आमची भूमीका एवढीच होती की तो विषय खुप चांगला आहे नागरीकांच्या मदतीसाठी आपण तो करतो परंतु आता मगाशी कोणीतरी बोलल शास्तीकराचा विषय तुम्ही एक हजार स्क्वे.फुटच्या घरांना केला आम्ही त्यावेळेस तुम्हांला सांगत होतो की तुम्ही सरसकट करा. घाईघाईने त्यावेळेस तो विषय मंजुर केला आणि नंतर आपण हजार स्क्वे.फुटाच्या लोकांना दिलासा दिला त्यांना शंभर टक्के फायदा झाला. परंतु आजही खुप मोठी संख्या राहीली, तुम्ही मागच्या काही जनरल बॉडीमध्ये तो विषय मंजूर केला आणि आता नगरसेवकांच म्हणण आहे की आता आमच सरकार आहे आणि आम्ही आमच्या सरकारकडून तो मंजूर करुन आणु, शंभर टक्के आम्ही त्या दृष्टिकोनातून प्रयत्न करतो. परंतु होतय काय त्याचवेळेस हा विषय प्रॉपरली डिसकस करुन जर केला असतातर, आमचे गटनेते, इतर पक्षाचे गटनेते, तुमचे गटनेते आणि त्यावेळी जे मा.महापौर होते तर मला वाटते ही वेळ आली नसती त्याच्यामुळ सभागृह चालवत असताना आपण योग्य पध्दतीने सगळयांना विश्वासात घेवून चाललतर निश्चितपणे त्याचा फायदा नागरीकांना होणार आहे याच्याबद्दल माझ्या मनात दुमत नाही. मा.महापौर साहेब, मगाशी सिमाताई आणि मंगलाताई सांगत होत्या की महापौरांचा अपमान झाला, अवमान झाला तर तुम्ही सभागृहामध्ये अनेकवेळा आयुक्तांना, प्रशासनाला आदेश दिले आहेत की या विषयाची ताबडताब चौकशी लावावी आणि त्याचा अहवाल पुढच्या जनरल बॉडीमध्ये ठेवावा. मग तो कोवीडचा विषय असेल किंवा इतर सगळे विषय असतील त्या बैठकीमध्ये तुम्ही स्वत: आदेश दिले होते आजतागायत तो अहवाल सभागृहापुढे आलेला नाही याच कारण काय की आपल्यामध्ये जे मतभेद आहेत ते प्रशासनाला माहीती आहेत आणि मग प्रशासन काय करतं त्याचा गैरफायदा घेतं. शेवटी प्रत्येक नगरसेवक काम करताना त्या त्या भागामध्ये मग तो कुठल्याही पक्षाचा असो नागरीकांना मदत करतो. आपली सगळयांची भूमीका आणि भावना काय असते की माझ्या विभागातल्या नागरीकांच काम झाल पाहीजे. माझ्या विभागात ज्या मुलभूत सुविधा आहेत त्या मुलभूत सुविधा लोकांना व्यवस्थित मिळाल्या पाहीजेत. आणि त्याच बरोबर त्याला त्या प्रभागामध्ये इतर गोष्टीही अपेक्षीत आहेत. किंवा आपण जी काही निवडणूकीमध्ये लोकांना आश्वासन दिली ती आश्वासन पुर्ण झाली पाहीजेत ही प्रत्येकाची भूमिका असते. पक्ष जरी आपले वेगळे असलेतरी चांगल काम करण्याची प्रत्येकाची भूमीका आहे. परंतु या सगळया भानगडीमध्ये जे काही आज घोटाळे समोर येतात याच्यामध्ये किती लोक सहभागी आहेत, अगदी मुठभर लोक हे करतात आणि बदनाम महापालिका होती, बदनाम सभागृह होतं, बदनाम पक्ष होतो. परंतु या मुठभर लोकांनी जो काही चुकीच्या पध्दतीने कारभार महापालिकेत काही अधिका-यांना हाताशी धरुन चालवला आहे आणि याच्यामध्ये नगरसेवकांना काही माहीती पण नाही मग तुमच्या नगरसेवकांना किंवा आमच्या नगरसेवकांना माहीती नाही आता हा विषय योगेशभाईनी जो आणला आहे, मा.महापौर साहेब, इतका भयानक विषय आहे म्हणजे रोजची ऐंशी कुत्र्याची नसबंदी होते आणि ते पण ज्या तीन महीन्यात सगळ कामकाज ठप्प होतं जवळपास ७१ लाख १७ हजार ८७५ रुपये दिले आहेत. योगेशभाई इतके पोटतीडकीने बोलले परंतु याच पुढ काय होणार आहे. तुम्ही जरी सांगीतल याची चौकशी करा, याच्या खोलात जा आणि पुढच्या मिटींगला सभागृहापुढे आणा.

प्रत्येक्षात काय होतय, स्मार्ट सिटीच्या बाबतीत मागच्यावेळेस आम्ही अनेकजण बोललो की स्मार्ट सिटीमध्ये इतका मोठा घोटाळा झालेला आहे आणि स्मार्ट सिटीची चौकशी व्हावी आणि

तसे आदेश आपण प्रशासनाला देण्याचा प्रयत्न केला परंतु पुढे काय झाल. मागच्या जीबीत आम्ही आयुक्ताना अनेकवेळा विचारल की याच्यावर तुम्ही पुढे काय चौकशी केली, काही नाही इतका प्रचंड मोठा घोटाळा आहे. नागरीक काय म्हणतात हे फक्त जनरल बॉडीला जातात, भाषण करतात एक दोन दिवस पेपरला बातमी येते आणि पुन्हा जैसे थे. म्हणजे आपण या कुठल्याही घोटाळयात ना तुम्ही सहभागी ना आम्ही परंतु मुठभर लोक जी करतात याच्यामुळे सगळे बदनाम होतात. त्याच्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की कुठल्यातरी विषयाच्या खोलात आपण जाऊ. अनेक विषय आहेत तुम्ही ठरवा स्मार्ट सिटीच्या घोटाळयात जायच का, कोवीडच्या काळातल्या घोटाळयात जायचं, का हया कुत्र्याच्या असे अनेक विषय आहेत आणि या विषयाच्या खोलात आपण गेलोतर शंभर टक्के याच्यात जी लोक चुकीची काम करतात मग ती कुठल्याही पक्षाची असो किंवा कुठलाही अधिकारी असो याच्यातून त्यांच्यावरती जरब बसेल, कार्यवाही होईल. आज अधिका-यांनी काय केल की या ठरावीक मंडळीच्या मदतीने त्यांना पाहीजे ते करतात. सगळेच अधिकारी वाईट आहेत असं मला म्हणायच नाही. काही अधिकारी या सगळया गोष्टीचा इतका गैरफायदा घेतात आणि नगरसेवकांना याच्यातल काहीच माहीत नाही. ठरावीक मुठभर लोक अशा पध्दतीने जर पिंपरी चिंचवड शहराची बदनामी करत असतीलतर आपल्या शहराच्या दृष्टिने अत्यंत दुर्दैवी आहे. मा.महापौर साहेब, मागच्या दोन महीन्यातील गोष्ट आहे, माझा एक मित्र राजस्थानला गेला होता आणि त्याठिकाणी कॉन्ट्रॅक्टर्स मंडळी बसली होती आणि त्याठिकाणी चर्चा होती की पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये कशा पध्दतीने रिंग होती, कशा पध्दतीने काम वाटून दिली जातात हे आपल्या शहराच्या दृष्टिने अत्यंत दुर्दैवी आहेअशी चुकीची प्रतीमा देशभर आपली व्हायला लागली आहे. मा.महापौर साहेब, आपण इथ परमनन्ट नाहीत सिमाताई आताच बोलल्या की दर पाच वर्षांनी आपल्याला पुन्हा परीक्षेला सामोर जायच आहे. सामोर जात असताना मग सगळा हिशोब नागरीक करतात आणि नागरीक हिशोब करताना आपल्याला आपली जागा दाखवून देतात. मा.महापौर साहेब, आपण या शहराचे प्रथम नागरीक आहेत, मागच्या काळात आपण खुप चांगल काम केलेल आहे तरी तुम्ही महापौर म्हणून कुठल्यातरी किमान एकातरी विषयात, म्हणजे हा जो विषय आहे रोजचे ८० म्हणजे ७१ लाख रुपये आपण या संस्थेला मोजलेले आहेत. करा याची चौकशी, जावा खोलात, प्रशासनाला आदेश दया आता मागचे विषय पण आता मंगलाताई आणि सिमाताई म्हणत होत्या त्याचा प्रशासनाला जाब विचारा का नाही आतापर्यंत तुम्ही मांडल सभागृहापुढे. येवु दयात सभागृहापुढे जनतेला पण कुठे दयांना कोण चुकल आहे ते. "दुधका दुध, पाणी का पाणी" होवू दयात मा.महापौर साहेब. माझी तुमच्याही पक्षाच्या नगरसेवकांना आणि आमच्याही पक्षाच्या नगरसेवकांना विनंती आहे की आपण साडेचार वर्षे जसं भारत-पाकीस्तान सारख आपण वैरी असल्यासारख, पण इथून मागच्या काळामध्ये असं कधीही नव्हतं. विरोधी पक्षाच्या नगरसेवकांना सुध्दा विश्वासात घेतल जायचं आणि विरोधी पक्षातल्या लोकांचीही काम व्हायची, तुम्ही पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये सत्तेत होतात तुम्ही सुध्दा चांगलच काम केलेल आहे आणि त्यावेळेस तुम्हांला आठवत असेल की भाजपचा असो, शिवसेनेचा असो किंवा काँग्रेसचा असो सगळयांना आपण संधी देत होतो. बजेटमध्ये त्याचा विचार होत होता त्याची काम होत होती, आता अंबरनाथ कांबळे इथ नाही परंतु त्यांनी त्यांची खंत व्यक्त केली. विकास डोळस सारखा खरोखर चांगल भाषण करतो असे अनेक नगरसेवक आहेत परंतु आपण त्यांना ती संधी देत नाहीत. ठिक आहे आता वेळ निघुन गेलेली आहे, आता आपल्या एक दोन सभा होतील त्याच्यानंतर आपल्याला महापालिका

इलेक्शनला सामोर जायचं आहे. तुम्ही तुमच्या पक्षाची भुमीका मांडणार आहात, आम्ही आमच्या पक्षाची भूमीका मांडणार आहोत आणि नागरीक त्यांचा निर्णय घेणार आहेत. परंतु मा.महापौर साहेब, तुम्ही एखादयातरी विषयाच्या खोलात जा, चौकशी लावा अशी माझी आपल्याला नंम्र विनंती आहे.

मा.विकास डोळस – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मगापासून आपण चर्चा ऐकतो, योगेशभाईनी आता नसबंदी बद्दल सविस्तर माहीती दिली आणि लॉजीकली जर आपण ती माहीती ऐकलीतर ती आपल्याला बुध्दीला पटणारी आणि कागदोपत्री आपल्याला त्यांनी ती माहीती दाखवली पण. सिमाताईनी सांगीतल की आपण जो आदेश दिला होता तो अहवाल आपल्या पटलावरती ठेवायचा होता परंतु एवढे महीने उलटल्यानंतरही तो अहवाल पटलावरती ठेवल्या जात नाही. ब-याच जीबीला सिमाताई सांगतात की हे पाप आपल्या माथी घेवू नका. आज भ्रष्टाचार होतोय, भ्रष्टाचार होतोय, भ्रष्टाचार होतोय हे पोटतीडकीने सत्ताधारी असतील, विरोधक असतील हे आपल्या समोर आणतात. आपणही आयुक्तांना त्या पध्दतीचे आदेश देतो पण आयुक्तांकडून त्यावरती कसल्याही प्रकारची कारवाई होत नाही. मग हे आपल्याला समजणारे इतके आपण खुळे नाहीत की याच्यामध्ये दोषी कोण आहे. रस्त्यानी जाताना जर एखादा साप दिसलानां तरी आपण घाबरतो का घाबरतो की आपल्याला माहीती तो फुस्करन आणि त्यानी फुस्करल्यानंतर पण आपण जर काही केलतर तो आपल्याला चावेल. ते आपल काय झाल आहे आपण फुस्कारतच नाही. मला नगरसचिवांना विचारायच की जर आयुक्त मा.महापौरांच्या आदेशाला पण केराची टोपली दाखवत असतीलतर त्यांच्यावरती काय करु शकतो. आज आठ महीने झाल पोटतीडकीने आम्ही सांगतो की स्पर्शचा अहवाल ठेवा, ठेवा, ठेवा. मग आयुक्त साहेबांना अशी कोणती गोष्ट अडचणीची वाटती की ते पटलावर ठेवत नाहीत. दोन तीन जीबी पुढे मी करसंकलन विभागाच बोललो हातो. टाटा मोटर्स वरती कारवाई केली, प्रशासन कशा पध्दतीने काम करत ते मी तुमच्या निदर्शनास आणून देतो. म्हणजे पालिकेच उत्पन्न वाढाव म्हणून जे आपले करसंकलन विभागाचे प्रसिध्दीलोलूप अधिकारी आहेत. टाटा कंपनीला, मोठमोठया ज्या नामांकीत कंपन्या आहेत त्यांना नोटीसा दिल्या ते पेपरला आले, प्रसारमाध्यमाशी इन्टराईट केल. आज त्यांच्या केबीनला जावून आयुक्त साहेब बघा, त्यांच्या केबीनला किती फाईली पेन्डीग आहेत हे तुम्ही स्वत: जावून बघा. जर करसंकलनाच्या कर्मचा-याशी बोललोनातर शंभर कोटी प्लस उत्पन्न येईल जर त्या फाईलीवरती सहया झाल्यातर. का पेन्डींग आहेत का तर त्यातून त्यांना उत्पन्न नाहीनां. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये यायच शासनाकडून ते छापायला यायच ही भूमिका असते आणि बदनाम कोण होतं आपण. कोणताही विषय घ्या, नसबंदीच्या विषयामध्ये एखाद बील काढताना त्याच्यामध्ये नगरसेवक असतो का. त्याच्यामध्ये ऑडीटची प्रक्रीया असते, त्याच्यामध्ये स्क्रूटीनी असते मग या प्रक्रीया गेल्या कुठं. क्रॉसचेक कोणी केलं. फायनल बीलावरती काय आम्ही सहया केल्या का. मग याला दोषी कोण? आयुक्त पध्दतशीररीत्या आपल्याला साईडला करतात, आपल्याला बदनाम करतात. आज करसंकलन विभागाच्या मॅडम आहेत माझ काही वैयक्तीक त्यांच्याशी नाही पण त्यांची काम करण्याची पध्दत जी आहेना ती चुकीची आहे आणि चुकीचीच आहे. जे चुकीच आहे त्याला छातीठोकपणे मी चुकीच म्हणणार. आज टाटा कंपनीला बदनाम केल, आज शंभर कोटीच्या फाईल तीथ पेन्डीग आहेत, आयुक्त साहेब काय करणार तुम्ही. मा.महापौर साहेब, त्यांना चार वर्षे झाले आहेत त्यांना पाठवून

दया शासनाकडे. आज आपले जगताप साहेब, अतिरीक्त आयुक्त आहेत, आज ढाकणे साहेब पण तुमच्या शेजारी बसलेले आहेत. नगरसेवकांना मला विचारायच आहे की ज्या ईझीली तुम्ही जगताप साहेबांकडे जाता त्या ईझीजी ढाकणे साहेबांकडे जाऊ शकता का, पर्सनली घेवू नका. डेप्युटेशनवर जे आलेले शासनाकडचे अधिकारी आहेत त्यांच्यासाठी नगरसेवक म्हणजे एक मुर्ख प्राणी आहे. चार इकडचे आणि चार तीकडचे हे दोन्ही मिळूनच सत्ताधारी आहेत बाकीचे जे राहताताना १२० ते फक्त सामान्य नगरसेवक आहेत. आज बघा अतीरीक्त आयुक्त (१),(२),(३) आहेत ज्या ईझीली आपण आपल्या पालीकेच्या अधिका-यांकडे जावु शकतोना त्या ईझीली हयांच्याकड जावू शकत नाही किंवा यांच्याकडून काम होत नाहीत. बायस पध्दतीने काम करण्याची यांची पध्दती आहे. किती तरी उदाहरण आपल्याला दाखवून देईल. माई महासभेमध्ये आयुक्त आणि प्रशासना विरुध्द आपल्याला जो ठराव करता येईल, जी ऍक्शन घेता येईल ती कायदेशीररीत्या तपासून आपण १२८ नगरसेवकांच्या वतीने ठराव करा आणि एकदा प्रशासना विरुध्द कारवाई करा. म्हणजे आमच्या महापौरांचा जो अपमान होतो, वारंवार जे आम्ही बोलतोय की आमच्या महापौरांचा अपमान आम्ही सहन करणार नाही त्याची कृती त्यांना दाखवून दया म्हणजे ते जागेवर येतील, धन्यवाद.

मा. भाऊसाहेब भोईर – मा. महापौर मी अधिक वेळ घेणार नाही. कारण त्याच त्याच विषयावर आपण सर्वजण विस्तारपूर्वक बोललेलो आहोत. खरं तर माई म्हणजे आईच असते त्यामुळे महापौर पण तुम्हीच आहात त्यामुळे डबल जबाबदारी आहे. सभा कामकाज नियमावलीनुसार सभेमध्ये आलेल्या विषयावर आपण सर्वांना बोलण्याची माई संधी दिली तर सभेमध्ये मंजूर झालेला विषय सोडून आपण दुस-या विषयाच्या उपसूचनांवरुन परत आपण पहिल्या विषयावर आपल्याला यावे लागले. म्हणजे इतके खदखदत होतं प्रत्येकाचे मनामध्ये. डोळस आमचे मित्राने अनेक साडेचार पावणे पाच वर्षाचा त्यांचा भार मोकळा केला आहे आणि ही खंत आहे आणि मी हे पहिल्या दिवसापासुन बोलत होतो माई की आपण सर्वांनी पक्षाचे गटनेते असतात आपण २५ वर्षे या सभागृहामध्ये आहे. असं कधीच झालं नाही माझ्या सारख्याने एखादी उपसूचना दिलेली सत्तेत असताना आणि मी आपण कायम २५ वर्ष माई एका पक्षात होतो तरी मी विरोधात होतो. गेली २५ वर्षे मी या महापालिकेत विरोधक बघितले आहेत पण हया २५ वर्षात एकाही अधिका-याने माझा अपमान केलेला नाही. एकही काम असं राहिलं नाही आणि आम्ही एखादी उपसूचना आसेल तर कुठं काही असेल तर त्याच्यावर फार बारकाईने विचार करुन इतकं तुमच्या तुमच्यामध्ये सुध्दा आता डोळस यांनी व्यक्त केलेली आहे. माई योगेश बहल यांना मी खरंच मन:पूर्वक धन्यवाद देतो की या कुत्र्यांचा सुळसुळाट आणि कोरोनाच्या कालखंडामध्ये एवढया नसबंदी होणे म्हणजे हा जागतिक स्तरावरचा गिनिज बुक ऑफ रेकॉर्ड होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. या डॉक्टरांना अनेक पुरस्कार प्राप्त होतील आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील कारण की सगळं जग झोपलेलं असताना एकही माणुस, कुत्रं रस्त्यावर नसताना सुध्दा एवढं धाडस त्या डॉक्टरांनी केलं. माई मी या सभागृहामध्ये ठराव मांडतो सगळयांच्या वतीने की या डॉक्टरांचा गेटवरती सन्मान करुन त्यांचा मानपत्र देऊन आणि मरणोत्तर त्यांना पुरस्कार देऊन त्यांचे तैलचित्र तरी त्या

दवाखान्यात लावावे म्हणजे अशा पध्दतीने काही तरी आपण धोरण निश्चित करावं कारण हा उच्चांक हया डॉक्टरांमुळे हा फार सबक किंवा फार मोठा आदर्श असेल काम करावं तर अशा डॉक्टरांसारखे काम करावे. कारण साडे सात हजार कुत्री हयांना भेटली कुठुन. बरं ती सर्व नेऊन सोडतात मोशीला. त्याचा आमच्या ताईंना त्रास होतोय. उरले सुरले चावायला हार्षल ढोरेकडे यांच्याकडे जातात. म्हणजे हे जे असे प्रकार चाललेत हर्षल षडयंत्र चाललय आपल्या भोवती. आता येणा-या निवडणुकीत सावध रहा. त्यामुळे हया सगळया कुत्र्यांपासुन जर वाचायचं असेल तर माई विनंती आहे माई दोन तीन सभा राहिलेल्या आहेत चिरंजीव म्हणुन मला चिरंजीव म्हणतात मला लहानपणापासुन घरात. म्हणजे बोलू देत, होऊ दयाना मोकळं प्रत्येकाला काय बोलणार, फक्त बोलणार. पूर्वी रामकृष्णजी मोरे आम्हांला सांगायचे तुम्ही पण साक्षीदार आहात. सभागृहात किती वेळ बोलायचं, कोणत्या विषयावर बोलायचं, पाणी पुरवठयाचा विषय चालला असेल तर कुत्र्यांचा विषय घ्यायचा का. मध्येच वृक्षारोपण करायचं का. मध्येच पर्यावरणावर बोलायचं का. हे पक्षनेत्यांचे काम असते पण पक्षनेते पण आमचे तयार आहेत. पण हया सगळया परिस्थितीचं भान आपण सर्व गटनेत्यांनी ठेवलं पाहिजे. आपण नगरसेवक एक जात आणि प्रशासन दुसरी जात असे दोन आहे. आपण नेहमी हया सभागृहात हे पावीत्र ठेवलं पाहिजे की बीजेपीचा कोण तो हया सभागृहाचा नगरसेवक असतो तो विश्वस्त असतो आणि हयाच पावित्र्य संभाळलं असतं तर ही वेळ प्रत्येकावर आली नसती. तुम्ही कोणी तरी बोललं पण प्रशासनावर शासनाचे अधिकारी येतात शासनाचे अधिकारी येतात. नवीन येतात ना आयएएस पण येतात. आपण खंबीर असलो ना तर ते त्यांचे काम करतील ना. त्यांची काय इस्त्राईलवरुन बदली होते का इथे. आणि त्यांना परत कुठं पाठवायचं हे सुध्दा जाणण्याची क्षमता आपल्यात आहे ना. पण आपणच बोलतो. आपण टीप लावतो ना हयाचा कार्यक्रम करा त्याचा कार्यक्रम करा म्हणुन ते आपला कार्यक्रम करतात. हे आता परत पावणे पाच वर्षानंतर तुम्हांला समजलय. आम्ही २५ वर्ष पाहतोय. आणि म्हणुनच कोणत्याही अधिका-याची काही मालकी हक्क नसते. त्या अधिका-याने तसं समजू नये. असं कोणी समजत असेल तर मी कायम विरोधात होतो तरी मी माझ्या पध्दतीनेच राहिलो कारण मी सर्व नगरसेवकांना बरोबर घेऊन जात होतो आणि माझ्या सभागृहामध्ये माझ्या विरोधात कोणीच कधी नव्हतं. आणि माई मी विषयांतराला धरुन विषयांतर केलं पण विषय सोडला नाही. हया कुत्र्यांच्या माध्यमातुन जो सुळसुळाट झालेला आहे शहरामध्ये आणि माझी परत एकदा नम्र विनंती सभागृहाच्या वतीने मांडतो मी मला पाठींबा द्या त्या डॉक्टरांचा सत्कार करावा आणि त्यांचा सन्मान एवढा मोठा करावा की पुढच्या भविष्यामध्ये त्या डॉक्टरला बघितल्यानंतर कुत्री पळून गेली पाहिजेत एवढी दहशत झाली पाहीजे. त्यामुळे अशा प्रकारे जे चाललय हे थांबवा आणि माई विषयाला धरुन विषय धरुन सभागृह चालवाव अशी नम्र विनंती.

मा. सचिन चिखले – सन्मा. महापौर, सन्मा. सभागृह, सन्मा. सर्व नगरसेवक , नगरसेविका माई खरं तर आताच सर्व नगरसेवकांनी एकदम चांगल्या प्रकारे शहरातील एकदम ज्वलंत विषय आपल्यासमोर ठेवलेला आहे. भाईंनी जी गोष्ट सांगितली की कोरोनाच्या काळामध्ये किंवा एका महिन्यामध्ये किती कुत्र्यांची नसबंदी झाली आणि त्याच्यावर किती पेमेंट झाले. हया सर्व गोष्टी व्यवस्थित सांगितल्या. माई त्यात एक गोष्ट नक्की आहे की शहरातील सर्व ज्येष्ठ नागरीक असतील मुलं असतील आणि शहरातील हा वाढता कुत्र्यांचा सुळसुळाट म्हणजे खूप मोठे भयभीत वातावरण आहे. आपण प्रत्येक जनरल बॉडीच्या मिटींगला आणि प्रत्येक सहा महिन्यांनी हा विषय येतो, त्याच्यावर चर्चा करतो आणि वेगवेगळया पध्दतीने आपण विषय पुढे नेतो पण त्याच्यावर इम्प्लिमेंट आणि काम कोणत्याही प्रकारचे होताना दिसत नाही. शहरातील कुत्र्यांचा विषय ज्येष्ठ नागरीकांनी वेळोवेळी आमच्याकडे कंम्प्लेंट, तक्रारी केल्या त्यांना सकाळी सकाळी येणा-या अडचणी आहेत, वॉकींगला जाणारी लोकं आहेत त्यांच्या वेगवेगळया अडचणी समोर आल्या आणि वेळोवेळी सभागृहाच्या समोर ते आम्ही ठेवण्याचे काम केले आहे. परंतु आयुक्त साहेबांना नम्र विनंती की आता ज्या काय गोष्टी झाल्या किंवा ज्या काय गोष्टी चर्चे समोर पुढे आल्यात त्याचे व्यवस्थितरित्या काम झालं पाहिजे. प्रभागातुन वेळोवेळी सर्व नागरीकांची मागणी असते. वेगवेगळया ठिकाणी कुत्रं कुठे ना कुठे चावा घेत असत. प्रभागामध्ये किंवा शहरामध्ये मोकाट जनावरांचा गायी असतील, बैल असतील जे फिरत असतात. हे सगळं घडत असताना आपली यंत्रणा नक्कीच १०० टक्के कमी पडती. यामध्ये काही दुमत नाही. याच्या आधी सुध्दा माई आपण एक विषय समोर आणला होता डुकरांचा सुध्दा. काही लोकवस्तीमध्ये काही व्यक्ती डुकरं पाळतात आणि ती व्यवस्थित सोडून देतात असा त्यांचा व्यवसाय केला जातो. एक डुक्कर माई पन्नास हजार, एक लाखाला विकलं जातं माई. पण त्याचा नाहक त्रास पाच पाच सहा सहा महिने संबंधित वस्तीमधील लोकांना होत असतो आणि आपले कर्मचारी किंवा आपली गाडी ज्या वेळेत त्यांना उचलण्यासाठी जाते त्या वेळेस ती लोकं सगळी अंगावर येतात. मी मागच्या वेळेस सुध्दा सांगितलं तुम्हांला माई की ज्या वेळेस अशी परिस्थिती येईल त्या वेळेस स्थानिक पोलीसांना व्यवस्थित पणे हाताशी घेऊन त्या ठिकाणी कारवाई झाली पाहिजे. आणि ही कारवाई कुठ होताना दिसत नाही. आजही जैसे थे परिस्थिती आहे. गेले सतत साडेचार वर्ष हा मुद्दा आपल्यासमोर आणतोय. सभागृहात त्याच्यावर चर्चा होतीए. पण त्याच्यावर कुठंतरी व्यवस्थितपणे काम होत नाहीए याची आम्हांला खंत वाटते. माई आता जे काही विषय तुमच्यासमोर आलेले आहेत आणि एक दोन महिने आपल्या हातामध्ये राहिलेले आहेत त्याच्यामुळे व्यवस्थितपणे काम करावं हीच अपेक्षा करतो आणि थांबतो, धन्यवाद.

मा. राहुल कलाटे – सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, पत्रकार बंधुंनो गेले २ – ३ तास झाले की आपण सेवाज्येष्ठतेनुसार सुरु केलेली चर्चा परत नं. १ विषयावर कुत्र्यांवर आली.

माझी प्रशासनाला देखील विनंती आहे की ज्या पध्दतीने सीमाताईंनी सांगितलं की ९७ ला कोणी जॉइन झालं होतं ९८, ९९ ला नंतर त्याला पण सेवाज्येष्ठता दिली. मला वाटतं आयुक्त साहेब आपण पण हया गोष्टीत लक्ष घालावं जेणेकरुन  हया शहरातल्या कुठल्याही कर्मचा-यावर अन्याय झाला नाही पाहिजे. जीबीच्या अगोदर आम्हांला एक अनुभव येतो की कर्मचारी आमच्याकडे येतात की आमची पण एक उपसूचना घ्या. कारण की त्यांनतर त्यांना मंत्रालयात जावं लागतं.  तिकडनं त्यांची फाईल क्लीअर करावी लागते.  तर मला वाटतं आयुक्त साहेब आणि महापौर साहेब माई आपण देखील थोडया अशा पध्दतीने डायलॉग ठेवावा त्यांच्यासमवेत. कारण काय होत की तो कुठतरी पक्षनेत्यांना पकडणार. आम्हां सगळया गटनेत्यांना विचारणार बघा बाबा आम्हांला विरोध नका करु आणि मग कुठंतरी पक्षनेत्याच्या मनात आलं त्याला वाटलं तर तो नेत्यांना विचारणार घेऊ का हा विषय. नेते नाही म्हटले की गेला तो घरी परंतु नामदेवरावांनी अजुनपर्यंत तसं केलेलं नाही. पण ही परंपरा हया सभागृहात आहे. पण ते काय होतं. आता कोणी तरी मगाशी सांगितलं की नगरसेवकांची मर्जी ठेवावी लागते. महापौरांची ठेवावी लागते. मला वाटतं इथं आपली नाही कोणाची ठेवावी लागत.  इथे तुमच्या नेत्यांची ठेवावी लागते. त्यांच्या दरबारात सकाळी गेलं की ती उपसूचना येते कुठंतरी ही प्रथा माई आता आपण एक चांगली डेमोक्रॅटीक पध्दत त्यात घ्या. जेणेकरुन कुठल्याही कर्मचा-यावर अन्याय होणार नाही आणि आयुक्त साहेब माझी देखील आपणांला विनंती आहे की ज्या पध्दतीने तुम्ही, ज्या पध्दतीने तुम्ही काम करताय निश्चितच कुठल्याही कर्मचा-यावर अन्याय होऊ देऊ नका आणि माई आता आपण परत कुत्र्यांवर येऊ. आता साडेचार वर्ष झालीत. हर्षलची कुत्री काही जायला तयार नाहीत. डास कुत्री आणि जलपर्णी मला वाटतं माई ज्या प्रभागातनं येतात त्या प्रभागात आज देखील ही अवस्था असेल तर निश्चितचं आपण सर्वांनी आत्मपरीक्षण करायची गरज आहे. विकासनी सांगितलं की इकडची चार लोक सभागृह चालवतात, तीकडची चार लोकं सभागृह चालवतात. मला नाही विकास कधी असं वाटल. मला तर ३-४ महिन्यापूर्वी असं वाटत होतं की नामदेवराव सभागृह चालवतात. आता कुठं तरी माई बोलू देताएत ते पण सोयीनी. माईंच पण काही चालत नाही हे आजही परिस्थिती आहेना सभागृहात. परंतु आता पाच वर्ष होत आलेत. कोणीतरी सांगितलं की आता हया गोष्टी एवढया वाढत चालल्यात आता शेवटी शेवटी माईलाही वाटत असेल की आता बोलू दया जाऊ दया. माई तर काय परत येणारच आहेत सभागृहामध्ये. यातले किती येतात किती हे बघु नंतर. त्यामुळे हया गोष्टी होत असताना संदीपने ज्या पध्दतीने सांगितलं आयुक्त साहेब की कॅटल शेडची जागा जी आपल्या ताब्यात आली होती त्याच काय झालं. साहेब आपण देखील हया गोष्टीचा आढावा घेतला पाहिजे जेणे करुन जसं भाऊसाहेबांनी सांगितलं तसं मला वाटतं त्या दोन डॉक्टरांना पण पुरस्कार द्यावे लागेल कारण की कोविडच्या ३ महिन्याच्या कालावधीत तिथे साडे सात हजार कुत्र्यांची नसबंदी करत असेल तर निश्चितच नामदेवराव तुम्ही आपल्या सभागृहाकडून एक शिफारस पाठवून द्या मोदीजींना की हयांना पण  पदमश्री किताब देऊन

टाकावा. म्हणजे त्यांच्या सुपीक डोक्याला पण मानलं पाहिजे. ज्या वेळेस सगळे लोक कोविडशी झुंज देत होते एकमेकांना मदत करत होते पण अशा वेळेस पण कुत्र्यांची नसबंदी करण्यात येत होती. कुठं तरी माई हया सगळया गोष्टी आपण खुप पोटतिडीकेने योगेशजींनी हा विषय मांडलाय. पोटतिडीकेने म्हणण्यापेक्षा कडक भ्रष्टाचाराचे एक चांगलं उदाहरण त्यांनी दिलय. किती चांगल्या प्रकारे भ्रष्टाचार कोणाचं लक्ष नसताना भ्रष्टाचार आम्ही करु शकतो. मला वाटतं हाय कोर्टाचा एक निकाल आहे की कुत्र्यांना आपण  मारु शकत नाही किंवा नसबंदी केल्यानेतर परत त्याच ठिकाणी त्याला सोडायचय. परवा दिवशी आमच्या इथे पारखे वस्तीत एक कुत्र होतं तसं मी डॉ. दगडेंना फोन केला  की कुत्र पिसाळलं आहे त्याला घेऊन जा. सगळी लोकं जमली होती सोसायटीतील. ते म्हणाले नाही नाही आम्हांला कुत्र्याला नेता येणार नाही त्याची ऑलरेडी नसबंदी झालेली आहे. कुठे तरी हा देखील विचार करावा लागेल की नसबंदी झाल्यानंतर ते कुत्र पिसाळत नाही असं कोण म्हणतय आणि पूर्वी देखील अजित पवार साहेब असताना  मी काही एनजीओंशी त्यांची भेट घालून दिली होती की सुस सारख्या ठिकाणी म्हाळूंजे सारख्या ठिकाणी आजही ते स्वत:च्या खर्चाने त्या  कुत्र्याला  घेऊन जाऊन त्याची नसबंदी करतात. असं असताना आपण कोटयावधी रुपयांची उधळपट्टी करतच आहोत आणि ही उधळपट्टी करत असताना जसं योगेशजींनी सांगितलं की कसा भ्रष्टाचार करावा खरंच मला तर परत तुमच्याकडे येऊन ती नस्ती  चेक करावी लागेल की कशा पध्दतीने ही मोडस ऑपरेंडी केली. ज्या  दिवशी लोकं घराच्या बाहेर येत नव्हती तुम्हांला आठवत असेल तर माई सूरूवातीला जेव्हा लॉकडाउन चालू झाला तर आपण रस्त्याने चाललो होतो. कुत्र्यांना तर असं भुंकायचं पण त्यांच्यात त्राण नव्हता राहिला. त्यांना खायला प्यायला मिळत नव्हतं. नंतर ज्या वेळेस कडक लॉकडाऊन उठल्यानंतर लोकं त्यांना भाकरी किंवा अन्न द्यायला लागले तेव्हा त्यानंतर त्यांनी पुन्हा टुव्हिलरच्या मागे पळायला सुरुवात केली. म्हणजे कुठं तरी आयुक्त साहेब आपण हे करत असताना पाळीव घरातली जी कुत्री आहेत ती ठीक आहेत. पण स्ट्रीट डॉग आहेत जी पाळीव कुत्री आहेत जी रस्त्यावर बाहेर फिरतात त्यांची संख्या कशी कमी होईल. तर मला वाटतं त्यांनी शी केली म्हणुन ५००/- दंड अशी नाही कमी होणार आणि मला वाटतं मंगलाताईंनी सांगितलं की जी लोकं कुत्री पाळतात मला वाटतं आपण जेव्हा परदेशात जातो तो व्यक्ती कुत्र्याला पुढ नेतो तेव्हा त्याला भांड पण हातात  ठेवाव लागत. कुत्र्याने शी केली ती पहिली भरायची. कुठं तरी नागरीकांना शिस्त लागली पाहिजे हा मोटीव्ह हयाच्यामागे असणं परंतु तुम्ही हयांच्याकडे पाहिले व्हेटरनरी डॉक्टरांना ५०००० मला वाटतं साहेब तुम्हांला कोण व्हेटरनरी डॉक्टर येणार आहे ५००००/- मानधनावर. आज आपण पाहिलं तर व्हेटरनरी डॉक्टरांची असणारी संख्या ती अत्यंत कमी आहे. तुम्ही मला वाटतं चेक केलं का नाही माहित नाही परंतु तुम्ही मानधनावर व्हेटरनरी डॉक्टरांना ५०,००० रुपये जर दिले तर तो असंच करणार. १० च्या ऐवजी तुम्ही जर त्याला इन्सेंटीव्ह जर १० च्यात १ ऍड करा त्याला

इन्सेंटीव्ह द्या. जेवढी नसबंदी करतील तेवढे पैसे म्हणजे अजुन एखादा विक्रम त्याच्याकडून होईल परंतु हे होत असताना कुत्र्यांवरून खरं तर सुरुवात झाली. माई तुम्ही हर्षलला मला वाटतं तुम्ही थांबवलं. मुळा रोड हा तसा चिंचवड विधानसभेचा महत्वाचा रोड आहे. मला वाटतं की आयुक्तांनी पण डिव्हीजनल कमिशनरांनी पण भूसंपादनाची नोटीस काढली. खरंतर त्या प्रकरणात तुम्ही त्या ठेकेदारावर कारवाई करायला पाहिजे होती त्याची मुदत संपली. आज नागरीकांसाठी किंवा तुम्ही तुमच्या शब्दासाठी साठी डांबरीकरण केलं असेल. परंतु हे काम करत असताना खोसे सारखा एक ठेकेदार त्याच्यावर पण तुम्ही कारवाई केली पाहिजे. की तू मुदत संपेपर्यंत का थांबला. दुस-या बाजूला एकतर तो कॉंक्रीटीकरणाचा रोड तुम्ही त्याचे डांबरीकरण करुन घेतले. ठीक आहे. नागरीकांचे प्रेशर असेल. सांगवीतला तो महत्वाचा रस्ता आहे तो करावा ही मानसिकता तुमची पण पाहीजे आणि सर्व नगरसेवकांची पाण पाहिजे पण ते करत असताना.....

मा. महापौर – तसे नाही, माझी मानसिकता आहे. तो केला रोड तो मीच रुंदीकरणात रोड केलेला आहे. आता आमचा भूसंपादनाचा विषय शासनाकडे गेलाय. कलेक्टर साहेबांचे माझे नेहमी बोलणं होतय आणि तो लवकरच आम्हांला ताबा मिळेल. ताबा झाल्यानंतर आमचा तो सिमेंटचा रोड होईल आता ताबा नसल्यामुळे आम्हांला सिमेंटचा रोड करता येईना आणि लोकांचे ऍक्सिडेंट व्हायला लागला म्हणुन आम्ही जाण्या येण्यासाठी तो मार्ग सिमेंटचा केला.

मा. राहुल कलाटे – माई आपण महापौर आहात. आपल्याला भूसंपादनाला एवढा वेळ लागला तर....

मा. महापौर – नियमाप्रमाणे वाटाघाटीने होईना पण तो म्हणुन प्रशासनाने शासनाकडे दिला आणि वाटाघाटीने तो होत नसल्याने राज्य शासनाकडून आपण प्रशासन विभागाकडून कलेक्टर साहेबांकडून करुन घेतोय. आज ना उद्या ते सरळ पध्दतीने होईल. बरीचशी घरे त्यामध्ये आहेत.

मा. राहुल कलाटे – तुम्ही महापौर असल्यामुळ ते काम होणं गरजेचे आहे.

मा. महापौर – १०० टक्के जे मी केलय तो मागचा पॅनेल जो होता त्या पॅनेलच्या द्वारेच आम्ही केलाय आणि आताही तो रोड माझ्याकडेच परत आलाय हया पॅनेलमध्ये. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे कोणाच्या घराला मला काही करता आलं नाही ही माझी अडचण दीड वर्ष होती.

मा. राहुल कलाटे – नाही माई मला एवढंच सांगायचय की माई तुम्ही गेल्या १० वर्षापासुन तो करताय अजुन ५ वर्ष न लावता आपण महापौर आहात. प्रशासनाला हाताशी धरुन भूसंपादन कसं लवकरात लवकर होईल ते पहा.

मा. महापौर – १०० टक्के.

मा. राहुल कलाटे – आणि कुठंतरी हर्षलकडे लक्ष द्या. हर्षलकडे लक्ष द्यावे लागेल.

मा. महापौर – असं कोण म्हणतं लक्ष नाही.

मा. राहुल कलाटे – मी सांगतो ना कारण पाच वर्ष झाली माई आपण महापौर आहात. सभागृहात तो सातत्याने डासांबद्दल बोलतोय. सभागृहात तो सातत्याने जलपर्णीबद्दल बोलतोय. आजही बोलतोय साडेचार वर्ष, आयुक्त साहेब तुमच्या माहितीसाठी सांगतो जर आपण सांगवी परिसराचं रेकॉर्ड काढलं तर सर्वात जास्त डेंग्युचे पेशंट सांगवीत सापडतात. कुठं तरी याचे पण आत्मपरीक्षण प्रशासनाने करावे.

मा.महापौर – आत्मपरीक्षण नाही. मुळा नदी आणि पवनेच्या मध्ये बेटा बसलेल्या आहेत. आम्हांला दोन नद्या आहेत. त्यातली शहरातुन पवना वाहते. पण आम्हांला दोन नद्या आहेत. तो प्रश्न आम्हांला जास्त भेडसावतो.

मा. राहुल कलाटे – मा.महापौर साहेब, जनरली नदीच्या कडेला जी गावे असतात ती सुपीक असतात तिथे सगळे धनवान आणि पैसेवाले लोक राहतात. मला वाटतं तुम्हांला तर दोन- दोन नद्या आहेत. असो माई आपण पाहिलं असेल नामदेवराव आता जाहीर सभेप्रमाणे भाषण करतीलच. त्या सगळयांना उत्तरं ते देतीलच. आता हयाच्यामुळे हे जे चाललयं शहरामध्ये चार साडेचार वर्षामध्ये भ्रष्टाचाराचा जो खरंच कळस झालाय त्यात कुठल्याही क्षेत्रातून भ्रष्टाचार करायचा ठेवला नाही. एक शेवटची कुत्रे राहिले होते मला वाटतं पाच वर्षात कुत्र्यांबाबत जे ऐकायला नव्हतं मिळालं तेही ऐकले आणि कुठंतरी आयुक्त साहेब सर्वजण ओरडतात की स्पर्शचा अहवाल का येत नाही कुठंतरी तो अहवाल आपण कशा पध्दतीने परत लवकर सभागृहापुढे आणता येईल पण तो अहवाल सभागृहापुढे आणताना तो खुलासा करत असताना निश्चितच कोणाची पार्शलिटी, तुमचं काही तरी वैयक्तीक आहे का आयुक्त साहेबांबरोबर, नाहीनां. आयुक्त साहेब करणार नाही करणार नाही. जरा एकदा ना माई तुम्ही आणि माऊली शेठची आयुक्त साहेबांबरोबर मिटींग घ्या. सारखेच पर्सनल जातात सारखेच पर्सनल जातात ते पण एक आय.ए.एस. आहेत. त्यांनी उन्हाळे पावसाळे पाहिलेत. त्यांचे जर रेकॉर्ड पाहिलं तर तेही जग फिरलेत. त्यांनीही कलेक्टर पदावर ब-याच ठिकाणी काम केलय पण असं असताना सारखे जाऊन आता मी बोलतोय तरी खुलासा करणार का आयुक्त साहेब. आयुक्त साहेब आता सभागृहात नाहीत. असो माई कुठंतरी तो अहवालाचा विषय तो आपण साहेबांना सिरीयसली घ्यायला सांगा. आयुक्त साहेब कॅटल शेड खरंच संदीप वाघेरेंनी जो मुद्दा मांडलाय त्याचं काय झालं त्याचं देखील आम्हांला पुढच्या जीबीला जनरल बॉडीत आम्हांला खुलासा मिळावा की जागा ताब्यात आली होती रिझर्व्हेशनच्या बदल्यात आली होती, काय झालं काय नाही ज्या

वेळेस हा विषय येतो मला वाटतं जर आपल्याकडे पाहिलं तर त्या विषयाशी अत्यंत भावनिकपणे ह्या शहराच्या नागरीकांनी हिंदुत्वाशी जोडल्या जातो एक विषय आहे. त्यांचही कुठतरी भविष्यात जाऊन राजकारण कोणी करु नये. आता जर आपण पाहिलं असेलतर सर्व देशातल राजकारण भावनिकतेचं झालय. विकासाचं सोडून ते कुठतरी जातीयवादाकडे चाललय आणि आपल्याकडे इलेक्शन येते अशा मोमेंटला कुठतरी त्याचा गैरफायदा घेऊन कॅटल शेडचे काय झाले. रस्त्यावर गायी फिरतात. रस्त्यावर गुरंढोरं फिरतात, त्यांच काय झाल कुठंतरी ह्या दृष्टीकोनातुन आपल्याला देखील आपल्या शहरातला सामाजिक सलोखा कसा राखता येईल त्यासाठी कॅटल शेडची जागा महत्वाची आहे. तो विषय पण महत्वाचा आहे आणि योगेशभाईंनी जे जे सांगितले माई तुम्ही त्या बाबतीत थोडं सिरीअस होऊन प्रशासनाला एक आदेश द्या. त्याची पूर्ण माहिती मला वाटतं सभागृहाला असावी. नाही तर उद्या आम्ही बाहेर जाऊन त्या त्या फाईलचा ट्रेस होणारच आहेत परंतु आपण देखील त्या ठिकाणी आयुक्तांना व कुठल्या अधिका-या मार्फत कशा पध्दतीने त्या डॉक्टरना पद्मश्री देता येईल त्याच्याकडे देखील आपण लक्ष द्यावे. जास्त न बोलता माई आपण सर्वांना बोलू देताय. फक्त आता विषयांतर करण्यात जे आम्हांला विषयांतर करायचं नाही ती अट तुम्ही पक्षनेता यांना पण करा. कारण की पक्षनेता एकदा उठले की ते मला वाटतं अमित शहा आणि मोदीनंतर तेच, धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके-** सन्मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, खर म्हणजे या विषयावरती अनेक आपल्या सन्मा.सदस्यांनी चर्चा केली आणि त्यावर सांगीतल की सेवाज्येष्ठतेची यादी आपल्याला सुध्दा माहीती आहे की सेवाज्येष्ठतेच्या यादीच्या संदर्भामध्ये अनेक विषय मत-मतांतरे या महापालिकेमध्ये आहेत. खर म्हणजे दि.७/५/२०२१ ला महाराष्ट्र शासनाचा जीआर आला आणि त्या अनुषंगान त्या अगोदर ज्यांची डीपीसी झाली आणि त्यांना त्याठिकाणी पदोन्नती मिळाली त्यानंतर या दोन अधिका-याची डीपीसी मध्ये मंजूरी होवून सुध्दा त्यांना महासभेला याव लागल आणि महासभेला आल्यानंतर त्यांना तात्पुरत्या स्वरुपाची पदोन्नती या आजच्या महासभेच्या विषयावरुन आहे. सन्मा.महापौर साहेब, हा प्रशासनाचा विषय आहे आयुक्त आणि प्रशासनाने महानगरपालिकेमध्ये असणा-या सर्व कर्मचा-यांची सेवाजेष्ठता यादी ही वेगवेगळया माध्यमातून त्याठिकाणी निश्चित केली आणि त्याच्यावरती वेगवेगळया माध्यमातून वेगवेगळे अधिकारी कोर्टामध्ये गेलेले आहेत आणि म्हणून हा प्रश्न वेगवेगळया यादयांच्या माध्यमातून आपल्या सगळयांच्या समोर येतो आणि हा प्रशासनाचा विषय आहे. सन्मा.महापौर साहेब, आपण आयुक्तांना या संदर्भात सुचना दयाव्यात की ही जी काही सेवाज्येष्ठता यादी आहे मग ती कुणीतरी कोर्टामध्ये गेल्याच्यानंतर कुठली यादी वापरायची त्याची डेट ऑफ जॉईनींगची सेवाजेष्ठता धरायची का, त्याला पदोन्नती मिळाली त्याच्या पदोन्नतीला असताना त्यावेळेला तो काय होता या संदर्भामध्ये मला वाटते आम्ही जाण्याची गरज नाही. प्रशासनाने त्या संदर्भामधला निर्णय घ्यावा आणि हा प्रशासकीय विषय आहे प्रशासनाने तो त्या पध्दतीने कुठल्याही दबावाला बळी न पडता, कुठल्याही सन्मा. पदाधिका-यांच्या दबावाला बळी न पडता, कुठल्याही नेत्यांना बळी न पडता जी काही याठिकाणी सेवाजेष्ठता यादी आहे, शासनाचे निर्णय आहेत किंवा न्यायालयाचा जो अवमान

होणार नाही या सगळया गोष्टींच्या तपासण्या करुन याठिकाणी हा विषय आणलेला आहे आणि म्हणून या संदर्भामध्ये आयुक्त साहेब त्याच उत्तर देतील किंवा हाताळतील. यासंदर्भामध्ये अनेक सभासदांनी सांगीतल की ते आपले कर्मचारी असतात, आपले कर्मचारी सगळयाकडे जातात, नगरसदस्यांकडे जातात, गटनेत्यांकडे जातात, पदाधिका-यांच्याकडे जातात  शेवटी आपणच म्हणतो की आपले कर्मचारी आपल्या घरीच येतात शासनाने जे प्रतिनियुक्तीवर पाठवलेले अधिकारी असतात त्यांच्याकडे ते जात नाहीत किंवा प्रशासनाकडे ते जात नाहीत. त्यांना कुठेतरी वाटते की आपल्याकडूनच त्याठिकाणी त्यांना न्याय मिळेल आणि न्यायाच्या भुमीकेतून आपण त्याठिकाणी आपल्याला जी काही माहीती असते त्यानुसार त्यांच त्याठिकाणी आपण सांगतो आणि जे नियमाप्रमाणे काम करायच असत ते काम प्रशासनाच असतं आणि त्याप्रमाणे आतापर्यंत येथून मागेही अशाच पध्दतीच्या पदोन्नती झाल्या त्या महाराष्ट्र शासनाच्या अधिनियमाला धरुन आणि न्यायालयाचा अवमान होणार नाही याला धरुन याठिकाणी पदोन्नत्या झालेल्या आहेत असं मला वाटतं.  त्या खोलामध्ये आपण जास्त जावू नये अस मला वाटत आणि जर चुकीच काम झालेल असेल, ज्यांनी चुकीच काम केलेल असेल मग तो कुठलाही प्रशासनाचा अधिकारी असेलतर त्याला शिक्षा दिली पाहीजे अशाप्रकारची भूमीका घ्यावी असे मा.महापौर साहेब मा.आयुक्तांना सांगावे.  खर म्हणजे हा दुसरा विषय चालू असताना याठिकाणी विषय क्रमांक १ वरती आपल्या सन्मा.सदस्यांनी याठिकाणी चर्चा केली आणि मी दोन वेळेला सांगीतल की हा नंबर एकचा विषय जो काही आहे तो धोरणाचा विषय आहे तो संगत विषय नाही त्याला दिलेली उपसूचना नाही परंतु ठिक आहे सन्मा.महापौर आम्हांला सुध्दा सगळयांना अपेक्षीतच होत की असं हे होणारच आहे आणि त्या अनुषंगाने आपल्या सभागृहामध्ये ज्यांना वाटत की ठिक आहे हाम करेसो कायदा किंवा त्यांनाच वाटत की सभागृहामध्ये आम्हांलाच कळतं किंवा  आम्ही सांगू तेच होवू शकतं असं वाटत त्यामुळे त्यांनी ती भुमीका मांडणे साहजीकच अपेक्षीत आहे आणि त्यांनी ती भूमीका मांडणं हे अपेक्षीतच धरल होतं, माझ्यासारख्यांनी पण याठिकाणी अपेक्षीत धरल होतं आणि त्याप्रमाणे त्यांनी त्यांची भूमीका याठिकाणी मांडली ती मांडत असताना त्यांनी सांगीतल की सभाशास्त्राच्या बद्दल, आता आम्ही सुध्दा ज्यावेळेला इथ सन्मा.नगरसदस्य नव्हतो त्यावेळेला गॅलरीत बसायचो मागच्या काळामध्ये. आम्हांला पण वाटायच सभा कशी चालते, काय चालते, कशा पध्दतीने सभागृह चालतं हे बघायची उत्सूकता होती आणि म्हणून मागे बसून सभा चालत असताना त्यावेळेला बघायचो.  आता जसं मंगलाताईनी सांगीतल पेरल तेच उगवतं तेच आहेना आपल्या काळात जशा सभा झाल्या, तुम्हीच आम्हांला शिकवल की सभा अशाच चालतात मग आम्ही अशाच चालवल्या सभा.  त्यामुळे जे पेरल तेच उगवतं आणि तशाच सभा चालल्या आणि आपणही तशाच पध्दतीने सभा चालवतो, नियमाला धरुन आणि मा.महापौरांच्या अधिकारामध्ये जे काही असेल त्याच्याप्रमाणे आपण याठिकाणी सभा चालवतो. त्यामुळे सभागृहातले सिनीअर नेतृत्व त्यांनी याठिकाणी मांडल की सभाशास्त्राच जे काही शिक्षण आहे ते आमच्याकडून घ्याव तरी हे मी त्यांना याठिकाणी सांगू इच्छितो की सभाशास्त्राच जे काही प्रशिक्षण आहे ते तुमच्याकडूनच आम्ही याठिकाणी घेतलेल आहे आणि त्याप्रमाणेच याठिकाणी सभा चालवतो. सभागृहाचा कुठलाही अवमान याठिकाणी करत नाहीत. सन्मा.महापौर प्रत्येकाला बोलण्यास वेळ देतात त्यामुळे अशाप्रकारची भूमीका याठिकाणी मांडणं हे उचित होत नाही. आता ही आपली सेकण्ड लास्ट महासभा आहे पुढच्या महीन्यामध्ये जर निवडणूका वेळेत झाल्यातर पुढची एक महासभा होईल त्यानंतर जानेवारीमध्ये आचारसंहीता असेल.

त्यामुळे या सभेला अशाप्रकारच बोलणं किंवा अशाप्रकारे आरोप करणं म्हणजे हे अपेक्षीत होतं. कारण काय हे कोणी कराव एखादया सन्मा. सदस्य सभागृहामध्ये किंवा आतापर्यंत काही नाही आम्ही कुठेही काही केलेल नाही, ज्यांनी ज्यांनी आता याठिकाणी भूमीका मांडली विशेष करुन आता सिनीअर नेतृत्वानी आपल्या भूमीका याठिकाणी मांडल्या, आता सन्मानीयांनी तीन महीन्यामधली कुञ्याच्या संदर्भामध्ये भुमीका मांडली. सन्मा.महापौर कुञ्यांची नसबंदी ही काही पाच वर्षामध्ये झाली का गेल्या दहा वर्षापासून या पिंपरी चिंचवड शहरामध्ये कुञ्याच्यां नसबंदी वरती अनेकवेळा महासभेमध्ये बोलले, मागच्याही महासभेमध्ये बोलले म्हणजे चार पाच वर्षाच्या अगोदर सुध्दा याच कुञ्यांच्या संदर्भामध्ये त्यावेळेस डॉ.रॉय होते त्यांच्या वरती बोलल जात होतं आता कुणीतरी दुसरे डॉक्टर आहेत त्यामुळे त्यांच्यावरती बोलल जातं हे अपेक्षीत आहे आणि हे होतं. मगाशी विकासभाऊनी सांगीतल की हे जे काही विषय असतात यावर सहया करणारे कोण असते, अधिकारी असतात. त्यांना त्याचे नियम अटी काय आहेत त्याच्याप्रमाणे करतात नाही करतात आणि चुकीच करतो त्याला त्याठिकाणी भोगाव लागतं, त्याला जाव लागत आणि आपण तशाप्रकारच्या सुचना सुध्दा वेळोवेळी सांगत असतो. आपण अधिका-यांच्या कुठल्याही बाजूनी चुकीच्या कामाच्या संदर्भामध्ये आतापर्यंत नाहीत आणि असणारही नाही ही आपली भारतीय जनता पार्टीची सभागृह नेता म्हणून याठिकाणी आमची भूमीका आहे. मागच्या काळामध्ये ज्या सदस्यांनी याठिकाणी भूमीका मांडली, सत्ताधारी पक्ष, सत्ताधारी पक्ष मला वाटत पंधरा ते वीस वेळा म्हणल. आता मी खर म्हणजे पक्षाच्या संदर्भामध्ये बोलणार नव्हतो परंतु आता बोलाव लागणार आहे की सत्ताधारी पक्ष. ज्यावेळेला याठिकाणी रेमडेसिव्हीरच्या बद्दल बोलल गेलं, याठिकाणी हॉस्पिटलच्या बद्दल बोलल गेलं, याठिकाणी कुञ्यांच्या नसबंदी वरती बोलल गेलं, मा.महापौर अख्ख्या पिंपरी चिंचवड शहराला माहीती आहे वायसीएम हॉस्पिटल आणि टिंब टिंब माणूस हे समीकरण आहे. या शहरातच नाहीतर संपुर्ण शहरामध्ये समीकरण आहे. वायसीएम आणि एक टिंब टिंब माणुस हे समीकरण आहे आणि त्यांनी गेल्या पंधरा-वीस वर्षामध्ये या वायसीएम हॉस्पिटलची स्वत:ची जहागीरी असल्यागत त्याठिकाणी काम केल आहे आणि अजूनही चालू आहे. आम्ही या संदर्भात बोलणार नव्हतो कारण आम्ही ज्यावेळेला बोलतो त्यावेळेला आम्ही कुठल्याही प्रकारच्या या संदर्भामध्ये नागरीकांनी आम्हांला विश्वासने निवडून दिलेल आहे आणि म्हणून त्यांच्या बद्दलची भूमीका, त्यांच्या बद्दलचा असणारा विश्वास हा कुठल्याही प्रकारे याठिकाणी तडीस जावू देणार नाही ही याठिकाणी सभागृह नेता म्हणून भूमीका आहे. सन्मा.महापौर साहेब, थोडस आपण तपासून बघाव की या वायसीएम हॉस्पिटलमध्ये किती मशिनरी घेवून पडलेल्या आहेत, तुम्ही पण म्हणलात मागच्या काळामध्ये की अनेक मशिनरी सात- आठ वर्षापुर्वी घेवून पडलेल्या आहेत तीथ आणि अजूनही धुळखात पडलेल्या आहेत, का पडल्या आहेत, कोण त्याठिकाणी काय करतय, कुठल हॉस्पिटल चालतय, कोण त्याच्यामध्ये आहे, कोण भागीदार आहे, कोण काय करतय. एखादी निवीदा मिळाली नाही म्हणून कुठतरी ज्याला बेस नाही अशाप्रकारची भूमीका त्याठिकाणी मांडायची, हॉस्पिटलच त्याठिकाणी सर्टिफिकेट नाही, त्या हॉस्पिटलमध्ये संख्या नाही का ? मला मिळाल नाही किंवा त्याठिकाणी जो माणूस आणला त्याला दिल नाही अशाप्रकारची तळमळ आणि अशाप्रकारची भूमीका याठिकाणी सभागृहामध्ये मांडायची. सन्मा.महापौर साहेब, मगाशी जसं म्हणल की इथ काय वाटत की बाकीचे आम्ही सर्व सभागृहामध्ये असणारे नगरसेवक म्हणजे सगळया पक्षाचे नगरसेवक जे बोलतात ते प्रामाणिकपणे बोलतात परंतु जे प्रामाणिक बोलत नाहीत त्यांच्या बद्दल मी याठिकाणी बोलतो.

ज्यांनी तळमळ मांडली आता इथ आमचे सहकारी हर्षलभाऊ आहेत, आमचे विकासभाऊ आहेत, आमचे अजीत गव्हाणे आहेत, मंगलाताईनी भूमीका मांडली, अनेक आमचे सदस्य भूमीका मांडतात. ज्यांनी त्यांनी त्यांची भूमीका याठिकाणी प्रामाणिकपणे मांडण्याचा प्रयत्न करतात. खरोखर मनापासून त्यांना वाटत की खरच हे कुठेतरी शहरातील नागरीकांच्या हिताचे विषय आहेत आणि ते कुठेतरी मांडले पाहीजेत परंतु काहीनां सवय झाली आणि आता अलीकडे ती सवय वाढली कारण २०२२ ला निवडणूका आहेत आणि हे साहजीक आहे कुठतरी माझ अस्तित्व काय आहे हे दाखवण्याचा प्रकार याठिकाणी थोडासा दिसतोय आणि त्यामध्ये आता स्पर्धा चालू आहे. भाऊसाहेब आपण म्हणले की पक्षनेते आता नवीन आहेत परंतु भाऊसाहेब आपण याठिकाणी मान्य केल पाहीजे की आपली भूमीका थोडीशी मला वाटते की चुकते. आपण म्हणले की मी अनेक वर्षापासून जरी सत्तेत होतो तरी वेगळया गटात होतो, विरोधात होतो मला वाटते आहे तीथे तुम्ही थांबले तर अजूनही तुम्हांला विरोधातच बसाव लागणार आहे. कारण तुम्ही सांगीतल की विरोधात का बसल्या जात आणि त्याला कारण हेच अशी मंडळी तुमच्या बरोबर आहेत आणि ते असंच होणार आहे तुमच्या बरोबर. याठिकाणी भूमीका मांडतांना कलम सांगीतले ३९ चा (३) आता हे कलम आम्हांला पण माहीती आहेना. आम्हांला सभाशास्त्र माहीत नाही असं पण काही नाही आम्हांला सगळ समजतं. पण काय असतं काहीना सवय असते खोट बोल पण रेटून बोल. म्हणजे मी बोललो तेच फायनल बाकीच काही माहीत नाही. या महापालिकेबद्दल देशामध्ये वेगवेगळया ठिकाणावरुन चांगले उदगार काढले जातात. सकाळीच आपण स्मार्ट सिटीला होतो तेथे कामाच्या संदर्भामध्ये आपले तज्ञ संचालक आपल्याशी सकाळी बोलले. या शहरामध्ये असणा-या स्मार्ट सिटी बद्दल, या शहरामध्ये असणा-या विकासाबद्दल, या शहरामध्ये चांगल्या ज्या गोष्टी होतात त्याच्या बद्दल नागरीक सांगतात की सुंदर काम झाल. कोरोनाच्या काळामध्ये या महापालिकेत इतर महापालिकेच्या तुलनेमध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेच्या डॉक्टरांनी, कामगारांनी, लोकप्रतिनीधीनी, आपल्या इथ असणा-या सर्व स्टाफनी सगळयानी मिळून एक टिमवर्क म्हणून याठिकाणी काम केलं, लसीकरण मोठया प्रमाणात केल. ज्यांनी त्यांनी आपली भूमीका याठिकाणी मांडली. मा.महापौर साहेब, कुत्र्याच्या संदर्भामधल्या दोन चार महीन्याच्या भूमीका त्यांनी मांडल्या हेच जर दहा वर्षातले मांडले असतेतर मला अधिक आनंद झाला असता. दहा वर्षामध्ये सुध्दा कुत्र्याची निर्मीती आणि कुत्र्याची नसबंदी कशा पध्दतीने होत हाती परंतु कुठलाही कागद नसताना काही नसताना असं बोलायच आणि सभागृहाचा वेळ घ्यायचा आणि कुठतरी सभागृहाची दिशाभूल करायची आणि राजकीय वातावरण सत्ताधारी पक्षावरती करायच अशाप्रकारची भूमीका आज सभागृहात दिसलेली आहे. आपण सभागृहात विषय आणत असताना अतीशय प्रामाणिकपणे आणि भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता मी असल्यामुळे मला समजते की या सभागृहामध्ये जे काही विषय असतील किंवा जे काही आपण विषय घेवून जावु ते या नागरीकांच्या भल्यासाठी, समाजातील सगळया घटकांच्या भल्यासाठी समाजाच्या प्रत्येक घटकाला बरोबर घेवून जावुन, याठिकाणी कोरानाचा काळ असताना देखील एक चांगली भूमीका या सभागृहाच्या माध्यमातून मांडून जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न याठिकाणी सभागृह नेता या नात्याने आणि आमच्या दोन्ही आमदारांच्या नंतृत्वाखाली, खर म्हणजे शिवेसेनेच्या गटनेत्यांनी सांगीतल आणि ते खर आहे ते आमचे आमदार आहेत, आमचे नेतृत्व आहे, आमचे नेते आहेत ते जे सांगतात ते नेतृत्व शहराच्या हितासाठी सांगतात. त्यांच आम्हांला ऐकलच पाहीजे परंतु असं नाही की आम्ही बारीक बारीक गोष्टी सुध्दा आम्ही त्यांना

विचारतो , त्यांना कळतं. अमचे पदाधिकारी याठिकाणी निर्णय घेण्यासाठी सक्षम आहेत आणि बारीक गोष्टीसाठी आम्ही कुणालाही विचारायला नाही जात परंतु  नेत्यांचा आदर करणं, नेत्यांच्या सुचना ऐकन आणि त्या सुचना शहराच्या हितासाठी ऐकणार हे आम्ही आमच्या नेत्यांच, आमच सर्वाच कर्तव्य समजतो. त्या पध्दतीने सभागृहामध्ये जनतेच्या हितासाठी, जनतेच्या भल्यासाठी, सर्वसामान्य लोकांच्यासाठी याठिकाणी सभागृहामध्ये विषय आणतो आणि तोच विषय क्रमांक १ जो होता तो सुध्दा जे नागरीक प्रामाणिकपणे कर भरतात अशा नागरीकांना करामध्ये सवलत देण्याचा विषय होता पण त्याच्यावरही राजकरण, त्याच्यातही सभाशास्ञ. आम्ही काही समजत नाही काय चालल आहे ते. आम्हांला असं वाटत की नेमकी या संदर्भामध्ये आम्हांला माहीती घेण्याची वेळ येते की काय, चुकीच बोलायच काहीतरी बोलायच आणि खोट बोलायचं अशा पध्दतीची भूमीका या सभागृहामध्ये आणि सभागृहनेता या नात्याने भारतीय जनता पार्टी कधीही स्विकारणार नाही. म्हणून याठिकाणी हा जो काही कुञ्याच्या संदर्भामधील असेल, प्रशासनाच्या चुकीच्या कामा संदर्भात असेलतर मा.महापौर साहेब कुञ्याच्या नसबंदीसंदर्भात जे काही कुणी चुकीच काम केल असेल, अधिका-यांनी चुकीच बील काढलेल असेल, ज्या अधिका-यांनी त्या कामामध्ये कामचुकराईपणा केलेला असेल, चुकीच काम केलेल असेलतर सन्मा. महापौर आपणही त्या भुमीकेमध्ये आहोत. कुठल्याही अधिका-याच आपण समर्थण करणार नाही, कुठलाही अधिकारी आपला कोण लागत नाही त्याच्या चुकीच्या कामासाठी त्याच्यावरती आपण कारवाई करणार आहोत आणि चुकीच काम पण ते पुराव्यासह याठिकाणी पटल पाहीजे, झाल पाहीजे पण फक्त मी माझ्या स्वार्थासाठी काहीतरी बोलायच, माझा स्वार्थ पुर्ण होत नाही म्हणून दुस-याला बदनाम करायच तो किती खोटा आहे अस दाखवण्याचा केवीलवाणा प्रकार या सभागृहामध्ये केला जात आहे. अंबरनाथ कांबळे यांनी सांगीतलेल खर आहे की या सभागृहाला काय दिशा देणार आहोत आम्ही, या शहराला काय दिशा देणार आहोत, या शहरामध्ये एवढया मोठया प्रमाणात काम झालेली आहेत. या शहरामध्ये वेगवेगळया योजना आणलेल्या आहेत या शहरामधल्या काही काही योजना फक्त पिंपरी चिंचवड महापालिकाच राबवते.  कधी तरी आपण चांगल बोलणार आहेत की नाहीत, आपल प्रतिबींब आपणच खराब करतो. महानगरपालिकेमध्ये चांगले काम जे केले आहेत ते सांगण्याऐवजी आम्ही किती खोटे आहेत, फक्त आणि फक्त राजकीय स्वार्थासाठी आणि स्वत:ची पोळी भाजण्याचा कार्यक्रम या सभागृहामध्ये चालतो आणि म्हणू असे बोलणा-यांचा मी या सभागृहामध्ये निषेध करतो. हे अस चुकीच काम याठिकाणी करतात आणि सभागृहाला दिशाभूल करण्याच काम करतात.  सगळयांना माहीती आहे हे कोण करत, काय करत, कुणी केल, कोण कुठल्या पदावरती होतं. त्या काळात काय झाल आहे, महीला बचत गटाचे पैसे कुठे गेले. त्यावेळेला आपण नाव कुठले दिले महानगरपालिकेची जहागीरी असल्यागत आमचे नाव दिले या संदर्भामध्ये आम्ही सक्षम आहोत आणि त्याला प्रतीउत्तर दयायला पण तेवढेच आम्ही सक्षम आहोत. आणि म्हणून याठिकाणी या सभागृहाचा वेळ आणि या सभागृहाची दिशाभूल करणा-यांचा याठिकाणी मी तीव्र शब्दामध्ये निषेध करतो आणि हा वि.क्र. २ मंजूर केलेला आहे आणि आपण वि.क्र. ३ ला सुरवात करावी अशी आपणास विनंती करतो.

मा.महापौर -  विषय क्रमांक २ उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – ७२९ विषय क्रमांक – २

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/२/कावि/८६४/२०२१,
दि.२२/०७/२०२१.
२) मा.विधी समिती कडील ठराव क्र.६३ दि.१८/१०/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **'कार्यकारी अभियंता (स्था)'** अभिनामाची २४ पदे **एस - २३ वेतनश्रेणी ६७७०० - २०८७००** मध्ये शासन मंजूर असून पदोन्नती करीता ५ पदे रिक्त आहेत. **'कार्यकारी अभियंता (स्था)'** अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्त सो. यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक १२/०७/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **'कार्यकारी अभियंता (स्था)'** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, खालील **उपअभियंता (स्था)** यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'कार्यकारी अभियंता (स्था)'** पदावर **एस - २३ वेतनश्रेणी ६७७०० – २०८७००** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

| अ.क्र | उपअभियंता नावं | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | श्रीम.पाठक अनघा अविनाश | ज्येष्ठतेनुसार |
| २ | श्री.जावरानी मनोहर टेकचंद | ज्येष्ठतेनुसार |

सबब, उपरोक्त **उप अधिकारी** यांना **एस - २३ वेतनश्रेणी ६७७०० -२०८७००** मध्ये **'कार्यकारी अभियंता (स्था)'** पदावर, पदोन्नती मधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन व शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहून सेवाज्येष्ठतेनुसार रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा(सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० मध्ये, प्रशासकीय सेवा गट ब, "ग्रंथालय प्रमुख" या पदास खालील प्रमाणे अर्हतेमध्ये दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. ("ग्रंथालय प्रमुख" पदाकरिता सुधारणा / दुरुस्ती बदल करणे बाबत)

| **अ.क्र.** | **संवर्ग** | **पदनाम** | **नेमणुक पद्धत** | **नेमणूकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती** |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय सेवा गट –ब (एस-१६ ) | ग्रंथालय प्रमुख | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १)मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील ग्रंथालय व माहिती शास्त्र शिक्षणक्रम पदव्युत्तर पदवी.(एम.लिब.अँड आय. एस्सी.) आवश्यक.<br>२)शासकीय व निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रंथपाल पदावरील ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. |
| | | | पदोन्नती (१००%) | १)ग्रंथालय व माहिती शास्त्र शिक्षणक्रम पदव्युत्तर पदवी (एम.लिब.अँड आय.एस्सी.)/ग्रंथालय शास्त्राचा पदवीधर (B.Lib.&I.Sc.)<br>२)पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग्रंथपाल **अथवा ज्युनियर टेक्निकल असिस्टंट** पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

सबब उपरोक्त, ग्रंथालय प्रमुख, या पदासाठी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग्रंथपाल अथवा ज्युनियर टेक्निकल असिस्टंट पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक व एस-१६ - वेतनश्रेणी ४४९००-१४२४०० मंजूर करणे अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० मध्ये, प्रशासकीय सेवा गट ब, क मध्ये, मुख्य क्रीडा अधिकारी, क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक पदाकरिता या पदास सुधारणा / दुरुस्ती, पदनामात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (क्रीडा अधिकारी, क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक " पदाकरिता सुधारणा / दुरुस्ती, पदनामात बदल करणे बाबत )

क्रीडा अधिकारी (पदसंख्या-१), क्रीडा पर्यवेक्षक (पदसंख्या-१०), क्रीडा शिक्षक (पदसंख्या-४०) या पदाकरिता वरील अर्हता ऐवजी मुख्य क्रीडा अधिकारी (पदसंख्या-१), क्षेत्रीय क्रीडा अधिकारी (पदसंख्या-१०), क्रीडा मार्गदर्शक (पदसंख्या-४०) खालील प्रमाणे पदनामामध्ये व अर्हतामध्ये दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | नेमणुक पद्धत | नेमणूकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| १ | क्रीडा सेवा गट-अ (एस-२०) | मुख्य क्रीडा अधिकारी | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १)बी.पी.एड पदवीधारक असणे आवश्यक<br>२)स्पोर्ट्स ॲथॉरिटी ऑफ इंडीया कडील पदविका असणे आवश्यक<br>३)राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूस प्राधान्य देणेत येईल.<br>४)शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा राष्ट्रीय क्रीडा संस्थेतील तत्सम पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | पदोन्नती (१००%) | १)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी.<br>२)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील बी.पी.एड. पदवी असणे आवश्यक.<br>३)पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील क्रीडा पर्यवेक्षक अथवा क्षेत्रीय क्रीडा अधिकारी या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या अधिका-यांची सेवा ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारावर पदोन्नती.<br>४)पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील ,शासनाकडील शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू यांचेकरिता वरील अट वरील अट क्र.२,३ या अटी शिथिलक्षम. |
| २ | क्रीडा सेवा गट-ब (एस-१६ ) | क्षेत्रीय क्रीडा अधिकारी | पदोन्नती (१००%) | १)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी.<br>२)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील बी.पी.एड. पदवी असणे आवश्यक.<br>३)पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील क्रीडा विभागातील क्रीडा शिक्षक अथवा क्रीडा मार्गदर्शक या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या अधिका-यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| ३ | क्रीडा सेवा गट क (एस-१४ ) | क्रीडा मार्गदर्शक | नामनिर्देशन १००% | शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या प्रचलित सेवाप्रवेश नियमानुसार, |

तरी वरील प्रमाणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० मध्ये, १) क्रीडा अधिकारी ऐवजी मुख्य क्रीडा अधिकारी, एस - २०- वेतन श्रेणी ५६१००-१७७५०० २) क्रीडा पर्यवेक्षक ऐवजी, क्षेत्रीय क्रीडा अधिकारी, एस -१६ -वेतनश्रेणी ४४९००-१४२४०० व ३) क्रीडा शिक्षक ऐवजी क्रीडा मार्गदर्शक, एस-१४– वेतनश्रेणी- ३८६००-१२२८०० अशी मंजूर करणेस मान्यता येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतर्गत विद्युत विभागाच्या आस्थापनेवर शासन मान्य असलेले सह शहर अभियंता (विद्युत) पदावर कार्यरत असलेले अधिकारी सेवानिवृत्त झालेनंतर तसेच या संवर्गात नव्याने पद निर्माण झालेनंतर अशा पदांवर सेवाज्येष्ठता, शैक्षणिक पात्रता, अनुभव इ. पदोन्नतीचे सर्व निकष पुर्ण करणाऱ्या पदोन्नतीपूर्व कार्यकारी अभियंता (विद्युत) या पदावरील सेवाज्येष्ठ अधिकारी १) श्री. संजय खाबडे व २) श्री. बाबासाहेब गलबले यांना सह शहर अभियंता (वि.) या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच विद्युत विभागाच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (विद्युत) अभिनामाची पदे नव्याने शासनमान्य झालेस अथवा रिक्त झालेस अशा पदांवर पदोन्नतीपूर्व उपअभियंता

(विद्युत) या पदावरील सेवाज्येष्ठ अधिकाऱ्यांची सेवाज्येष्ठता, शैक्षणिक पात्रता, अनुभव इ. पदोन्नतीचे सर्व निकष पूर्ण करणाऱ्या सेवाज्येष्ठ अधिकारी १) श्रीमती लता बाबर २) श्री. वासुदेव मांडरे ३) श्रीमती अनुश्री कुंभार व ४) श्री.अकबर शेख यांना कार्यकारी अभियंता (वि.) या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेमध्ये २००८ मध्ये स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर नेमणूका देण्यात आलेल्या होत्या. सदर स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती पूर्व अनुभवाची पाच वर्षाची अट व व्यवसायीक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक होते. तसेच कनिष्ठ अभियंता स्थापत्य या पदाची ११ पदे रिक्त असताना व पात्र उमेदवार मनपामध्ये उपलब्ध असताना देखिल उपरोक्त कर्मचारी यांना पदोन्नती पासुन वंचित ठेवणेत आले होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने शासनाच्या नगरविकास विभागास पत्र.क्र. प्रशा/२/कावी/३९१/०९ दिनांक २५/०३/२००९ अन्वये कनिष्ठ अभियंता(स्था) या पदांची आवश्यकता विचारात घेता मा. महापालिका सभा मंजूर ठराव क्रमांक ५४८ दिनांक २२/१२/२००८ नुसार कनिष्ठ अभियंता (स्था) पदावर पदोन्नती साठी सेवा प्रवेश नियमात पदोन्नती पूर्वपदावरील पाच वर्ष सेवा याऐवजी पदोन्नती पुर्व पदावर नियमित ३ वर्षांची किमान सेवा असा बदल करून कनिष्ठ अभियंता स्थापत्य या पदावर पदोन्नती देणेच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेची विनंती केली होती.

सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० कनिष्ठ अभियंता (स्था) या पदासाठी पदोन्नती पूर्व अनुभवाची अट पाच वर्ष ऐवजी तीन वर्षेच मान्य करणेत आलेली आहे. तसेच व्यवसायीक परीक्षेची अट देखिल शिथिल करणेत आलेली आहे. सद्यस्थितीत कार्यरत असलेले कनिष्ठ अभियंता (स्था) २०११ मध्येच पदोन्नतीसाठी पात्र होते तसेच कनिष्ठ अभियंता (स्था) या संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील पदे रिक्त होती. तरी देखिल स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर कार्यरत असलेल्या अभियंत्यांना त्यावेळी पदोन्नती न देता सरळसेवेने कनिष्ठ अभियंता (स्था) पदाची भरती करणेत आलेली असल्याने सन २०११ मध्ये कार्यरत असलेल्या व पदोन्नती पात्र असलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचेवर अन्याय झालेला स्पष्ट दिसुन येत आहे.

मनपा प्रशासनाच्या दिरंगाईमुळे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना कनिष्ठ अभियंता (स्था) या अभिनामाच्या पदावर पदोन्नतीकरीता झालेला प्रशासकीय विलंब विचारात घेता त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने सेवा जेष्ठता लागू करुन त्यांच्यावर सेवा ज्येष्ठता यादी मध्ये झालेला अन्याय दूर करणे आवश्यक आहे. तरी २०११ पासुन पदोन्नतीकरीता पात्र असुन देखिल वेळेवर पदोन्नती न मिळालेल्या अभियंत्यांना ते ज्यावेळी पदोन्नतीस पात्र होते त्या दिनांकापासुन पुर्वलक्षी प्रभावाने सेवाजेष्ठता यादीतील मानिव जेष्ठता क्रमांक मिळणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

तसेच सन १९९१ पासूनचे महिन्याचे दुस-या व चौथ्या शनिवारचा अतिकालीन भत्ता (दिडपट) मिळणेस मान्यता देणेत येत आहे. अग्निशामक विभागातील ८३ कर्मचा-यांनी मे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्थर, पिंपरी यांचे कोर्टात रे.दि.मु.न.११९/९२ अन्वये महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारचा अतिकालीन भत्ता मिळावा याकरीता दावा दाखल केला होता. सदरच्या दाव्याचा निकाल मे.कोर्टाने दि.०९ /०७/२०१४ रोजी दिला. सदर निकालामध्ये

मे.कोर्टाने सर्व बाबींचा अभ्यास करुन कामगारांना महिन्याच्या दुस-या व चौथ्या शनिवारी काम केल्याबाबत दीडपटीने अतिरिक्त भत्ता देण्याबाबत आदेश केला आहे. त्यानंतर अग्निशामक विभागातील कर्मचा-यांना त्यांचे पगाराच्या दिडपट अतिकालीन भत्ता अदा केलेला आहे. तद्अनुषंगाने अग्निशामक विभागातील उर्वरीत १०६ कर्मचा यांनी मे. औदयोगिक न्यायालय, पुणे यांचे कोर्टात अतिकालीन भत्ता मिळावा याकरीता तक्रारी अर्ज दाखल केले होते. मे.कोर्टाने त्यांना अतिकालीन भत्ता अदा करणेबाबत आदेश दिलेले आहे. तसेच प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्रं. प्रशा /४/कावि/१३५/२००९ दि. १८/२/२००९ अन्वये अत्यावश्यक सेवेतील सर्व कर्मचा-यांना अतिकालीन भत्ता देय असल्याचे अटीमध्ये नमूद केले आहे. सुरक्षा विभाग हा अत्यावश्यक सेवेमध्ये येत असल्याने अग्निशामक विभागातील उर्वरीत सर्व कर्मचाऱ्यांना तसेच सुरक्षा विभागातील सन १९९१ पासूनच्या सर्व कर्मचा-यांना त्याचप्रमाणे सर्व लिफ्टमन (उदवाहक चालक) कर्मचा-यांना महिन्याच्या दुस-या व चौथ्या शनिवारचा अतिकालीन भत्ता ( दीडपटीने अतिरिक्त भत्ता ) पुर्वलक्षी प्रभावाने अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवेपैकी पाणी पुरवठा विभागांतर्गत सेक्टर नं.२३ व आंद्रा /भामा आसखेड येथील जलशुद्धीकरण केंद्राद्वारे शहरातील नागरिकांना शुद्ध व स्वच्छ पाणी पुरवठा करण्याचे काम करण्यात येते. सेक्टर नं.२३ येथील एकूण चार टप्प्यातील छत्तीस बेड मार्फत जलशुद्धीकरणाचे कामकाज अहोरात्र चालू असते. त्या करिता तांत्रिक संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांची आवश्यकता असते. कामकाजाच्या सोयीसाठी व जलशुद्धीकरण प्रक्रियेतील गाळणी निरीक्षक (फिल्टर इन्स्पेक्टर) व गाळणी चालक (ऑपरेटर ) या कर्मचा-यांवर पर्यवेक्षीय पदाची नितांत गरज आहे. जेणेकरून शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने शुद्ध पाणी पुरवठा करण्यात येईल. त्या करिता चीफ केमिस्ट पदाप्रमाणेच, मुख्य गाळणी निरीक्षक (चीफ फिल्टर इन्स्पेक्टर) या पदाची देखील आवश्यकता आहे. सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० या मध्ये मुख्य गाळणी निरीक्षक (चीफ फिल्टर इन्स्पेक्टर) या अभिनामाच्या पदाचा समावेश करण्यास मान्यता देणेत येत आहे.

"मुख्य गाळणी निरीक्षक (चीफ फिल्टर इन्स्पेक्टर)" हे नव्याने पदनाम मंजूर केल्याने, सदर पदास मान्यता तसेच मुख्य गाळणी निरीक्षक (चीफ फिल्टर इन्स्पेक्टर), गाळणी निरीक्षक (फिल्टर इन्स्पेक्टर) व गाळणी चालक (ऑपरेटर) " या पदाकरिता खालील प्रमाणे अर्हता अनुभव या मध्ये दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | नेमणुक पद्धत | नेमणूकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| १ | तांत्रिक सेवा गट-ब S-16 | मुख्य गाळणी निरीक्षक (चीफ फिल्टर इन्स्पेक्टर) | पदोन्नती (१००%) | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची शास्त्र शाखेची पदवी (बी.एस्सी.)(केमिस्ट्री विषयासह )आवश्यक.<br>२) पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आस्थापनेवरील गाळणी निरीक्षक(फिल्टर इन्स्पेक्टर)या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिका-यांची सेवा ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती . |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | तांत्रिक सेवा गट-क S-13 | गाळणी निरीक्षक (फिल्टर इन्स्पेक्टर) | पदोन्नती (१००%) | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची शास्त्र शाखेची पदवी (बी.एस्सी.)(केमिस्ट्री विषयासह )आवश्यक.<br>२) गाळणी चालक (ऑपरेटर ) कामाचा ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक असणे आवश्यक. |
| ३ | तांत्रिक सेवा गट-क S-8 | गाळणी चालक (ऑपरेटर) | नामनिर्देशन (१००%) | मान्यता प्राप्त विद्यापीठाची शास्त्र शाखेची पदवी (बी.एस्सी.)(केमिस्ट्री विषयासह)आवश्यक. |

तरी वरील प्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० व आकृतिबंध या मध्ये, "मुख्य गाळणी निरीक्षक (चीफ फिल्टर इन्स्पेक्टर) S16 वेतनश्रेणी ४४९००-१४२४०० हे नव्याने पदनाम मंजूर केल्याने, सदर पदास मान्यता व गाळणी निरीक्षक (फिल्टर इन्स्पेक्टर) S13 व गाळणी चालक (ऑपरेटर) S8 " या पदाकरिता सुधारणा /दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाहन दुरुस्ती कार्यशाळा विभागाकडे ( यांत्रिकी विभाग ) कार्यकारी अभियंता, यांत्रिकी या पदाचे १ पद शासन मंजूर असून सद्य स्थितीत ते रिक्त आहे. वाहन दुरुस्ती कार्यशाळा विभागाचे कामकाज सद्य स्थितीत कार्यकारी अभियंता, विद्युत यांचेकडे आहे. कार्यालयीन कामकाजाच्या साईच्या दृष्टीने सदरचे कामकाज हे या क्षेत्रातील अनुभव व कार्यरत असलेल्या अभियंता यांचेकडे सोपविणे आवश्यक आहे. कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदाकरीता खालील प्रमाणे अर्हता आहे.

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील उप अभियंता (ऑटोमोबाईल/यांत्रिकी) / कार्यव्यवस्थापक व मान्यता प्राप्त विद्यापिठाची मेकॅनिकल अभियांत्रिकी शाखेची पदवी धारण केलेल्या अधिका-यास ३ वर्षे व पदवीका धारण करणारा ५ वर्षे अशा अधिका-यांमधून सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती.

कार्यशाळा विभागातील अनुभव असलेले श्री. दिवेकर कैलास विठ्ठल हे कार्यव्यवस्थापक या पदावर कामकाज करीत आहेत. तसेच त्यांना या विभागाचा २२ वर्षांचा अनुभव आहे. कार्यकारी अभियंता, यांत्रिकी या पदास असलेली शैक्षणिक अर्हता व श्री. कैलास विठ्ठल दिवेकर यांचा कार्यव्यवस्थापक पदाचा १ वर्षांचा अनुभवासह २२ वर्षांचा अनुभव असलेले एकमेव आहेत. त्यांचेकडे असलेली मान्यता प्राप्त विद्यापिठाची मेकॅनिकल अभियांत्रिकी शाखेची पदवीका धारण करणारा ५ वर्षाची अट शिथील करुन रिक्त असलेल्या कार्यकारी अभियंता, यांत्रिकी या पदावर त्यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सद्यस्थितीत सह कनिष्ठ अभियंत्यांना ०१/११/२०२१ रोजी उपअभियंता (स्थापत्य) पदाचा पदभार दिलेला आहे. त्यांना डी. पी. सी. घेऊन तातडीने उपअभियंता पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. सद्यस्थितीत Ad-hoc तरी देणेस मान्यता देणेत येत आहे. सदर ठरावाची अंमलबजावणी प्रशासन विभागाने तातडीने करणेस मान्यता देणेत येत आहे.

डॉ.वर्षा सुभाष डांगे या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वैद्यकिय अधिकारी या पदावर सन २०१० पासून वैद्यकिय विभागामध्ये कार्यरत आहेत. त्यांची प्रथम नियुक्ती यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये करण्यात आलेली होती सदर कालावधीमध्ये त्यांनी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथील कुटुंब कल्याण विभागामध्ये कामकाज केलेले आहे. तद्नंतर त्यांची नियुक्ती वैद्यकिय विभाग मुख्य कार्यालयात महिला वैद्यकिय अधिकारी तथा आर.सी.एच.ऑफिसर या पदावर करण्यात आलेली आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरामधील कोविड-१९ विषयक सर्व लसीकरण केंद्रे तसेच कोरोना तपासणी विषयक (कोविड टेस्टींग) या विषयाचे प्रमुख म्हणून संपूर्ण कामकाज करत आहेत. त्यांचे वैद्यकिय अधिकारी पदावर दि.०१/०२/२०२० रोजी काम करणा-या अधिका-यांच्या अंतिम सेवाजेष्ठसूची क्र.प्रशा/१२/कावि/३९१/२०२० दि.०४/११/२०२० अन्वये त्याज्येष्ठ वैद्यकिय अधिकारी या पदोन्नतीच्या पदासाठी पात्र आहेत. तरी त्यांना "ज्येष्ठ वैद्यकिय अधिकारी" या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दुरसंचार विभागातील कर्मचारी श्री. नागनाथ आण्णा कांबळे रेडिओ मॅकेनिक इलेक्ट्रीशन यांचे सेवानोंद पुस्तकामध्ये चुकिची जन्म तारीख नोंदविलेली आहे. जन्म तारीख ०१/०६/१९६१ ऐवजी १२/०६/१९६५ अशी दुरुस्त व खरी सुधारित जन्म तारीखची नोंद सेवानोंद पुस्तकात घेणेकामी श्री. कांबळे यांनी दि १२/०८/२०१५ दि २३/०५/२०१८ व दि १४/०५/२०१९ अन्वये मा. आयुक्त यांचेकडे जन्म तारीख दुरुस्ती बाबत अर्ज सादर केलेले आहेत. श्री नागनाथ आण्णा कांबळे यांनी शासन निर्णय १) क्र. पीसीसी- ३०१९ / मुसंस क्र ४५५/नवि -२२ नगरविकास विभाग दि १०/०६/२०१९ व २) जन्म दि.१३१९/१०६/ (प्र.क्र.४२/१९)/१३अ दि.०४/०७ /२०१९ न्यायालयीन निर्णयानुसार सादर केलेल्या कागदपत्राचे अनुशंगाने कागदपत्राचे अवलोकन करून श्री. नागनाथ कांबळे याचे सेवा नोंद पुस्तकामध्ये जन्म तारीख ०१/०६/१९६१ च्या ऐवजी १२/०६/१९६५ अशी दुरुस्त नोंद घेणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ३

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१२/१३४/२०२१, दि.०१/१०/२०२१

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.३४ दि.२०/१०/२०२१अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मौजे भोसरी येथे स.नं.२१७ मध्ये जलनिःसारण विभागाचे पंपींग स्टेशन कार्यान्वीत असून सदर पंपींग स्टेशनसाठी ९.०० मी रूंद रस्ता उपलब्ध असून काही रस्त्याचा ताबा महानगरपालिकेला प्राप्त झाला आहे. मे.महायश एन्टरप्रायझेस तर्फे सौ.सरिता अशोकपाल शर्मा व श्री.राजेद्रं नारायण भोसले यांनी मौजे भोसरी येथील स.नं.२१६/१क/१ मधील महानगरपालिकेच्या जलनिःसारण विभागाच्या पंपीग स्टेशन शेजारील सौ.सरिता अशोकपाल शर्मा यांचे मालकीचे ११० चौ.मी. क्षेत्र व श्री.राजेद्रं नारायण भोसले यांचे मालकीचे १०० चौ.मी. क्षेत्र असून सदर क्षेत्र बांधकाम योग्य नसल्यामुळे (Non Buildable) सदर जागा महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील ९.०० मी रस्त्यात अंदाजे १०% जात असून उर्वरीत जागा निवासी विभागात असून महानगरपालिकेचा रस्ता व पंपींग स्टेशनमुळे बांधकामास योग्य (बांधकाम परवानगी मिळू शकत नाही) होत नाही. सदर जागा महानगरपालिकेने ताब्यात घ्यावी व जागेच्या मोबदला खाजगी वाटाघाटीच्या स्वरूपात मिळणेस विनंती केली आहे. तसेच मा.कार्यकारी अभियंता, जलनिःसारण विभाग इ प्रभाग यांनी सदर जागा भविष्यातील पंपींग स्टेशन विस्तारासाठी आवश्यक असल्याने जागा ताब्यात घेणेबाबत कळविले आहे. सदर जागेची जलनिःसारण विभागास भौगोलिक परिस्थितीनुसार व पंपीग स्टेशन विस्तारासाठी आवश्यकता आहे. तथापि सदर ठिकाणी महानगरपालिकाचे आरक्षण नसून निवासी झोन आहे. सदर जागा महानगरपालिकेस खाजगी वाटाघाटीने देण्यास संबधित जागामालक तयार आहेत. सदर मंजूर विकास आराखड्यातील आरक्षणा व्यतिरीक्तच्या (Non D.P.) जागा खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेणेसाठी मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिकासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी उक्त प्रकरणी सदहू मौजे भोसरी येथील स.नं.२१६/१क/१ मधील महानगरपालिकेच्या जलनिःसारण पंपीग स्टेशन शेजारील मे.महायश एन्टरप्रायझेस तर्फे सौ.सरिता अशोकपाल शर्मा यांचे मालकीचे ११० चौ.मी. क्षेत्र व श्री.राजेद्रं नारायण भोसले यांचे मालकीचे १०० चौ.मी. क्षेत्र मंजूर विकास आराखड्यातील आरक्षणा व्यतिरीक्तच्या (Non D.P.Proposal) जागा खाजगी वाटाघाटीने मोबदल्याच्या स्वरूपात जलनिःसारण विभागाच्या पंपीग स्टेशन विस्तारासाठी ताब्यात घेणेस मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ५५३ दिनांक- ०४/०६/२०२० मध्ये उपसूचनेद्वारे समाविष्ट करणेत आलेला खालीलप्रमाणे मजकूर वगळण्यास मान्यता देण्यात यावी. "स्थापत्य EWS (PMAY) प्रकल्प

विभागाकडील अंदाजपत्रक सादर केले होते. या विभागाकडून शासनाच्या पंतप्रधान आवास योजना ही महत्त्वकांक्षी योजना राबविणेकामी आवश्यक तरतूदी करणेत आल्या होत्या परंतु सदरच्या तरतूदी अंदाजपत्रकामध्ये कमी केल्याचे दिसून येत आहे. सदरची कामे प्रगतीपथावर असून तरतूदी अपु-या पडणार आहेत. तरी सदरबाबत खालीलप्रमाणे तरतूद उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत यावी.

| लेखशिर्ष क्र. / अ.क्रं . | पान क्र. | मा.स्थायी समिती मंजुर अंदाजपत्रकानुसार | अंदाजपत्रकात अंतर्भुत करावयाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १२ | ६४७ | पंतप्रधान आवास योजना ( इतर ) | १२ ( अ ) पंतप्रधान आवास योजनेसाठी घटक क्रं १ अंतर्गत राबविणेत येणा-या PCSSIHDP प्रकल्पांतर्गत सल्लागार यांचेमार्फत गुलाबनगर जयभिम नगर, महात्मा फुले नगर, सिद्धार्थ नगर, लिंबोरे चाळ, दापोडी प्रकल्पांचे पुनर्वसन / पुननिर्माण करणे. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु १७५७००००००/- व सन २०२०-२१ चा मूळ अंदाज र.रु. १,००,०००/- करणेत यावी. |
| | | | १२ ( ब ) प्रकल्प सल्लागार फी अदा करणे. सन २०२०-२१ चा मूळ अंदाज र.रु. ५०,००,०००/- करणेत यावी |

तरी वरीलप्रमाणे निर्माण करण्यात आलेले मूळ लेखाशिर्ष / उपलेखाशीर्ष रद्द करण्यास मान्यता देणेत यावी तसेच त्या लेखाशीर्ष / उपलेखाशीर्षावर करण्यात आलेली तरतूद रद्द करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच बीआरटीएस विभागामार्फत बीआरटीएस कॉरीडॉर क्र.३ वर सुदर्शननगर चौक येथे ग्रेड सेपरेटर (समतल विलगक) बांधणेचे कामाची निविदा नो.क्र.०८/०१/२०१८-१९ अन्वये काढणेत आलेली असून समतल विलगकाचे काम ९५% पुर्ण झालेले आहे. सदर कामामध्ये समतल विलगकाचे दोन्ही बाजुचे पदपथ व सायकल ट्रॅक विकसीत करणेचा कामाचा अंतर्भाव करणेत आलेला होता. तथापि स्मार्ट सिटी विभागामार्फत नाशिक फाटा उड्डाणपुल ते

जगताप डेअरी चौकापर्यंत पदपथ व सायकल ट्रॅक विकसीत करणेत येत असल्याने सदर कामाची निविदा रक्कम अखर्चीत राहणार आहे.

सदर निविदा (नि.नो.क्र.०८/०१/२०१८-१९) रक्कमेतील अखर्चित रक्कमेतून बीआरटी कॉरीडॉर क्र.३ वरील उर्वरीत रस्त्याचे डांबरीकरण व तसेच पदपथ व सायकल ट्रॅक स्मार्ट सिटी प्रमाणे विकसीत करणे शक्य आहे.

तरी बीआरटीएस कॉरीडॉर क्र.३ वर सुदर्शनगर चौक येथे ग्रेड सेपरेटर (समतल विलगक) बांधणे. (नि.नो.क्र.०८/०१/२०१८-१९) या कामाच्या अंतर्गत कॉरीडॉर क्र.३ वरील उर्वरीत रस्त्याचे डांबरीकरण व तसेच पदपथ व सायकल ट्रॅक स्मार्ट सिटी प्रमाणे विकसित करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र १८ ताब्यातील डी.पी. रस्ते विकसीत करणेचे कामास मान्यता देणेत येत अहे. प्रभाग क्र. १८ मधील ताब्यात आलेले डी.पी. रस्ते विकसित करणेचे नियोजन आहे. त्यानुसार अंदाजपत्रकामध्ये मनपाचे विकास आराखड्यातील आगाऊ ताब्यात आलेले रस्ते विकसित करणेचे प्रस्तावित होते. त्यानुसार अंदाजपत्रकातील प्रस्तावित रस्त्यांपैकी काही ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करणेत आलेले आहे, परंतु काही ठिकाणचे प्रपत्र ब द्वारे आगाऊ ताब्यात आलेल्या ठिकाणी रस्त्याचे काम करणेस नागरिकांचा विरोध होत आहे. त्यामुळे विषयाकिंत काम करणेस अडचणी येत आहेत. विषयांकित कामामधुन प्रभाग क्र. १८ मधील केशवनगर, तानाजीनगर व इतर भागातील डी.पी. रस्त्यांचे सुमारे १० ते १२ वर्षापुर्वी झालेले डांबरीकरण खराब झाले असुन त्याठिकाणी नव्याने डांबरीकरण करणे आवश्यक आहे. सदरचे कामातील नियोजित ठिकाणी काम करणेस विरोध असलेने इतर ठिकाणचे रस्ते मुळ निविदा रक्कमेमध्ये वाढ न करता विषयांकित कामामधुन करता येणे शक्य आहे.

सबब सदरचे कामातील नियोजित ठिकाणी काम करणेस विरोध असलेने इतर ठिकाणचे रस्ते विषयांकित कामामधुन प्रभाग क्र. १८ मधील केशवनगर, तानाजीनगर व इतर भागातील डी.पी. रस्त्यांचे काम करून घेणेस मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र. १८ मधील मोरया हॉस्पीटल ते यशोपुरम ब्रिज पिंपरी चिंचवड लिंक रोड अर्बन स्ट्रीट डिझाईन नुसार विकसीत करणेस मान्यता देणेत यावी. भाग क्र. १८ मधील मोरया हॉस्पीटल ते यशोपुरम ब्रिज पिंपरी चिंचवड लिंक रोड अर्बन स्ट्रीट डिझाईन नुसार विकसीत करणेचे नियोजन आहे. त्यानुसार अंदाजपत्रकातील प्रस्तावित कामामधील पावसाळी पाण्याच्या गटरच्या डक्ट मधील कॉंक्रिटची जाडी कमी केल्यामुळे तसेच अ प्रभागाकडील जोडरस्त्यांचे काम त्यांचे मार्फत कॉंक्रिटीकरण करणेत आले आहे. त्यामुळे सदरच्या कामातील शिल्लक रक्कमेमधुन प्रभागातील इतर ठिकाणचे रस्त्यांचे डांबरीकरण / कॉंक्रिटीकरण करणेचे काम करता येणे शक्य आहे.

सबब सदरचे कामातील नियोजित कामातील शिल्लक राहिलेल्या रक्कमेतुन प्रभागातील इतर ठिकाणचे रस्त्यांचे डांबरीकरण / कॉंक्रिटीकरण करणेचे काम करुन घेणेस मान्यता देणेत यावी.

तसेच सन २०२१-२२ च्या मूळ अंदाजपत्रकातील कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| क्रं | लेखा शिर्ष | उपलेखाशिर्ष अथवा कामांचे नाव | पानांक | अ. क्रं. | सन २०२१-२२ ची मुळ अंदाज (उपलब्ध तरतूद) | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०२१-२२ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | प्रभाग क्र.३१ मधील साई चौक सांगवी पोलिस चौकी रस्ता UTWT पद्धतीने विकसीत करणे. | १७ | ३१ | ३०००००० | ४१२०००००० | ० | ४४२०००००० |
| २ | विशेष योजना | प्रभाग क्र.३१ मध्ये UTWT पध्दतीने विकसित करणे. | १७ | २९ | ६२०००००० | ७७०००००० | ० | ८३२०००००० |
| ३ | विशेष योजना | प्रभाग क्र. ३१ मध्ये रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | १७ | ३० | ५०००००० | २५०००००० | ० | ७५०००००० |
| ४ | | अग्निशमन केंद्र | २९० | २ | ५५००००००० | ० | १२०७००००० | ४२९३००००० |
| | | **एकूण** | | | ५६४२००००० | १२०७००००० | १२०७००००० | ५६४२००००० |

तसेच संत सावतामाळी नगर ते बोऱ्हाडेवाडी पर्यंतचा (सिल्व्हर हॉटेल) १२ मी. डी. पी. रस्ता विकसित करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच ग प्रभागातील प्रभाग क्र २१ मधील मनपाच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात नागरिकांच्या मागणी व विकासाच्या दृष्टीने विद्युत विषयक खालील कामांची तरतुद अत्यंत कमी असल्याने प्रभागातील विद्युत विषय कामांची निविदा काढलेनंतर संपुर्ण व्याप्तीचे काम होणे शक्य होणार नाही त्यामुळे खालील नमुद केलेल्या तक्त्यामधील विद्युत विषयक कामांना सन २०२१-२२ मध्ये खर्च होणारी आवश्यक तरतुद खालीलप्रमाणे वर्ग करणेस मान्यता देणेत यावी. सदर वर्गीकरणास मा.स्थायी समिती सभा कार्यक्रम पत्रिका क्र.248, दि.03-11-2021 नुसार दि.11-11-2021 रोजीच्या स्थायी समिती सभेच्या बैठकीत उपसूचनेद्वारे मंजूरी देणेत आलेली आहे. सदर वर्गीकरणास मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | लेखाशिर्ष / कामाचे नाव | पा नांक | अनु. क्र. | लेखा शिर्ष | अंदाजपत्र कीय रक्कम | सुधारित अंदाजपत्र कीय रक्कम | सन २०२१-२०२२ चा मूळ अंदाज | सन २०२१-२०२२ वाढ करावयाची तरतूद | सन २०२१-२०२२ घट करावयाची तरतूद | सन २०२१-२०२२ करावयाची सुधारित तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२१ मधील नव्याने होणा-या रस्त्यावर दिवाबत्ती व्यवस्था करणे. (२०२०-२१) | ३३९ | १५ | सार्वजनिक सुरक्षितता | ५०००००० | ५०००००० | १००००० | २९००००० | ० | ३०००००० |
| २ | प्रभाग क्र. २१ पिंपरी मधील मनपाचे जिजामाता रूग्णालयाचे इमारतीवर सोलर सिस्टिम बसविणे. | ३३८ | ६ | अपारंपारिक उर्जा स्त्रोता पासून विजनिर्मिती करणे | ५०००००० | ५०००००० | ५००००० | २५००००० | ० | ३०००००० |
| ३ | पिंपरी वार्ड क्र. २१मधील जोग महाराज उद्यानामध्ये लेझर शो करिता विद्युत विषयक कामे करणे. | ३९६ | ३३ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे | १५०००००० | १५०००००० | ० | ४०००००० | ० | ४०००००० |
| ४ | प्र. क्र. २१ मधील पिंपरी व परीसरातील रस्त्याचे क्राँकिंट रस्त्याचे विद्युतीकरण करणे (२०२१-२२) | ३९६ | ३५ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे | २०००००० | २०००००० | १०००००० | ४०००००० | ० | ५०००००० |
| ५ | प्र. क्र. २१ मधील पिंपरी गावठाण परीसरातील रस्त्यांवर डेकोरेटीव्ह पोल बसविणे.(२०२१-२२) | ३९७ | ४१ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे | २०००००० | २०००००० | ० | २५००००० | ० | २५००००० |
| ६ | प्र. क्र. २१ मधील पिंपरी कॅम्प परीसरातील रस्त्यांवर डेकोरेटीव्ह पोल बसविणे.(२०२१-२२) | ३९७ | ४२ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे | २०००००० | २०००००० | ० | २०००००० | ० | २०००००० |
| ७ | प्र. क्र. २१ मधील डिलक्स चौक, रिव्हर रोड, संजय गांधी नगर, साधु वासवानी बागेसमोर व परीसरातील रस्त्यांवर सुशोभीत पथदिव्यांचे | ३९७ | ४४ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे | ५०००००० | ५०००००० | ० | २५००००० | ० | २५००००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खांब बसविणे.(२०२१-२२) | | | | | | | | |
| ८ | प्र.क्र. ४३ मधील स्मशानभूमीचे उर्वरीत स्थापत्य विषयक कामे करणे. | २९ | १९१ | स्थापत्य विशेष योजना | १५००००००० | १५००००००० | ५५००००० | ० | ४०००००० | १५००००० |
| ९ | प्र.क्र.२७ रहाटणी येथील नखाते नगर ते कोकणे चौक या १२.०० मी रूंद रस्ता विकसित करणे. | ३० | २०७ | स्थापत्य विशेष योजना | १२००००००० | १२००००००० | १००००००० | ० | १००००००० | ० |
| १० | पिंपरी वाघेरे मधील रिव्हर रोड पासून रहाटणी(काळेवाडी) कडे जाणा-या पवना नदीवर पुल बांधणे. | ४२ | ७३ | स्थापत्य विशेष योजना | २५००००००० | २५००००००० | ३८१८००० | ० | ३८००००० | १८००० |
| ११ | रहाटणी स्मशानभूमी जवळील रस्त्यापासून पिंपरी कडे जाणा-या रस्त्यावर पवना नदी येथे पूल बांदणे. | ४३ | ७८ | स्थापत्य विशेष योजना | २५००००००० | २५००००००० | ३८१८००० | ० | २६००००० | १२१८००० |
| | **एकूण** | | | | ९९५०००००० | ९९५०००००० | २४७३६००० | २०४००००० | २०४००००० | २४७३६००० |

तसेच ह क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्र.३१ सांगवी परिसरातील मुख्य रस्ते अद्ययावत पद्धतीने विकसित करणे आवश्यक आहे. तथापि सदर कामासाठी सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकीय तरतूद अपुरी आहे. तरी सदर कामांसाठी अंतर्गत तरतूद वर्गीकरण करणेसाठी खालीलप्रमाणे तरतूद वर्गीकरण सुचविण्यात येत आहे.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पान क्र. | अनु क्र. | लेखाशिर्ष | सन २०२१-२२ ची तरतुद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयची तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३१ परिसरातील मुख्य रस्ते अद्ययावत पद्धतीने विकसित करणे | ३१ | २३२ | विशेष योजना | २५,००,००, ००० | १,४५,००,००० | ० | अ.क्र. २ वरून अ.क्र.१ वर वर्ग |
| २ | प्रभाग क्र. ३२ मधील सांगवी परिसरातील अंतर्गत रस्ते अद्ययावत पद्धतीने विकसित करणे | ३१ | २३७ | विशेष योजना | १०,००,००,००० | ० | १,४५,००,००० | |
| | एकूण | | | | ३५,००,००,००० | १,४५,००,००० | १,४५,००,००० | |

तरी वरीलप्रमाणे सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात वाढ/घट करुन तरतूद वर्ग करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच महानगरपालिकेतर्फे ऐतिहासिक धम्मभूमी देहुरोड याठिकाणी मनपा हद्दीबाहेर सामाजिक उपक्रमास अर्थिक सहाय्य देणेस  मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड शहर हे आळंदी, देहू व चिंचवड या तिर्थ क्षेत्राच्या परिसरात विकसित होत असून पिंपरी चिंचवड या शहराला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. आळंदी, देहू व साधू मोरया गोसावी यांचे यात्रेनिमित्त महाराष्ट्र राज्यातून अनेक भाविक येत असतात यांना सर्व सुविधा मिळण्याकरिता महापालिकेकडून आर्थिक मदत सहाय्य केले जाते.

भारत देशाच्या वैभवशाली परंपरेचा सांस्कृतिक व महान तत्त्वज्ञानाचा वारसा २५ डिसेंबर १९५४ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देहुरोड येथे रुजविला याठिकाणी तथागत भगवान बुध्द यांचे बुध्दरुप स्थापन करुन २५०० वर्षाची परंपरा याभुमीला दिली. या अनुषंगाने या धम्मभूमीवर गेली ६० वर्ष सांस्कृतिक व सामाजिक वारसा जपण्याचे कार्यक्रम होत असून या ठिकाणी भारत देशातून लाखो अनुयायी जमा होतात. या ऐतिहासिक भूमीला सुध्दा सामाजिक उपक्रमाचे कार्यक्रमास आळंदी, देहू या तिर्थ क्षेत्राप्रमाणेच महानगरपालिकेकडून कायमस्वरुपी आर्थिक मदत मिळावी. पिंपरी चिंचवड शहरामधून याठिकाणी लाखो बौध्द अनुयायी अभिवादनास येत असतात तरी याठिकाणी होणा-या सामाजिक कार्यक्रमास या आर्थिक वर्षात २०,००,०००/- ( अक्षरी–र.रु. वीस लाख) खर्च अपेक्षित होत आहे. तरी सदर ऐतिहासिक धार्मिक स्थळ मनपा हद्दीबाहेर असल्याने मनपा धोरणानुसार कॅन्टोमेंट बोर्ड देहुरोड यांचे नावे अदा करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रातील नागरीकांचे आरोग्य चांगले रहावे तसेच नियमित व्यायामाची सवय लागावी या उद्देशाने पिंपरी चिंचवड मनपाच्या मोकळया जागा, उद्याने व सार्वजनिक ठिकाणी नागरीकांकरीता ओपन जिम व विविध खेळाचे साहित्य विषयक काम प्रगतीपथावर असुन यापूर्वीच सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून सदरचे काम तातडीने करणे आवश्यक आहे. तसेच पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी स्थापत्य विभागामार्फत नि.नो.क्र.११-१८/१९ आदेश क्र. PCSCL/T/KAVI/17/2019 दि.16/05/2019 मधील नमूद निविदा अटी शर्तीनुसार पिंपरी चिंचवड मनपाच्या मोकळया जागा, उद्याने व सार्वजनिक ठिकाणी नागरीकांकरीता ओपन जिम व विविध खेळाचे साहित्य विषयक कामे करणे या कामाचा सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात समावेश करुन विशेष बाब म्हणून पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. अंतर्गत वरील निविदा आदेशान्वये चालू कामामध्ये सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात वाढ घट करुन खालील प्रमाणे तरतूद वर्गीकरण सुचविण्यात येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | पान क्र. | अनु क्र. | अंदाजपत्रकीय र.रु. | वाढ करावयाची तरतूद | घट करावयची तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी | - | - | - | ७०,००,००० | ० | अ.क्र. २ वरून अ.क्र.१ वर वर्ग |
| २ | क्रीडा व्यायाम साहित्य खरेदी | १७८ | ५ | ४,००,००,००० | ० | ७०,००,००० | |
| **एकूण** | | | | **४,००,००,०००** | **७०,००,०००** | **७०,००,०००** | |

तरी वरीलप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस तसेच येणा-या खर्चास मान्यता देणेत यावी. प्रभाग क्र. १८ मधील क्रांतीवीर चापेकर वाड्याच्या तिस-या टप्प्याची कामे करणे भाग – २ व भाग – ३ ची कामे करणेचे कामाचा समावेश मनपाचे सन २०२१ – २२ चे अंदाजपत्रकामध्ये पान.क्र. १७, अ.क्र. ३ व ४ वर विशेष योजना या लेखाशिर्षा अंतर्गत करणेत आलेला आहे. सदर कामाची निविदा कार्यवाही पुर्ण करणेत आली असुन कामाचे आदेश देणेत आलेले आहेत. सदर कामातील भाग – २ चे काम मनपामार्फत निविदा कार्यवाही करुन करणेत येत असुन भाग – ३ चे काम क्रांतीवीर चापेकर स्मारक समिती मार्फत निविदा कार्यवाही करुन करणेत यावी. सदर कामास र.रु.१२,००,००,०००/- इतकी एकत्रित प्रशासकीय मान्यता घेणेत आलेली आहे. तथापि, सदर कामातील भाग – ३ चे कामामधील पुतळयाच्या बाबीमधील संख्या वाढत असलेने कामाचे प्रशासकीय मान्यतेमध्ये र.रु. ३,००,००,०००/- इतकी वाढ करुन र.रु.१५,००,००,०००/- इतकी सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

सबब, विषयांकित कामास र.रु. १५,००,००,०००/- इतकी सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड भक्ती शक्ती ते त्रिवेणीनगर चौकापर्यंत जॉगिंग ट्रॅक व इतर अनुषंगिक कामे करणेची मागणी स्थानिक नागरिक करत आहे. खालील कामाची आवश्यकता असून सदरच्या कामाचा सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात समावेश करून प्रशासकीय मान्यता व आवश्यक ती तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र | अ.क्र | प्रशासकिय मान्यता र.रु | सन २०२१-२२ मूळ तरतूद | वाढ | घट | सुधारित तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भक्ती शक्ती ते त्रिवेणीनगर चौकापर्यंत जॉगिंग ट्रॅक व इतर अनुषंगिक कामे करणे | स्थापत्य उद्यान | - | - | ५००००००० | ० | १००००० | ० | १००००० | अ.क्र.२ वरून वर्ग |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | **फ प्रभागातील विविध उद्यानामध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे** | **स्थापत्य उद्यान** | ३०३ | ३१९ | १०००००००० | ३०००००० | ० | १००००० | २९००००० | **अ.क्र.१ वर वर्ग** |
| | **एकूण =** | | | | ६००००००० | ३०००००० | १००००० | १००००० | ३०००००० | |

तरी सदरचे उपसूचना मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र. 2 से.क्र. 16 राजे शिवाजीनगर मधील रस्ते अद्ययावत पद्धतीने करणेचे काम मे. अजवानी इन्फ्रा प्रा. लि. या ठेकेदारामार्फत प्रगती पथावर आहे. या कामाअंतर्गत सावतामाळी मंदिर ते विसावा चौकापर्यंतच्या 30 मी व 18 मी. डी पी रस्त्याची उर्वरीत कामे करणे तसेच शिवरस्ता ते चिखली तळवडे हद्दी पर्यंतचा 30 मी. डि पी रस्ता विकसित करणेचे काम तातडीने हाती घेवून मनपाचे सन 2022 चे सावत्रिक निवडणूकी पुर्वी पुर्ण करणेत यावीत, कारण सदरचा रस्ता हा वाहतुकीच्या दृष्टीने अतिशय वर्दळीचा असुन स्थानिक नागरीक सुध्दा रस्ता लवकरात लवकर करणेबाबत वारंवार मागणी करीत आहेत.

तरी विषयांकित कामाअंतर्गत सावतामाळी मंदिर ते विसावा चौकापर्यंतच्या 30 मी व 18 मी. डी पी रस्त्याची उर्वरीत कामे करणे तसेच शिवरस्ता ते चिखली तळवडे हद्दी पर्यंतचा 30 मी. डि पी रस्ता विकसित करणेचे कामे करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच राजीव गांधी पुलापासुन रक्षक चौकापर्यंतचा रस्ता स्मार्ट सिटीच्या माध्यमातुन विकसीत करणे आवश्यक आहे. त्यासाठी सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील कामाच्या तरतुदीमध्ये खालील प्रमाणे वाढ / घट करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | लेखाशिर्ष | पानांक | अ.क्र. | सन २०२१-२०२२ ची मुळ तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्मार्ट सिटी ( मनपा वर्ग करावयाचा हिस्सा ) | स्मार्ट सिटी | २६-२७ | १६ | १०० कोटी | ४०००००००० | ० |
| २ | UTF अंतर्गत BRTS रस्त्यांची अनुषांगीक कामे करणे | मनपा मेट्रो प्रकल्प | ५५३ | ३(२) | ५० कोटी | ० | ४०००००००० |
| | | | | | | ४०००००००० | ४०००००००० |

सदरचे काम हे BRTS अंतर्गत असुन सदर कामास UTF अंतर्गत BRTS रस्त्यांची अनुषांगीक कामे करणे - मनपा मेट्रो प्रकल्प या कामामधुन वरील प्रमाणे र.रु. ४० कोटी स्मार्ट सिटी ( मनपा वर्ग करावयाचा हिस्सा ) या लेखाशिर्षावर वर्ग करुन स्मार्ट सिटी प्रकल्पास वर्ग करण्यास तसेच वर नमूद केलेप्रमाणे सन २०२१-२२ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामांच्या तरतूदीत वाढ / घट करुन देणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्र.क्र. १८ मधील मोरया हॉस्पिटल ते यशोपुराम ब्रिज पिंपरी चिंचवड लिंक रोड अर्बन स्ट्रीट डीझाईननुसार विकसित करणे अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे (निविदा क्र.३४/९-२०२०/२१) याकामातील उर्वरीत विद्युत काम चिंचवड काळेवाडी पुलापासून भाटनगर एस.टि.पी पर्यंतचा १८ मी रस्ता विकसित करणे प्रकल्प अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे (निविदा क्र.२७/१-२०१८/१९) या कामातुन करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड लिंक रोडचे स्थापत्य विभागाकडुन अर्बन स्ट्रीट डीझाईननुसार विकसीत करणेचे काम चालु आहे. अर्बन स्ट्रीट डीझाईननुसार सदर रस्त्याच्या दुभाजकामध्ये ७ मी. व पदपथावर ३ मी.चे नविन स्ट्रीट लाईट पोल उभा करावे लागणार आहे. परंतु सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करतेवळी उपलब्ध तरतुदीमुळे फक्त सदर रस्त्याचे दुभाजकातील जुने पोल बदलुन त्याठिकाणी अर्बन स्ट्रीट डीझाईनुसार ७ मी. नविन पोलचा समावेश करणेत आला असलेचे विद्युत विभागाकडुन सांगणेत आले.

पिंपरी चिंचवड लिंक रोडवर अर्बन स्ट्रीट डीझाईन नुसार दुभाजकातील जुने पोल आता न बदलता प्रथम पदपथावर ३ मी.चे नविन डेकोरेटिव्ह स्ट्रीट लाईट पोल उभा करण्यात यावे असे सदर प्रभागातील सर्व नगरसदस्यांची व परीसरातील नागरीकांची मागणी आहे. सदर ३ मी. डेकोरेटिव्ह पोल सदर रस्त्याच्या दुतर्फा सदर चालु असलेल्या निविदा क्र.३४/९-२०२०/२१ जेवढे बसतील तेवढे याकामातुन करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच उर्वरीत ३ मी.चे पोल व इतर विद्युत विषयक कामे सदर प्रभागातील चिंचवड काळेवाडी पुलापासून भाटनगर एस.टि.पी पर्यंतचा१८ मी रस्ता विकसित करणे प्रकल्प अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे निविदा क्र.२७/१-२०१८/१९ या कामातुन करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच ग प्रभागातील प्रभाग क्र २१ मधील पिंपरीगाव भैरवनाथ मंदीर बांधणे या कामात स्थापत्य विषयक कामे पूर्ण होत आलेले आहे. विद्युत विषयक उर्वरीत कामे तातडीन करणे आवश्यक आहे तथापि सदर कामाचे नाव अंदाजपत्रकात नसल्याने खालील तक्त्याप्रमाणे कामाचे नाव अंदाजपत्रकात समावेश करून र.रू.१०००००००/-(अक्षरी र.रू.एक कोटी) एवढी प्रशासकीय मंजूरी मिळणेस आणि खालीलप्रमाणे तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | लेखाशिर्ष / कामाचे नाव | पानांक | अनु. क्र. | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२१-२०२२ चा मूळ अंदाज | सन २०२१-२०२२ वाढ करावयाची तरतूद | सन २०२१-२०२२ घट करावयाची तरतूद | सन २०२१-२०२२ करावयाची सुधारित तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरीगाव प्र.क्र. २१ मधील भैरवनाथ मंदीर बांधणे या कामातील उर्वरीत विद्युतविषयक कामे करणे. | नव्याने समावेश | नव्याने समावेश | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक | ० | १०००००००० | ० | १२००००० | ० | १२००००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर णे. | कर णे. | कामे ग प्रभाग ( या लेखाशीर्षा त नव्याने समावेश करणे) | | | | | |
| ११ | रहाटणी स्मशानभूमी जवळील रस्त्यापासून पिंपरी कडे जाणा-या रस्त्यावर पवना नदी येथे पूल बांदणे. | ४३ | ७८ | स्थापत्य विशेष योजना | २५००००००० | २५००००००० | १२१८००० | ० | १२००००० | १८००० |
| | **एकूण** | | | | २५००००००० | २६००००००० | १२१८००० | १२००००० | १२००००० | १२१८००० |

तसेच प्रभाग क्र. 2 से.क्र. 16 राजे शिवाजीनगर मधील रस्ते अद्यायावत पद्धतीने करणेचे काम मे. अजवानी इन्फ्रा प्रा. लि. या ठेकेदारामार्फत प्रगती पथावर आहे. या कामाअंतर्गत खालील प्रमाणे प्रभाग क्र. 2 मधील कामे हाती घेण्यास मान्यता देणेत यावी.

1 जाधववाडी मधील डॉ.वनवे निवास्थानाकडे जाणारा रस्ता

2 जाधववाडी मधील वडाचामळा येथील 18 मी. डी. पी. रोडला लागून असलेले खाजगी फ्लॉटींग मधील रस्ते

3 जाधववाडी मधील मधलापेठा कॉलनी क्र. 9 व राजू मळेकर चाळी शेजारील रस्ता

4 जाधववाडी मधील जयबजरंग तालीम ते आहेरवाडी चौका पर्यंतचा अंतर्गत रस्ता

5 जाधववाडी मधील मधला पेठा कॉलनी क्र. 11 मधील रस्ता

6 देहू आळंदी रोड ते आल्हाटवस्ती पर्यंतचा अंतर्गत रस्ता

7 बो-हाडेवाडी मधील रोज गँलक्सी सोसायटी ते उत्तपीया सोसायटी पर्यंतच्या 18 मी. डी पी रस्त्याची उर्वरीत कामे करणे.

8 बो-हाडेवाडी मधील बारणेवस्ती ते सिव्हर नाईन व प्रिस्टिन ग्रीन सोसायटी समोरील 18 मी. डिपी रस्त्याची उर्वरीत कामे करणे

9 बो-हाडेवाडी बनकरवस्ती मधील पुणे नाशिक हायवे ते भैरवनाथ मंदिरापर्यंतचा अंतर्गत रस्ता विकसीत करणे.

10 बो-हाडेवाडी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र ते ग.नं. 658/ 670 पर्यंतचा 12 मी. व 18 मी. डी पी रस्ता विकसीत करणे.

11 बो-हाडेवाडी मधील 31 मी.डी पी रस्त्यापासून शिवशिंभो कॉलनी पर्यंतचा 12 मी. व /18 मी. डिपी रस्ता विकसीत करणे

12 संत सावतामाळी नगर ते बो-हाडेवाडी पर्यंतचा (सिव्हर हॉटेल ) 12 मी. डी पी रस्ता विकसीत करणे.

13 जाधववाडी मधील सावतामाळी मंदिर ते विसावा चौकापर्यंतच्या 30 मी व 18 मी. डी पी रस्त्याची उर्वरीत कामे करणे.

तरी विषयांकित कामाअंतर्गत वरील अनुक्रमांक 1 ते 13 पर्यंतची रस्त्यांची कामे करणेस मान्यता देणेत यावी.

मा.राजेंद्र गावडे - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.
मा.महापौर - विषय क्रमांक ३ उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ७३०                                                    विषय क्रमांक – ३
दिनांक – १८/११/२०२१                                                  विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१२/१३४/२०२१,
दि.०१/१०/२०२१
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.३४
दि.२०/१०/२०२१अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मौजे भोसरी येथे स.नं.२१७ मध्ये जलनिःसारण विभागाचे पंपींग स्टेशन कार्यान्वीत असून सदर पंपींग स्टेशनसाठी ९.०० मी रूंद रस्ता उपलब्ध असून काही रस्त्याचा ताबा महानगरपालिकेला प्राप्त झाला आहे. मे.महायश एन्टरप्रायझेस तर्फे सौ.सरिता अशोकपाल शर्मा व श्री.राजेद्रं नारायण भोसले यांनी मौजे भोसरी येथील स.नं.२१६/१क/१ मधील महानगरपालिकेच्या जलनिःसारण विभागाच्या पंपीग स्टेशन शेजारील सौ.सरिता अशोकपाल शर्मा यांचे मालकीचे ११० चौ.मी. क्षेत्र व श्री.राजेद्रं नारायण भोसले यांचे मालकीचे १०० चौ.मी. क्षेत्र असून सदर क्षेत्र बांधकाम योग्य नसल्यामुळे (Non Buildable) सदर जागा महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील ९.०० मी रस्त्यात अंदाजे १०% जात असून उर्वरीत जागा निवासी विभागात असून महानगरपालिकेचा रस्ता व पंपींग स्टेशनमुळे बांधकामास योग्य (बांधकाम परवानगी मिळू शकत नाही) होत नाही. सदर जागा महानगरपालिकेने ताब्यात घ्यावी व जागेच्या मोबदला खाजगी वाटाघाटीच्या स्वरूपात मिळणेस विनंती केली आहे. तसेच मा.कार्यकारी अभियंता, जलनिःसारण विभाग इ प्रभाग यांनी सदर जागा भविष्यातील पंपींग स्टेशन विस्तारासाठी आवश्यक असल्याने जागा ताब्यात घेणेबाबत कळविले आहे. सदर जागेची जलनिःसारण विभागास भौगोलिक परिस्थितीनुसार व पंपीग स्टेशन विस्तारासाठी आवश्यकता आहे. तथापि सदर ठिकाणी महानगरपालिकाचे आरक्षण नसून निवासी झोन आहे. सदर जागा महानगरपालिकेस खाजगी वाटाघाटीने देण्यास संबधित जागामालक तयार आहेत. सदर मंजूर विकास आराखड्यातील आरक्षणा व्यतिरीक्तच्या (Non D.P.) जागा खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेणेसाठी मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिकासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी उक्त प्रकरणी सदहू मौजे भोसरी येथील स.नं.२१६/१क/१ मधील महानगरपालिकेच्या जलनिःसारण पंपीग स्टेशन शेजारील मे.महायश एन्टरप्रायझेस तर्फे सौ.सरिता अशोकपाल शर्मा यांचे मालकीचे ११० चौ.मी. क्षेत्र व श्री.राजेद्रं नारायण भोसले यांचे मालकीचे १०० चौ.मी. क्षेत्र मंजूर विकास आराखड्यातील आरक्षणा व्यतिरीक्तच्या (Non D.P.Proposal) जागा खाजगी वाटाघाटीने मोबदल्याच्या स्वरूपात जलनिःसारण विभागाच्या पंपीग स्टेशन विस्तारासाठी ताब्यात घेणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.

महापालिका सभा ठराव क्रमांक ५५३ दिनांक- ०४/०६/२०२० मध्ये उपसूचनेद्वारे समाविष्ट करणेत आलेला खालीलप्रमाणे मजकूर वगळण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"स्थापत्य EWS (PMAY) प्रकल्प विभागाकडील अंदाजपत्रक सादर केले होते. या विभागाकडून शासनाच्या पंतप्रधान आवास योजना ही महत्त्वकांक्षी योजना राबविणेकामी आवश्यक तरतूदी करणेत आल्या होत्या परंतु सदरच्या तरतूदी अंदाजपत्रकामध्ये कमी केल्याचे दिसून येत आहे. सदरची कामे प्रगतीपथावर असून तरतूदी अपु-या पडणार आहेत. तरी सदरबाबत खालीलप्रमाणे तरतूद उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

| लेखशिर्ष क्र. / अ.क्रं . | पान क्र. | मा.स्थायी समिति मंजुर अंदाजपत्रकानुसार | अंदाजपत्रकात अंतर्भुत करावयाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १२ | ६४७ | पंतप्रधान आवास योजना ( इतर ) | १२ ( अ ) पंतप्रधान आवास योजनेसाठी घटक क्रं १ अंतर्गत राबविणेत येणा-या PCSSIHDP प्रकल्पांतर्गत सल्लागार यांचेमार्फत गुलाबनगर जयभिम नगर, महात्मा फुले नगर, सिद्धार्थ नगर, लिंबोरे चाळ, दापोडी प्रकल्पांचे पुनर्वसन / पुननिर्माण करणे. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु १७५७००००००/- व सन २०२०-२१ चा मूळ अंदाज र.रु. १,००,०००/- करणेत यावी. |
| | | | १२ ( ब ) प्रकल्प सल्लागार फी अदा करणे. सन २०२०-२१ चा मूळ अंदाज र.रु. ५०,००,०००/- करणेत यावी |

तरी वरीलप्रमाणे निर्माण करण्यात आलेले मूळ लेखाशिर्ष / उपलेखाशीर्ष रद्द करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच त्या लेखाशीर्ष / उपलेखाशीर्षावर करण्यात आलेली तरतूद रद्द करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच बीआरटीएस विभागामार्फत बीआरटीएस कॉरीडॉर क्र.३ वर सुदर्शननगर चौक येथे ग्रेड सेपरेटर (समतल विलगक) बांधणेचे कामाची निविदा नो.क्र.०८/०१/२०१८-१९ अन्वये काढणेत आलेली असून समतल विलगकाचे काम ९५% पुर्ण झालेले आहे. सदर कामामध्ये समतल विलगकाचे दोन्ही बाजुचे पदपथ व सायकल ट्रॅक विकसीत करणेचा कामाचा अंतर्भाव करणेत आलेला होता. तथापि स्मार्ट सिटी विभागामार्फत नाशिक फाटा उड्डाणपुल ते जगताप डेअरी चौकापर्यंत पदपथ व सायकल ट्रॅक विकसीत करणेत येत असल्याने सदर कामाची निविदा रक्कम अखर्चीत राहणार आहे.

सदर निविदा (नि.नो.क्र.०८/०१/२०१८-१९) रक्कमेतील अखर्चित रक्कमेतून बीआरटी कॉरीडॉर क्र.३ वरील उर्वरीत रस्त्याचे डांबरीकरण व तसेच पदपथ व सायकल ट्रॅक स्मार्ट सिटी प्रमाणे विकसीत करणे शक्य आहे.

तरी बीआरटीएस कॉरीडॉर क्र.३ वर सुदर्शनगर चौक येथे ग्रेड सेपरेटर (समतल विलगक) बांधणे. (नि.नो.क्र.०८/०१/२०१८-१९) या कामाच्या अंतर्गत कॉरीडॉर क्र.३ वरील उर्वरीत रस्त्याचे डांबरीकरण व तसेच पदपथ व सायकल ट्रॅक स्मार्ट सिटी प्रमाणे विकसित करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र १८ ताब्यातील डी.पी. रस्ते विकसीत करणेचे कामास मान्यता देणेत येत अहे. प्रभाग क्र. १८ मधील ताब्यात आलेले डी.पी. रस्ते विकसित करणेचे नियोजन आहे. त्यानुसार अंदाजपत्रकामध्ये मनपाचे विकास आराखड्यातील आगाऊ ताब्यात आलेले रस्ते विकसित करणेचे प्रस्तावित होते. त्यानुसार अंदाजपत्रकातील प्रस्तावित रस्त्यांपैकी काही ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करणेत आलेले आहे, परंतु काही ठिकाणचे प्रपत्र ब द्वारे आगाऊ ताब्यात आलेल्या ठिकाणी रस्त्याचे काम करणेस नागरिकांचा विरोध होत आहे. त्यामुळे विषयाकिंत काम करणेस अडचणी येत आहेत. विषयांकित कामामधुन प्रभाग क्र. १८ मधील केशवनगर, तानाजीनगर व इतर भागातील डी.पी. रस्त्यांचे सुमारे १० ते १२ वर्षापुर्वी झालेले डांबरीकरण खराब झाले असुन त्याठिकाणी नव्याने डांबरीकरण करणे आवश्यक आहे. सदरचे कामातील नियोजित ठिकाणी काम करणेस विरोध असलेने इतर ठिकाणचे रस्ते मुळ निविदा रक्कमेमध्ये वाढ न करता विषयांकित कामामधुन करता येणे शक्य आहे.

सबब सदरचे कामातील नियोजित ठिकाणी काम करणेस विरोध असलेने इतर ठिकाणचे रस्ते विषयांकित कामामधुन प्रभाग क्र. १८ मधील केशवनगर, तानाजीनगर व इतर भागातील डी.पी. रस्त्यांचे काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र. १८ मधील मोरया हॉस्पीटल ते यशोपुरम ब्रिज पिंपरी चिंचवड लिंक रोड अर्बन स्ट्रीट डिझाईन नुसार विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे. भाग क्र. १८ मधील मोरया हॉस्पीटल ते यशोपुरम ब्रिज पिंपरी चिंचवड लिंक रोड अर्बन स्ट्रीट डिझाईन नुसार विकसीत करणेचे नियोजन आहे. त्यानुसार अंदाजपत्रकातील प्रस्तावित कामामधील पावसाळी पाण्याच्या गटरच्या डक्ट मधील कॉक्रिटची जाडी कमी केल्यामुळे तसेच अ प्रभागाकडील जोडरस्त्यांचे काम त्यांचे मार्फत कॉक्रिटीकरण करणेत आले आहे. त्यामुळे सदरच्या कामातील शिल्लक रक्कमेमधुन प्रभागातील इतर ठिकाणचे रस्त्यांचे डांबरीकरण / कॉक्रिटीकरण करणेचे काम करता येणे शक्य आहे.

सबब सदरचे कामातील नियोजित कामातील शिल्लक राहिलेल्या रक्कमेतुन प्रभागातील इतर ठिकाणचे रस्त्यांचे डांबरीकरण / कॉक्रिटीकरण करणेचे काम करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच सन २०२१-२२ च्या मूळ अंदाजपत्रकातील कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| क्रं | लेखा शिर्ष | उपलेखाशिर्ष अथवा कामांचे नाव | पानांक | अ. क्रं. | सन २०२१-२२ ची मुळ अंदाज (उपलब्ध तरतूद) | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०२१-२२ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | प्रभाग क्र.३१ मधील साई चौक सांगवी पोलिस चौकी रस्ता UTWT पद्धतीने विकसीत करणे. | १७ | ३१ | ३०००००० | ४१२०००००० | ० | ४४२०००००० |
| २ | विशेष योजना | प्रभाग क्र.३१ मध्ये UTWT पध्दतीने विकसित करणे. | १७ | २९ | ६२०००००० | ७७०००००० | ० | ८३२०००००० |
| ३ | विशेष योजना | प्रभाग क्र. ३१ मध्ये रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | १७ | ३० | ५०००००० | २५०००००० | ० | ७५०००००० |
| ४ | | अग्निशमन केंद्र | २९० | २ | ५५००००००० | ० | १२०७०००००० | ४२९३०००००० |
| | | **एकूण** | | | ५६४२०००००० | १२०७०००००० | १२०७०००००० | ५६४२०००००० |

तसेच संत सावतामाळी नगर ते बोऱ्हाडेवाडी पर्यंतचा (सिल्व्हर हॉटेल) १२ मी. डी. पी. रस्ता विकसित करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच ग प्रभागातील प्रभाग क्र २१ मधील मनपाच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात नागरिकांच्या मागणी व विकासाच्या दृष्टीने विद्युत विषयक खालील कामांची तरतुद अत्यंत कमी असल्याने प्रभागातील विद्युत विषय कामांची निविदा काढलेनंतर संपुर्ण व्याप्तीचे काम होणे शक्य होणार नाही त्यामुळे खालील नमुद केलेल्या तक्त्यामधील विद्युत विषयक कामांना सन २०२१-२२ मध्ये खर्च होणारी आवश्यक तरतुद खालीलप्रमाणे वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर वर्गीकरणास मा.स्थायी समिती सभा कार्यक्रम पत्रिका क्र.248, दि.03-11-2021 नुसार दि.11-11-2021 रोजीच्या स्थायी समिती सभेच्या बैठकीत उपसूचनेद्वारे मंजूरी देणेत आलेली आहे. सदर वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्ष / कामाचे नाव | पानांक | अनु. क्र. | लेखा शिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२१-२०२२ चा मूळ अंदाज | सन २०२१-२०२२ वाढ करावयाची तरतूद | सन २०२१-२०२२ घट करावयाची तरतूद | सन २०२१-२०२२ करावयाची सुधारित तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२१ मधील नव्याने होणा-या रस्त्यावर दिवाबत्ती व्यवस्था करणे. (२०२०-२१) | ३३९ | १५ | सार्वजनिक सुरक्षितता | ५०००००० | ५०००००० | १००००० | २९००००० | ० | ३०००००० |
| २ | प्रभाग क्र. २१ पिंपरी मधील मनपाचे जिजामाता रूग्णालयाचे इमारतीवर सोलर सिस्टिम बसविणे. | ३३८ | ६ | अपारंपारिक उर्जा स्त्रोता पासून विजनिर्मिती करणे | ५०००००० | ५०००००० | ५००००० | २५००००० | ० | ३०००००० |
| ३ | पिंपरी वार्ड क्र. २१मधील जोग महाराज उद्यानामध्ये लेझर शो करिता विद्युत विषयक कामे करणे. | ३९६ | ३३ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे | १५०००००० | १५०००००० | ० | ४००००० | ० | ४००००० |
| ४ | प्र. क्र. २१ मधील पिंपरी व परीसरातील रस्त्याचे क्राँकिंट रस्त्याचे विद्युतीकरण करणे (२०२१-२२) | ३९६ | ३५ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे | २०००००० | २०००००० | १००००० | ४००००० | ० | ५००००० |
| ५ | प्र. क्र. २१ मधील पिंपरी गावठाण परीसरातील रस्त्यांवर डेकोरेटीव्ह पोल बसविणे.(२०२१-२२) | ३९७ | ४१ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे | २०००००० | २०००००० | ० | २५००००० | ० | २५००००० |
| ६ | प्र. क्र. २१ मधील पिंपरी कॅम्प परीसरातील रस्त्यांवर डेकोरेटीव्ह पोल बसविणे.(२०२१-२२) | ३९७ | ४२ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे | २०००००० | २०००००० | ० | २००००० | ० | २००००० |
| ७ | प्र. क्र. २१ मधील डिलक्स चौक, रिव्हर रोड, संजय गांधी नगर, साधु वासवानी बागेसमोर व परीसरातील रस्त्यांवर सुशोभीत पथदिव्यांचे | ३९७ | ४४ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे | ५०००००० | ५०००००० | ० | २५००००० | ० | २५००००० |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खांब बसविणे.(२०२१-२२) | | | | | | | | | |
| ८ | प्र.क्र. ४३ मधील स्मशानभूमीचे उर्वरीत स्थापत्य विषयक कामे करणे. | २९ | १९१ | स्थापत्य विशेष योजना | १५००००००० | १५००००००० | ५५००००० | ० | ४०००००० | १५००००० |
| ९ | प्र.क्र.२७ रहाटणी येथील नखाते नगर ते कोकणे चौक या १२.०० मी रूंद रस्ता विकसित करणे. | ३० | २०७ | स्थापत्य विशेष योजना | १२००००००० | १२००००००० | १००००००० | ० | १००००००० | ० |
| १० | पिंपरी वाघेरे मधील रिव्हर रोड पासून रहाटणी(काळेवाडी) कडे जाणा-या पवना नदीवर पुल बांधणे. | ४२ | ७३ | स्थापत्य विशेष योजना | २५००००००० | २५००००००० | ३८१८००० | ० | ३८००००० | १८००० |
| ११ | रहाटणी स्मशानभूमी जवळील रस्त्यापासून पिंपरी कडे जाणा-या रस्त्यावर पवना नदी येथे पूल बांदणे. | ४३ | ७८ | स्थापत्य विशेष योजना | २५००००००० | २५००००००० | ३८१८००० | ० | २६००००० | १२१८००० |
| | **एकूण** | | | | ९९५०००००० | ९९५०००००० | २४७३६००० | २०४००००० | २०४००००० | २४७३६००० |

तसेच ह क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्र.३१ सांगवी परिसरातील मुख्य रस्ते अद्ययावत पद्धतीने विकसित करणे आवश्यक आहे. तथापि सदर कामासाठी सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकीय तरतूद अपुरी आहे. तरी सदर कामांसाठी अंतर्गत तरतूद वर्गीकरण करणेसाठी खालीलप्रमाणे तरतूद वर्गीकरण सुचविण्यात येत आहे.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पान क्र. | अनु क्र. | लेखाशिर्ष | सन २०२१-२२ ची तरतुद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयची तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३१ परिसरातील मुख्य रस्ते अद्ययावत पद्धतीने विकसित करणे | ३१ | २३२ | विशेष योजना | २५,००,००, ००० | १,४५,००,००० | ० | अ.क्र. २ वरून अ.क्र.१ वर वर्ग |
| २ | प्रभाग क्र. ३२ मधील सांगवी परिसरातील अंतर्गत रस्ते अद्ययावत पद्धतीने विकसित करणे | ३१ | २३७ | विशेष योजना | १०,००,००,००० | ० | १,४५,००,००० | |
| | एकूण | | | | ३५,००,००,००० | १,४५,००,००० | १,४५,००,००० | |

तरी वरीलप्रमाणे सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात वाढ /घट करुन तरतूद वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच महानगरपालिकेतर्फे ऐतिहासिक धम्मभूमी देहुरोड याठिकाणी मनपा हद्दीबाहेर सामाजिक उपक्रमास अर्थिक सहाय्य देणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड शहर हे आळंदी, देहू व चिंचवड या तिर्थ क्षेत्राच्या परिसरात विकसित होत असून पिंपरी चिंचवड या शहराला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. आळंदी, देहू व साधू मोरया गोसावी यांचे यात्रेनिमित्त महाराष्ट्र राज्यातून अनेक भाविक येत असतात यांना सर्व सुविधा मिळण्याकरिता महापालिकेकडून आर्थिक मदत सहाय्य केले जाते.

भारत देशाच्या वैभवशाली परंपरेचा सांस्कृतिक व महान तत्त्वज्ञानाचा वारसा २५ डिसेंबर १९५४ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देहुरोड येथे रुजविला याठिकाणी तथागत भगवान बुध्द यांचे बुध्दरुप स्थापन करुन २५०० वर्षाची परंपरा याभुमीला दिली. या अनुषंगाने या धम्मभूमीवर गेली ६० वर्ष सांस्कृतिक व सामाजिक वारसा जपण्याचे कार्यक्रम होत असून या ठिकाणी भारत देशातून लाखो अनुयायी जमा होतात. या ऐतिहासिक भूमीला सुध्दा सामाजिक उपक्रमाचे कार्यक्रमास आळंदी, देहू या तिर्थ क्षेत्राप्रमाणेच महानगरपालिकेकडून कायमस्वरुपी आर्थिक मदत मिळावी. पिंपरी चिंचवड शहरामधून याठिकाणी लाखो बौध्द अनुयायी अभिवादनास येत असतात तरी याठिकाणी होणा-या सामाजिक कार्यक्रमास या आर्थिक वर्षात २०,००,०००/- ( अक्षरी–र.रु. वीस लाख) खर्च अपेक्षित होत आहे. तरी सदर ऐतिहासिक धार्मिक स्थळ मनपा हद्दीबाहेर असल्याने मनपा धोरणानुसार कॅन्टोमेंट बोर्ड देहुरोड यांचे नावे अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रातील नागरीकांचे आरोग्य चांगले रहावे तसेच नियमित व्यायामाची सवय लागावी या उद्देशाने पिंपरी चिंचवड मनपाच्या मोकळया जागा, उद्याने व सार्वजनिक ठिकाणी नागरीकांकरीता ओपन जिम व विविध खेळाचे साहित्य विषयक काम प्रगतीपथावर असुन यापूर्वीच सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून सदरचे काम तातडीने करणे आवश्यक आहे. तसेच पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी स्थापत्य विभागामार्फत नि.नो.क्र.११-१८/१९ आदेश क्र.PCSCL/T/KAVI/17/2019 दि.16/05/2019 मधील नमूद निविदा अटी शर्तीनुसार पिंपरी चिंचवड मनपाच्या मोकळया जागा, उद्याने व सार्वजनिक ठिकाणी नागरीकांकरीता ओपन जिम व विविध खेळाचे साहित्य विषयक कामे करणे या कामाचा सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात समावेश करुन विशेष बाब म्हणून पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. अंतर्गत वरील निविदा आदेशान्वये चालू कामामध्ये सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात वाढ घट करुन खालील प्रमाणे तरतूद वर्गीकरण सुचविण्यात येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | पान क्र. | अनु क्र. | अंदाजपत्रकीय र.रु. | वाढ करावयाची तरतूद | घट करावयची तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी | - | - | - | ७०,००,००० | ० | अ.क्र. २ वरून अ.क्र.१ वर वर्ग |
| २ | क्रीडा व्यायाम साहित्य खरेदी | १७८ | ५ | ४,००,००,००० | ० | ७०,००,००० | |
| **एकूण** | | | | **४,००,००,०००** | **७०,००,०००** | **७०,००,०००** | |

तरी वरीलप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस तसेच येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

प्रभाग क्र. १८ मधील क्रांतीवीर चापेकर वाड्याच्या तिस-या टप्प्याची कामे करणे भाग – २ व भाग – ३ ची कामे करणेचे कामाचा समावेश मनपाचे सन २०२१ – २२ चे अंदाजपत्रकामध्ये पान.क्र. १७, अ.क्र. ३ व ४ वर विशेष योजना या लेखाशिर्षा अंतर्गत करणेत आलेला आहे. सदर कामाची निविदा कार्यवाही पुर्ण करणेत आली असुन कामाचे आदेश देणेत आलेले आहेत. सदर कामातील भाग – २ चे काम मनपामार्फत निविदा कार्यवाही करुन करणेत येत असुन भाग – ३ चे काम क्रांतीवीर चापेकर स्मारक समिती मार्फत निविदा कार्यवाही करुन करणेत येत आहे. सदर कामास र.रु.१२,००,००,०००/- इतकी एकत्रित प्रशासकीय मान्यता घेणेत आलेली आहे. तथापि, सदर कामातील भाग – ३ चे कामामधील पुतळयाच्या बाबीमधील संख्या वाढत असलेने कामाचे प्रशासकीय मान्यतेमध्ये र.रु. ३,००,००,०००/- इतकी वाढ करुन र.रु.१५,००,००,०००/- इतकी सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सबब, विषयांकित कामास र.रु. १५,००,००,०००/- इतकी सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड भक्ती शक्ती ते त्रिवेणीनगर चौकापर्यंत जॉगिंग ट्रॅक व इतर अनुषंगिक कामे करणेची मागणी स्थानिक नागरिक करत आहे. खालील कामाची आवश्यकता असून सदरच्या कामाचा सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात समावेश करून प्रशासकीय मान्यता व आवश्यक ती तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र | अ.क्र | प्रशासकिय मान्यता र.रु | सन २०२१-२२ मूळ तरतूद | वाढ | घट | सुधारित तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भक्ती शक्ती ते त्रिवेणीनगर चौकापर्यंत जॉगिंग ट्रॅक व इतर अनुषंगिक कामे करणे | स्थापत्य उद्यान | - | - | ५०००००० | ० | १००००० | ० | १००००० | अ.क्र.२ वरून वर्ग |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | **फ प्रभागातील विविध उद्यानामध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे** | **स्थापत्य उद्यान** | ३०३ | ३१९ | १००००००० | ३०००००० | ० | १००००० | २९००००० | **अ.क्र.१ वर वर्ग** |
| | **एकूण =** | | | | ६००००००० | ३०००००० | १००००० | १००००० | ३०००००० | |

तरी सदरचेस उपसूचना मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र. 2 से.क्र. 16 राजे शिवाजीनगर मधील रस्ते अद्यायावत पद्धतीने करणेचे काम मे. अजवानी इन्फ्रा प्रा. लि. या ठेकेदारामार्फत प्रगती पथावर आहे. या कामाअंतर्गत सावतामाळी मंदिर ते विसावा चौकापर्यंतच्या 30 मी व 18 मी. डी पी रस्त्याची उर्वरीत कामे करणे तसेच शिवरस्ता ते चिखली तळवडे हद्दी पर्यंतचा 30 मी. डि पी रस्ता विकसित करणेचे काम तातडीने हाती घेवून मनपाचे सन 2022 चे सावत्रिक निवडणूकी पुर्वी पुर्ण करणेत यावीत, कारण सदरचा रस्ता हा वाहतुकीच्या दृष्टीने अतिशय वर्दळीचा असुन स्थानिक नागरीक सुध्दा रस्ता लवकरात लवकर करणेबाबत वारंवार मागणी करीत आहेत.

तरी विषयांकित कामाअंतर्गत सावतामाळी मंदिर ते विसावा चौकापर्यंतच्या 30 मी व 18 मी. डी पी रस्त्याची उर्वरीत कामे करणे तसेच शिवरस्ता ते चिखली तळवडे हद्दी पर्यंतचा 30 मी. डि पी रस्ता विकसित करणेचे कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच राजीव गांधी पुलापासुन रक्षक चौकापर्यंतचा रस्ता स्मार्ट सिटीच्या माध्यमातुन विकसीत करणे आवश्यक आहे. त्यासाठी सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील कामाच्या तरतुदीमध्ये खालील प्रमाणे वाढ / घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | लेखाशिर्ष | पानांक | अ.क्र. | सन २०२१-२०२२ ची मुळ तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्मार्ट सिटी ( मनपा वर्ग करावयाचा हिस्सा ) | स्मार्ट सिटी | २६-२७ | १६ | १०० कोटी | ४०००००००० | ० |
| २ | UTF अंतर्गत BRTS रस्त्यांची अनुषांगीक कामे करणे | मनपा मेट्रो प्रकल्प | ५५३ | ३(२) | ५० कोटी | ० | ४०००००००० |
| | | | | | | ४०००००००० | ४०००००००० |

सदरचे काम हे BRTS अंतर्गत असुन सदर कामास UTF अंतर्गत BRTS रस्त्यांची अनुषांगीक कामे करणे - मनपा मेट्रो प्रकल्प या कामामधुन वरील प्रमाणे र.रु. ४० कोटी स्मार्ट सिटी ( मनपा वर्ग करावयाचा हिस्सा ) या लेखाशिर्षावर वर्ग करुन स्मार्ट सिटी प्रकल्पास वर्ग करण्यास तसेच वर नमूद केलेप्रमाणे सन २०२१-२२ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामांच्या तरतूदीत वाढ / घट करुन देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्र.क्र. १८ मधील मोरया हॉस्पिटल ते यशोपुराम ब्रिज पिंपरी चिंचवड लिंक रोड अर्बन स्ट्रीट डीझाईननुसार विकसित करणे अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे (निविदा क्र.३४/९-२०२०/२१) याकामातील उर्वरीत विद्युत काम चिंचवड काळेवाडी पुलापासून भाटनगर एस.टि.पी पर्यंतचा १८ मी रस्ता विकसित करणे प्रकल्प अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे (निविदा क्र.२७/१-२०१८/१९) या कामातुन करणेस मान्यता देणेत येत आहे पिंपरी चिंचवड लिंक रोडचे स्थापत्य विभागाकडुन अर्बन स्ट्रीट डीझाईननुसार विकसीत करणेचे काम चालु आहे. अर्बन स्ट्रीट डीझाईननुसार सदर रस्त्याच्या दुभाजकामध्ये ७ मी. व पदपथावर ३ मी.चे नविन स्ट्रीट लाईट पोल उभा करावे लागणार आहे. परंतु सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करतेवळी उपलब्ध तरतुदीमुळे फक्त सदर रस्त्याचे दुभाजकातील जुने पोल बदलुन त्याठिकाणी अर्बन स्ट्रीट डीझाईनुसार ७ मी. नविन पोलचा समावेश करणेत आला असलेचे विद्युत विभागाकडुन सांगणेत आले.

पिंपरी चिंचवड लिंक रोडवर अर्बन स्ट्रीट डीझाईन नुसार दुभाजकातील जुने पोल आता न बदलता प्रथम पदपथावर ३ मी.चे नविन डेकोरेटिव्ह स्ट्रीट लाईट पोल उभा करण्यात यावे असे सदर प्रभागातील सर्व नगरसदस्यांची व परीसरातील नागरीकांची मागणी आहे. सदर ३ मी. डेकोरेटिव्ह पोल सदर रस्त्याच्या दुतर्फा सदर चालु असलेल्या निविदा क्र.३४/९-२०२०/२१ जेवढे बसतील तेवढे याकामातुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच उर्वरीत ३ मी.चे पोल व इतर विद्युत विषयक कामे सदर प्रभागातील चिंचवड काळेवाडी पुलापासून भाटनगर एस.टि.पी पर्यंतचा१८ मी रस्ता विकसित करणे प्रकल्प अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे निविदा क्र.२७/१-२०१८/१९ या कामातुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच ग प्रभागातील प्रभाग क्र २१ मधील पिंपरीगाव भैरवनाथ मंदीर बांधणे या कामात स्थापत्य विषयक कामे पूर्ण होत आलेले आहे. विद्युत विषयक उर्वरीत कामे तातडीन करणे आवश्यक आहे तथापि सदर कामाचे नाव अंदाजपत्रकात नसल्याने खालील तक्त्याप्रमाणे कामाचे नाव अंदाजपत्रकात समावेश करून र.रू.१००००००0/-(अक्षरी र.रू.एक कोटी) एवढी प्रशासकीय मंजूरी मिळणेस आणि खालीलप्रमाणे तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्ष / कामाचे नाव | पानांक | अनु. क्र. | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२१-२०२२ चा मूळ अंदाज | सन २०२१-२०२२ वाढ करावयाची तरतूद | सन २०२१-२०२२ घट करावयाची तरतूद | सन २०२१-२०२२ करावयाची सुधारित तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरीगाव प्र.क्र. २१ मधील भैरवनाथ मंदीर बांधणे या कामातील उर्वरीत विद्युतविषयक कामे करणे. | नव्याने समावेश करणे. | नव्याने समावेश करणे. | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे ग प्रभाग ( | ० | १००००००० | ० | १२००००० | ० | १२००००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | या लेखाशीर्षात नव्याने समावेश करणे) | | | | | |
| ११ | रहाटणी स्मशानभूमी जवळील रस्त्यापासून पिंपरी कडे जाणा-या रस्त्यावर पवना नदी येथे पूल बांदणे. | ४३ | ७८ | स्थापत्य विशेष योजना | २५००००००० | २५००००००० | १२१८००० | ० | १२००००० | १८००० |
| | **एकूण** | | | | २५००००००० | २६००००००० | १२१८००० | १२००००० | १२००००० | १२१८००० |

तसेच प्रभाग क्र. 2 से.क्र. 16 राजे शिवाजीनगर मधील रस्ते अद्यायावत पद्धतीने करणेचे काम मे. अजवानी इन्फ्रा प्रा. लि. या ठेकेदारामार्फत प्रगती पथावर आहे. या कामाअंतर्गत खालील प्रमाणे प्रभाग क्र. 2 मधील कामे हाती घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

1 जाधववाडी मधील डॉ.वनवे निवास्थानाकडे जाणारा रस्ता

2 जाधववाडी मधील वडाचामळा येथील 18 मी. डी. पी. रोडला लागून असलेले खाजगी फ्लॉटींग मधील रस्ते

3 जाधववाडी मधील मधलापेठा कॉलनी क्र. 9 व राजू मळेकर चाळी शेजारील रस्ता

4 जाधववाडी मधील जयबजरंग तालीम ते आहेरवाडी चौका पर्यंतचा अंतर्गत रस्ता

5 जाधववाडी मधील मधला पेठा कॉलनी क्र. 11 मधील रस्ता

6 देहू आळंदी रोड ते आल्हाटवस्ती पर्यंतचा अंतर्गत रस्ता

7 बो-हाडेवाडी मधील रोज गॅंलक्सी सोसायटी ते उत्तपीया सोसायटी पर्यंतच्या 18 मी. डी पी रस्त्याची उर्वरीत कामे करणे.

8 बो-हाडेवाडी मधील बारणेवस्ती ते सिव्हर नाईन व प्रिस्टिन ग्रीन सोसायटी समोरील 18 मी. डिपी रस्त्याची उर्वरीत कामे करणे

9 बो-हाडेवाडी बनकरवस्ती मधील पुणे नाशिक हायवे ते भैरवनाथ मंदिरापर्यंतचा अंतर्गत रस्ता विकसीत करणे.

10 बो-हाडेवाडी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र ते ग.नं. 658/ 670 पर्यंतचा 12 मी. व 18 मी. डी पी रस्ता विकसीत करणे.

11 बो-हाडेवाडी मधील 31 मी.डी पी रस्त्यापासून शिवशिंभो कॉलनी पर्यंतचा 12 मी. व /18 मी. डिपी रस्ता विकसीत करणे

12 संत सावतामाळी नगर ते बो-हाडेवाडी पर्यंतचा (सिव्हर हॉटेल ) 12 मी. डी पी रस्ता विकसीत करणे.

13 जाधववाडी मधील सावतामाळी मंदिर ते विसावा चौकापर्यंतच्या 30 मी व 18 मी. डी पी रस्त्याची उर्वरीत कामे करणे.

तरी विषयांकित कामाअंतर्गत वरील अनुक्रमांक 1 ते 13 पर्यंतची रस्त्यांची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनूकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ४

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१५/१५०/२०२१, दि.११/१०/२०२१
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.३५ दि.२०/१०/२०२१अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र. पीसीसी/३०९६/१८०१/सीआर–२६१/नवि-२२, दिनांक–११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र. टीपीएस–१८०५/१०५०/सीआर–७९५/०७/नवि-१३, दि. ३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि. १८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिध्द केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून शासन निर्णय क्र. टीपीएस/१८१२/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२/ईपी मंजूरी/नवि-१३,दिनांक ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागाच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. मौजे चिखली येथील पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्ता / आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **आ. क्र.** | **आरक्षणाचे प्रयोजन** | **गट नं.** | **बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी.** |
|---|---|---|---|---|
| १. | - | मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रस्ता रुंदी. | मौजे चिखली येथील गट नं.२२१ ते २४३, ६८८ व ६९० | ५००० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे

आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३(नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेत यावे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.संतोष कांबळे – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणत आला असता-

ठराव क्रमांक – ७३१ विषय क्रमांक – ४
दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१५/१५०/२०२१, दि.११/१०/२०२१
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.३५ दि.२०/१०/२०२१अन्वये.

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ५
दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१५/१५१/२०२१, दि.११/१०/२०२१
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.३६ दि.२०/१०/२०२१अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र. पीसीसी/३०९६/१८०१/सीआर–२६१/नवि-२२, दिनांक–११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र. टीपीएस–१८०५/१०५०/सीआर–

७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि.१८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिध्द केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून शासन निर्णय क्र. टीपीएस/१८१२/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२/ईपी मंजूरी / नवि-१३, दिनांक ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागाच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. मौजे चिखली येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्ता / आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आ. क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | गट नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | - | मंजूर विकास योजनेतील दक्षिणोत्तर ३०.०० मी. रस्ता रुंदी, तसेच पुर्व-पश्चिम ३०.०० मी. रुंद रस्ता व त्याची गोलाई | मौजे चिखली येथील गट नं. २३५ ते २४४, २४८ ते २५०, २५२, २५६, ३०१ ते ३०३, ३०५, ३११ ते ३२५, ६०१ ते ६१३, ६१९, ते ६२१, ६८४, ६८६ व ६८८ | ३०००० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणे.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मौजे पुनावळे येथील स.नं.४ व ५ पै मधील मंजुर विकास योजनेतील आ.क्र.४/७४ मैलाशुद्धीकरण केंद्र व त्यास स.नं .४ व ५ पैकी मधून जाणारा १२ मी. पोहोच रस्त्याचे भुसंपदान करणेस मान्यता देणेत यावी. मा. महापालिका सभा क्र.५०, विषय क्र.१६, ठराव क्र.९८६ दि.२०/०८/२०१० मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देणेत यावी.

मौजे पुनावळे येथील स.नं .४ व स.नं.५ पैकी मधील आ.क्र.४/७४ मैलाशुद्धीकरण केंद्र व त्यास स.न.४ व ५ पैकी मधून जाणारा १२ मी. रस्ता ही जागा भुसंपादन प्रस्तावाने मनपाच्या ताब्यात घेणेत यावी.

उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत यावी.

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुधारित मंजूर विकास योजना (जुनी हद्द ) यातील मौजे पिंपरी वाघेरे मधिल सि.स.नं. १०२, १०३, १०४, १०५, १०६ या मिळकती मधून जाणारा ९.०० मी. रुंदीचा विकास योजनेमधिल रस्ता हा फक्त ५० मी. रुंद आहे. तथापी तो एकाच मिळकतधारकाच्या मौजे पिंपरी वाघेरे मधिल सि.स.नं. १०२, १०३, १०४,१०५, १०६ या मिळकतीमधून जात असल्याने सदरच्या मिळकतधारकाचे पुर्ण नुकसान होत आहे. अदयाप सदरची रस्ता बाधित मिळकत महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली नाही. हा विकास योजना रस्ता रद्द केल्याने लगतच्या इतर कोणत्याही मिकतधारकाची कोणतीही अडचण होणार नाही.

तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुधारित मंजूर विकास योजना (जुनी हद्द ) यातील मौजे पिंपरी वाघेरे मधिल सि.स.नं. १०२, १०३, १०४, १०५, १०६ या मिळकती मधून जाणारा ९.०० मी. रुंदीचा विकास योजना रस्ता रद्द करुन रस्ता बाधित क्षेत्र लगतच्या निवासी क्षेत्रामध्ये समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे व त्याबाबतची सर्व वैधानिक कार्यवाही साठी मा. आयुक्त यांना प्राधिकृत करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच मा. महापालिका सभा ठराव क्र.६६१, विषय क्र.७ , दि. २९/०७/२०२१ या ठरावाची दुरूस्ती करणेस मान्यता देणेत यावी. मा. महापालिका सभा ठराव क्र. ६६१, विषय क्र.७, दि. २९/०७/२०२१ रोजीच्या ठरावात खालील प्रमाणे विषय मंजूर झालेला आहे.

मौजे दापोडी येथील स.नं. ३६ मधील ३०.०० मी. सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या डाव्या बाजूची स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या भिंतीला लागून व यांत्रिकी भवन, दापोडी यांच्या इमारती मागील जागा मंजूर विकास आराखड्यातील औद्योगिक विभागात समाविष्ट आहे. सदर जागा ही पुर्णपणे नदी ते निळी पुररेषेखाली असल्याकारणाने सदर जागा महाराष्ट्र शासनाकडील संबंधित विभागास प्रस्ताव सादर करून त्यावर खेळाचे मैदान व जलतरण तलावासाठी व उद्यानासाठी १ हेक्टर ( २.४७ एकर ) क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन व म.प्रा.व.न. र. अधिनियम १९६६ अन्वये वैधानिक कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे हरकती सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत आली आहे.

विषयांकितबाबतचा मा. महापालिका सभा ठराव क्र. ६६१, विषय क्र. ७, दि. २९/०७/२०२१ रोजीच्या ठरावात खालील प्रमाणे दुरूस्ती करणेस मान्यता देणेत यावी.

मौजे दापोडी येथील स.नं. ३६ मधील ३०.०० मी. सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या डाव्या बाजूची स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या भिंतीला लागून व यांत्रिकी भवन, दापोडी यांच्या इमारती मागील जागा मंजूर विकास आराखड्यातील औद्योगिक विभागात समाविष्ट आहे. सदर जागा ही पुर्णपणे नदी ते निळी पुररेषेखाली आहे. सदर जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरित होणेकामी महाराष्ट्र शासनाकडील संबंधित विभागास प्रस्ताव सादर करून त्यावर खेळाचे मैदान व जलतरण तलावासाठी तसेच मैलाशुध्दीकरण प्रकल्प विस्तारासाठी सुमारे

२.४८ हेक्टर क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन व यापुर्वी मंजूर केलेल्या मा. महापालिका सभा ठराव क्र. ३४२, विषय क्र. १४, दि. २०/१२/२०१८ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार आरक्षण फेरबदलाची संपुर्ण वैधानिक कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहिर नोटीस करणेकामीचे, हरकती सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव सादर करणेचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच किवळे स.न.६६ मधील SWT चे आरक्षण ऐवजी क्रीडासंकुल विकसित करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र:- टी.पी .एस - १८०५ /१०५० / प्र.क्र ७९५ /०५ नवि-१३ दि . ३०/०५/२००८ व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, अधिसूचना क्र.टी.पी .एस-१८०८/८९४ सी.आर १७२७/०९ नवि- १३ दि . १८/०८/२००९ व अधिसूचना क्र.टी.पी .एस १८१२/१६०/ सी.आर- ५८/१२ पुर्नरचना नं. /२७/१२ ई .पी मंजूर / यु डी-१३ दि. ०२/०३/२०१५ अन्वये विकास योजना मंजूर आहे. वाढीव हद्दीच्या मौजे किवळे येथील स.नं ६६ मध्ये आरक्षण क्र ४/१०३ ( SWT ) असून ते ४५ .० मी BRT रस्त्यालगत व १८.० मी रस्त्यालगत आहे. सदरचा पूर्ण भाग हा निवासी भाग आहे, शेजारी केंद्र शासनाचा दारुगोळा कारखाना आहे. त्यांनी व येथील स्थानिक रहिवासी यांनी सदर ( SWT ) चे आरक्षण होऊ नये या करिता विरोध केलेला आहे व सदरचे आरक्षण मध्ये फेरबदल करून सदर आरक्षणामध्ये क्रीडा संकुल असा आरक्षणामध्ये बदल करून विकसित करावे अशी स्थानिक नागरिकांची विनंती आहे. मौजे किवळे येथील माहिती घेतली असता या भागात कोठेहि क्रीडासंकुल नाही वाढीव लोकसंख्या पाहता या भागात शैक्षणिक गुणवते बरोबर युवकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी व विविध क्रीडा प्रकारांच्या सुख सुविधा करिता क्रीडासंकुल हि काळाची गरज आहे. यातून खेळाडू निर्माण होऊन आपल्या शहराच्या नावलौकिकात भर पडणार आहे.

तरी सदर मौजे किवळे येथील आरक्षण क्र ४/१०३ ( SWT ) च्या वापरात बदल करून खेळाडूंसाठी क्रीडासंकुल करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच मा.महापालिका सभा क्र. ५० विषय क्र. १६ ठराव क्र. ९८६ दि.२०/०८/२०२१० मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देणेत यावी.

मौजे पुनावळे येथील स.नं. ४ व स.नं. ५ पैकी मधील आ.क्र. ४/७४ मैलाशुध्दीकरण केंद्र व त्यास स.नं. ४व ५ पैकी मधून जाणारा १२ मी. रस्ता ही जागा भूसंपादन प्रस्तावाने मनपाच्या ताब्यात घेणेत यावी.

उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मान्यता देणेत यावी.

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा

आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड मनपाची ओपन स्पेस (मोकळी जागा) भाडे तत्वावर मिळणेस मान्यता देणेत यावी. मोशी प्राधिकरण हद्दीतील सेक्टर नं. ४ मधील प्लॉट क्र. ६ मधील जागा मनशक्ती केंद्राच्या वतीने मोफत बाल संस्कार केंद्रासाठी ती जागा मिळण्याबाबत ब-याच वर्षापासून ती जागा मोकळी पडली असून त्या ठिकाणी अतिक्रमण होत आहे. त्या अनुषंगाने पिंचिं.मनपाला त्याचे भाडे चालू करता येईल म्हणून ती जागा मनशक्ती केंद्राला १० वर्षासाठी भाडे तत्वावर देणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड शहरातील पत्रकार बंधुना पत्रकारीतेचे कामकाज सोयीचे व सुलभ होण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या विकास आराखड्यामध्ये संत तुकाराम नगर, स.न. १८७ पै. येथे पत्रकार भवनसाठी आरक्षित असलेली जागा आरक्षण क्रमांक ५१ हे ०.१० हे. महापालिकेच्या वतीने तातडीने ताब्यात घेऊन महापालिकेच्या वतीने विकसित करण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुधारित मंजूर विकास योजना ( जुनी हद्द ) यातील मौजे पिंपरी वाघेरे ( पिंपरी कॅम्प ) येथिल सि.स.नं. ४६३५ ते ४६५८ या शासकिय मिळकती ह्या शासकिय / निम शासकिय विभागामध्ये समाविष्ट आहेत.

तथापी सदरच्या मौजे पिंपरी वाघेरे ( पिंपरी कॅम्प ) येथिल सि.स.नं. ४६३५ ते ४६५८ मधिल शासकिय मिळकती ह्या पिंपरी कॅंम्प परिसरामधिल असल्याने त्याजागा जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन त्या व्यापारी प्रयोजनासाठी वापरल्यास त्यामध्ये महानगरपालिकेस प्रचंड फायदा होईल.

तरी मौजे पिंपरी वाघेरे ( पिंपरी कॅम्प ) येथिल सि.स.नं. ४६३५ ते ४६५८ या मिळकती मधिल शासकिय जागा ह्या शॉपींग कॉम्पलेक्स या प्रयोजनार्थ आरक्षित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे व त्याबाबतची सर्व वैधानिक कार्यवाही साठी मा. आयुक्त यांना प्राधिकृत करणेस मान्यता देणेत यावी.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा. अॅड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता एवढ सांगून सुध्दा पुन्हा सभाशाखेचे नियम धाब्यावर. सभाशाखेच्या नियमांच उल्लंघन करुन पुन्हा पुन्हा एकच सदस्य अनेक उपसूचना देत आहे त्यामुळे सदरचे विषय हे ग्राहय धरु नये अशी नोंद घ्यावी आणि त्याबाबत हरकत आहे. मा.महापौर साहेब, आता चुकीच्या पध्दतीने उपसूचना मांडली गेली त्याला मी हरकत नोंदवितो.

मा.अजीत गव्हाणे – मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मगाशी सचिवानी याठिकाणी खुलासा केला एकच सदस्य दोन उपसूचना वाचतो, दोन सदस्य नाही वाचत. त्यामध्ये ती सगळी एकच उपसूचना आहे. एका उपसूचनेमध्ये ते विषय आहेत, ती एकच उपसूचना आहे. एक सदस्य उपसूचना वाचतो आणि त्याला एक सदस्य उपसूचना देतो त्यामुळे सभाशास्त्राप्रमाणेच जे कलम आहे त्याप्रमाणेच आहे आणि या संदर्भामध्ये अशाच आपण उपसूचना करतो.

मा.महापौर- विषय क्रमांक ५ उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – ७३२ विषय क्रमांक – ५

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१५/१५१/२०२१, दि.११/१०/२०२१

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.३६ दि.२०/१०/२०२१अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र. पीसीसी/३०९६/१८०१/सीआर–२६१/नवि-२२, दिनांक–११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र. टीपीएस–१८०५/१०५०/सीआर–७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि.१८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिध्द केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून शासन निर्णय क्र. टीपीएस/१८१२/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२/ईपी मंजूरी / नवि-१३, दिनांक ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागाच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. मौजे चिखली येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्ता / आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आ. क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | गट नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | - | मंजूर विकास योजनेतील दक्षिणोत्तर ३०.०० मी. रस्ता रुंदी, तसेच पुर्व-पश्चिम ३०.०० मी. रुंद रस्ता व त्याची गोलाई | मौजे चिखली येथील गट नं. २३५ ते २४४, २४८ ते २५०, २५२, २५६, ३०१ ते ३०३, ३०५, ३११ ते ३२५, ६०१ ते ६१३, ६१९, ते ६२१, ६८४, ६८६ व ६८८ | ३०००० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान

भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच मौजे पुनावळे येथील स.नं.४ व ५ पै मधील मंजुर विकास योजनेतील आ.क्र.४/७४ मैलाशुद्धीकरण केंद्र व त्यास स.नं .४ व ५ पैकी मधून जाणारा १२ मी. पोहोच रस्त्याचे भुसंपदान करणेस मान्यता देणेत येत आहे. मा. महापालिका सभा क्र.५०, विषय क्र.१६, ठराव क्र.९८६ दि.२०/०८/२०१० मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मौजे पुनावळे येथील स.नं .४ व स.नं.५ पैकी मधील आ.क्र.४/७४ मैलाशुद्धीकरण केंद्र व त्यास स.न.४ व ५ पैकी मधून  जाणारा १२ मी. रस्ता ही जागा भुसंपादन प्रस्तावाने मनपाच्या ताब्यात घेणेत यावी.

उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच  पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुधारित मंजूर विकास योजना (जुनी हद्द ) यातील मौजे पिंपरी वाघेरे मधिल सि.स.नं. १०२, १०३, १०४, १०५, १०६ या मिळकती मधून जाणारा ९.०० मी. रुंदीचा विकास योजनेमधिल रस्ता हा फक्त ५० मी. रुंद आहे. तथापी तो एकाच मिळकतधारकाच्या मौजे पिंपरी वाघेरे मधिल सि.स.नं. १०२, १०३, १०४,१०५, १०६ या मिळकतीमधून जात असल्याने सदरच्या मिळकतधारकाचे पुर्ण नुकसान होत आहे. अदयाप सदरची रस्ता बाधित मिळकत महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली नाही. हा विकास योजना रस्ता रद्द केल्याने लगतच्या इतर कोणत्याही मिकतधारकाची कोणतीही अडचण होणार नाही.

तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुधारित मंजूर विकास योजना (जुनी हद्द ) यातील मौजे पिंपरी वाघेरे मधिल सि.स.नं. १०२, १०३, १०४, १०५, १०६ या मिळकती मधून जाणारा ९.०० मी. रुंदीचा विकास योजना रस्ता रद्द करुन रस्ता बाधित क्षेत्र लगतच्या निवासी क्षेत्रामध्ये समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे व त्याबाबतची सर्व वैधानिक कार्यवाही साठी मा. आयुक्त यांना प्राधिकृत करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच मा. महापालिका सभा ठराव क्र.६६१, विषय क्र.७ , दि. २९/०७/२०२१ या ठरावाची दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.  मा. महापालिका सभा ठराव क्र. ६६१, विषय क्र.७, दि. २९/०७/२०२१ रोजीच्या ठरावात खालील प्रमाणे विषय मंजूर झालेला आहे.

मौजे दापोडी येथील स.नं. ३६ मधील ३०.०० मी. सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या डाव्या बाजूची स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या भिंतीला लागून व यांत्रिकी भवन, दापोडी यांच्या इमारती मागील जागा मंजूर विकास आराखड्यातील औद्योगिक विभागात समाविष्ट

आहे. सदर जागा ही पुर्णपणे नदी ते निळी पुररेषेखाली असल्याकारणाने सदर जागा महाराष्ट्र शासनाकडील संबंधित विभागास प्रस्ताव सादर करून त्यावर खेळाचे मैदान व जलतरण तलावासाठी व उद्यानासाठी १ हेक्टर ( २.४७ एकर ) क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन व म.प्रा.व.न. र. अधिनियम १९६६ अन्वये वैधानिक कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे हरकती सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत आली आहे.

विषयांकित बाबतचा मा. महापालिका सभा ठराव क्र. ६६१, विषय क्र. ७, दि. २९/०७/२०२१ रोजीच्या ठरावात खालील प्रमाणे दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

मौजे दापोडी येथील स.नं. ३६ मधील ३०.०० मी. सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या डाव्या बाजूची स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या भिंतीला लागून व यांत्रिकी भवन, दापोडी यांच्या इमारती मागील जागा मंजूर विकास आराखड्यातील औद्योगिक विभागात समाविष्ट आहे. सदर जागा ही पुर्णपणे नदी ते निळी पुररेषेखाली आहे. सदर जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरित होणेकामी महाराष्ट्र शासनाकडील संबंधित विभागास प्रस्ताव सादर करून त्यावर खेळाचे मैदान व जलतरण तलावासाठी तसेच मैलाशुध्दीकरण प्रकल्प विस्तारासाठी सुमारे २.४८ हेक्टर क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन व यापुर्वी मंजूर केलेल्या मा. महापालिका सभा ठराव क्र. ३४२, विषय क्र. १४, दि. २०/१२/२०१८ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार आरक्षण फेरबदलाची संपुर्ण वैधानिक कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहिर नोटीस करणेकामीचे, हरकती सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव सादर करणेचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच किवळे स.न.६६ मधील SWT चे आरक्षण ऐवजी क्रीडासंकुल विकसित करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र:- टी.पी .एस - १८०५ /१०५० / प्र.क्र ७९५ /०५ नवि-१३ दि . ३०/०५/२००८ व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, अधिसूचना क्र.टी.पी .एस-१८०८/८९४ सी.आर १७२७/०९ नवि- १३ दि . १८/०८/२००९ व अधिसूचना क्र.टी.पी .एस १८१२/१६०/ सी.आर- ५८/१२ पुर्नरचना नं. /२७/१२ ई .पी मंजूर / यु डी-१३ दि. ०२/०३/२०१५ अन्वये विकास योजना मंजूर आहे. वाढीव हद्दीच्या मौजे किवळे येथील स.नं ६६ मध्ये आरक्षण क्र ४/१०३ ( SWT ) असून ते ४५ .० मी BRT रस्त्यालगत व १८.० मी रस्त्यालगत आहे. सदरचा पूर्ण भाग हा निवासी भाग आहे, शेजारी केंद्र शासनाचा दारुगोळा कारखाना आहे. त्यांनी व येथील स्थानिक रहिवासी यांनी सदर ( SWT ) चे आरक्षण होऊ नये या करिता विरोध केलेला आहे व सदरचे आरक्षण मध्ये फेरबदल करून सदर आरक्षणामध्ये क्रीडा संकुल असा आरक्षणामध्ये बदल करून विकसित करावे अशी स्थानिक नागरिकांची विनंती आहे. मौजे किवळे येथील माहिती घेतली असता या भागात कोठेहि क्रीडासंकुल नाही वाढीव लोकसंख्या पाहता या भागात शैक्षणिक गुणवते बरोबर युवकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी व विविध क्रीडा प्रकारांच्या सुख सुविधा करिता क्रीडासंकुल

हि काळाची गरज आहे. यातून खेळाडू निर्माण होऊन आपल्या शहराच्या नावलौकिकात भर पडणार आहे.

तरी सदर मौजे किवळे येथील आरक्षण क्र ४/१०३ ( SWT ) च्या वापरात बदल करून खेळाडूंसाठी क्रीडासंकुल करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच मा.महापालिका सभा क्र. ५० विषय क्र. १६ ठराव क्र. ९८६ दि.२०/०८/२०२१० मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मौजे पुनावळे येथील स.नं. ४ व स.नं. ५ पैकी मधील आ.क्र. ४/७४ मैलाशुध्दीकरण केंद्र व त्यास स.नं. ४व ५ पैकी मधून जाणारा १२ मी. रस्ता ही जागा भूसंपादन प्रस्तावाने मनपाच्या ताब्यात घेणेत यावी.

उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मान्यता देणेत येत आहे.

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड मनपाची ओपन स्पेस (मोकळी जागा) भाडे तत्वावर मिळणेस मान्यता देणेत येत आहे. मोशी प्राधिकरण हद्दीतील सेक्टर नं. ४ मधील प्लॉट क्र. ६ मधील जागा मनशक्ती केंद्राच्या वतीने मोफत बाल संस्कार केंद्रासाठी ती जागा मिळण्याबाबत ब-याच वर्षापासून ती जागा मोकळी पडली असून त्या ठिकाणी अतिक्रमण होत आहे. त्या अनुषंगाने पिंचिं.मनपाला त्याचे भाडे चालू करता येईल म्हणून ती जागा मनशक्ती केंद्राला १० वर्षासाठी भाडे तत्वावर देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरातील पत्रकार बंधुना पत्रकारीतेचे कामकाज सोयीचे व सुलभ होण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या विकास आराखड्यामध्ये संत तुकाराम नगर, स.न. १८७ पै. येथे पत्रकार भवनसाठी आरक्षित असलेली जागा आरक्षण क्रमांक ५१ हे ०.१० हे. महापालिकेच्या वतीने तातडीने ताब्यात घेऊन महापालिकेच्या वतीने विकसित करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुधारित मंजूर विकास योजना ( जुनी हद्द ) यातील मौजे पिंपरी वाघेरे ( पिंपरी कॅम्प ) येथिल सि.स.नं. ४६३५ ते ४६५८ या शासकिय मिळकती ह्या शासकिय / निम शासकिय विभागामध्ये समाविष्ट आहेत .

तथापी सदरच्या मौजे पिंपरी वाघेरे ( पिंपरी कॅम्प ) येथिल सि.स.नं. ४६३५ ते ४६५८ मधिल शासकिय मिळकती ह्या पिंपरी कॅम्प परिसरामधिल असल्याने त्याजागा जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन त्या व्यापारी प्रयोजनासाठी वापरल्यास त्यामध्ये महानगरपालिकेस प्रचंड फायदा होईल.

तरी मौजे पिंपरी वाघेरे ( पिंपरी कॅम्प ) येथिल सि.स.नं. ४६३५ ते ४६५८ या मिळकती मधिल शासकिय जागा ह्या शॉपींग कॉम्पलेक्स या प्रयोजनार्थ आरक्षित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे व त्याबाबतची सर्व वैधानिक कार्यवाही साठी मा. आयुक्त यांना प्राधिकृत करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

ॲड. मोरेश्वर शेंडगे – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ६

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१५/१५२/२०२१, दि.११/१०/२०२१

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.३७ दि.२०/१०/२०२१अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र. पीसीसी/३०९६/१८०१/सीआर – २६१/ नवि -२२, दिनांक – ११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र. टीपीएस – १८०५/१०५०/सीआर – ७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि. १८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिध्द केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून शासन निर्णय क्र. टीपीएस/१८१२/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२/ईपी मंजूरी/नवि-१३,दिनांक ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागाच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. मौजे चिखली येथील पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्ता / आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **आ. क्र.** | **आरक्षणाचे प्रयोजन** | **गट नं.** | **बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी.** |
|---|---|---|---|---|
| १. | - | मंजूर विकास योजनेतील ३०.०० मी. रुंद रस्ता | मौजे चिखली येथील गट नं. ६८०, ६८७, ६८८ व ६८९ | ६००० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक - ७३३ विषय क्रमांक – ६

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१५/१५२/२०२१, दि.११/१०/२०२१
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.३७ दि.२०/१०/२०२१अन्वये.

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

ॲड. मोरेश्वर शेंडगे – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ७

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.शैलेश मोरे व मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.
२) मा. क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती कडील ठराव क्र.५० दि.१२/१०/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी चिंचवड संगीत अकादमी स्थापना दि. ८ जून २००१ रोजी आहे. तेव्हापासून सदर अकादमी मध्ये विधिवत संगीत देण्याचे कार्य चालू आहे. या संगीत अकादमीमध्ये आजपर्यंत शेकडो विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे. संगीत क्षेत्रात अनेक नामवंत कलाकार यांचे सादरीकरण झाले आहे. पिंपरी चिंचवड संगीत अकादमी यास भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रात समर्पित असलेले दिग्गज शास्त्रीय गायक भारतरत्न पंडित भीमसेन जोशी संगीत अकादमी असे नाव दिल्यास पिपरी चिंचवड संगीत अकादमी याचा प्रसार प्रचार होण्यास आणखी मदत होईल. सबब पिंपरी चिंचवड संगीत अकादमी निगडी यास भारतरत्न पंडित भीमसेन जोशी संगीत अकादमी निगडी असे नाव देण्यास मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- चऱ्होली प्रभाग क्रमांक ३ मध्ये खालील प्रकल्प/रस्ते नव्याने पुर्ण झाले असुन नागरिकांना माहिती होण्याच्या दृष्टीने त्यांचे खालीलप्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र | ठिकाणाचे प्रकल्पाचे नाव | नामकरण |
|---|---|---|
| १ | स. न. २२७ आणि स. न. ११ येथील चौकाला नाव देणे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक |
| २ | स. न. ४०५/१ येथे पठारे मळा ते काळजेवाडी रोडवरील चौक | राणी चौक (कोतवालवाडी चऱ्होली बु.) |

तरी वरील प्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग ०३ मधील खालीलप्रमाणे चौकांचे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

१) 24 मीटर व 30 मीटर च्या चौकास भारत मातेचे सुपुत्र वीरजवान चौक बुर्डे वस्ती. चर्होली रस्त्यास असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

२) 30 मीटर ते 30 मीटर बुर्डे वस्ती ते लोहगाव कडे जाणारा रस्ता क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले असे नामकरण बुर्डेवस्ती चऱ्होली बु. येथे करण्यास मान्यता देणेत यावी.

३) 30 मीटर हिरामाता रस्ता मंदिराकडे जाणारा श्री. हिरामाता चौक असे बुर्डेवस्ती चऱ्होली बु. येथे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

४) 18 मीटर व 24 मीटर जंक्शन चौकास श्री जयगणेश चौक दमडी बुर्डेवस्ती, चऱ्होली बु. असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

५) बुर्डे वस्ती चर्होली बु. 2/92 आरक्षण पाण्याची टाकीचे नाव कै. विशालशेठ हिरामण ताम्हाणे असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

६) चऱ्होली बु. गावठाण बाजारपेठ चौकास जय श्रीराम चौक असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

७) 90 मीटर चौक ते 30 मीटर चौकास श्रीमती राधाबाई राघु रासकर चर्होली बु. असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

८) चव्हाणनगर च-होली बुद्रुक असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

९) 24 मीटर व 24 मीटर चौकास श्री जायमाळणी माता बुर्डे वस्ती चर्होली बु .असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

१०) आरक्षण क्र. 2/97 आरक्षणास सौ. सुवर्णाताई विकास अण्णा बुर्डे फाउंडेशन बुर्डे वस्ती चर्होली बु असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच आरक्षण क्र. ३/५ सर्व्हे क्र. १६/१८ येथील खेळाच्या मैदानास “स्व. श्रीमती कमल सुदाम काटे ” असे नाव देणेस मान्यता देणेत यावी. सदर विषयान्वये प्रभाग क्र. ३० दापोडीतील आरक्षण क्र. ३/५ सर्व्हे क्र. १६/१८ दापोडी येथे विकसित करण्यात आलेल्या क्रिडांगणास “स्व.श्रीमती कमल सुदाम काटे क्रिडांगण” असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच आरक्षण क्र. ३/३१ सर्व्हे क्र. ८५ येथे नव्याने विकसित केलेल्या उद्यानाला "तथागत भगवान गौतम बुध्द उद्यान" असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे. सदर विषयान्वये प्रभाग क्र. ३० दापोडीतील आरक्षण क्र. ३/३१ सर्व्हे क्र. ८५ येथे नव्याने विकसित केलेल्या उद्यानाला "तथागत भगवान गौतम बुध्द उद्यान" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच निगडी प्राधिकरणातील से. २७/ए मधील सिटी प्राईड शाळेच्या मागील परिसराला श्री अग्रसेन महाराज नगर असे नामकरण करण्यात यावे ही मागणी या परिसरातील राहणाऱ्या अनेक रहिवासी नागरिकांची आहे. तरी निगडी प्राधिकरणातील सेक्टर २७ /ए मधील सिटी प्राईड शाळेच्या मागील परिसराला "श्री अग्रसेन महाराज नगर" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच चौकाचे नामकरण करणे- सेक्टर नं. २५ एल.आय.जी. कॉलनी प्राधिकरण येथील मोन्जीनीस केक शॉप जवळील चौकास "जेष्ठ समाजसेवक विष्णू मारुती सायकर चौक" असे नामकरण करण्यात यावे अशी मागणी या परिसरातील राहणाऱ्या अनेक रहिवासी नागरिकांची आहे. तरी नागरिकांच्या मागणीनुसार या चौकास "जेष्ठ समाजसेवक विष्णू मारुती सायकर चौक" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपळे गुरव येथील समतल विलगकासला स्व. मनोहर पर्रीकर ( मा. संरक्षण मंत्री) समतल विलगक सुदर्शन चौक पिंपळे गुरव असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र 14 येथील काळभोर नगर व मोहन नगर येथील रस्त्यावरील बालाजी चौक ते सिद्दाजी आप्पा चौक ( गायवासरु ) यांस भक्ती मार्ग " तसेच आकुर्डी येथील शुभश्री रेसिडेन्सी समोरील रोड ते कुटे हॉस्पीटल पर्यंत "श्रीमती चारुशिला कुटे (मा.नगरसेविका)" असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी. सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

तसेच प्रभाग 20 कासारवाडी येथील स.न. 408, सि.टी.एस. नं. 2330, 2331 आरक्षण क्रं. 13 खेळाचे मैदान क्रिडा संकुलला "स्व. पै. श्री.राजाराम लांडे क्रिडा संकुल" असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी.सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

तसेच प्रभाग क्र.१३ निगडी यमुनानगर मध्ये सदगुरु दत्त उदयानामध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या ज्येष्ठ नागरिक विरुंगळा केंद्रास ज्येष्ठ नागरिक सिताराम धोंडू रहाटे व युवा प्रविण काशीनाथ खिल्लारे असे नामकरण मुख्य इमारतीस करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.राजेंद्र गावडे – मा. महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

ॲड. मोरेश्वर शेंडगे – मा. महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.महापौर - वि.क्र.७ उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ७३४ विषय क्रमांक – ७

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.शैलेश मोरे व मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.
२) मा. क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती कडील
ठराव क्र.५० दि.१२/१०/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी चिंचवड संगीत अकादमी स्थापना दि. ८ जून २००१ रोजी आहे तेव्हापासून सदर अकादमी मध्ये विधिवत संगीत देण्याचे कार्य . चालू आहे. या संगीत अकादमीमध्ये आजपर्यंत शेकडो विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे .संगीत क्षेत्रात अनेक नामवंत कलाकार यांचे सादरीकरण झाले आहेपिंपरी चिंचवड संगीत अकादमी . यास भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रात समर्पित असलेले दिग्गज शास्त्रीय गायक भारतरत्न पंडित भीमसेन जोशी संगीत अकादमी असे नाव दिल्यास पिंपरी चिंचवड संगीत अकादमी याचा प्रसार प्रचार होण्यास आणखी मदत होईलसबब पिंपरी चिंचवड संगीत अकादमी निगडी यास . भारतरत्न पंडित भीमसेन जोशी संगीत अकादमी निगडी असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच चऱ्होली प्रभाग क्रमांक ३ मध्ये खालील प्रकल्प/रस्ते नव्याने पुर्ण झाले असुन नागरिकांना माहिती होण्याच्या दृष्टीने त्यांचे खालीलप्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | ठिकाणाचे प्रकल्पाचे नाव | नामकरण |
|---|---|---|
| १ | स. न. २२७ आणि स. न. ११ येथील चौकाला नाव देणे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक |
| २ | स. न. ४०५/१ येथे पठारे मळा ते काळजेवाडी रोडवरील चौक | राणी चौक (कोतवालवाडी चऱ्होली बु.) |

तरी वरील प्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग ०३ मधील खालीलप्रमाणे चौकांचे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

१) 24 मीटर व 30 मीटर च्या चौकास भारत मातेचे सुपुत्र वीरजवान चौक बुर्डे वस्ती. चर्होली रस्त्यास असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

२) 30 मीटर ते 30 मीटर बुर्डे वस्ती ते लोहगाव कडे जाणारा रस्ता क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले असे नामकरण बुर्डेवस्ती चऱ्होली बु. येथे करण्यास मान्यता देणेत येत आहे.

३) 30 मीटर हिरामाता रस्ता मंदिराकडे जाणारा श्री. हिरामाता चौक असे बुर्डेवस्ती चऱ्होली बु. येथे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

४) 18 मीटर व 24 मीटर जंक्शन चौकास श्री जयगणेश चौक दमडी बुर्डेवस्ती, च-्होली बु. असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

५) बुर्डे वस्ती चर्होली बु. 2/92 आरक्षण पाण्याची टाकीचे नाव कै. विशालशेठ हिरामण ताम्हाणे असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

६) च-्होली बु. गावठाण बाजारपेठ चौकास जय श्रीराम चौक असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

७) 90 मीटर चौक ते 30 मीटर चौकास श्रीमती राधाबाई राघु रासकर चर्होली बु. असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

८) चव्हाणनगर च-होली बुद्रुक असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

९) 24 मीटर व 24 मीटर चौकास श्री जायमाळणी माता बुर्डे वस्ती चर्होली बु .असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

१०) आरक्षण क्र. 2/97 आरक्षणास सौ. सुवर्णाताई विकास अण्णा बुर्डे फाउंडेशन बुर्डे वस्ती चर्होली बु असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच आरक्षण क्र. ३/५ सर्व्हे क्र. १६/१८ येथील खेळाच्या मैदानास “स्व. श्रीमती कमल सुदाम काटे ” असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे. सदर विषयान्वये प्रभाग क्र. ३० दापोडीतील आरक्षण क्र. ३/५ सर्व्हे क्र. १६/१८ दापोडी येथे विकसित करण्यात आलेल्या क्रिडांगणास “स्व.श्रीमती कमल सुदाम काटे क्रिडांगण” असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच आरक्षण क्र. ३/३१ सर्व्हे क्र. ८५ येथे नव्याने विकसित केलेल्या उद्यानाला “तथागत भगवान गौतम बुध्द उद्यान” असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे. सदर विषयान्वये प्रभाग क्र. ३० दापोडीतील आरक्षण क्र. ३/३१ सर्व्हे क्र. ८५ येथे नव्याने विकसित केलेल्या उद्यानाला “तथागत भगवान गौतम बुध्द उद्यान” असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच निगडी प्राधिकरणातील से. २७/ए मधील सिटी प्राईड शाळेच्या मागील परिसराला श्री अग्रसेन महाराज नगर असे नामकरण करण्यात यावे ही मागणी या परिसरातील राहणाऱ्या अनेक रहिवासी नागरिकांची आहे. तरी निगडी प्राधिकरणातील सेक्टर २७ /ए मधील सिटी प्राईड शाळेच्या मागील परिसराला “श्री अग्रसेन महाराज नगर” असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच चौकाचे नामकरण करणे- सेक्टर नं. २५ एल.आय.जी. कॉलनी प्राधिकरण येथील मोन्जीनीस केक शॉप जवळील चौकास “जेष्ठ समाजसेवक विष्णू मारुती सायकर चौक” असे नामकरण करण्यात यावे अशी मागणी या परिसरातील राहणाऱ्या अनेक रहिवासी नागरिकांची आहे. तरी नागरिकांच्या मागणीनुसार या चौकास “जेष्ठ समाजसेवक विष्णू मारुती सायकर चौक” असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपळे गुरव येथील समतल विलगकासला स्व. मनोहर पर्रीकर ( मा. संरक्षण मंत्री) समतल विलगक सुदर्शन चौक पिंपळे गुरव असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र 14 येथील काळभोर नगर व मोहन नगर येथील रस्त्यावरील बालाजी चौक ते सिद्दाजी आप्पा चौक ( गायवासरु ) यांस भक्ती मार्ग " तसेच आकुर्डी येथील शुभश्री रेसिडेन्सी समोरील रोड ते कुटे हॉस्पीटल पर्यंत "श्रीमती चारुशिला कुटे (मा.नगरसेविका)" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग 20 कासारवाडी येथील स.न. 408, सि.टी.एस. नं. 2330, 2331 आरक्षण क्रं. 13 खेळाचे मैदान क्रिडा संकुलला "स्व. पै. श्री.राजाराम लांडे क्रिडा संकुल" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र.१३ निगडी यमुनानगर मध्ये सदगुरु दत्त उदयानामध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या ज्येष्ठ नागरिक विरुंगळा केंद्रास ज्येष्ठ नागरिक सिताराम धोंडू रहाटे व युवा प्रविण काशीनाथ खिल्लारे असे नामकरण मुख्य इमारतीस करण्यास मान्याता देणेत येत आहे. सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

अॅड. मोरेश्वर शेंडगे – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ८

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अमुका/३/कावि/१७३/२०२१दि. ५/१०/२०२१

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७२१ दि.२०/१०/२०२१ अन्वये.

मा.महापालिका सभा ठराव क्र. ६९६ दि.२०/०९/२०२१ अन्वये यांत्रिकीकरणाद्वारे साफसफाईचा विषय प्रशासकीय मान्यतेकामी माहे ऑक्टोबर महिन्याचे मा.महापालिका सभेपुढे सादर करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच जुन्या आरएफपी मधील ४ पॅकेज ऐवजी २ पॅकेजमध्ये शहरातील रस्त्यांची विभागणी करुन सुधारित आरएफपी मसुदा तयार करण्यास व खर्चामध्ये कपात करुन यंत्रे आणि मनुष्यबळाची फेररचना करण्यात यावी असेही ठरावामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

त्यानुसार आरएफपी मसुद्यामध्ये बदल करुन सुधारित आरएफपी तयार करण्यात आलेला असून आरएफपी मध्ये असलेली रचना व खर्च यामध्ये बदल झालेला आहे. नविन आरएफपी मसुद्यामध्ये असलेल्या करण्यात आलेला बदलांबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

सदर कामकाजाकरिता नियुक्त सल्लागार संस्था मे.टंडन अर्बनन सोल्युशन्स प्रा.लि. यांचेमार्फत सुधारित आरएफपी मसुदा तयार करण्यात आलेला असून त्यानुसार शहरातील १८.०० मी. पेक्षा मोठ्या रस्त्यांची २ भागांमध्ये विभागणी करण्यात आलेली असून त्यामध्ये

Southern side of head office व Northern side of head office चे प्रत्येकी १ पॅकेज अशा रितीने २ पॅकेज निश्चित करण्यात आलेले आहे.

पॅकेज क्र. १ करिता ३३१ किमी व पॅकेज क्र. २ करिता ३३९.१५ किमी, इतकी रस्त्याची लांबी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामुळे शहरातील एकत्रित रस्त्यांची अंदाजित लांबी (Sweeping Length)६७०.१५ गृहीत धरण्यात आलेली आहे. यामध्ये शहरातील महामार्ग, बीआरटी मार्ग व १८.०० मी. पेक्षा रस्त्यांची लांबी गृहीत धरण्यात आलेली आहे. यांत्रिकी पध्दतीने रस्ते साफसफाई कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या वाहनांची व मनुष्यबळा बाबतची माहिती आरएफपी मध्ये समाविष्ट करण्यात आलेला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

**Package 1: - Southern side of Head Office**

| Heavy Vehicle (5-6 M3) | Medium Vehicle (2.5-3.5 M3) | Gobbler / Litter Picker | Total Vehicles | Hook loader / Compactor | Water Tanker (10000 L) |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 4 | 8 | 16 | 3 | 2 |

**Proposed Manpower Deployment**

| Sweeper | Driver | Operator | Helper | Total |
|---|---|---|---|---|
| 150 | 16 | 20 | 5 | 191 |

**Package 2: - Northern side of Head Office**

| Heavy Vehicle (5-6 M3) | Medium Vehicle (2.5-3.5 M3) | Gobbler / Litter Picker | Total Vehicles | Hook loader / Compactor | Water Tanker (10000 L) |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 4 | 8 | 16 | 3 | 2 |

**Proposed Manpower Deployment**

| Sweeper | Driver | Operator | Helper | Total |
|---|---|---|---|---|
| 150 | 16 | 20 | 5 | 191 |

सदर निविदा कालावधी हा ७ वर्षांचा असून त्याकरिता अंदाजे र.रु.३६२.०४ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. तथापि, निविदा प्रक्रिया राबविण्या करिता खालील बाबींची पूर्तता करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे.

1. निविदा कालावधी हा ७ वर्षांचा असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार असे दायित्व पत्करण्यापूर्वी मा.महापालिका सभेची मंजूरी घेण्याचे प्रावधान आहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया राबविण्याकरिता अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार मा.महापालिका सभेची अंदाजित र.रु. ३६२.०४ कोटी अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.
2. मा.महापालिका सभेमार्फत प्रशासकीय मान्यता घेण्यात आल्यानंतर आरएफपी मसुद्यामध्ये निविदा प्रक्रियेपूर्वी अथवा निविदा प्रक्रिये दरम्यान काही बदल करणे आवश्यक असल्यास उदा.मनुष्यबळ, वाहनसंख्या, अंदाजित / प्रत्यक्ष खर्च इ. सदर बदल करण्याचे अधिकार आयुक्तांना राहतील.
3. निविदा प्रक्रियेअंती निश्चित होणा-या दरास व संविदेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक राहील.

सबब, शहरातील रस्ते, मंडई व इतर मोकळया जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाजा करिता तयार करण्यात आलेल्या निविदा / आरएफपी नुसार ७ वर्षे कालावधीकरिता निविदा प्रक्रिया राबविणेकामी व त्यापोटी होणा-या अंदाजे र.रु.३६२.०४ कोटींच्या अथवा प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यतेकामी प्रस्तुतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ (ब) नुसार मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ७३५ विषय क्रमांक – ८

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अमुका/३/कावि/१७३/ २०२१दि. ५/१०/२०२१
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७२१ दि.२०/१०/२०२१ अन्वये.

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर - राजू बनसोडे खाली बसा गोंधळ करु नका. अन्यत: तुम्हांला बाहेर जावे लागेल. राजू मी सांगीतल आहे मी हे विषय झाल्यानंतर तुम्हांला बोलायचे तर बोलू देते. तुम्हांला अभिनंदन करायच आहेतर विषय झाल्यानंतर करानां. आपण काय सांगीतले वि.क्र. ३ वर बोलायचे परंतु तो विषय मगाच मंजूर झालेला आहे. हे विषय होवू दयात मी तुहांला बोलण्यास देते.

अॅड. मोरेश्वर शेंडगे – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ९

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.शिक्षण/आस्था/
१अ/कावि/४१८/२०२१दि. २१/१०/२०२१

नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील क्र. पीसीसी -२०२१ /प्र.क्र.५/ नवि - २२ दिनांक १४/०७/२०२१ अन्वये श्रीम. नीता नानासाहेब खैरे, उपशिक्षिका सातारा जिल्हा परिषद यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये उपशिक्षिका या पदावर पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार विशेष बाब म्हणून नियुक्ती करणेबाबत आदेश प्राप्त झालेले आहेत.

सदर आदेशामध्ये श्रीम. नीता नानासाहेब खैरे, उपशिक्षिका सातारा जिल्हा परिषद यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये उपशिक्षिका या पदावर पती - पत्नी एकत्रीकरण नियमानुसार विशेष बाब म्हणून नियुक्ती करताना पिंपरी चिंचवड महानगरपालिका महासभेची मान्यता घेणे बंधनकारक असल्याचे आदेश दिले आहेत. सदर प्रकरणी प्रस्ताव सादर केला असता मा. उपआयुक्त प्राथमिक शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील आदेशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका महासभेची मान्यता घेणेकामी विषयपत्र सादर करणेबाबत आदेश दिले आहेत.

श्रीम. नीता नानासाहेब खैरे, उपशिक्षिका, सातारा जिल्हा परिषद यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये उपशिक्षिका या पदावर पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार विशेष बाब म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ७३६ विषय क्रमांक – ९

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.शिक्षण/आस्था/ १अ/कावि/४१८/२०२१दि. २१/१०/२०२१

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.राजु बनसोडे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह. माई, तीन नंबरच्या विषयाला माझी उपसूचना होती ती मंजूर केल्याबद्दल तुमच आणि पक्षनेते नामदेव ढाके यांना मी मनापासून धन्यवाद देतो. गेले एक वर्ष आमच्या दापोडीच्या नागरीकांवर एसआरएची टांगती तलवार होती तो ठराव आज रद्द केल्याबद्दल तुमच मनापासून अभिनंदन, पक्षनेते तुमचही मनापासून अभिनंदन करतो.

मा.आशा धायगुडे-शेंडगे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर या विषयास जी आज आपण उपसूचना दिली त्या विषयाच्या हेडवरती जे काही पैसे होते ते सगळे रद्द करण्याची आपण उपसूचना दिली होती, ख-या अर्थाने एसआरएचा प्रकल्प त्यात काही ताकद होती का तर निश्चितपणे काही ताकद नव्हती. परंतु सन्मा. तत्कालीन आयुक्तांना असं वाटल की हा प्रोजेक्ट राबवावा आणि माझ्या दोपाडीतील प्र.क्र. ३० मधील जो परीसर आहे त्याचा काहीतरी विकास करावा. परंतु नागरीकांची तीथली घर त्यांची जी घरांची अवस्था होती अत्यंत चांगल्या प्रकारची घर त्या नागरीकांची आहेत अनेक लोक ठराव करु नये किंवा तीथल्या नागरीकांची इच्छा पाहीली आणि २०१९ लाच या प्रकल्पातून आपण जवळपास बाहेर पडलो होतो. त्या प्रकल्पा संदर्भात २८/११/२०१९ रोजी आपण हा प्रोजेक्ट रद्द करा माझ्या नागरीकांची इच्छा नाही अशा प्रकारच पत्र आपण सन्मा.आयुक्तांना दिलं, तुम्हांलाही दिलं आणि तुम्ही तेव्हापासूनच या विषयाच्या हेडवरचे पैसे कमी करत गेलात. परंतु राजकारण आहे, इलेक्शन जवळ आलेले आहेत, काहीतरी विषय करायचा माझ्या दापोडीतील नागरीकांची दिवाळी फार काही चांगली गेली नाही. कारण त्या सगळयांना या हेडवरचे पैसे दिसले आणि कुठेतरी असं वाटल की महानगरपालिका आता हा प्रकल्प राबवेल का आणि त्यांच्या मनात असणारा किन्तृ, परंतु काढण्याचा प्रांजळ प्रयत्न मी असेल, आम्ही चारही नगरसेवकांनी प्रयत्न केला आणि आज तुम्ही महापौर, पक्षनेत्यांनी उपसूचना स्विकारली. मा.महापौर साहेब मी सगळयांना सांगू इच्छिते की १८/१०/२०१९ रोजी माझ दुसर पत्र सन्मा.आयुक्तांकड आहे की ज्याच्यामध्ये आपण सांगीतल की या प्रोजेक्टवरती जे काही पैसे आहेत त्यांच जे बिल अदायगी आहे ती करु नये आणि तत्कालीन आयुक्तांनी ते स्विकारल. त्यांनी त्याच्यापुढची कोणतीही रक्कम दिली नाही आणि आपोआपच त्या मुकेश मेहतानी या प्रकल्पातून पाय बाहेर काढले किंवा इतरांची जी इच्छा शक्ती होती त्यातून बाहेर पडले आणि माझ्या दापोडीकरांनी एक मोकळा श्वास किंवा एक खात्रीचा विश्वास आमच्या सगळयावरती दाखवला होता परंतु पुन्हा आता रान पेटल होत, नागरीक डिस्टर्ब झाले होते आणि मग आमच्या प्रभागातील काही नागरीक याठिकाणी आले आयुक्त म्हणून त्यांची भेट घेतली तुमची

भेट घेतली आणि एकमताने निर्णय घेतला की आपण सगळयांनी एक उपसूचना करायची आणि ती उपसूचना आजच्या महासभेमध्ये मंजूर करायची आणि आपण ती मंजूर करुन जो एक दिलासा माझ्या दापोडीकरांना दिला त्यापासून सन्मा.महापौरताई तुमच मनापासून धन्यवाद व्यक्त करते आणि थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

ॲड.मोरेश्वर शेंडगे – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ७३७ | विषय क्रमांक – १० |
| दिनांक – १८/११/२०२१ | विभाग – मा.नगरसचिव |

**मा.विधी समिती**

अ) कार्यपत्रिका क्र.२१ दि.१/१०/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

ॲड.मोरेश्वर शेंडगे – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ७३८ | विषय क्रमांक – ११ |
| दिनांक – १८/११/२०२१ | विभाग – मा.नगरसचिव |

**मा.महीला व बालकल्याण समिती**

अ) कार्यपत्रिका क्र. १७ दि.२३ /९ /२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

ॲड.मोरेश्वर शेंडगे – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७३९ विषय क्रमांक – १२
दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

अ) कार्यपत्रिका क्र.१९ दि.८/१०/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

ॲड.मोरेश्वर शेंडगे – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७४० विषय क्रमांक – १३
दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती</u>**

अ) कार्यपत्रिका क्र.९ दि.१३/८/२०२१, दि.२७/८/२०२१
दि. १३/९ /२०२१ व १७/९/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) कार्यपत्रिका क्र.१० दि.१३/९/२०२१ व दि. १७/९/२०२१
चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) कार्यपत्रिका क्र.११ दि. २४/९/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

ॲड.मोरेश्वर शेंडगे – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७४१ विषय क्रमांक – १४

दिनांक – १८/११/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

**मा.शिक्षण समिती**

अ) कार्यपत्रिका क्र.१४ दि.१८/१०/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.महापौर - सभागृहाच्या भावना लक्षात घेवून पदोन्नती देत असताना आयुक्त साहेबांनी अभ्यासपुर्वक पदोन्नती दयावी, जे विषयपत्रीकेवरील विषय असतील त्या संबंधीत अधिका-यांना पुढच्यावेळेस सभागृहात बसण्याची परवानगी दयावी. पास्कोच्या कामाबद्दलची माहीती मागीतली त्याबद्दलही पुढच्या मिटींगला माहीती मिळावी त्याचप्रमाणे कुत्र्यांची नसबंदी बाबतची चौकशी करावी आणि त्याचा रितसर अहवाल समोर मांडावा. आशाताई शेंडगेनी खड्डे बुजवण्याचे काम सांगीतले होते त्यामध्ये त्यांचा एक युवा कार्यकर्ता गेला. त्या भागातले संबंधित एक्झिक्युटीव्ह आहेत त्यांनी पाहणी करुन ते काम केलेले आहे का नाही नसेल केलेतर त्यासाठी आदेश दयावे असे मी आयुक्तना आदेश देते, त्याचप्रमाणे जे काही जनावरे दुखापत झालेले आहेत त्याबाबत सारीका बो-हाडे यांनी विषय मांडला मी सारीकाताईच कौतूक करते, भटक्या कुत्र्याच वगैरे हे खुप वर्षापासून चाललेल आहे, भटक्या कुत्र्यांना काही कारणास्तव आपल्याला बंदीस्त ठेवता येत नाही आणि मुक्या प्राण्याचे हाल करणं ते कायदयात बसत नाही त्याच्यावर गुन्हा दाखल होतो म्हणून आपल्याला फक्त नसबंदी करुन आपण त्या कुत्र्यांना जीथ होत तीथ सोडतो. त्यामध्येही काही डॉक्टरांच्या चुका झालेल्या आहेत परत त्या कुत्र्यांना पिल्ल झालेले आपल्याला पाहीला मिळतात तरी अति.आयुक्त आपल्याला सांगते की हा जो काही सावळागोंधळ आहे त्याची खरी काय परिस्थिती आहे त्याची आपण चौकशी करा म्हणजे आम्हांला देखील आपल्याला अति.आयुक्त (१) म्हणून आपल्याकडे पाहण्याचा आमचा दृष्टिकोन चांगला राहील. असा सावळागोंधळ जर सभागृहात होत असेलतर तीन अतिरीक्त आयुक्त व एक आयुक्त यांची जरुरत आहे की नाही हे सभागृहाने ठरवाव. एक उच्च शिक्षीत पशुवैदयकीय डॉक्टर जर अशा पध्दतीचा सावळागोंधळ करीत असेल आणि सभागृहाला आणि आपल्या सारख्या नगरसेवकांना बदनाम करायचा प्रयत्न करत असेलतर त्या डॉक्टरांच काय करायच हे पुढच्यावेळेस आपल्याला डिसीजन घ्यावा लागणार आहे. त्या अगोदर त्यांची आम्हांला माहीती दयावी खरी माहीती आमच्या समोर आल्याशिवाय आज आम्हांला तात्काळ डिसीजन घेता आला नाही. जनावरे दुखापत झालेले आहेत मला असं कळतय की आपण जे कुत्र्यांची नसबंदी करतो ती केल्यानंतर त्या कुत्र्यांच्या अंगाला पुर्ण खाज सुटते व त्यामुळे त्यांची सगळी स्कीन निघत जाते त्यामुळ त्याच आयुष्य आपोआप कमी होत असं डॉक्टरांच म्हणण आहे अस आपल्याला डॉक्टर सांगतात तरी याची देखील आपण रितसर चौकशी करुन ते कुत्र पिसाळलेल

आहे का नाही हे सुध्दा बघण आवश्यक आहे कारण आपण ते पिसाळल आहे या नावान त्याचा प्रचार करतो आणि ते चावल्यानंतर पुढची जी ट्रिटमेंट आहे ती अगदी लाँग प्रोसिजरने घ्यावी लागते तरी त्याचा देखील विचार करुन जी दुखापत झालेली जनावर आहेत, जी कुत्री आहेत यांचेसाठी मा.आयुक्त साहेब मी आपल्याला आदेश देते की सारीकाताईनी मांडलेला प्रश्न आहे की कुत्र किंवा जनावर असेल ते दुखापत झाली आणि डॉक्टरांना फोन केलातर ते म्हणतात त्यांना आमच्या पर्यंत घेवून या हे काही खर वर्तन आहे का ही अशी डॉक्टरांची भाषा जी आहे ती एकदम चुकीची आणि राँग आहे. ते जर कडेवर लहान बाळ असेलतर नक्कीच सारीकाताई आपल्यासारख्यानी तीथपर्यंत पोहचवल असतं पण जनावर गाडीत टाकून नेण्याच एवढ सोप नाही, लेडीज नगरसेवीका आहेत, आणि जो असे उत्तर देतो त्या अधिका-यांना सस्पेन्ड करा हाही आपल्याला आदेश देते. त्याच बरोबर जागेवर जावून त्या जनावराची ट्रिटमेंट कशी होईल याकरिता आपण सतर्क रहा. पुढच्यावेळेस जखमी झालेल्या सर्व जनावरांची ट्रिटमेंट झालेली आम्हांला पाहीला मिळाली पाहीजे. सारीका ताई जे जनावराला जखम झालेली आहे त्यांची ट्रिटमेंट झालेली आहे का नाही त्यांना औषध, बँडेज हे झालेल आहे का हे देखील आपण लक्ष ठेवा. आपण चांगला विषय मांडला आहे. मुक्या जनावराला खुप त्रास होत असतो, त्याला बोलता येत नाही, त्याच्या डोळयातून पाणी आलेल आपल्याला पाहीला मिळतं. तरी त्यांच जे काही दुख आहे ते आपण सभागृहात मांडल ते मला खुप बरं वाटल तुमच्याकडून एक वेगळ मला ऐकायला मिळाल. कारण कुत्र्याचा विषय नेहमीच चालतो आता आठ्ठावीस वर्ष झाल आहे मी देखील सभागृहात आहे पण सारीका मी तुझ मनापासून कौतूक करते आणि आपल्याला एक सूचित करते की अति.आयुक्तांना मी सांगीतल आहे की मुक्या जनावरांना मलमपट्टी, वैदयकीय ट्रिटमेंट झाली पाहीजे, ती मिळाली पाहीजे या दृष्टिकोनातून तीकडे सुध्दा लक्ष दयाव. पुनश्च एकदा सगळयांचे मनपुर्वक आभार मानुन आजची सभा संपली असे मी जाहीर करते.

-------

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/५/कावि/ ९१८ /२०२२
दिनांक - १०/१/२०२२

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील
योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.